म. ग्रं. स. ठाणें.
विषय भू-प्रवास
सं. क्र. 638
REFBK-0026558

संदर्भ
भू.प्रवास
७३८
२६५५८
३।९२

अभि

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :—खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, ...न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे ...रा वर्गणी भरावी लागेल.

9 MAY 1992
3 MAY 1992
9 AUG 1992
6 AUG 1992
3 SEP 1992
6 SE 1992
OCT 1992

31 OCT 1992
11 NOV 1992
2 DEC 1992
12 MAY 1993
13 JUL 1993
17 JUL 1993
(क्र. मी. पह)
8 MAR 1995
19 OCT 1994

# इब्सेनच्या नॉर्वेत

अनिरुद्ध कुलकर्णी

REFBK-0026558

श्रीविद्या प्रकाशन
२५०, शनिवार पेठ, पुणे ३०

इब्सेनच्या नॉर्वेत

प्रकाशक :
दामोदर दिनकर कुलकर्णी
श्रीविद्या प्रकाशन
२५० शनिवार, पुणे ३०

सर्व हक्क सुरक्षित
प्रथमावृत्ती १९९१

मुखपृष्ठ
कमल शेडगे

मूल्य साठ रुपये

टाईप सेटिंग
आर. एम्. टाईपसेटर्स
१२०४/२५ पुरंदरे रस्ता
शिवाजीनगर, पुणे ४

मुद्रक
महाराष्ट्र सहकारी मुद्रणालय
९१५ शिवाजीनगर
पुणे ४

In Ibsen's Norway

Publishers
D D Kulkarni
Shrividya Publishers
250 Shanivar, Pune 30
India

All Rights Reserved
First Edition 1991

Art work
Kamal Shedge

Rs Sixty only

Type - setting
R M Type setters
1204/15 Purandare Lane
Shivajinagar, Pune 4

Printers
Maharashtra Sahakari Press
915 Shivajinagar
Pune 4

५३८
२६५५८
७।३।९२

# साभार ऋणनिर्देश

रोटेरियन्स श्री. ब्योर्न व सौ योरून वीगान्ड (Rtn DG Bjorn and Ann Jorun Wiegand, Bergen), प्रो आसब्योर्न व प्रो इंगेर ऑर्सेथ (Professor Asbjorn and Prof Inger Aarseth, The University of Bergen), श्री हेनिग व सौ ओद हेन्रिकसन, (Rtn PDG Henning and Ann Aud Henriksen, Os), श्री इयान व सौ रॉन्दी ह्योग (Rtn Jan and Ann Rondi Hoeg, Oslo) श्री ब्योर्न व सौ. मार्गरिट बात (Rtn Bjorn and Ann Margaret Bat, Skien), श्री एव्हर्ट व सौ उज्ज्वला ॲण्डरसन, स्तोकहोल्म, रोटे पीडीजी लक्ष्मीकान्त भोजवानी, रोटे पीडीजी सतीश कौशिक, बर्जोर कूपर, श्री मुकुंदराव नवाथे व बाबूभाई लाखाणी, लंडन, श्री वसंतराव जोशी, प्रमुख ग्रंथपाल, ब्रिटिश लायब्ररी पुणे, तर्कतीर्थ जोशी, वाई, कै विनायक राजगुरू, श्री. मधुकाका कुलकर्णी, श्रीविद्या प्रकाशन, श्री सदा डुंबरे, साप्ताहिक सकाळ, श्री अनिल किणीकर, गुलमोहोर, श्री. अरुण खोरे, लोकसत्ता, पुणे

## १. नव वर्षाची सुरुवात

एक जानेवारी १९९० नव्या वर्षाची पहिली तारीख मुद्दाम नक्की केली होती येथून निघालो तो या दिवशी आणि नॉर्वेच्या पश्चिम किनाऱ्यावरील बेर्गेन शहरात पोहोचलो तोही याच दिवशी मुंबईहून पहाटे १२ - ५० ला ब्रिटिश एअरवेजने निघालो वाटेत लंडनला साडेचार - पाच तास गेले. विमान बदलले आणि बेर्गेन विमानतळावर उतरलो तेव्हा दुपारचे साडेतीन वाजले होते, पण अंधार पडायला सुरुवात झाल्यासारखे वाटत होते आणि सर्वत्र पांढरे शुभ्र हिम चमचमत होते.

शाळकरी मुले नॉर्वेला मध्यरात्रीच्या सूर्याचा देश म्हणून ओळखतात, तर काही मुलांच्या लक्षात नॉर्वे हा उत्तर ध्रुवानजीकचा एक देश असून, तेथे काळवीटासारखी शिंगे असणारे रेनडिअर असतात किंवा पेंग्विन पक्षी असतात, हे पुसटसे नोंदलेले असते आवर्जून तेथे जावे, असे मात्र निश्चितच कोणाच्या मनात नसते मी आणि रेखा नॉर्वेत उतरलो तेव्हा माझ्या लेखी मात्र माझे पाय इब्सेन या विश्वविख्यात नाटककाराच्या भूमीला स्पर्श करीत होते माझ्या डोक्यात इब्सेनची सारी पंचवीस नाटके होती त्याच्या चरित्राची खडान् खडा माहिती होती, तर रेखाच्या मनात नॉर्वेजियन एम्बसीने दिलेल्या पुस्तकाची अभ्यासलेली पाने होती.

सर्वस्वी परकीय आणि अपरिचित अशा भूमीवर आपण प्रथम उतरतो तेव्हाचे प्रथम दर्शन आणि मनाची स्थिती शब्दातीत असते तिचा ठसा पुसून जाण्यासारखा नसतो तसा अनुभव याही वेळेला आला विमानातून वरून जेव्हा नॉर्वेचे दर्शन घेतले, तेव्हा ते गंभीर होते, काहीसे उग्र होते वर ढगाच्या थरावर सूर्यप्रकाश डोळे दिपवीत होता, पण खाली नॉर्वेचा किनारा, असंख्य बेटे - मात्र अंधुक, पुसट वातावरणात खिन्न वाटत होती. समुद्राचे निळसर - काळसर पाणी, खडकाळ बेटे आणि किनाऱ्यावर अधूनमधून दिसणाऱ्या जंगलाचे हिरवे - हिरवे पुंजके जणू काहीच सांगत नव्हते. हिम पडल्यामुळे पांढरे दिसणारे काही भाग हसत होते आणि नव्हतेही. जरा खाली आल्यावर विमानातून दिसणारी घरे मात्र कमालीची सुंदर दिसत होती. त्यांच्या भोवतीचे परिसर सुंदर आणि स्वच्छ होते, हे वरूनही समजत होते.

प्रत्यक्ष विमानतळावर, जेव्हा भूमीवर पाय ठेवले, तेव्हा मन विलक्षण शांततेने भारून गेले होते नीरव, निवांतता भोवती आणि मनात एकाच वेळी दाटून होत्या. फ्यूअं,

पाईन आणि बर्चची झाडे नजरेत भरत होती आणि त्याच्या शिल्लक सागाड्यावर हिम साचलेले होते. हिवाळ्याच्या म्हणून खुणा असतात, त्या वातावरणात सर्वत्र होत्या गार झोंबणारा वारा वाहत होता उजेड होता आणि क्षितिजावर तांबडा प्रकाश होता, पण सूर्यबिंब मात्र दिसत नव्हते आमचे विमान हे विमानतळावर उतरले होते की, एखाद्या जंगलात ? मी माझ्या खिशातून हात बाहेर काढला तेव्हा त्या हातात एक इवलीशी गुलाबाची पाकळी होती माझी पुतणी अमृता हिने दिलेल्या गुलाबाची एकमेव पाकळी ती पाकळी मी त्या झोंबऱ्या वाऱ्यावर सोडून दिली एक लहानशी शिरशिरी माझ्या अंगातून वाहत गेली इतर सर्वच गोष्टींचा मला जणू विसर पडला होता अनेक वर्षे मनात असलेले एक स्वप्न आता स्वप्न राहिलेले नव्हते हजारो मैल मागे टाकून मी आणि माझ्या नादाने रेखा एका वेगळ्याच वास्तवात येऊन पोहोचलो होतो

बाहेर पडायला अपेक्षेपेक्षा जास्त वेळ गेला माझी अपेक्षा अशी होती की, आम्हाला न्यायला श्री ब्योर्न वीगाड आणि त्याच्या पत्नी योरून हे येतील त्यांनी आम्हाला नॉर्वेला निमंत्रित केले होते पण तावदानाबाहेर लाबवर जी माणसे उभी होती ती वेगळी होती वीगाड दांपत्याला आम्ही पुण्याला भेटलो होतो. बाहेर उभी असलेली माणसे आमच्याकडे पाहत होती. कदाचित त्यांनी आम्हाला ओळखले असावे आमचे पासपोर्ट व व्हिसा काळजीपूर्वक तपासले जात असताना माझे लक्ष शेजारी गेले आणि मी चमकलो.

होय ! तो एक भव्य ट्रोलच होता आणि आमचे स्वागत करीत होता

ट्रोल म्हणजे नॉर्वेजियन लोककथेतील विनोदाचा स्पर्श असणारे राक्षसी भूत अशा एका ट्रोलचा भव्य पुतळा आम्हाला अभिवादन करीत होता मला हायसे वाटले. अत्यंत पॉश झगमगीत दालनात शुकशुकाट होता. तेथे एक परिचित मित्र भेटल्यासारखे वाटले

हा अधिकृत ट्रोल आहे काय ? मी सुरक्षा अधिकाऱ्याला विचारले तो अधिकारी हसला आणि क्षणार्धात आमची मोकळीक झाली आम्ही कायमचे मुक्काम ठोकायला आलेले निर्वासित नसून, रोटरी संघटनेचे व बेर्गेन विद्यापीठाचे सहा आठवड्याचे पाहुणे आहोत, हे ऐकून त्याचा जीव भांड्यात पडला असावा

आमच्या मोठ्या सूटकेसेस घेऊन आम्ही बाहेरच्या प्रशस्त दालनात आलो. आम्हाला सामोरे आलेले गृहस्थ होते, एक प्राध्यापक आसब्योर्न ऑर्सेथ आणि दुसरे होते रोटरीचे भूतपूर्व गव्हर्नर हेनिंग हेन्रिकसन. माझी उंची सहा फुटास एकच इंच कमी, पण माझ्यासमोर उभे असणारे दोन्ही मित्र साडेसहा फूट उंचीचे होते आणि दणदणीत

शरीरयष्टीचे होते मी हातमोजा काढला आणि दोघाशीही भक्कम हस्तांदोलन केले, माझ्या हातात प्रचड आनद जमा झाला होता तो सारा त्या हस्तांदोलनात व्यक्त होऊ पाहत होता मी माझे व रेखाचे नाव सागितले, हेन्रिकसननी त्याची टोपी हातात घेतली व माझे स्वागत केले

'सो हिअर यू आर ! वेलकम् !'

ऑर्सेथ आणि माझा गेल्या तीन वर्षांचा पत्रव्यवहार होता त्यानी रेखाशी हस्तांदोलन केले व नतर माझ्याशी. नजरेला नजर मिळाली आणि पत्रमैत्रीचे रूपातर क्षणात प्रत्यक्ष मैत्रीत झाले. त्या दोघाना झालेला आनद इतका होता की, त्यांनी आमच्या बॅग्ज उचलल्या. माझी बॅग मला परत मिळविण्यासाठी आग्रह करावा लागला बोलता बोलता आम्ही विमानतळाच्या बाहेर असणाऱ्या कार पार्कच्या दिशेने चालू लागलो

एकमेकापासून चौदा हजार मैलावर दूर असणारी माणसे एका क्षणात एकमेकाची होतात हेन्रिक इब्सेनच्या नाट्यालाही मागे सारेल, असे हे खरेखुरे नाट्य असते आणि इब्सेनच त्याचे कारण असते

प्रा ऑर्सेथ आणि हेन्रिकसन यानी काही वेळ नॉर्वेजियनमधून बातचीत केली. मी ती लक्ष देऊन ऐकली नाही माझे लक्ष सभोवती भिरभिरत होते बेर्गेनचा तो छोटेखानी पण देखणा विमानतळ, भोवतालची निष्पर्ण झाडे, मोजक्या इमारती मी पाहून घेत होतो श्री. वीगाड बाहेरगावी गेले असल्याने आम्ही सुरुवातीचे दोन दिवस हेन्रिकसन याच्या घरी राहणार होतो आणि हेन्रिकसन याचे घर विमानतळापासून तीस किलोमीटरवर उस (Os) या गावी होते. हा उलगडा मला झाला तेव्हा आम्ही हेन्रिकसनच्या मोटारीत बसल्यासारखे होतो ऑर्सेथ आमचा निरोप घेत होता. उद्या विद्यापीठावर गाठ - भेट होणारच आहे, असे म्हणत होता.

मोटारीत बसलो. पट्टे आवळले म्हणजे स्वत ला सीटवर बाधून घेतले बेर्गेन विमानतळावरून उस या गावी येईपर्यंत हेन्रिकसन मला व रेखाला त्याच्या विश्वासू आणि आश्वासक स्वरात प्रश्न विचारीत होते व आम्ही उत्तरे देत होतो, पण माझे खरे लक्ष रस्ता आणि सभोवताली असलेल्या अत्यत भिन्न अशा निसर्गाकडे होते तीस किलोमीटरपर्यंत मी तो निसर्ग काळजीपूर्वक पाहत राहिलो. उच सूचिपर्ण वृक्षाच्या राई, आपल्या डोंगराएवढेच, किंबहुना किंचितसे कमी डोंगराळ भाग, विस्तीर्ण पाणी सामावणारे फ्योर्डस्, तळी, डोंगर उतारावर बसविलेली आखीव - रेखीव घरे, त्यात मदपणे चमचमणारे असख्य दिवे, आकाशात असलेले गडद ढग, चहुकडे दिसणारे हिम, मधूनच पाणथळ जागी दिसणारी बदके व हस आणि मोर दिसणारा काहीसा अरुद पण

सुस्थितीतील भरधाव रस्ता, सारखे लागणारे चढ - उतार. तुलनाच करायची झाली तर काश्मिरच्या निसर्गाखेरीज दुसरे काही डोळ्यासमोर येऊ शकत नव्हते आणि तरीही खूप फरक होता, असे जाणवत होते नॉर्वेच्या निसर्गाची ही अतुलनीयता जी पहिल्यादा जाणवली, ती अखेरपर्यंत टिकली आणि त्याचे सौंदर्यदेखील मोहवीत राहिले

□

## हेन्रिकसन यांच्या घरी

२.

हेनिग हेन्रिकसन याच्या घरी आम्ही अनेक वेडीवाकडी वळणे घेत येऊन दाखल झालो. डोंगर - उतरणीवर हे दुमजली घर होते, आहे नतर काही नॉर्वेजियन - नोर्स्क - घरातून आम्ही राहिलो. अनेक घरे पाहिली, परतु माझ्या मनावर पक्का ठसा उमटला तो या घराचा हे घर मी काळजीपूर्वक पाहिले आणि नतर त्याचा आराखडाही रेखाटला. त्याचे अधिकृत नकाशेदेखील बरोबर घेतले.

डोंगर - उतरणीवरील, लाकडी दुमजली घरे हे नॉर्वेचे वैशिष्ट्य आहे घराची छपरे तिरकी असतात आणि भव्य असतात त्यामुळे तळमजला आणि वरचा मजला आपोआपच तयार होतात घरे बाहेरून छोटी वाटतात, पण प्रत्यक्षात ती प्रशस्त असतात अगदी लहान घरातूनही सात - आठ खोल्या सहज असतात आणि माणसे मात्र मोजकी. बहुतेक घराना तळघर किंवा तळघरवजा भाग असतोच. त्यामुळे घरात अडगळीसारखे वाटेल, असे वर - सामान झाकलेले बाजूला राहते. प्रत्येक घराला जिना हा असतोच आणि परपरेशी नाते राखणारे छपरातून वर डोके काढणारे चिमणी - धुराडे. नोर्स्क घराच्या खिडक्या मोठमोठाल्या असतात आणि दुहेरी भव्य काचानी झाकलेल्या असतात. बाहेरचा निसर्ग आणि घरातील वास्तव्य याचे दृश्य आणि प्रत्यक्ष नाते तुटत नाही उच इमारती आणि फ्लॅट्स हा प्रकार नॉर्वेत नाही असे नाही, पण तो बेर्गेन, उस्लो अशा मोठ्या शहरात आहे व तुरळक आहे आणि अशा ठिकाणी देखील उच इमारती राहण्यासाठी वापरल्या जात नाहीत, तर ऑफिसाच्या जागा म्हणून वापरल्या जातात. राहण्यासाठी मध्यम किंवा मोठे दुमजली घर हेच सर्रास उपलब्ध आहे. नोर्स्क मनुष्य हे घर आजही जिवापाड जपतो आणि बदल्यात हेच घर नोर्स्क माणसाला जतन करते आहे.

हेन्रिकसन याचे घर प्रशस्त होते खालच्या मजल्यावर सहा खोल्या आणि वरच्या मजल्यावर मोठा दिवाणखाना, स्वयपाकगृह आणि दोन बेडरूम्स व स्वच्छतागृह.

आमचा मुक्काम खालच्या मजल्यावरील एका बेडरूममध्ये होता आणि आमच्या बेडरूम पलीकडे हेनिंगची पुस्तकाची गच्च भरलेली अभ्यासिका होती मौज म्हणजे अशी अभ्यासिका की जिच्यातील बहुतेक सर्व पुस्तके मी न पाहिलेली आणि न वाचलेली होती त्यामुळे मला माझ्या अज्ञानाचेही भरपूर कौतुक वाटत राहिले. हेन्रिकसनचे घर म्हणजे एक म्युझियमच होते अनेक चित्रे, पेंटिंग्ज, जमविलेल्या वस्तू, सुदर फर्निचर आणि पुस्तके. आणि पुढे असे आढळले की हे घर अपवाद नव्हते. नॉर्वेत लोकसंख्या फक्त चव्वेचाळीस लाख असली तरी अशी घरे असख्य आहेत. बाहेर आठ - दहा महिने थडी असल्याने, गारठा असल्याने नॉर्वेजियन माणसे घरातील वास्तव्याला काळजीपूर्वक जोपासतात घरावर खूप खर्चही करीत राहतात. सुतारकाम, बाधकाम. प्लबिग, पडदे शिवणे अशा कामात सर्वसामान्य माणसे सरावलेली असतात दुसऱ्याकडे जाऊन गप्पा - सप्पा मारण्यापेक्षा आणि गावकुचाळक्या करण्यापेक्षा तो घरकाम करणे पत्करतो आणि ' सोशल लाईफ ' पेक्षा स्वत:कडे जास्त लक्ष देतो

हेन्रिकसनच्या वरच्या मजल्यावरील दिवाणखान्याची दर्शनी भिंत काचाची होती समोर पसरली होती झाडीत दडलेली तुरळक घरे आणि पलीकडे डोंगररागा. त्यातील एक शिखर जरा उच होते का कोण जाणे पण मला त्या शिखरावर शिवाजी महाराच्या किल्ल्यासारखा एखादा किल्ला असेल असे वाटत राहिले आणि त्यावर चाललेला उजेडाचा घावता खेळ पाहून पॉल सेझानच्या पर्वत - शिखराच्या चित्राची आठवण येत राहिली. नॉर्वेवर माझा हळू हळू विश्वास बसत गेला त्यात या शिखराचा अनुभव कारणीभूत ठरला या शिखराच्या आसपासची व पलीकडची काही शिखरे पाढऱ्याशुभ्र हिमाने झाकलेली होती पण हे शिखर मात्र गडद हिरवेगार होते.

महाबळेश्वरच्या डोंगराकडे पाहिल्यावर मला जसे घरी, आपल्या घरी आल्यासारखे वाटते तसेच या शिखराकडे पाहिल्यावर मला वाटत राहिले परिणामी हेन्रिकनसच्या घराविषयी मला आपुलकी निर्माण झाली तशी आपुलकी इतर घरांविषयी निर्माण झाली नाही.

हेनिंग हेन्रिकसन एका ज्युनिअर कॉलजचे प्राचार्य म्हणून निवृत्त झालेले. नॉर्वेजियन भाषा व साहित्य हाच त्याचा विषय. दुसऱ्या महायुद्धाचा अनुभव असलेले आणि जर्मनाची कैद भोगलेले हे गृहस्थ मनाने अतिशय उमदे पण सावध, जग पाहिलेले पण अस्सल नॉर्वेजियन, भारतातून आलेल्या ' इडियन इब्सेनअ एक्सपर्टअ ' ला त्याच्या हाती सोपविणे उचित होते निवृत्त असल्याने मला देण्यासाठी त्याच्याजवळ वेळ व सुविधा होत्या तर मला त्याच्यासारख्या अनुभवी, साहित्यिक पिंडाच्या माणसाच्या साथीची आवश्यकता होती. मी नॉर्वेत आलो तो वीगाड पतिपत्नींमुळे पण माझा

नॉर्वेतील मुक्काम आणि काम यशस्वीरीत्या अर्थपूर्ण झाले ते हेनिंग हेन्रिकसन याच्यामुळे इब्सेनविषयी झाडून जे जे करता येण्याजोगे होते ते ते त्यांनी माझ्यासाठी घडवून आणले. आणि सक्तीसारखे न होऊ देता आवर्जून मला करायला लावले विशेष म्हणजे रेखालाही त्यात आनंदाने करता येईल तेवढे सहभागी करून घेतले इब्सेनच्या नाटकाच्या ' टेक्स्ट् ' चे माझे ज्ञान त्यांनी वारवार तपासले आणि त्यांना जेव्हा ते ' डीप अँड वाईड ' आहे हे खात्रीने वाटू लागले तेव्हा ते इतरांजवळ माझ्याविषयी कौतुकाने परंतु एखादे गुपित आपण सांगत आहोत अशा थाटाने बोलू लागले माझ्याशी बोलताना इब्सेनविषयीची प्राथमिक माहिती टाळून फक्त त्यांच्यादृष्टीने जी मर्मस्थळे आहेत त्याविषयी बोलत राहिले

स्वत हेनिंग, पत्नी ओद आणि मुलगी लिव रायडून हे त्या घरात राहत होते एक आनंदी आणि निर्मळ कुटुंब. त्यांच्या दोन वडील मुली इतरत्र त्यांच्या घरी राहात होत्या एकीचे लग्न झालेले होते तर दुसरी नर्स मुलगी ' अनमॅरिड कपल ' म्हणून सैन्यातील एका डॉक्टरबरोबर राहात होती. नॉर्वेतील आमचे पहिले जेवण - सध्याकाळी साडेपाच वाजताचे डिनर - जोरदार होते. खास मेणबत्त्याही लावण्यात आल्या होत्या रेनडियरचे मास शिजविण्यात आले होते ते खाताना मी, रेनडियर हा नॉर्वेचा राष्ट्रीय प्राणी असल्याने तो मारला जात नसावा असे मला वाटल्याचे सांगितले आणि मी खाण्यात गाईचे व डुकराचे मास टाळतो असेही स्पष्ट केले.

धार्मिक भावना दुखवू नयेत हा माझा या मागचा हेतू असतो हे सांगितल्यावर त्यांना मौज वाटली

डिनरच्या वेळी एक इटालियन तरुण आमच्याबरोबर होता. लिव रायडूनचा तो मित्र होता. गेले आठवडाभर तो या घरी पाहुणा म्हणून राहात होता लवकरच माझ्या लक्षात आले की त्याला जावयाला दिली जावी तशी वागणूक मिळत होती आणि तिचा तो उत्फुल्ल मनाने उपभोग घेत होता. शिरू रोबेर्तो हे या देखण्या तरुणाचे नाव होते तो इटलीमधील सासारी या गावाहून येथे आला होता लिव रायडून व त्याची मैत्री लडनमध्ये एका भाषाविषयक शिबिरात झाली होती आणि तिला आता पालवी फुटत होती कळ्या धरत होत्या. त्याच्या आयुष्यात आलेला पहिला इंडियन माणूस म्हणून रोबेर्तोने माझ्यावर प्रश्नांची सरबत्ती चालविली. त्याला भारताविषयी थोडीशी आणि रजनीश आणि स्वामी चिन्मयानद यासारख्या माणसांविषयी काही माहिती होती उलट मी त्याच्याकडून इटलीविषयी मला काही असलेल्या प्रश्नांची उत्तरे मिळवीत होतो. आम्हा सर्वांनाच इग्लिश येत असल्याने सभाषण सुरळीत होत होते, फक्त त्याची गती धीमी राखावी लागत होती.

नॉर्वेजियन माणसाना इटलीविषयी कायमचे कुतूहल आणि जिव्हाळा आहे. इटली कॅथलिक आहे तर नॉर्वे प्रोटेस्टट. पण हे कुतूहल अबाधित आहे याचे कारण इटलीतील सूर्यप्रकाश आणि ऊब इटलीतील वेगळे भूमध्य सामुद्रिक निसर्ग सौंदर्य, उलट उत्तर ध्रुवाच्या अगदी नजीक राहणारी माणसे म्हणून नॉर्वेजियन मडळींविषयी व नॉर्वेविषयी इटालियन, स्पॅनिश लोकाच्या मनात आकर्षण असते, पण त्याची तीव्रता बेताची असते इटालियन स्त्री - पुरुष आपल्याकडील काश्मिरी माणसासारखे रेखीव, देखणे असतात, त्याचे गोरेपण केतकी वर्णाकडे झुकते व डोळे आणि केस काळे असल्याने ते खुलते उलट नॉर्वेजियन स्त्री - पुरुष सहा - साडेसहा फुटी असतात खूपच धडधाकट असतात. त्याचे गोरेपण पाढरेपणाकडे झुकते आणि डोळे निळे असल्याने ते आपल्याला ' शकित ' वाटते. नॉर्वेजियन माणसाची नजर आपल्यावर रोखलेली आहे असे कधीच वाटत नाही उलट ते त्याचेच काही स्वप्न पाहात असावेत असे वाटते. इब्सेनला इटलीविषयी कमालीचे प्रेम होते आणि त्याने साडेअकरा वर्षे इटलीत वास्तव्य केले होते त्याची सर्वश्रेष्ठ मानली जाणारी ' *पेअर ग्यून्ट* ' व ' *ए डॉल्स हाऊस* ' ही भिन्न प्रकृतीची दोन्ही नाटके इटलीतच लिहिली गेली हे सारे विचार माझ्या मनात जेवताना आले आणि मी ते रोबेर्तो आणि लिव रायडून याना बोलूनही दाखविले. ' यू अण्डरस्टॅण्ड मेनी थिंग्ज ' असे लिव रायडून मला म्हणाली, तेव्हा ती रोबेर्तोकडे बघत होती आणि मी ओद बाईंकडे बघत होतो. त्याच्या चेहऱ्यावर मिस्किल आणि खोचक हास्य तवगले होते रोबेर्तोचा मुक्काम दुसऱ्या दिवशी हलणार होता.

पाच साडेपाचलाच रात्रीचे ' डिनर ' घेताना विचित्र वाटत होते मात्र बाहेर अधार पडल्याने ती रात्र आहे हे मानणे भाग होते रात्री नऊ साडेनऊच्या सुमारास परत कॉफी, केक झाले पण गप्पा लांबतच गेल्या झोपायला पाऊण झाला. पुढे साऱ्या मुक्कामात असेच होत राहिले उजाडे दहाला आणि मावळे पाचला त्यामुळे हिंडून फिरून पाहायला वेळ कमी पण चर्चा, मुलाखती, इनडोअर गोष्टी करायला वेळ भरपूर असे होई आणि स्कॅण्डिनेव्हियातील हिवाळा तर मी मुद्दाम मागून घेतला होता याच्या नेमके उलट चित्र उन्हाळ्यात असते मी ते टाळले होते. स्कॅण्डिनेव्हियातील हिवाळ्यालाही आपण सामोरे जाऊ शकतो, हिमवृष्टी, गार झोंबरे वारे, अधार यातही आपली इच्छाशक्ती जागृत राहू शकते हे मला पाहायचे होते ' सेंट्रल हीटिंग ' च्या आधुनिक तत्रामुळे हे अवघड जात नाही हे लक्षात आले

आम्हाला दिलेल्या बेडरूममध्ये झोपताना मी सुखावलो होतो. नव्या वर्षाची सुरुवात मी नवा देश, नवी माणसे, नव्या दिशा यानी केलेली होती रेखाच्या आणि माझ्यात मूलभूत फरक होता. ती प्रवासी भारतातून आलेली पाहुणी होती तिच्या हालचालींना

टाइमटेबल होते पण तिचे मन मोकळे होते मी प्रवासी पाहुणा होतो त्याहीपेक्षा मी यात्री होतो माझ्यासमोर ' मिशन ' होते निश्चित उद्दिष्ट होते माझे नाणे खणखणीत आहे हे एका परक्या देशात सिद्ध करायचे होते झोपताना मी सुखावलो होतो कारण हे होऊ शकते आणि होणार हा विश्वास मला आला होता मी झोपलो तो निश्चित मनाने झोप कधी लागली ते कळले नाही ओव्हनची उष्णता थोडी वाढविण्याचेही विसरलो

□

## पहिली जाग ३.

सहाला जाग येण्याची आणि उठण्याची सवय त्याप्रमाणे जाग आली. क्षणभर गागरलो पण दुसऱ्या क्षणी मन झर्रकन जाग्यावर आले टेबल लॅम्प लावला आणि मद प्रकाश खोलीत पसरला काही वेळ ती खोली बारीक न्याहाळत पडलो बाहेर गच्च अधार होता खरे म्हणजे केव्हा एकदा उठतो, आवरतो नि बाहेर पडून गोष्टी पाहतो असे झाले होते पण इलाज नव्हता समोरच्या कॉटवर रेखा गाढ झोपेत होती तिचा चेहरा छोट्या मुलीसारखा वाटत होता

नॉर्वेजियन बेडरूम्स मोठ्या नसतात दहा बाय दहा किंवा दहा बाय पधरा एवढा त्याचा आकार असतो. कमी उचीचे पलग पण त्यावर जाड व मऊ गाद्या आणि त्यावर गादीएवढे जाड पाघरूण जाड व मऊ उशा जमिनीवर जाड गालिच्यासारख्या पण एकरगी सतरज्या अतिनाजूक व कलात्मक वॉलपेपरने सजविलेल्या पातळ भिती आणि त्याच्यावर लहान आकाराच्या विविध तसबिरी. लहानशा खोलीतही तीन - चार दिवे असतात.

आपल्याकडे वापरल्या जातात तशा ट्यूब्ज घरात क्वचितच दिसतात आणि दिवेही कधी शेड्सशिवाय दिसणार नाहीत वेगवेगळ्या ऋतूतील निसर्गचित्रे किंवा लहान नातेवाईक मुलाची चित्रेही बेडरूममध्ये असतात पण सर्वांत महत्त्वाचा असतो तो खोलीतील ओव्हन. खोलीचे तपमान तुम्हाला हवे ते ठेवता येणारी विजेची शेगडी. १२५, २५०, ५००, १००० असे आकडे दर्शविलेले असतात वेळ आणि तुम्हाला नेमके हवे असणारे तापमान याचे गणित माडूनच हा आकडा निवडायचा सेंट्रल हीटिंग चालू असले तरी या शेगडीची आवश्यकता असते कारण बाहेरचे तपमान - ४° ते - १०° पर्यंत खाली उतरू शकते. काही वेळा जास्तही खाली जाऊ शकते, मायनस तीस - पस्तीस पर्यंत. मी साधारणपणे २५० या आकड्यावर शेगडी ठेवीत असे, आणि

नंतर वाटेल त्याप्रमाणे तपमान कमी - जास्त करीत असे. अर्थात सेंट्रल हीटिंग आणि ओव्हन्स इब्सेनच्या काळात १९ व्या शतकातील नॉर्वेत नव्हते हे मी मलाच बजावून सांगितले.

आपण भारतीय आणि मराठी माणसे दिवाणखाने नीट ठेवू पाहतो पण आपल्या बेडरूम्स कलात्मक आणि नीटनेटक्या नसतात तर इकडे कडाक्याचा गारठा आणि बंदिस्त घरे यामुळे बेडरूमसही व्यवस्थितपणापलीकडे मजल मारू शकत नसणार असा अंदाज मी केला. फ्रेंच बेडरूमसची सर अर्थातच मी येथे अपेक्षित नव्हतो, आणि तरीही येथील सौंदर्य व नीटनीटकेपणा मला जाणवत होता.

बेडरूमसप्रमाणेच येथे वैशिष्ट्यपूर्ण दिसली ती घरात शिरतानाच आढळणारी क्लोक रूम जिन्यालगतच ही खोली असते आणि तिथे जोडे जसे ठेवलेले असतात तसेच अनेक तऱ्हेचे कोट टांगून ठेवलेले असतात. जाड वूलनचे निळ्या, तांबड्या रंगाचे किंवा जुने फरचे, अलीकडील रेक्झिन लावलेले वजनानी हलके पण आतून उबदार, किंवा रेनकोट आणि वूलन याचे मिश्रण असणारे असे अनेक म्हणजे अनेक ओव्हर कोट्स प्रत्येक घरातून असतात आणि टोप्याही हरतऱ्हेच्या व हातमोजेही हरतऱ्हेचे ही क्लोकरूम फार महत्त्वाची असते कारण नॉर्वेतील हवामानाचे किमान प्रकार तीन. थंड, खूप थंड आणि अतिथंड अगदी उन्हाळ्यातही नॉर्वेत सूर्य असतो पण त्याच्या प्रकाशात उजेड असला तरी ऊब नसते हवा थंडच असते त्या वेळी वापरायचे वरकोट घातळ आणि कमी उबदार असतात पण ते टळत मात्र नाहीत

□

## ४. स्टाव चर्च

आपल्याकडे कुठल्याही चांगल्या कार्याची सुरुवात देवदर्शन घेऊन करतात मी करतो असे नाही पण आपल्याकडे करतात आमचे नकळत तसे झाले आमची सुरुवात एका स्टाव चर्चला भेट देऊन झाली हाताच्या बोटावर मोजण्याएवढी स्टाव चर्चेस आता शिल्लक आहेत स्टाव चर्च नॉर्वेच्या व्हायकिंग कालखंडानंतर लगेचची ही लाकडी असत आणि जपानी पॅगोडा जसे दिसतात तशी ही दिसतात नॉर्वेत ख्रिश्चन धर्म तुलनेने खूप उशिरा आला. त्याची ही चर्चेस साक्षी आहेत. स्पेन, इटली देशात जशी टोलेजंग दगडी चर्चेस आणि ख्रिश्चन धर्माचा बडिवार दिसतो तसा नॉर्वेत आढळत नाही. नॉर्वेतील चर्च बहुधा लाकडी असते आणि ते छोटेखानी व साधे असते

मला चर्च पाहण्यात रस नव्हता असे नाही पण इटालियन पाहुणा रोबेर्तोला होता एका वृक्षानी व्यापलेल्या टेकडीवरील हे चर्च ' पारादिस ' विभागात आहे आणि ते मूळचे तेथील नाही. बेर्गेनच्या नागरिकानी आपल्या गावात असा नमुना हवा म्हणून ते मूळच्या जागेवरून हलवून आणले आहे. काळ्याशार लाकडी ओंडक्याचे हे चर्च आतून - बाहेरून साधे होते. आणि आपल्या भाषेत ते जागृत देवस्थान तर बिलकुल नव्हते नॉर्वेचे राष्ट्रीय प्रॉटेस्टट चर्च त्र्योन् ह्येम या गावी आहे

नॉर्वेचे उत्तर ध्रुवानजीकचे हवामान, लोकाचा पिंड, नैसर्गिक परिसर पाहता ख्रिश्चन धर्म तेथला असा वाटत नाही त्याचे मूळ देव - देवता भिन्न आहेत पण आज तो आदिम धर्म शिल्लक नाही यावविषयी स्टाव चर्च पाहत असताना हेन्रिकसनशी चर्चा झाली त्याच्या मते नॉर्वेजियन लोक कन्झर्वेटिव आहेत पण हवामानामुळे धार्मिक कर्मकाडाला ते महत्त्व देत नाहीत प्रॉटेस्टट धर्मगुरू विवाह करतो, त्याला मुलेही असतात आणि चर्चचे खर्च सरकार चालविते. स्त्रिया प्रीस्ट होऊ शकतात की नाही यावर आज तेथे वाद आहे हे ऐकल्यावर मी मुद्दाम दोन रविवारी सकाळी चर्चप्रार्थनाना गेलो तेथील कार्यक्रमात स्त्रिया हाताखालच्या धर्मगुरू म्हणून काम करताना दिसल्या

मला स्टाव चर्च दाखविण्यात मी धर्माकडे कोणत्या भावनेने पाहतो हे जाणून घेण्याची हेनिगची इच्छा होती हे मी ताडले मी इब्सेनचा चाहता इब्सेन धार्मिक नव्हता नव्या धर्माचा शोध घेणारा होता माझाही प्रकार काहीसा तसाच असावा असे उत्तर मी दिले धर्मापेक्षा निसर्ग ही जास्त महत्त्वाची शक्ती आहे असे मला वाटते, असे मी सागितले. त्याचबरोबर उत्तम भाषा कमाविण्यासाठी मी गीता, दासबोध, बायबलचा नवा करार हे खूप काळजीपूर्वक वाचले आहेत हीही माहिती त्याला दिली. स्टाव चर्च आम्ही पाहिले. पण माझ्यावर जास्त छाप पडली ती सभोवतीच्या शात, भरगच्च झाडाझुडपाची स्टाव चर्चपाशी लावलेली मूळ ख्रिसमस झाडे, फ्यूरअ मी काळजीपूर्वक पाहिली ख्रिसमस नुकताच सपला होता पण घराच्या दारात वा दिवाणखान्यात अजून ख्रिसमस झाडे सजविलेली होती. ती झाडे विशिष्ट जातीची फर झाडे असतात आपल्याकडे ज्याला आपण ख्रिसमस ट्री म्हणतो त्याला नॉर्वेजियन अस्सल ख्रिसमस ट्री समजत नाहीत ती झाडे ' डॅनिश ' मडळींची आहेत, असे ते मानतात.

स्टाव चर्च पाहिल्यावर, बेर्गेन पाहत पाहत आम्ही बेर्गेनच्या जुन्या भागात आलो आणि दोन तरुण मित्राना सोडून, तिघे बेर्गेन विद्यापीठावर आलो. इब्सेन जिथे राहिला आणि वाढला अशी नॉर्वेतील शहरे चार - जन्मगाव शिएन, नतर जेथे औषधाच्या दुकानात तो कामाला होता ते ग्रिमस्टा, नाटककार म्हणून उदयास आला ते बेर्गेन व शेवटची चार नाटके जेथे लिहिली ते उस्लो पैकी मी सुरुवात केली होती बेर्गेनपासून

फ्लोयेन, रूदेमानेन, ब्ल्योमानेन, बारेगेन, उलरिकेन, ल्योवस्ताकेन आणि ल्योदरह्योर्न या सात डोंगरामध्ये बेर्गेन ऐसपैस पसरलेले आहे. उस्लो खालोखाल नॉर्वेतील हे सर्वांत मोठे गाव. नॉर्वेतील जवळजवळ सर्व महत्त्वाची शहरे बंदरे आहेत तसेच बेर्गेन हेही बंदर आहे. एकोणिसाव्या शतकापर्यंत बेर्गेन हेच नॉर्वेतील सर्वांत महत्त्वाचे शहर होते. डेन्मार्क व स्वीडनच्या वर्चस्वापासून मुक्त होण्याचा लढा बेर्गेनलाच सुरू झाल्यामुळे त्याला ऐतिहासिक महत्त्व आहे बेर्गेन पश्चिम किनाऱ्यावर असल्याने साहजिकच त्याचा ओढा इंग्लंड, अमेरिका या देशाकडे जास्त आहे आपल्याकडील उच्चभ्रू माणसांची मुले जशी अमेरिकेत शिकून तेथेच स्थायिक होण्याचे स्वप्न बाळगून असतात त्याचप्रमाणे येथील उच्चभ्रूंचीही मुले असतात आज लाखो नॉर्वेजियन्स अमेरिकेत स्थायिक झालेले आहेत. आणि हे देशांतर गेल्या शतकापासून चालू आहे

बेर्गेन शहर उत्तमोत्तम फ्योर्दस्नी वेढलेले आहे त्याच्या किनाऱ्यालगत असंख्य बेटे आहेत या बेटांमधून पसरलेला शांत समुद्र आणि त्याचे सौंदर्य हे नॉर्वेच्या पश्चिम किनारपट्टीचे अद्वितीय वैशिष्ट्य होय बेर्गेनभोवती उत्तम जंगले आहेत आणि खुद्द या गावाचे सौंदर्य लक्षणीय आहे पण या गावाची हवा भिकार आहे असे मानले जाते हिमवृष्टी, वारंवार पाऊस आणि सतत झाकाळलेले आकाश, महिनोमहिने सूर्यदर्शन होत नाही असे असले तरी बेर्गेन किंवा अन्य प्रमुख नॉर्वेजियन किंवा स्वीडीश शहरांच्या प्रगत व उच्च राहणीमानाने आपले डोळे दिपूनच जातात नॉर्वे, स्वीडनमधील झगमगाटापुढे इंग्लंडमधील शहरे, अगदी लंडन धरून दुय्यम प्रतीची व ढोबळ वाटतात लंडनची आणि त्याच्या केंद्रभागाची गचडी तर केविलवाणी व निराशाजनक वाटते बेर्गेनची लोकसंख्या जेमतेम दोन लाख आहे. पण आकारमान पाहिले तर आपल्याकडील मोजपट्टीने असे वाटेल की या गावात चाळीस लाख लोक असतील

बेर्गेन विद्यापीठ गावाच्या केंद्रभागी एका टेकडीवजा वस्तीत असून ते उदयोन्मुख आहे या विद्यापीठाच्या ' नॉर्डिस्क इन्स्टिट्यूट ' च्या अखत्यारीत मी काम केले मला एक स्वतंत्र खोली देण्यात आली होती आणि फोन, टाईपरायटर, झेरॉक्स मशीन इ. उपलब्ध होते पण मी विद्यापीठावर गेल्या गेल्या प्रोफेसर ऑर्सेथ यांना विनंती केली की, कृपया मला पुस्तके वाचीत बसवू नका मी पुस्तकं चाळीन व आवश्यक त्या नोंदी करीन पण माझे येथील वास्तव्य वाचनासाठी नाही नॉर्वेजियन पुस्तके मला कळणार नाहीत आणि इंग्लिश पुस्तके मी भारतातही मिळवून वाचू शकतो माझा मुख्य भर इब्सेनच्या व अन्य नाटकाच्या व्हिडिओ टेप्स पाहणे, येथील अर्काइव्हज व म्युझियम्स बघणे, रंगभूमीवर नाटक बघणे आणि स्थळांना भेटी देणे हे आहे मी ॲकॅडेमिक् स्वरूपाचे काम करीत असलो तरी मी ॲकॅडेमिक् व्यक्ती नाही. येथून जे मला पुण्याला

नेता येणार नाही ते पाहण्यात मला मदत करा मी राजदूत नाही पण लोकदूत जरूर आहे तेव्हा माझ्या ओळखी करून द्या इडो - नॉर्वेजियन मैत्रीचा श्रीगणेशा मला करू द्यात. इब्सेनच्या माध्यमातून हे होईल अशी मला आशा आहे माझी कळकळीची आणि सुस्पष्ट भूमिका पाहिल्यावर आणि मी प्रकाशकही आहे हे लक्षात घेऊन ऑर्सेथ आणि हेनिग यानी मला सागितले की तुम्ही म्हणता ते बरोबर आहे पण येथील मौल्यवान पुस्तके तुम्ही बघितली नाही असे, होऊ नये एवढेच. प्रा. ऑर्सेथ याना माझा प्राजळपणा आवडला आणि त्यानी इन्स्टिट्यूटजवळ असलेल्या इब्सेनच्या चार नाट्यप्रयोगाच्या व्हिडिओ कॅसेट्स वेळ न घालविता माझ्या हवाली केल्या. त्या कॅसेट्सची मी अक्षरश चुबने घेतली. इतका आनद मला झाला. *'फ्रूएन फ्रा हावअ्,' 'एत डुकेह्येम,' 'विल्डान्डेन' आणि 'रोझमर्सहोल्म'* ही ती नाटके होती ही नाटके मी बेर्गेन मुक्कामात रात्री जागवून दोन - दोन वेळा बघून घेतली व माझ्या नोट्सही काढल्या

२ जानेवारीलाच दुपारी बेर्गेन थिएटर आम्ही बघितले थिएटरच्या दारातच इब्सेनचा भव्य पुतळा आहे आणि या पुतळ्यातील इब्सेनने डोळे वटारलेले आहेत. हेन्रिकसनने विचारले, 'असे का ?' मी उत्तर देण्याच्या आत ते म्हणाले, 'याचे कारण त्या वेळच्या बेर्गेनमधील लोकानी त्याच्या नाटकाना म्हणावी अशी दाद दिली नाही म्हणून पण सध्या उभे असलेले बेर्गेन थिएटर हे मूळचे नॅशनल थिएटर नाही ते आगीत भस्मसात झाले ते लाकडी होते नतर बाधण्यात आलेले थिएटर काळजी घेऊन दगडविटात बाधण्यात आले आहे थिएटरभोवती सुदर बगीचा आहे आणि थिएटरच्या दालनातून अनेक नाटकातील दृश्ये चित्रित केली आहेत व काही नट - नट्याचे अर्धाकृती पुतळेही आहेत मात्र हे नाट्यगृह इब्सेनची नाटके झाली ते मूळचे नाही तर विसाव्या शतकातील आहे' हे कळल्यावर माझा उत्साह बराच कमी झाला होता थिएटर पाहताना हेन्रिकसनना मी पुण्यातील बालगधर्व रगमदिर आणि पुणेकरांचे नाट्यवेड दोहोंचीही कल्पना देऊन महाराष्ट्रात सकस नाट्यपरपरा आहे हे थोडेसे विस्ताराने सांगितले

'तुझ्यात नाट्यप्रेम कोठून आले ?' त्यानी विचारले 'मी नाट्यप्रेमी नाही. इब्सेनची नाटके मला आवडतात त्या श्रेष्ठ साहित्यकृती आहेत.' मी.

'तुझ्या घरासमोरच थिएटर आहे तेव्हा तुम्ही नाटके पाहत असणार ?' हेनिग

'मी क्वचितच नाटके पाहतो. पण माझी आई नाटकाची भोक्ती आहे तिने हजारावर नाटके पाहिली असतील ' मी

'अस ! इब्सेनची आईदेखील नाट्यवेडी होती - मराठीतील कोणते नाटककार आहेत ?' हेनिगने विचारले


उस्लो बोटॅनिक इन्स्टिट्यूट


इतिहासप्रसिध्द आकर्सहूस किल्ला, उस्लो




उस्लोच्या होलमनकोलन रोटरी क्लबला भेट, अध्यक्ष लार्स वायडर



स्वीडिश अकादमीस भेट. रेखा, अनिरुध्द, उज्ज्वला ॲण्डरसन, विवेका आणि आन्दर्स रायबर्ग



लाकडी स्टाव चर्च



उस येथील आमच्या वसतीस्थानाचा परिसर



बेर्गेन विद्यापीठ - दर्शनी भाग



बीगाण्ड याच्या घरातून दिसणारे रम्य फ्योर्द, पैलतीरी संगीतकार एडवर्ड ग्रीगचे घर



तेऱ्ये व्रिगेनची कबर असणारे चर्च, ग्रिमस्टा



इब्सेनचा दिवाणखाना, १३ आर्बिन्स पथ, उस्लो



उस्लोचे राष्ट्रीय थिएटर



इब्सनची कबर (ग्रलसेर्स ग्रावतुन्ड) उस्लो



नॉर्वेजियन लोककथेतील ट्रोल्स (विनोदी भुते)



वेरेनश्योल्डने रंगविलेला उतारवयातील इब्सेन



वेनस्त्योप - शिएन येथील इब्सेनचे घर



ग्रिमस्टा येथील वैद्यकगृह  येथे तरुण इब्सेनपासून सोफी एल्झला अनौरस मुलगा झाला

'अत्रे, वरेरकर, काणेकर हे इब्सेनचा प्रभाव असलेले नाटककार होते सध्या प्रचलित मराठी नाटककारांत कानेटकर व तेंडूलकर हे मोठे नाटककार आहेत व त्याची अनेक नाटके चांगली आहेत ' मी.

अशा प्रकारचे सवाद झडत होते व बेर्गेनचे नाट्यगृह आम्ही पाहत होतो. मध्येच थाबून हेनिंग म्हणाले, 'अनिरूधा, हा समोरचा पुतळा कोणाचा आहे ?' समोरचा पुतळा इब्सेनच्या व्याह्याचा ब्योर्नसन या प्रसिद्ध साहित्यिकाचा होता. तो पुतळा कोणाचा आहे हे सागून मराठीतील त्याचे नाटक '*आंधळ्याची शाळा*' कसे गाजले ही माहिती मी हेनिगला एगवून सागितली. त्याच दिवशी रात्री मी लिहिलेला '*इब्सेन अँड मराठी ड्रामा*' हा लेखही त्याना वाचण्यासाठी दिला या लेखाची एक प्रत ऑर्सेथनाही दिली ही घटना आणि लेख दोघांनाही मनापासून आवडले. आमच्या स्नेहाचा खुटा हलवून बळकट करण्याचे काम या लेखाने साधले

या प्रवासात 'इब्सेनच्या नाटकात तुम्हाला कसा रस निर्माण झाला ?' हा प्रश्न हमखास विचारला गेला. पुण्यापासून सेहेचाळीस मैल अतरावर नारायणगाव आहे. तेथील केंब्रीज स्कॉलर प्राचार्य रा. प. सबनीस वारल्यावर त्यांच्या ग्रथसभाराची व्यवस्था लावण्याचे काम मी घेतले. तेव्हा मी कॉलेज तरुण होतो. त्या ग्रथसभारात मी '*लेडी फ्रॉम दि सी*' हे नाटक प्रथम वाचले. नतर एम. ए. ला काही नाटके अभ्यासली ७२ मध्ये नॉर्वेचे कौन्सुल जनरल फिन सॅण्डबर्ग पुण्याला असताना त्याच्या व्याख्यानानतर मी त्याना प्रश्न कसे विचारले व त्यानी इब्सेनच्या अभ्यासाला मला कसे उत्तेजन दिले इ. माहिती प्रश्न विचारणारास व्यवस्थितपणे व आनदाने सांगत असे अगदी असख्य वेळा मी ती दिली. माझ्या दौऱ्याची बातमी रेडिओवर आली माझ्या मुलाखती व मोठी छायाचित्रे वृत्तपत्रातून आली त्यामुळे तर हा प्रश्न आणि माझे ठराविक पण दर वेळी उत्साहाने दिलेल उत्तर ही अटळ बाबच होऊन गेली रेखा मात्र ही रेकॉर्ड ऐकून जाम वैतागत असावी. फटकन बदुकीचा आवाज होतो आणि धावणारा वेगाने स्टेडियमला प्रदक्षिणा घालतो तसा हा प्रकार घडायचा विचारणारे दर वेळी नवे असत आणि काही वेळा त्या सुदर तरुणीही असत, एवढाच दिलासा देणारा भाग होता बाकी होता तो विचारणाराचा आणि उत्तर देणाऱ्याचा नाइलाज.

□

## हिम आणि थंडी

५.

निसर्गाची ठेवण मजेशीर आहे. एक महत्त्वाचा घटक सारा रागरंग ठरवितो. सतत पाऊस असण्याऱ्या केरळचा निसर्ग वेगळा, सतत उन्हातान्हात असणाऱ्या महाराष्ट्राचा निर्सग वेगळा तर सतत हिम असणाऱ्या नॉर्वेचा निसर्ग वेगळा. नॉर्वेत वातावरण थंड, जास्त थंड आणि अतिथंड ( जसे मद्रास हॉट, हॉटर आणि हॉटेस्ट ).

ज्या काळात मे, जूनमध्ये नॉर्वेत २२ तासापर्यंत दिवस व सूर्यप्रकाश असतो त्याही काळात नॉर्वे थंडच असते. प्रवासी स्वेटर कोट घेऊनच येथे येतात. आणि बऱ्याच वेळा पावसाच्या माऱ्यापुढे निराश होऊन परततात.

हिम ह्या घटकाने नॉर्वेचा निसर्ग घडविला आहे. आम्ही हिवाळ्यात गेलो पण तो हिवाळा ' डिझॅस्टरस ' होता. म्हणजे हिम सातत्याने चालू नव्हते आणि तपमान - २ ते - ४° पर्यंत खाली जाई पण जास्त म्हणजे - ३४ ते -४०° होत नव्हते गेले दोन - तीन वर्षे नेहमीची सणसणीत हिमवृष्टी होत नाही आणि तपमान - ४०° पर्यंत रहात नाही म्हणून नोर्स्क मंडळी अस्वस्थ होती. आम्हाला होती ती थंडी आणि हिमवृष्टी प्रथमच पाहायला मिळत होती. नोर्स्क मंडळी ही हिमस्थिती पर्यावरणाचा समतोल बिघडल्याचे चिन्ह मानत होती. नॉर्वे, स्वीडन व्यवस्थित ६ - ८ महिने बर्फाखाली राहिले की त्याना बरे वाटते सारे काही ठाकठीक होईल अशी आशा वाटते.

आपल्याला पावसाचे 'अप्रूप पण नोर्स्क मंडळी पावसाला चांगले मानत नाहीत कारण पाऊस पडणे म्हणजे हिम न पडणे. पाऊस आणि थंडी हे मिश्रण ' इंग्लिश व्हेदर ' म्हणून आणि नाराजीने उल्लेखिले जाते. आम्ही बेर्गेनमध्ये होतो तेव्हा अशी इंग्लिश हवा नंतर लागली

□

## माणसे आणि प्रदेश

६.

नॉर्वेची लोकसंख्या ४० लाखाच्यावर आहे. बाहेरील निर्वासित धरून ती ४४ लाख आहे क्षेत्रफळाच्या दृष्टीने पाहता दर चौरस कि. मी ला १४ माणसे पडतात. प्रत्यक्षात

श्री मवारा
५३८
२६५५
६।३।९२



अर्थातच वस्ती आहे तेथे एवढी विरळ नाही. याचे कारण ७० % नोर्स्क मडळी शहरातून राहातात. यापैकी ३/४ लोक किनाऱ्यालगतच्या भागातून राहातात विशेष म्हणजे दक्षिण आणि उत्तर नॉर्वेतील लोकसख्येचे प्रमाण अगदी भिन्न आहे उत्तर नॉर्वेत तीन जिल्हे आहेत आणि एकूण मुख्य क्षेत्रफळाच्या १/३ क्षेत्र ते व्यापतात पण या भागातील लोकसख्या मात्र एकूण लोकसख्येच्या १/१० आहे

नॉर्वेतील वस्त्या नैसर्गिक परिसरावर अवलबून आहेत आणि त्यात विविधता आहे. किनाऱ्यालगतच्या भागात डोंगर उतारणीवर जशी घरे बाधलेली आहेत तशीच सपाट भागातही बाधलेली आहेत पण सपाट भागात काहीच मर्यादित प्रमाणात बाधकामे करण्यास परवानगी दिली जाते आपण शब्द बाधकाम वापरतो पण बव्हंशी इमारती लाकडाच्या असतात अवघड व गैरसोयीच्या जागीही घरे बाधण्यात नॉर्वेजियन इंजिनिअर्स व आर्किटेक्ट्स तरबेज असतात. सपाट जमीन शक्यतो होता होईतो कुरणे, ग्राऊडस् यासाठी वापरण्यावर कटाक्ष आहे

अगदी उत्तरेस वेगळी तऱ्हा आहे. तेथे मच्छीमारी हे उपजीविकेचे प्रमुख साधन आहे छोटे कारखाने, उद्योगधदे हेदेखील मच्छीमारीशी निगडीत आहेत किनाऱ्यावर अनेक कोळी वसाहती पसरलेल्या आहेत हवामान खराब असेल वा जमीन निकृष्ट असेल तरी मच्छीमारी चालूच राहाते

नॉर्वेत सामी जमातीचे वीस हजार लोक आहेत यातील फक्त दहा टक्के लोक त्याचा मूळचा रेनडियर पालनाचा व्यवसाय करतात बाकीचे लोक मच्छीमारी, शेती, शिकार इ व्यवसाय करतात नॉर्वेतील सामी लोक फिनलड आणि स्वीडनमधील सामी लोकाशी सबध, रोटी - बेटी व्यवहार ठेवतात एकूण सामी लोकांपैकी निम्मे लोक नॉर्वेत आहेत नॉर्डिक सामी कौन्सिलदेखील स्थापण्यात आले आहे

सामी लोकाची वाशिक उपपत्ती लागत नाही. त्याची भाषा उरल भाषेतील फिनो - उग्रियन शाखा होय. ही भाषा आणि जुन्या चालीरीती वैशिष्ट्ये जतन करण्याची सामी लोक धडपड करीत आहेत दुसरीकडे आधुनिक सुखसोयी आणि तत्रे आत्मसात करण्याचीही त्याची खटपट आहे भटक्या सामी टोळ्या आता हळूहळू स्थिरावू पाहत आहेत. ते स्नोस्कूटर्सचा वापर करू लागले आहेत.

स्वालबार बेटावर सुमारे बाराशे नॉर्वेजियन राहतात. नॉर्वेचा हा अगदी उत्तरेकडील प्रात होय बहुतेक माणसे लोगहयरबायेन या वस्तीत राहतात. दगडी कोळशाच्या खाणी हा तेथील प्रमुख व्यवसाय आहे. स्तोर नोर्स्क शिपट्सबेर्गेन कुलकोंपानी ही कपनी दरवर्षी सुमारे पाच लाख टन दगडी कोळसा खाणीतून बाहेर काढते. नी - ओलसूड येथे नॉर्वेचे

कायमस्वरूपी ध्रुवीय - सशोधन केंद्र आहे. स्वालबार नॉर्वेचे असले तरी सोविएत रशियाही एक दगडी कोळशाची खाण तेथे चालवीत आहे.

हिमनद्या आणि खडबडीत डोंगरानी नॉर्वेचा बराच भाग व्यापलेला आहे याचा अर्थ कायमची वस्ती करण्यासाठी नॉर्वेत फार भूभाग नाही. उत्तर ध्रुवानजीक असूनही नॉर्वेत राहणे शक्य झाले आहे याचे कारण जवळून जाणारा गल्फ प्रवाह स्वालबारमध्ये झाडे नाहीत परतु वनस्पती जीवनमात्र आहे. रेनडियर, पोलर बीअर आणि ध्रुवीय लाडगे - कोल्हे हे प्राणी आहेत उन्हाळ्याच्या काळात म्हणजे एप्रिल, मे, जूनमध्ये स्वालबारमध्ये विविध जातीचे पक्षी आढळतात. १९७५ पासून लोंगहयरबायेन येथे विमानतळ अस्तित्वात आला आहे. तेथून नॉर्वेतील मुख्य शहराशी सपर्क साधता येतो. उपग्रहामार्फत नॉर्वेतील कार्यक्रम स्वालबार टी व्ही केंद्रावर दाखविले जातात

☐

## लोकसंख्या कमी का ? ७.

नॉर्वेचीच लोकसख्या कमी आहे असे नाही तर साऱ्या स्कॅण्डिनेव्हियातच लोकसख्या कमी आहे याची कारणे काय असावीत ?

हे देश अतिथड हवामानाचे आहेत. या हवामानात कामभावनाही गारठते. कमी थड हवेचा काळ ३ - ४ महिने असतो एरवी अगावर जाडजूड कपडे. फक्त एकमेकाचे चेहरे दिसतात हस्तादोलन, गालावर हलकी चुबने घेण्यानेही कामभावना जागी होत नाही.

कामभावना (Sexuality) आणि जननक्षमता यात (fertility) फरक आहे. जननक्षमता कमी असावी कारण आहारात भात नाहीच नाही. भात खाणाऱ्या देशात लोकसख्या जास्त आहे. शिवाय हे लोक स्निग्ध व चरबी कमी खातात मासे खातात पण त्याचा परिणाम जननक्षमता वाढण्यात होत नसावा

सध्या विवाहित स्त्रिया ३ - ३, ४ - ४ मुले होऊ देतात मागच्या पिढ्यात कुटुब नियोजन होते आणि अगदी तरुण मुली पण नियोजन करीत आहेत. स्कॅण्डिनेव्हियात सतती नियमन फार अगोदरपासून - १९०४ - ६ पासून आले परिणामत या भागाची लोकसख्या कमी. माणसे ८० - ८०, ९० - ९० वर्षे जगतात तेव्हा आयुर्मर्यादा कमी हे कारण दिसत नाही. स्वीडनमध्ये औद्योगिकीकरण खूपच आहे. तेथे जास्त लोकसख्या आहे.

भारत, चीन, जपान येथे लोकसंख्या वाढीचे बेसुमार प्रमाण दिसते तर नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क येथे लोकसंख्या कमीत कमी असण्याचे प्रमाण पण याविषयी उघड चर्चा कोणाशी केली नाही आम्ही उतरलेल्या कुटुंबात ३ - ३ मुले होती.

☐

## ८. हान्झा

ब्योर्ननी आम्हाला फ्योर्दस् व बेटे दाखविली तर योरूनबाईंनी एक दिवस आम्हाला 'हान्झा' विभाग दाखविला वीगाड हे नाव जर्मन आहे वीगाड व त्याचे पूर्वज जहाजव्यापारात आहेत. त्यामुळे हान्झा दाखविताना स्वत यावे असे ब्योर्नला वाटत होते. पण त्यादिवशी काही काम निघाल्यामुळे योरूनबाई आम्हाला घेऊन गेल्या

मध्ययुगात सागरी व्यापारावर जर्मनाचे वर्चस्व होते. त्यातील काही मातबर जहाज व्यापारी बेर्गेन शहराच्या प्रमुख फ्योर्दवर येऊन राहिले. त्यानी बांधलेली काही घरे आजही शिल्लक आहेत ही घरे जर्मन समुद्रव्यापाराची, 'हान्झा' ची साक्ष आहेत. त्यातील दोन घरे म्युझियम म्हणून अतिशय नीट जतन केली आहेत.

ही घरे पाहताना मनाने आपण मध्ययुगात जातो. या घराची ओळख महत्त्वाची कारण त्याच्यावरून मध्ययुगीन जहाजे कशी असतील याचीही कल्पना येते. आपल्याकडे शिवाजीमहाराजानी आरमार उभारले होते असे सागितले जाते पण ती जहाजे किंवा त्यानी बदराकाठी बाधलेली बदरवजा ठिकाणे आज दाखविता येत नाहीत. त्याची चित्रेही उपलब्ध नाहीत. उलट मध्ययुगीन, हान्झाची, जहाजाची चित्रे या घरात लावलेली आहेत. भलेमोठे अवजड पेटारे, भाडी, ढोबळ वाटणारे फर्निचर मालाचे वजन करणारे तराजू, मद्य साठविण्याची पिंपे, अशा अनेक वस्तू या घरात आहेत त्याचे बिछाने पाहताना आम्ही 'गाईड' मुलीला विचारले की हे बिछाने इतके आखूड कसे ? त्यावर ती उत्तरली की हे जहाजव्यापारी व खलाशी बसून झोप घेत. त्याची अशी समजूत होती की जमिनीवर आडवे पडून झोप घेतली की रक्त डोक्यात जाते आणि आरोग्य बिघडते, आयुष्य कमी होते. 'हान्झा' मध्ये काम करणाऱ्या खलाशाना लग्न करण्याची बदी होती. विशेष म्हणजे हान्झाच्या या वस्तीत स्वयपाक करण्यास बदी होती कारण आग लागण्याची भीती त्यामुळे अन्न बेर्गेनच्या हद्दीत शिजविले जाई आणि 'भाड्यात भाडी' ठेवून ते या भागात आणले जाई.

'हान्झा' भाग पाहण्यात मला विशेष रस होता. याचे कारण हे होते की यावरून मी आपल्याकडील पूर्वीच्या पोर्तुगीज, डच, व्यापाऱ्याच्या 'वखारी' कशा असतील याची कल्पना करू शकत होतो प्रचड ओंडक्यानी बाधलेल्या त्या घरातून वावरताना आणि तेथल्या वस्तू पाहताना आपल्याकडील एक हरवलेला कालखडही माझ्या डोळ्यासमोर तरळत होता

'हान्झा' तील घरात इतका गारठा होता की मी काकडू लागलो. सेंट्रल हीटिंग नव्हते. पूर्वीच्या काळी तेथे राहाणे किती बिकट असेल ? स्कॅण्डिनेव्हियन चाचे आणि अलीकडील नॉर्वेचे व्यापारी आरमार यात जमीन अस्मानाची तफावत आहे. या दोहोतील दुवा म्हणजे हान्झा काळातील ही नाविकाची घरे, गलबते, व जीवन 'हान्झा' पाहत असताना गाईडच्या बोलण्यातून मला आणखी एक गोष्ट जाणवली ती म्हणजे नॉर्वेजियन लोकाना जर्मनाविषयी असलेली समिश्र भावना जर्मन लोकाच्या कणखरपणाविषयी व कष्टाळूपणाविषयी त्याना आदर वाटतो पण त्याच वेळी त्याच्या 'आक्रमक' वृत्तीमुळे नॉर्वेजियन मडळींच्या मनात त्याच्याविषयी तिटकारा आहे. 'हान्झा' हे नॉर्वेवरील जर्मन प्रभावाचे अवशेष आहेत. इग्लड - नॉर्वेचे सबध मैत्रीचे आहेत, तसे या प्रभावाचे स्वरूप नाही

'हान्झा' पाहात असताना माझ्यापेक्षा रेखाला जास्त आनद होत असावा कारण समुद्र या गोष्टीवर तिचे अती प्रेम आहे समुद्राविषयी माझ्या मनात भीतीदेखील असते. तसे तिचे नाही. समुद्राच्या सान्निध्यात ती नेहमी आनदी असते तर मी खरा रमतो तो हिमशिखराच्या डोंगराच्या सान्निध्यात त्यामुळे हान्झा पाहून होताच मी म्हणालो, 'चला आता झकास कॉफीतरी घेऊयात.' ती कल्पना छान होती आम्ही ज्या 'हान्झा' रेस्टॉरटमध्ये गेलो तेथे मध्ययुगीन वातावरण जसेच्या तसे राखण्याचा प्रयत्न होता जाडजूड टेबले आणि दणकट बाकडी होती. दिवे नव्हते तर मशाली होत्या. आम्ही जुन्या पद्धतीच्या भाड्यातून काळी कॉफी प्यालो हान्झा म्युझियम आणि रेस्टॉरटमध्ये योरूनबाई कमालीच्या खुषीत का होत्या याचा उलगडा मला झाला नाही. परतताना त्याना जास्त आनद झाला कारण हिम पडत होते. हिम पडण्यात जोर नव्हता पण अपेक्षित हिम पडत होते याचा तो आनद होता

योरूनबाईंना माझ्या इब्सेन व्यासगाबद्दल निश्चित आपुलकी होती. पण त्याची बोलण्याची पद्धत त्रोटक व उडवाउडवीची. धूम्रपानात हरवून जाणे त्याना आवडे. त्याच्यावर अमेरिकन प्रभाव होता. अन्य नॉर्वेजियन स्त्रियांपेक्षा त्या तडफदार आणि झटपट वाटत होत्या भारतात मी त्याना पाहिले त्या वेळी त्याच्या वयाविषयी माझी चुकीची कल्पना झाली हान्झाच्या पार्श्वभूमीवर आणि बेर्गेनमध्ये त्या तरुण वाटत

होत्या वीगाडही उत्फुल्ल व तरुण वाटत होते हान्झाच्या वाटेवर योरूनला तिच्या स्वत विषयी माहिती सागण्यासाठी मी प्रवृत्त करून पाहिले पण ते जमले नाही आणि ते अखेरपर्यंत जमले नाही

हान्झा भेटीच्या रात्री योरूनबाई ‘ जनरेशन डान्स ’ ला निघाल्या होत्या त्यांनी ताबडा उची वेष परिधान केला होता आणि व्यवस्थित मेकअप् केला होता. आमचा निरोप घेण्यासाठी त्या आल्या तेव्हा मी चमकलो त्याच्या तयारीवर मी बोलावे अशी त्याची अपेक्षा दिसली

‘ तुम्ही एखाद्या राणीसारख्या दिसत आहात !’ मी चटकन बोलून गेलो. ‘ थँक यू !’ त्याना खूप बरे वाटले होते नतर मला कळले की जनरेशन डान्स मध्ये वडीलधारी माणसे आणि तरुण माणसे एकत्र नाचतात म्हणजे वडीलधारी स्त्री तरुण मुलांबरोबर नाचते, आणि वयस्क पुरुष तरुण मुलींबरोबर नाचतात या सदर्भात मी काढलेल्या उद्‌गाराचा अर्थ कळणे अवघड होते मलाही कळणे दुरापास्त होते

योरूनबाईंना तीन मुले होती पहिला मोठा मुलगा अमेरिकेत डी बी एम्, एम्. बी ए सारखा कोर्स करीत होता. शिक्षणासाठी किंवा नशीब काढण्यासाठी अमेरिकेत जाणे नॉर्वेत गेले शभर दीडशे वर्षे चालू आहे मधली मुलगी हिल्डअ ही दतवैद्य होती व ती लग्न होऊन उस्लोत स्थायिक झाली आहे. दिवाणखान्यात लावलेल्या छायाचित्रावरून हा विवाह धार्मिक पद्धतीने झाल्याचे दिसत होते तिसरा मुलगा ओविन हा त्याच्याबरोबर राहात होता एका हॉटेलात तो नोकरीला होता आणि पुढे भविष्यात स्वतत्र हॉटेल काढणे त्याच्या मनात होते वीगाड दापत्य आमच्यापेक्षा दहा वर्षांनी वडील होते. त्याना तीन मुले होती पण त्याच्या पिढीतील अनेक जोडप्याना चार चार मुले असलेली आढळली. याचे कारण नॉर्वेची परिस्थिती लोकसख्येच्या बाबतीतदेखील भारताच्या आणि महाराष्ट्राच्या उलट आहे अतिशय कमी लोकसख्या ( ४४ लाख ) असल्याने यत्राचा वापर वाढता करावा लागतो. जी हलक्या दर्जाची कामे समजली जातात ती कामे करण्यासाठी माणसे उपलब्ध होत नाहीत. विशेषत शेतीला माणसे मिळत नाहीत परिणामी नॉर्वे सरकार जोडप्याना जास्त मुले होऊ देण्यास प्रोत्साहन देते त्याना प्रतिमूल पेन्शन देते पण तरुण पिढीतील जोडपी जास्त मुले होऊ देत नाहीत कारण पैसे मिळाले तरी श्रमाने करणे होत नाही व जास्त मुले म्हणजे जास्त काळजी व चिता आपल्याकडे एक किंवा दोनपेक्षा जास्त पोरे होऊ देणे म्हणजे राष्ट्रद्रोह तर नॉर्वेत एक किंवा दोन पोरापेक्षा जास्त होऊ देणे व त्याची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे राष्ट्रीय कार्यक्रमात भाग घेणे. श्रीमत व कमी लोकसख्या असणाऱ्या राष्ट्रात काळ्या किंवा ब्राऊन मुलाना दत्तक घेण्याचा प्रकार दिसतो. काळ्या किंवा ब्राऊन राष्ट्रात नुकतीच

'हान्झा' भाग पाहण्यात मला विशेष रस होता. याचे कारण हे होते की यावरून मी आपल्याकडील पूर्वीच्या पोर्तुगीज, डच, व्यापाऱ्याच्या 'वखारी' कशा असतील याची कल्पना करू शकत होतो प्रचड ओंडक्यानी बाधलेल्या त्या घरातून वावरताना आणि तेथल्या वस्तू पाहताना आपल्याकडील एक हरवलेला कालखडही माझ्या डोळ्यासमोर तरळत होता.

'हान्झा'तील घरात इतका गारठा होता की मी काकडू लागलो सेट्रल हीटिंग नव्हते. पूर्वीच्या काळी तेथे राहाणे किती बिकट असेल ? स्कॅण्डिनेव्हियन चाचे आणि अलीकडील नॉर्वेचे व्यापारी आरमार यात जमीन अस्मानाची तफावत आहे या दोहोतील दुवा म्हणजे हान्झा काळातील ही नाविकांची घरे, गलबते, व जीवन 'हान्झा' पाहत असताना गाईडच्या बोलण्यातून मला आणखी एक गोष्ट जाणवली ती म्हणजे नॉर्वेजियन लोकाना जर्मनाविषयी असलेली समिश्र भावना. जर्मन लोकाच्या कणखरपणाविषयी व कष्टाळूपणाविषयी त्याना आदर वाटतो पण त्याच वेळी त्याच्या 'आक्रमक' वृत्तीमुळे नॉर्वेजियन मडळींच्या मनात त्याच्याविषयी तिटकारा आहे 'हान्झा' हे नॉर्वेवरील जर्मन प्रभावाचे अवशेष आहेत. इग्लड - नॉर्वेचे सबध मैत्रीचे आहेत, तसे या प्रभावाचे स्वरूप नाही.

'हान्झा' पाहात असताना माझ्यापेक्षा रेखाला जास्त आनद होत असावा कारण समुद्र या गोष्टीवर तिचे अती प्रेम आहे समुद्राविषयी माझ्या मनात भीतीदेखील असते तसे तिचे नाही समुद्राच्या सान्निध्यात ती नेहमी आनदी असते तर मी खरा रमतो तो हिमशिखराच्या डोंगराच्या सान्निध्यात त्यामुळे हान्झा पाहून होताच मी म्हणालो, 'चला आता झकास कॉफीतरी घेऊयात' ती कल्पना छान होती. आम्ही ज्या 'हान्झा' रेस्टॉरटमध्ये गेलो तेथे मध्ययुगीन वातावरण जसेच्या तसे राखण्याचा प्रयत्न होता जाडजूड टेबले आणि दणकट बाकडी होती दिवे नव्हते तर मशाली होत्या आम्ही जुन्या पद्धतीच्या भाड्यातून काळी कॉफी प्यालो हान्झा म्युझियम आणि रेस्टॉरटमध्ये योरूनबाई कमालीच्या खुषीत का होत्या याचा उलगडा मला झाला नाही. परतताना त्याना जास्त आनद झाला कारण हिम पडत होते. हिम पडण्यात जोर नव्हता पण अपेक्षित हिम पडत होते याचा तो आनद होता

योरूनबाईंना माझ्या इब्सेन व्यासगाबद्दल निश्चित आपुलकी होती. पण त्याची बोलण्याची पद्धत त्रोटक व उडवाउडवीची धूम्रपानात हरवून जाणे त्याना आवडे त्याच्यावर अमेरिकन प्रभाव होता. अन्य नॉर्वेजियन स्त्रियांपेक्षा त्या तडफदार आणि झटपट वाटत होत्या. भारतात मी त्याना पाहिले त्या वेळी त्याच्या वयाविषयी माझी चुकीची कल्पना झाली. हान्झाच्या पार्श्वभूमीवर आणि बेर्गेनमध्ये त्या तरुण वाटत

होत्या. वीगाडही उत्फुल्ल व तरुण वाटत होते. हान्झाच्या वाटेवर योरूनला तिच्या स्वत विषयी माहिती सागण्यासाठी मी प्रवृत्त करून पाहिले पण ते जमले नाही आणि ते अखेरपर्यंत जमले नाही

हान्झा भेटीच्या रात्री योरूनबाई 'जनरेशन डान्स' ला निघाल्या होत्या त्यानी तावडा उची वेष परिधान केला होता आणि व्यवस्थित मेकअप् केला होता. आमचा निरोप घेण्यासाठी त्या आल्या तेव्हा मी चमकलो त्याच्या तयारीवर मी बोलावे अशी त्याची अपेक्षा दिसली.

'तुम्ही एखाद्या राणीसारख्या दिसत आहात!' मी चटकन बोलून गेलो. 'थँक यू!' त्याना खूप बरे वाटले होते. नतर मला कळले की जनरेशन डान्स मध्ये वडीलधारी माणसे आणि तरुण माणसे एकत्र नाचतात म्हणजे वडीलधारी स्त्री तरुण मुलाबरोबर नाचते, आणि वयस्क पुरुष तरुण मुलींबरोबर नाचतात या सदर्भात मी काढलेल्या उद्गाराचा अर्थ कळणे अवघड होते मलाही कळणे दुरापास्त होते

योरूनबाईंना तीन मुले होती. पहिला मोठा मुलगा अमेरिकेत डी बी. एम्, एम्. बी ए सारखा कोर्स करीत होता. शिक्षणासाठी किंवा नशीब काढण्यासाठी अमेरिकेत जाणे नॉर्वेत गेले शभर दीडशे वर्षे चालू आहे मधली मुलगी हिल्डअ ही दतवैद्य होती व ती लग्न होऊन उस्लोत स्थायिक झाली आहे दिवाणखान्यात लावलेल्या छायाचित्रावरून हा विवाह धार्मिक पद्धतीने झाल्याचे दिसत होते तिसरा मुलगा ओविन हा त्याच्याबरोबर राहात होता. एका हॉटेलात तो नोकरीला होता आणि पुढे भविष्यात स्वतत्र हॉटेल काढणे त्याच्या मनात होते वीगाड दापत्य आमच्यापेक्षा दहा वर्षांनी वडील होते त्याना तीन मुले होती पण त्याच्या पिढीतील अनेक जोडप्याना चार चार मुले असलेली आढळली. याचे कारण नॉर्वेची परिस्थिती लोकसख्येच्या बाबतीतदेखील भारताच्या आणि महाराष्ट्राच्या उलट आहे अतिशय कमी लोकसख्या ( ४४ लाख ) असल्याने यत्राचा वापर वाढता करावा लागतो. जी हलक्या दर्जाची कामे समजली जातात ती कामे करण्यासाठी माणसे उपलब्ध होत नाहीत. विशेषत शेतीला माणसे मिळत नाहीत परिणामी नॉर्वे सरकार जोडप्याना जास्त मुले होऊ देण्यास प्रोत्साहन देते त्यांना प्रतिमूल पेन्शन देते. पण तरुण पिढीतील जोडपी जास्त मुले होऊ देत नाहीत कारण पैसे मिळाले तरी श्रमाने करणे होत नाही व जास्त मुले म्हणजे जास्त काळजी व चिता आपल्याकडे एक किंवा दोनपेक्षा जास्त पोरे होऊ देणे म्हणजे राष्ट्रद्रोह तर नॉर्वेत एक किंवा दोन पोरांपेक्षा जास्त होऊ देणे व त्याची जबाबदारी स्वीकारणे म्हणजे राष्ट्रीय कार्यक्रमात भाग घेणे. श्रीमत व कमी लोकसख्या असणाऱ्या राष्ट्रात काळ्या किंवा ब्राऊन मुलाना दत्तक घेण्याचा प्रकार दिसतो काळ्या किंवा ब्राऊन राष्ट्रात नुकतीच

झालेली मुले सोडून देतात अशा प्रकारची मुले अनाथाश्रमात जमविली जातात व त्यापैकी काही गोऱ्या देशात पाठविली जातात अशापैकी काही मुले नॉर्वेतही आली आहेत पण त्याना दत्तक घेतले जात नाही. त्याचा आर्थिक भार काही कुटुबे उचलतात. आपल्याला मूल नाही म्हणून काळी किंवा व्हिएटनाममधील पिवळी मुले दत्तक घेतली आहेत अशी नॉर्वेजियन कुटुबे मला आढळली नाहीत. अशा मुलाची सख्या नॉर्वेत वाढविण्यापेक्षा आपल्याच तरुण जोडप्यानी जास्त मुले होऊ द्यावीत अशी दृष्टी दिसली. नॉर्वे स्वत च्या एकसधतेला कसे जोपासू पाहात आहे याचे हे एक उदाहरण होय.

नॉर्वेसारख्या देशात मागच्या पिढ्यानी सतती नियमन केल्याने, देशात म्हातारी माणसे खूप आणि लहान मुले किंवा तरुण मुले अगदीच कमी दिसतात असे सागण्यात येते पण आम्हाला तरुण मडळी - मुले वारवार दिसली आणि लहान लहान मुलाचे अतिशय आकर्षक रंगीबेरगी पोषाख केलेले हसरे थवेही आम्हाला नित्य दिसले. आपल्याकडे शाळेतून बाहेर पडणारे लोंढे पाहिले की छातीत धस्स होते तसा प्रकार येथे होत नाही. येथे शाळेतून बाहेर पडणारे किंवा शाळेत दिसणारे मुलाचे थवे लहान लहान असतात तरुण मुलेमुली एकत्र दिसतात पण सार्वजनिक ठिकाणी ती चुबने घेत आहेत, एकमेकाना गच्च मिठ्या मारत आहेत असे दृश्य अगदी क्वचित दिसते.

घटस्फोट हा योरूनबाईंचा जिव्हाळ्याचा प्रश्न दिसला तरुणात पसरत चाललेली, विवाह न करता राहण्याची लाटही त्याना पसत नव्हती नव्या पिढीत नॉर्वे, स्वीडनमध्ये जे विवाह होतात त्यापैकी चाळीस टक्के जोडपी घटस्फोट घेतात असे त्या म्हणाल्या अविवाहित पद्धतीने एकत्र राहण्यात मुलाला त्रास होतो असे त्याचे मत होते भारतात विवाह का टिकतात आणि लग्ने कशी ठरविली व केली जातात याची त्याना माहिती होती. भारतीय प्रकारदेखील त्यांना पसत नव्हता याविषयी रेखा व त्याच्यात बरीच आणि वारवार चर्चा झाली.

मुलाना कायदेशीर त्रास होणार नसेल आणि त्यांची आबाळ होणार नसेल तर अविवाहित जोडपी निर्माण होण्यास हरकत नसावी आज आपल्याला या गोष्टीची सवय नाही पण पुढे होईल अशी भूमिका मी माडू पाही. पण त्याचबरोबर भारतात सध्या साखरपुड्यावरच जोरदार खर्च होतो आणि लग्ने तीनतीन हजार माणसे बोलवून साजरी केली जातात ही माहितीही मी त्याना देत असे आमचा विवाह प्रेमविवाह आहे, आमचे लग्न आम्ही रजिस्टर्ड पद्धतीने केले, ते कमी खर्चात व कमी लोक बोलवून केले आम्हाला पोकळ डामडौल आवडत नाही आणि असे समारभ करण्यासाठी लागणारा ब्लॅकमनी आमच्याजवळ आहे तरी कुठे हे आम्ही अनेकाना सागितले यामुळे आमच्याविषयी तेथे अनुकूल मत झालेले दिसले. आम्हाला दोनच मुले आहेत, ती गुणी

आहेत आणि आम्ही संततीनियमन पाळतो ही आमची माहितीही त्या मंडळींना आवडलेली दिसली.

परदेशात जेव्हा तुम्ही प्रवासी म्हणून जाता आणि हॉटेलातून राहता तेव्हा गोष्ट वेगळी असते पण जेव्हा तुम्ही त्या देशातील तद्देशीय मंडळींच्या कुटुंबातून राहता तेव्हा तुमच्या गृहस्थाश्रमाच्या तपशीलाला महत्त्व प्राप्त होते. आपल्याकडे उतरलेली गेस्ट मंडळी कोण आहेत याबरोबरच ती कशी आहेत याचा विचार अर्थातच होणार हे उघड आहे.

आम्ही रोटरी संघटनेचे सदस्य आहोत तेव्हा आम्ही श्रीमंत असण्याची शक्यता आहे असेही अनेकांना वाटे पण आम्ही ह्याबाबतही निराकरण करीत असू. आम्ही श्रीमंत नाही पण सुस्थितीतील आहोत. आणि या सुस्थितीला एकत्र कुटुंब पद्धतीची पार्श्वभूमी कारणीभूत आहे हे आम्ही सांगत असू. आमच्या आईवडिलांना आम्ही कधी वृद्धाश्रमात जाऊ देणार नाही हा आमचा निश्चय त्यांना आवडत असावा असे वाटते.

□

# ९. आहार व पोषाख

नॉर्वेजियन्स सकाळी ७.३० - ८ लाच ब्रेकफास्ट घेतात सकाळी ८ ला सगळे कामाला जाण्याच्या घाईत असतात त्यामुळे ब्रेकफास्ट टेबल रात्रीच लावून ठेवतात ब्रेकफास्टला पाव - लोणी, कॉफी, ऑम्लेट अथवा एखादा अन्य पदार्थ, एखादी उसळदेखील बाहेर पडताना पाव किंवा केक बांधून घेऊन एखादे फळ बरोबर ठेवतात

दुपारी एकला छोटी लंच होते. काही ठिकाणी १२ ३० लाच थोडेसे खाणे, कॉफी व परत काम बहुतेक ऑफिसेस तीन - साडेतीनला सुटतात. शाळा - कॉलेजेदेखील या ऑफिसच्या पद्धतीने चालतात. छोट्या मुलांच्या शाळा ९ - ९ ३० ला भरतात

५.३० च्या सुमारास डिनर होते ब्रेकफास्ट अंधारात आणि डिनरही अंधारात या इतक्या लवकर डिनरची आपल्याला सवय व्हावी लागते. डिनर भरपूर असते मांसमासे यांची रेलचेल असते मासे हे तर नोर्स्क मंडळीचे मुख्य अन्न ही मंडळी कच्च्या भाज्याही भरपूर खातात पावाचे प्रोटीननुसार ३ - ४ प्रकार असतात गोडधोड केक्सचीही यांना फार आवड. फळे वा फ्रूटसॅलड असते. कॉफी तर मस्ट

रात्री ८.३० - ९ ला सपर. कॉफी व केक खायचे आणि मग झोपायचे काही वेळा सपरला केक्स बरोबर गरम दूधही घेतात.

याचा अर्थ नॉर्वेजियन चार वेळा खातात एक वेळेला अगदी भरपूर आणि तीन वेळा थोडे थोडे उबेच्या दिवसात म्हणजे कमी थडीच्या दिवसात मे, जून, जुलैतदेखील आहाराच्या वेळा व पद्धती हीच राहते.

**कॉफी, बीअर व वाईन**

नॉर्वेत लिकरला बदी आहे हे ऐकून आश्चर्य वाटेल पण आहे तीन टक्के अल्कोहोल असलेली बीअर आणि वाईन मिळते वेळप्रसगी जेवताना किंवा नतर ही वाईन किंवा बीअर वापरली जाते. व्होडका, व्हिस्की, रम, अशा आणि जास्त टक्के अल्कोहोल असणाऱ्या मद्याला नॉर्वेत बदी आहे. गेले कित्येक वर्षे अशा प्रकारची मर्यादा नॉर्वे पाळीत आहे

नॉर्वेचा शेजारी स्वीडन आहे तेथे नियम इतके कडक नाहीत. नॉर्वेत नियम कडक असण्याचे कारण तेथील डोंगर दऱ्यातील अरुद रस्ते दारू पिऊन या रस्त्यावर वाहने चालवायची म्हणजे साक्षात मृत्यूला आमत्रण. स्वीडन तुलनेने सपाट देश आहे, तेथील रस्तेही रुद आहेत

नॉर्वेत चहाही कोणी पीत नाहीत कॉफी, कॉफी आणि कॉफी. काळी बिनसाखरेची आणि बिनदुधाची कॉफी दूध मात्र लोक भरपूर पिताना दिसतात होल आणि टोन्ड दुधाची लिटर लिटरची खोकी वेगळी मिळतात. सात आणि दहा क्रोनर्सला एक लिटर दूध पडते कित्येक वेळा नॉर्वेत डेन्मार्कमधूनही दूध येते कारण डेन्मार्क म्हणजे दूधदुभत्याचे आगरच होय. अर्थात हे सारे दूध गायीचे, शेळ्याचे होय. रेनडियरचेही दूध असते पण ते लोकप्रिय नाही.

फ्रान्स - इटलीत जसे वाईन व ॲपल सायडरचे प्रस्थ आहे तसे येथे नाही. कारण नॉर्वेत सफरचद थोडीफार होत असली तरी द्राक्षे अजिबात होत नाहीत.

**व्यसनापासून दूर**

नॉर्वे तुलनेने व्यसनमुक्त दिसला. माणसे पाईप ओढताना, स्त्रिया सिगारेट्स ओढताना दिसतात पण क्वचित नॉर्वेजियन सिगारेट्स विशिष्ट काळजी घेऊन बनविलेल्या असल्याने अपायकारक नसतात असे सागण्यात आले. या सिगारेट्सचा कागद विशिष्ट तऱ्हेचा असतो तरुण मुला - मुलीत तर सिगारेट्स ओढणे अपवाद म्हणूनही आढळले नाही

अफू, चरस, गाजा व ड्रग्जसारख्या गोष्टी तरुणात पसरण्याची भीती येथेही बोलून दाखविली जात होती. याचे कारण पैसा आहे. पण अजून ह्या गोष्टी फार मर्यादित आहेत.

तुमच्याकडे ड्रग्ज कितपत आहेत ? या प्रश्नाला आम्ही खरे ते सागत असू आमच्याकडे ड्रग्ज कोणाला परवडणार ? आमची ही समस्या नाही. मात्र आमच्याकडे दारू पिण्याचे प्रमाण वाढले आहे व सरकारनेच दारू खुली केली आहे, असे उत्तर देत असू.

आपल्याकडे असलेले फिल्मस्‌चे वेड येथे नाही फिल्मउद्योग तेजीत आहे तो स्वीडनमध्ये नॉर्वेजियन टी व्ही. ला एकच वाहिनी असून जगातील विविध बातम्या व शैक्षणिक वाटतील असे कार्यक्रम दाखविले जातात. छायागीत हा प्रकार येथे नाही थोडक्यात, स्वीडनच्या तुलनेत नॉर्वे सोवळा आढळला

पोषाख

थडीच एवढी असते की नुसत्या पँट - शर्टवर भागवणेच अशक्य जाड स्वेटर्स, कोट, ओव्हरकोट, हातमोजे, जाड पायमोजे आणि बूट हे पुरुषाना वापरावेच लागतात ऑफिसमध्ये किंवा पार्टी वगैरेत पुरुष बहुतेक सुटात व नेकटाय लावून येतात सूट घालावयास हवा का ? हे दर वेळी विचारावे लागते. साधारणपणे कामाचा सदर्भ, अपॉईण्टमेंण्ट असली की सूट आलाच.

मध्यम वयस्क किंवा वृद्ध माणसे जुन्या पद्धतीचे चामड्याचे शूज वापरणे पसत करतात पण तरुण मुले विविध पद्धतीचे नवेनवे शूज, बूट्स वापरतात लाब केस वाढविलेले तरुण बरेच दिसतात. स्त्रियाच्या ओव्हरकोटमध्ये जे वैविध्य असते ते पुरुषाच्या ओव्हरकोटमध्ये नसते मात्र त्याच्या टोप्यात वैविध्य दिसून येते घरात सेण्ट्रल हीटिंग असल्याने शर्टपॅण्टवर हिंडता येते तरीही बऱ्याच वेळा जाड लाब बाह्याचा स्वेटर अगावर असावासा वाटतो. घरातही मोजे व हलके बूट वापरावे लागतात उघड्या अनवाणी पायाने हिंडणे अशक्य असते

ओव्हरकोटाऐवजी नव्या प्रकारची वजनाने हलकी पण गुबगुबीत व लाब जर्किन्स अलीकडे लोकप्रिय होत आहेत. याचे रग पिवळट, निळा, हिरवट असे असतात आत सूट व वर अशा प्रकारचे जर्कीन असे सर्रास दिसते. लोकरीचे व जाड चामड्याचे असे दोन प्रकारचे हातमोजे वापरले जातात. बाहेर पडताना ओव्हरकोट व छत्री घ्यायची का हा प्रश्नच नाही. केव्हा बर्फ पडू लागेल व गार वारे सुटतील याचा नेम नाही

मध्यम वयस्क किंवा वृद्ध स्त्रिया हमखास स्कर्ट व टॉप मध्ये दिसतात केस बॉब केलेले, त्याचप्रमाणे जाडजूड वेण्याही दिसतात. खास नोर्स्क डिझाइनचे असे स्वेटर्स असतात काळी पाढरी लोकर व डिझाईन विशिष्ट असते. बूट आणि मोजे वापरावेच लागतात अगदी जाड ओव्हरकोट व डोक्याला टोपीही घालणे भाग असते. पण स्त्रियाचे ओव्हरकोट व टोप्या आकर्षक असतात. गळ्याभोवती रुमालही गुडाळतात.

अगदी तरुण मुली अमेरिकन फॅशन्सच्या जीन्स व शर्टात असतात पण स्कर्ट वापरणाऱ्या मुलीही दिसतात. काही मुली अन्य पॅण्ट्स घालतात. लाब केस मोकळे ठेवण्याकडे तरुण मुलींचा कल आहे हातमोजे व ओव्हरकोट वापरणे भाग असते. तरुण मुली कातड्याचे काळे गमबूट घालतात कपड्यावरून सामाजिक थर ओळखता येत नाही कारण सर्वांचेच कपडे चागले असतात

लहान मुलाचे कपडे मात्र विलक्षण गोड व आकर्षक. रगीबेरगी जर्किन्स आणि रगीबेरगी टोप्यातील मुलाकडे पाहात राहावेसे वाटते आधीच गुबगुबीत व धडधाकट मुले कपड्यात जास्त खुलून दिसतात. काटकिळी, खगलेली, रोगट मुले शोधूनही सापडणार नाहीत हे विशेष वाटले. मुलाच्या जर्किन्स व स्वेटर्समध्ये राष्ट्रध्वजातील रग म्हणजे ताबडा व निळा खूप वापरले जातात. स्वीडीश मुलांच्या जर्किन्समध्ये निळ्या व पिवळ्या रगावर भर असतो. मुले ओव्हरकोटाऐवजी नव्या पद्धतीची जाड विंटर जॅकेट्स घालताना दिसतात. ही चामड्याची सुद्धा असतात

स्त्रिया किंवा पुरुष फक्त झोपतानाच गाऊन घालतात अगदी घरातदेखील गाऊनमध्ये हिंडताना कोणी दिसणार नाही अघोळ झाल्यावर घालायचा वेगळा टर्कीश गाऊन असतो.

□

# थिएटर म्युझियम

१०.

बेर्गेन शहरातील ' थिएटर म्युझियम ' ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची सस्था होती बेर्गेन विद्यापीठाच्या आवारानजीक एका भव्य इमारतीत हे सग्रहालय आहे नॉर्वेजियन रगभूमीचा इतिहास येथे जतन केला जात आहे. इग्लडमधील स्ट्रॅटफर्ड अपॉन एव्हॉन या शेक्सपिअरच्या जन्मग्रामी स्वान थिएटरमध्ये जशा प्रकारचे म्युझियम आहे तशा प्रकारचे हे आहे

नाटककाराची हस्तलिखिते, रगभूमीसाठी वापरलेल्या संहितेच्या रगावृत्त्या, नटनट्याचे कपडे, रगभूमीवर वापरलेले विविध प्रकारचे सामान, फर्निचर अशा अनेक गोष्टी येथे जपल्या जात आहेत. नॉर्वेतील गेल्या तीनशे वर्षांच्या नाट्यपरपरेचे अवशेष येथे नीट ठेवले गेले आहेत. आपल्याला फक्त इब्सेन ठाऊक असतो. पण येथे हॉलबर्ग, हायबर्ग, ब्योर्नसनपासून अगदी अलीकडील नाटककारापर्यंत माहिती मिळते. फोटॉग्रफी

येण्याच्या आधीच्या काळातील नाटकाच्या सेट्सची चित्रे, स्केचेस पाहायला मिळतात आणि फोटॉग्रफी आल्यानतरच्या नाटकाची प्रयोगवार लावलेली हजारो म्हणजे हजारो दुर्मिळ छायाचित्रे बेर्गेनमध्ये आणि अन्यत्र जेवढे जेवढे म्हणून इब्सेनच्या नाटकांचे नॉर्वेजियन प्रयोग झाले त्या साऱ्याची छायाचित्रे मी काळजीपूर्वक पाहिली आणि त्यातील अत्युत्कृष्ट छायाचित्राची झेरॉक्स करून घेतली या कामात दोन दिवस मोडले

मला मदत करण्यासाठी सिरेन लायरव्हॉग नावाची रगभूमीवर पीएच. डी करणारी एक तरुणी दिली होती. तिने न थकता आणि चिकाटीने साथ दिली तिचा हसरा आणि अतिशय सुदर चेहरा आम्हा दोघाच्या स्मरणात कोरला गेला आहे. नॉर्वेहून परतताना तिला आम्ही परत भेटू व काही भेटवस्तू देऊ शकू असे वाटले होते पण ते घडले नाही याची हळहळ वाटली

इब्सेनच्या *'डॉल्सहाऊस'* मधील पहिल्या नॉर्वेजियन प्रयोगात नोराने तारातेला नृत्य करताना जो फ्रॉक वापरला होता तो येथे जपून ठेवला आहे इब्सेनची रगभूमी दिग्दर्शक असताना, केलेली रगीत चित्रे, *'ओलाफ लिलयेक्रान्स'* साठी केलेली नटाच्या वेषभूषेची चित्रे खरोखरच छान आहेत. मौज म्हणजे आपल्याकडे चित्रकार समजले जातात अशा व्यक्तीच्यापेक्षाही सरस चित्रे येथे सहज पाहायला मिळतात या चित्राचा सदर्भ रगभूमीपुरता मर्यादित आहे एवढेच. इब्सेनच्या *'व्हायकिंग'* नाटकात जे दणदणीत जाड कपडे व अवजड शस्त्रे वापरली गेली तीही व्यवस्थित ठेवली आहेत पूर्वी नाटकातून 'सीन' रगविलेले असत, तेही आहेत रगभूमीवर ध्वनिनिर्मितीसाठी वापरली जाणारी यत्रे (उदा. वादळ, घोड्याच्या टापा) आणि पेट्रोमॅक्सचे दिवे अशासारख्या वस्तूही जतन केल्या आहेत रगभूमीसाठी जे सेट्स वापरले गेले त्याच्या छोट्या प्रतिकृती पाहावयास मिळतात

हे म्युझियम मला नॉर्वेजियन रगभूमीची कल्पना देणारे ठरले. भारतात आपण आजच्या नोर्स्के नाटकाच्या व्हिडिओज पाहू शकू पण हे म्युझियम देते ती कल्पना येण्यासाठी तेथेच जावयास हवे मराठी रगभूमीच्या सदर्भात असे म्युझियम कोठे आहे ? उद्या हजारो मैल पार करून समजा एखादा अभ्यासक मराठी रगभूमीवर पुस्तक लिहिण्यासाठी आला तर तो कोठे जाईल ? त्याला अशी माहिती कोण देईल ? माझे मन स्वत ला अवघड प्रश्न विचारण्यात निष्कारण पटाईत झाले आहे खरे !

□

# उस आणि फाना



उस जिमनॅस हे एक ज्युनिअर कॉलेज होते. तेथे जाऊन आम्ही ' *फ्रूएन फ्रा हावअ* ' ( लेडी फ्रॉम दि सी ) या नाटकाची फिल्म बघितली. अर्थात व्हिडिओ फिल्म. उस जिमनॅस या शाळेचे हेन्रिकसन हे माजी प्राचार्य होते आणि माजी प्राचार्य असले तरी या शाळेच्या किल्ल्या त्याच्याकडेही होत्या

उस जिमनॅस रमणीय व भव्य ज्युनिअर कॉलेज आहे तेथील चकचकाटाची व भव्य सौंदर्याची कल्पना करवणार नाही. मुख्य इमारत कॉर्बुझिएचा प्रभाव असणाऱ्या आर्किटेक्टने केली होती हे उघड दिसत होते विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर प्रशिक्षण देण्यासाठी स्वतत्र दालन होते आणि बास्केटबॉल कोर्ट इनडोअर होते कॉलेजभोवती असलेली बाग सुव्यवस्थित होती. कडक हिवाळा असल्याने आणि आम्ही गेलो त्या वेळी कॉलेजवर तास चालू नसल्याने कॉलेजचे दर्शन शुकशुकाटाचे होते ज्या दालनात आम्ही कॅसेट बघितली तेथील सेंट्रल हीटिंग चालू केले तरी गारठा जायला वेळ लागला. आम्ही कुडकुडतच फिल्म बघितली फिल्म चागली होती आणि लिव उलमान या प्रसिद्ध नॉर्वेजियन अभिनेत्रीने तीत प्रमुख भूमिका केली होती

इब्सेनच्या नाटकाची व्हिडिओ कॅसेट बघायला आम्हाला उस जिमनॅसवर जावे लागले. इब्सेनच्या नाटकाच्या कॅसेट्स नॉर्वेत विक्रीस उपलब्ध नाहीत. नॅशनल रेडिओ - टेलिव्हिजन कॉर्पोरेशन ही नाटके प्रसारित करते आणि शैक्षणिक सस्था प्रसगी ती रेकॉर्ड करून ठेवतात. आणि अशा सहा कॅसेट्स आम्हाला पाहता आल्या. उरलेल्या पाहण्यासाठी सरकारी प्रसारण केंद्रात जावे लागले आणि तेही उस्लोत याचे कारण साधे आहे नाटके करणारे ' एन आर को. ' चे कलावत असले तरी त्याच्या रॉयल्टीबाबतचा मुद्दा सुटलेला नाही. कॅसेट्स विक्रीकरता काढायच्या तर त्याना रॉयल्टी मिळायला हवी आणि त्याबाबतची बोलणी चालू आहेत उस जिमनॅसच्या सौजन्याने आम्हाला ' *डी युगेस फोरबुड* ' आणि ' *पेअर ग्यून्ट* ' या दोन्ही व्हिडिओ फिल्मस् नतर पुढे पाहायला मिळाल्या व्हिडिओ फिल्मस् मला दिल्या आणि त्यामुळे म्हणा, मी पुढे तीन व्याख्यानेही उस जिमनॅसवर दिली व्याख्याने भारतीय सस्कृती आणि भारतातील राजकीय परिस्थिती यावर होती आणि पूर्वतयारी करून गेल्यामुळे ती चागली वठली.

व्हिडिओ फिल्मस् पाहणे आणि त्यावर हेन्रिकसन आणि ऑर्सेथ यांच्याशी चर्चा करणे हा बेर्गेनमधील वास्तव्यात महत्त्वाचा कार्यक्रम ठरला. फिल्मविषयक चर्चा करताना दोन गोष्टींची सहजच चर्चा होई. त्या म्हणजे मूळ नाटके आणि नॉर्वेजियन समाज. समाजही दोन काळांतील, एक तत्कालीन १९ व्या शतकाचा आणि सध्याचा विसाव्या शतकाच्या अखेरीचा.

नॉर्वेजियन समाज हा एकसंघ समाज आहे. आपल्या महाराष्ट्रातील मराठी समाजदेखील बहुसांस्कृतिक आणि बहुजिनसी आहे तशी त्याची अवस्था नाही. नॉर्वेत दोन नॉर्वेजियन भाषा आहेत. एक बूकमॉल ही डॅनिशचा प्रभाव असणारी शिष्टसमत भाषा तर दुसरी नीनोर्श्क ही सरकारमान्य आणि बोलीभाषेतील शब्दांचा भरणा असलेली व वेगळे हेल असणारी भाषा. टी. व्ही. वर दोन्ही ऐकायला मिळतात, पण परकीयांना त्यांच्यातील फरक जाणवत नाही. त्याला काही काळ जावा लागतो. भाषा दोन असल्या तरी नॉर्वेजियन समाज एकसंघच आहे आणि एका देशात राहणारा एकसंघ समाज कसा असतो याचा अनुभवच घ्यावयास हवा. ही एकसंघता इतक्या प्रकारांनी आविष्कृत झालेली असते की विचारायची सोय नाही. एक झेंडा, एक राजा, एक पार्लमेंट, एक चर्च, एक वर्ण, एक वंश, एकाच लाकडी पद्धतीची घरे असे अनेक घटक ही एकसंघता स्पष्ट करतात. एक गमतीदार उदाहरण. सिलोनमधून आणि पाकिस्तानमधून आलेले शेकडो निर्वासित अलीकडे नॉर्वेत दाखल झालेले आहेत. निर्वासित येतात आणि आपल्या देशात ठाण मांडून बसतात हा अनुभव नॉर्वेला नवा आहे. निर्वासित ( रेफ्यूजी ), त्यातही पाकिस्तानी, तेथे मशीद बांधण्यासाठी ते हालचाली करीत आहेत आणि त्यावर उलट - सुलट चर्चा चालू आहेत.

दोन - चार लोकांनी याबाबत माझ्यापाशी विषय काढला. त्यांची अस्वस्थता मला दिसत होती. आज पाकिस्तानी मुसलमान मशीद बांधतील उद्या सिलोनी, तमीळ निर्वासित मंदिरे बांधू पाहतील ही भीती त्यांना होती.

मी म्हटले, ' हा तुमचा प्रश्न आहे. तुम्ही लोकशाही राष्ट्र आहात. बहुमताने निर्णय घ्यावा लागेल आणि तुमच्या देशाचा एकजिनसीपणा ठेवायचा का नाही हे ठरवावे लागेल. तमीळ माणसे हेकट आहेत, पण घरात देवपूजा करणे हिंदूंना मान्य असल्याने ते उतावीळपणे लगेच मंदिर बांधायला निघतील, असे वाटत नाही.'

हा विषय चालू असताना हेन्रिकसन यांच्यावर आलेला वर्तमानपत्रातील एक लेख त्यांच्या बायकोने अभिमानाने मला दाखविला. वय सदुसष्ट वर्षांचे आणि कडाक्याची थंडी, असे असले तरी हेनिंग यांनी समुद्रावर जाऊन १२७ मासे धरले होते. या

पराक्रमावर तो लेख होता लेखात हेनिग गळ धरून बसल्याचे उत्तम छायाचित्र होते. आर्नअ ऑर्सेथ यानी तो लेख लिहिला होता. पुढे त्यानीच माझ्यावरही असाच लेख लिहिला आणि मला 'प्रकाशात' आणले समुद्रावर जाऊन मासे मारणे आणि थड हिमाच्छादित डोंगरात जाऊन स्कीइग करणे, बर्फात घसरण्याचा खेळ खेळणे हे नॉर्वेजियन मडळींच्या हाडीमाशी खिळलेले आहे नॉर्वेतील प्रत्येक कुटुबात जशी मोटारकार असते तशी बोटही असते क्वचित जास्तही असतात सवड आणि सुट्टी मिळाली की ही मडळी समुद्रावर जात असतात त्याची सणसणीत मनगटे व दड वल्हविण्याच्या सरावातून तयार होतात स्कीइग हा तर त्याचा राष्ट्रीय खेळच आहे त्याच्या स्पर्धांचे दर्शन टी व्ही. वर वारवार चालू असते. सर्व वयाची मडळी सर्व थरावर या खेळात भाग घेत असतात. स्कीइगसाठी लागणारे मौल्यवान सामान व बूट यानी तळघरे व्यापलेली असतात. थडीत स्कीइग तर उन्हाळ्यात समुद्रावर जाणे हे चुकत नाही नॉर्वे Fjords आणि Fjels याचा देश आहे म्हणजे समुद्रखाड्या आणि पर्वत याचा देश आहे आणि म्हणूनच तो समुद्रावर भटकती व स्कीइग याचाही देश आहे. दर्यावर्दी पूर्वज आणि त्याची व त्याच्या जहाजाची घरात टागलेली चित्रे, छायाचित्रे ह्या नॉर्वेजियन कुटुबाचा अभिमानाचा विषय असतो

मासेमारीची हेन्रिकसनची आवड ही माझ्या दृष्टीने महत्त्वाची असली तरी उपयोगाची नव्हती हेन्रिकसन कविता करतात हे माझ्या माहितीचे झाले होते त्याचा आवाज त्याच्या व्यक्तिमत्त्वाप्रमाणेच धीरगभीर आणि हळूवार होता माझ्या मनात एक कल्पना चमकून गेली इब्सेनच्या मूळ नॉर्वेजियन कविता त्याच्याकडून ऐकाव्यात व त्या टेप करून घ्याव्यात यात दोन्ही गोष्टी साधणार होत्या त्याचा आवाज माझ्या सग्रही राहणार होता आणि इब्सेनच्या निवडक कविताही या कल्पनेने हेन्रिकसन आनदून गेले

इब्सेनच्या कविता निवडणे, त्यावर इग्रजीतून थोडे भाष्य करणे आणि मूळ कविता म्हणणे, ती टेप करणे हे काम आम्ही उत्साहाने केले *'तेर्ये विगेन'* ही कविता तर नॉर्वेतील घराघरातून माहीत असते. ही दीर्घ कविता आम्ही सपूर्णपणे टेप केली होकॉनचे 'पाळणागीत' देखील प्रत्येक नॉर्वेजियन स्त्रीला पाठ असते. ते लिव रायडूनच्या आवाजात घेतले एवढेच नाही तर हेन्रिकसन याच्या स्वत च्या काही कविताही टेप केल्या

तेर्ये विगेन कविता मला माहीत आहे आणि आवडतेही हे ऐकल्यावर हेन्रिकसन कुटुबाला मी आणखी जवळचा वाटलो. तेर्ये विगेन हा अपकाराची फेड उदात्त उपकाराने करणारा भारतीय वळणाचा वाटावा असा खलाशी, कॅप्टन होता ही कविता ऐकताना अनेक नॉर्वेजियन्सच्या डोळ्यात अश्रू तरळतात ही कविता मला आवडते हे

ऐकल्यानतर हेन्रिकसनने माझ्या ग्रिमस्टाच्या भेटीत तेन्ये विगेनच्या बदरभागाला आणि कबरीला माझी भेट ठरविली.

तीन जानेवारीला रात्री बाहेरगावी गेलेले वीगांड पतिपत्नी बेर्गेनला परतले आणि आमचा मुक्काम त्याच्याकडे हलला एका हसऱ्या, उमद्या, मोकळ्या घरातून एका करड्या शिस्तीतील, छोट्या राजवाड्यात आम्ही दाखल झालो

फाना हा बेर्गेन शहरातील श्रीमत वस्तीचा भाग आहे फ्योर्द आत आल्याने निर्माण झालेले सुदर विस्तीर्ण तळे आणि त्याभोवतीच्या डोंगरावर सूचिपर्णी वृक्षात लपलेले अनेक बगले, त्याच्याभोवतीच्या उत्कृष्ट बागा ही फानाची वैशिष्ट्ये आहेत. वीगाड याचा ऐटबाज बगला या जलाशयाच्या काठी होता तेथील अती पॉश व श्रीमती वातावरणाने मी व रेखा दोघेही दबकून गेलो. या बगल्यातील फर्निचर, गालिचे, चित्रे इतके भारी आणि स्वच्छ होते की सुरुवातीस आमची हालचालदेखील बिचकत होत होती आम्हा दोघाना महाबळेश्वराला राहणे परिचित आहे पण येथील निसर्गसौंदर्यापेक्षा घरातील वातावरण आम्हाला जास्त जाणवत होते आमची मराठमोळी मने ताणाखाली आली होती

वीगाड पतिपत्नी भारतात येऊन गेलेली होती त्याच्या निमत्रणामुळे मी येथे पोहोचलो होतो पण त्या दोघाची मते भारताविषयी नव्हे तर भारतीयाविषयी अनुकूल नव्हती भारतीयाचे दोष आणि दौर्बल्यस्थाने त्याच्या परिचयाची होती. त्यामुळे सुरुवातीस या दोघाच्याही वागण्यात व आमच्याकडे पाहण्यात एक अतर होते हे अतर रेखाच्या कोमल मनाला जास्त जाणवत होते, खुपूनही गेले माझ्याजवळ नेहमीप्रमाणे आत्मविश्वास होता वरून करडी व कोरडी वाटणारी माणसे आतून तशी नसतातही असे अनेक वेळा माझ्या अनुभवाला आलेले होते त्यामुळे लवकरच या दापत्याला मी आपलेसे करू शकेन असे मला वाटले आणि काळाच्या ओघात घडलेही तसेच

जलाशयाच्या एका बाजूला वीगाडचा बगला होता आम्हाला दिलेल्या खोलीतून वरचा थर गोठलेले ते तळे आम्हाला दिसत होते खिडकीची भव्य व जाड तावदाने जणू पाण्याला भिडू पाहात होती सूचिपर्णी झाडे समोर उभी होती जलाशयाच्या पलीकडे लाबवर एक ऐतिहासिक वास्तू दिसत न दिसत उभी होती नॉर्वेचा जगप्रसिद्ध सगीतकार एडवर्ड ग्रीग याची ती वास्तू होती त्या दिशेने पाहिले की माझे मन उत्फुल्ल होई वीगाड याच्याकडील मुक्कामात एडवर्ड ग्रीगच्या बऱ्याच रेकॉर्डस् व टेप्स मिळवून ऐकल्या ग्रीगने इब्सेनच्या 'पेअर ग्यूंट' नाटकाला दिलेल्या सगीताच्या रेकॉर्डस वीगाडनी मला पूर्वी भारतातच भेट दिल्या होत्या, ही स्मृती ताजी होती. वीगाड याच्याकडील

एडवर्ड ग्रीग याची ती वास्तू होती त्या दिशेने पाहिले की माझे मन उत्फुल्ल होई वीगाड याच्याकडील मुक्कामात एडवर्ड ग्रीगच्या बऱ्याच रेकॉर्डस् व टेप्स मिळवून ऐकल्या ग्रीगने इब्सेनच्या *'पेअर ग्यून्ट'* नाटकाला दिलेल्या सगीताच्या रेकॉर्डस वीगाडनी मला पूर्वी भारतातच भेट दिल्या होत्या, ही स्मृती ताजी होती वीगाड याच्याकडील क्लासिकल म्युझिकच्या इतरही रेकॉर्डस मी काळजीपूर्वक ऐकल्या चायकोवस्की, ब्रॅम, मोत्सार्ट, वाग्नेर, बीथोव्हन, बाख याच्या सगीतस्वरानी मी असेपर्यंत वीगाड याचे घर निनादत राहिले आणि त्याचा जादूप्रमाणे परिणाम होऊन आम्ही चौघे एकमेकाच्या जवळ आलो बौद्धिक वाद किंवा वैचारिक स्पष्टीकरणाना जेव्हा फारसा वाव नसतो तेव्हा सगीतासारखी भाषा कामी येते याचा अनुभव आला.

□

## *रम्य फ्योर्दस्* १२.

आम्ही सुरुवातीस एक गोष्ट उत्साहाने पार पाडली ती म्हणजे सूत्रा आणि त्या दिशेने रपेट करून नव्या रस्त्यानी जोडली जात असलेली फ्योर्दस् बघितली नॉर्वेचा पश्चिम किनारा सरळ रेषेत पाहिला तर २६०० कि मी आहे पण प्रत्यक्षात त्याची लाबी एकवीस हजार कि मी आहे याचे कारण फ्योर्दस्. आपल्याकडे समुद्रकिनारा म्हटले की सरळ दोन भाग पडतात एकीकडे समुद्र आणि दुसरीकडे जमीन समुद्राच्या काठावर ठिकठिकाणी वाळूचे किनारे हा प्रकार नॉर्वेत नाही किनाऱ्यावर ठिकठिकाणी समुद्र आत घुसतो आत घुसतो तेथे उचउच डोंगर दोन्ही बाजूला असतात आणि किनाऱ्याकिनाऱ्याने असख्य लहान लहान बेटे. त्यामुळे सरळ किनारा हा प्रकारच नाही. समुद्राचे पाणी दिसते पण प्रमुख सागर दूरवर असतो आणि तेथे गेले तरी तो सरळ असा दिसत नाही

पूर्वीच्या काळी या फ्योर्दस्वर मच्छीमारी चाले शेतीच्या दृष्टीने जी बेटे उत्तम वाटत त्यावर वस्ती असे आणि पलीकडच्या बेटावर किंवा नॉर्वेच्या प्रमुख भूभागावर जायला पडावाचा, नावाचा वापर केला जाई फ्योर्दस्मधील पाणी शांत असते त्यामुळे तेथे मासे जमा होत असतात त्याच्या आधारे मच्छीमारीही करता येई, येते आणि उपजीविकेस मदत होई, होते एका बेटावरील माणसाचा दुसऱ्या बेटावरील माणसाशी सपर्क राखणे सोपे नसे त्यामुळे नॉर्वेची बव्हशी लोकसख्या किनाऱ्यावरील छोट्या छोट्या गावात विभागली होती

असल्यामुळे फ्योर्दस्‌मध्ये येणाऱ्या माशाची सख्या घटली आहे व काही ठिकाणी तर मासे मारणारे शेकडो, हजारो कोळी बेकार झाले आहेत. त्याची बेकारी दूर कशी करायची हे नॉर्वेसमोरील एक आव्हान आहे.

ही फ्योर्दस् आणि बेटे पाहत आम्ही मोटारीतून भरपूर भटकलो. प्रत्येक फ्योर्दचे सौंदर्य वेगळे, प्रत्येक बेटाचे सौंदर्य वेगळे. काही ठिकाणी डोंगराचे कडे आणि शिखरे आल्हाददायक प्रसन्न रूपात उभी असतात. शेते असतात, झाडी असते, तर काही ठिकाणी डोंगराचे रूप, निर्जनता, वैराणपणा याचे रूप भीतिप्रद असते आपल्याकडील कोकणातली माणसे जशी देशावर स्थायिक झाली तरी कोकणातल्या स्मृती मनात जोपासत असतात त्याप्रमाणे नॉर्वेतील अनेक माणसे आता मोठ्या शहरातून राहत असली तरी ' त्याच्या बेटावरील ' स्मृती, जुन्या चालीरीती जपत असतात अनेक घरातून अशा बेटावरील प्रमुख डोंगराचे निसर्गचित्र टागलेले असते हेन्रिकसनच्या घरात ट्यूसनेस बेटावरील डोंगराचे दृश्य टागलेले होते पूर्वीच्या काळी आपण या बेटावर कसे कष्टप्रद बालपण किंवा तारुण्य घालविले याच्या आठवणी व किस्से वयस्कर माणसे कौतुकाने ऐकवत असतात. आपल्या देशाची रचना अशी आहे की समुद्र व समुद्रकिनाऱ्यावरील वस्ती याना दुय्यम स्थान आहे आपण नद्याचा विचार जास्त करतो. नॉर्वेची रचना अगदी वेगळी आहे नॉर्वेचा भूभाग हिमाच्छादित डोंगरानी व्यापलेला आहे. तेथे वस्ती दुर्लभ आहे जी काही प्रमुख वस्ती व शहरे ती किनाऱ्यावर आणि किनाऱ्यालगतच्या बेटावर आहे त्यामुळे या फ्योर्दस्‌ना त्याच्या जीवनात असाधारण महत्त्व आहे ही फ्योर्दस् खूप लाब असतात. सोनफ्योर्द हे सर्वांत जास्त लाबीचे फ्योर्द दोनशे कि मी. आहे. नॉर्वेतील पर्वतशिखरे हिमाच्छादित असली तरी त्याची उची हिमालयाएवढी नाही तर सह्याद्रीपेक्षा थोडी जास्त आहे. यालहोपिगेन हे सर्वांत उच्च शिखर ७४०८ फूट उचीचे आहे. नॉर्वेजियन माणसाचे अस्तित्वच असे आहे की, तो फ्योर्दस्, बेटे आणि हिमशिखरे याचा एकत्रित विचार करतो हे सारे घटक त्याला अगदी निकटचे वाटत असतात त्याच्या व्यक्तिमत्त्वात नाविक आणि गिर्यारोहक सामावलेले असतात आणि त्यामुळे गप्पा जरा रगात आल्या की तो त्याची फ्योर्दस्, हिमशिखरे, बेटे याच्याविषयी बोलू लागतो वेळी गहिवरूनही येतो आम्हाला फिरवून फ्योर्दस् दाखवीत असताना वीगाडची अवस्था हीच होत होती तो स्वत जास्त काळ बेर्गेनमध्येच राहिलेला होता. पण त्याचे वाडवडील तो विसरू शकत नव्हता. त्याचे अनुभव तो नकळत स्वत चे मानीत होता

या बेटावर फ्योर्दच्या कडेला बसलेल्या छोट्या छोट्या वस्त्या मनोहर असतात. तेथील शांतता, स्वच्छता व सौंदर्य शब्दातीत असते गोंगाट, प्रदूषण, जीवघेणी स्पर्धा

बेर्गेनमध्येच राहिलेला होता. पण त्याचे वाडवडील तो विसरू शकत नव्हता. त्याचे अनुभव तो नकळत स्वतःचे मानीत होता

या बेटावर फ्योर्दच्या कडेला बसलेल्या छोट्या छोट्या वस्त्या मनोहर असतात. तेथील शांतता, स्वच्छता व सौंदर्य शब्दातीत असते गोंगाट, प्रदूषण, जीवघेणी स्पर्धा याचा स्पर्शही तेथे नसतो तेथील नीरव शातता तेथील व्यक्तींच्या रोमरोमात भिनलेली असते आवाज जो येणार तो वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा हे वारे टाळण्यासाठी वस्त्या अशा ठिकाणी वसलेल्या असतात, की जेथे पाणी जवळ आहे आणि उन्हाळ्यात सूर्यप्रकाश मिळेल, त्याचबरोबर डोंगराचा आडोसाही लाभेल या वस्त्यातील माणसे अगदी अलीकडील काळात रेडिओ, टी व्ही द्वारे जगातील घडामोडींशी परिचित होत आहेत. १९ व्या शतकात या वस्त्या मच्छीमारी व शेती करीत, त्याच्या छोट्या विश्वात रमून गेलेल्या होत्या तेथे वर्तमानपत्रेही पोहोचणे सोपे नव्हते इब्सेनच्या '*ब्रान्द*' नाटकाला जी पार्श्वभूमी आहे ती अशा एका फ्योर्दची आहे

ही बेटे, फ्योर्दस् पाहताना आम्हाला वाटेत हातगाडीवाले, भेळेसारख्या पदार्थांच्या गाड्या, दुरुस्त्या करणाराच्या टपऱ्या, अपघातात जागोजागी उलथून पडलेले ट्रक्स, कामानिमित्त ठोकलेले तबू, जत्रा किंवा उत्सवाची गर्दी, रस्त्याने फिरणारे मेंढ्याचे किंवा गाई - बैलाचे कळप, कुत्री, सायकली, घाटात ट्रॅफिक जॅम, रस्त्याच्या कडेने लहान चर्चेस, तेथे बसलेले फकीरवजा याचक, हे कोठेही आढळले नाही. शुकशुकाटातून गेलो आणि शुकशुकाटातून परतलो. वाटेत मधून भेटल्या त्या मोजक्या मोटारी आणि ट्रक्स. रस्त्याची व पुलाची बाधकामे चाललेली दिसली पण तेथे मजूर अगदी मोजके होते आणि त्याच्या अगावर निळ्या रगाचे जाड कपडे होते पायात जाड बूटही होते थोडक्यात आपल्याकडे वस्त्याच्या आधाराने ज्या उप व निकृष्ट वस्त्या दिसतात तसा प्रकार दिसला नाही सस्कृतीच्या सावटात उभी राहिलेली नडली पिडलेली सस्कृती दिसली नाही नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क हे जगातील अतिशय उच्च राहणीमान असणारे देश आहेत हे ऐकून होतो त्याचेच हे एक लक्षण होते 'आमच्याकडे झोपडपट्ट्या नाहीत! आमच्या नद्याचे आणि नळाचे पाणी तुम्ही निर्धास्तपणे पिऊ शकता! प्रदूषणाबाबत आम्ही जागरूक आहोत! नुकतीच एक अणुभट्टी आम्ही बद केली!' गाडी चालवता चालवता ब्योर्न वीगाड अभिमानाने सागत होता आणि सागता सागता ग्रेट डिफरन्स, थर्ड वर्ल्ड कट्रीज हे आपल्याला भोसकून टाकणारे शब्दही आलेच. साडपाणी आणि कचरा याची विल्हेवाट लावणारी डोंगराच्या पोटात तयार केलेली केंद्रेही त्याने आम्हाला आवर्जून दाखविली एकाच नाण्याला दोन बाजू असतात तशा आमच्या भावनाना दोन बाजू निर्माण झाल्या होत्या एक तेथील गोष्टी पाहून होणारी

' परस्परातील देवाणघेवाण - एक्सचेंज ही कल्पना मला आवडते यावर जास्त विचार करून काही योजना करता येईल तुम्हीही काही मूर्त सूचनाचा विचार करून ठेवा ' मी उत्तरलो माझे सारे लक्ष समुद्राचे पाणी आणि त्यापलीकडे दिसणारे क्षितिज यावर केंद्रित झाले होते. माझे उत्तर मनापासून होते, पण त्यात माझे मन नव्हते

□

# १३. नोर्दिस्क इन्स्टिट्यूटच्या उबेत

बेर्गेन विद्यापीठाच्या ' नोर्दिस्क इन्स्टिट्यूट ' मध्ये सुरुवातीचा आठवडा मी रोज सकाळी जात असे आणि रेखाही माझ्याबरोबर येत असे मी अभ्यास वा चर्चा करीत असताना तिने गावात इकडे तिकडे हिंडावे किंवा विद्यापीठाच्या सभोवती फिरावे हे होऊ शकले नाही कारण बाहेर अधूनमधून पाऊस व कडाक्याचा गारठा परिणाम असा झाला की तिनेही तेथे इब्सेनची काही नाटके वाचून काढली विद्यापीठाच्या आवारात विद्यार्थ्यासाठी भली मोठी स्टोअर्स होती तरी तेथे काही खरेदी करणे शक्य नव्हते कारण आमचा सारा प्रवास पुढेच होता.

नोर्दिस्क इन्स्टिट्यूटमध्ये आम्हाला एक स्वतत्र खोली होती फोन, टाईपरायटर, टेबल लॅम्पस, स्टेशनरी साऱ्या गोष्टी हाताशी होत्या. खिडकीच्या तावदानातून बाहेर उभा असलेला बर्च वृक्ष दिसे त्याच्या निष्पर्ण फांद्यातून पलीकडील पूल आणि फ्योर्द दिसे. तेथे उभी असलेली जहाजे दिसत आणि पलीकडे पसरलेल्या हिमाच्छादित डोंगराची शिखरे दिसत ही हिमशिखरे उन्हात चमचमतील, त्याच्यावर मावळणारे व एरवीचे सूर्यबिंब दिसेल, आकाशाची निळाई स्मितहास्य करील असे आम्हाला वाटायचे पण ते कधीही घडले नाही.

या आठवड्यात रेखा आणि मी विद्यापीठ विद्यार्थी झालो होतो आयुष्यात अतिशय निवातपणा आम्हाला मिळत होता. मनावर कोणताही ताण नव्हता अधूनमधून मुलाच्या आठवणी येत ऋतु - धनू काय करीत असतील ? असे वाटे पण आजी आजोबा त्याची काळजी घ्यायला असल्याने मन निश्चित असे त्यामुळे इब्सेनवरील झाडून साहित्य मी तेथे चाळले जगातील वेगवेगळ्या देशात इब्सेनवर झालेले काम प्रत्यक्ष डोळ्याने पाहिल्याने मी दिपून गेलो प्रा ऑर्सेथ याची खोली शेजारीच असल्याने त्याच्याशी अनेक मुद्द्यावर चर्चा करणे सुलभ होते. विद्यापीठाचे वर्ग अजून नियमित सुरू झाले नसल्याने ते तसे मोकळे होते. मी केव्हाही त्याच्या खोलीत जाऊ शकत होतो

ऑर्सेथ हे इब्सेन प्रेमी होते *ब्रान्द* नाटकातील एका प्रसगावर त्यानी बाटिक पेंटिंगसारखे एक भव्य पेंटिंग कापडावर करून घेतले होते आणि नोर्दिस्क इन्स्टिट्यूटला भेट म्हणून दिले होते ते विद्यापीठाच्या कॅन्टिनमध्ये लावलेले होते त्यानी ते मला आवर्जून दाखविले ऑर्सेथ याचे सहकारी प्रा. विली डाल हेही इब्सेनचे अभ्यासक म्हणून प्रसिद्ध आहेत त्याचे लेख मी वाचले आहेत त्याचा माझा परिचय झाला पण डाल यानी तो वाढविला नाही आणि त्याना काही कामानिमित्त बाहेर गावीही जावे लागले विली डाल याचे व्यक्तिमत्त्व अत्यत रुबाबदार होते. ऑर्सेथ हे धीरगभीर प्रोफेसर वाटत होते तर विली डाल हे एखाद्या भव्य जहाजाचे कॅप्टन वाटत होते.

आमच्या खोलीच्या किल्ल्या ठेवायला आम्ही ज्या छोट्याश्या ऑफिसमध्ये जात असू तेथे एक वयस्क स्त्री होती व एक तरुण स्त्री होती तरुण स्त्री अप्रतिम सौंदर्याचा नमुना होती ती आमच्या लक्षात राहिली कारण आठवडाभर ती हिरव्या फ्रॉकमध्येच होती किल्ली घ्यायला, द्यायला गेलो की ती हसत असे. तिला आनद होई आमच्याविषयी तिला सागण्यात आले होते पण तिला इग्लिश अजिबात म्हणजे अजिबात येत नव्हते त्यामुळे उरत ते फक्त हावभाव

विद्यापीठाच्या कॉरिडॉर्समधून आणि जिन्यावर विद्यार्थी - विद्यार्थिनी दिसत अनेक देशातून ते आलेले होते हे उघड होते अरबी, इजिप्शियन, जपानी, आफ्रिकन विद्यार्थी - विद्यार्थिनीही होत्या मोकळ्या जागातील उची सोफासेटवर कोंडाळी करून हे विद्यार्थी आनदाने कॉफीपान करीत असताना दिसत त्याचे वर्ग अजून सुरू झालेले नव्हते विद्यार्थी व विद्यार्थिनी एकमेकाना बिलगून प्रणयाराधन करीत उभे आहेत हे दृश्य पाश्चात्त्य विद्यापीठातून दिसते पण ते येथे एक दोनदाच दिसले विशेष म्हणजे शिक्षक मडळींचे कॅन्टिन वेगळे आणि विद्यार्थ्यांचे वेगळे असा प्रकार आढळला

नोर्दिस्क इन्स्टिट्यूटच्या कॉरिडॉर्समधून अनेक थोर साहित्यिकाची छायाचित्रे लावलेली आहेत एवढेच नव्हे तर पुतळेही ठेवलेले आहेत इंग्लिश वाङ्मयाचा भागही असाच भरगच्च सजविलेला आढळला. तो पाहाताना माझ्या अनेक जुन्या स्मृती जाग्या झाल्या मी गलबलून गेलो जर्मन, फ्रेंच, भाषावाङ्मयाचे विभागही नितान्त सुदर आहेत

### बेर्गेन विद्यापीठ लायब्ररीच्या तळघरात

बेर्गेन विद्यापीठाच्या लायब्ररीत एक अमोल खजिना आहे. इब्सेनच्या एका चाहत्याने इब्सेनविषयीच्या व इब्सेनच्या जगातील भाषात झालेल्या अनुवादाचा त्याच्या हयातीत सग्रह केला. त्याच्या निधनानतर हा सग्रह बेर्गेन विद्यापीठाला देण्यात आला आहे

विद्यापीठाच्या प्रचंड ग्रंथालयातील तळघराच्या विभागात हा आहे मी तेथे ठिय्या दिला व ही सारी पुस्तके पाहिली.

इब्सेनची नाटके चिनी, जपानी, पोलिश, रशियन, तुर्की, हिंदी, बंगाली इ आवृत्यातून पाहताना मौज वाटली. पुस्तके वेगवेगळ्या देशात कशी काढली जातात याचेही दर्शन घडले इब्सेनच्या *'तेऱ्ये विगेन'* या खण्डकाव्याच्या 'क्रिस्तियन क्रोग' या विख्यात चित्रकाराच्या चित्रे असलेल्या अनेक आवृत्या आहेत. त्यातील चित्रे केवळ अप्रतिम आहेत. त्याना तोड नाही

अलिबाबाच्या गुहेतच तर मी नाही ना ? असे मला वाटत होते इतर नॉर्वेजियन पुस्तकेही मी पाहिली. ही पुस्तके इंग्लिश पुस्तकाच्या तुलनेत फार रुबाबदार आणि महाग दोन्ही वाटत होती. बेर्गेन विद्यापीठ उस्लो विद्यापीठापेक्षा जोरदार करण्याची खटपट चालू आहे त्यामुळे अनेक बेर्गेनवासीयानी हजारो दुर्मिळ पुस्तके या ग्रंथालयाला देऊन त्याग केला आहे

❑

# १४. *शिक्षण व संशोधन*

नॉर्वेतील एकचतुर्थांश लोक शिक्षणक्षेत्रात सहभागी असतात कोणी शिक्षक म्हणून, कोणी विद्यार्थी म्हणून तर कोणी अन्य तऱ्हेचे कर्मचारी म्हणून या एकाच गोष्टीवरून नॉर्वेत शिक्षणाला किती महत्त्व आहे याची कल्पना येते.

पहिली ते नववी हे प्राथमिक व माध्यमिक शिक्षण सक्तीचे आहे. सुमारे पाच लाख विद्यार्थी सध्या याचा लाभ घेत आहेत प्राथमिक शिक्षणाची सुरुवात सातव्या वर्षी होते व जेव्हा शाळा सपते तेव्हा विद्यार्थी १६ वर्षांचा असतो. सुमारे ८० टक्के विद्यार्थी हे शिक्षण पुरे झाल्यावर पुढील अन्य शिक्षण घेतात

काही अपवाद सोडल्या तर सर्व शाळा स्थानिक किंवा केंद्रीय सरकारच्या अनुदानावर चालतात सर्व शिक्षण फुकट दिले जाते. कॉलेज किंवा युनिव्हर्सिटी शिक्षणदेखील मोफत असते दर्जा, परीक्षा, सधी याबाबत सर्वत्र एकवाक्यता राखण्याचा प्रयत्न केला जातो. शिक्षण हा सर्वांचा हक्क मानला जातो.

नॉर्वेसारख्या छोट्या लोकसख्येच्या देशात अन्य परदेशी भाषेचे शिक्षण महत्त्वाचे आहे. ४ थी पासून दुसरी भाषा म्हणून इंग्लिश आहे सर्व विद्यार्थ्यांना या इयत्तात नोर्स्क

आणि इंग्लिश दोन्ही शिकविल्या जातात माध्यमिक शिक्षण घेताना ( किंवा पुढेही ) कोणाला फ्रेंच वा जर्मन शिकायचे असेल तर त्या भाषा शिकता येतात काही शाळांतून स्पॅनिश, रशियन किंवा फिनिश शिकण्याची सोय आहे. याचा अर्थ नॉर्वेत किमान म्हणून ' द्विभाषा सूत्र ' आहे.

२० वर्षे किंवा त्याच्यापुढे असलेले विद्यार्थी जर उच्च शिक्षण घेत असतील तर त्याना सरकार कर्ज पुरविते यासाठी स्टेट एज्युकेशनल लोन फड आहे शिक्षण पुरे केल्यावर हे कर्ज फेडायचे असते.

नॉर्वेतील चार विद्यापीठे बेर्गेन, उस्लो, त्रोनह्येम आणि त्र्योमसो येथे आहेत त्र्योमसो विद्यापीठ सर्वांत अलीकडील असून जगातील सर्वांत उत्तरेकडील विद्यापीठ म्हणून ते प्रसिद्ध आहे त्र्योनह्येम विद्यापीठ त्याच्या तत्रवैज्ञानिक इन्स्टिट्यूटसाठी प्रसिद्ध आहे

बेर्गेन विद्यापीठात अर्थशास्त्र आणि उद्योग - व्यवस्थापन याची खास कॉलेजेस आहेत. शारीरिक शिक्षण, खेळ आणि सगीत याची खास कॉलेजेस उस्लो विद्यापीठात आहेत ओस ( Aos ) येथे कृषिविद्यापीठ आहे. उस्लोपासून हे विद्यापीठ जवळ आहे. चाळीस हजार विद्यार्थी या विद्यापीठातून उच्च शिक्षण घेत असतात. तर सुमारे तीस हजार विद्यार्थी इतर अन्य सस्थातून उच्च शिक्षण घेत असतात सात विभागीय कॉलेजेस आहेत. ही महाविद्यालये दोन ते तीन वर्षांच्या अभ्यासक्रमातून शिक्षण देतात तर विद्यापीठातून पदवी सपादन करण्यासाठी पाच किंवा सात वर्षांचा कालावधी लागतो विभागीय महाविद्यालयाचा हेतू उच्च शिक्षण सर्व भागात जावे हा आहे दक्षिणेत क्रिस्तियनसाण्ड येथे तर उत्तरेत फिनमार्कमध्ये आल्टा येथेही विभागीय महाविद्यालये आहेत.

सशोधनात, तत्रविज्ञान आणि निसर्गशास्त्रावर भर आहे पर्यावरणशास्त्रावर भर आहे खासगी व सार्वजनिक सस्था दोन्ही मिळून सशोधनकार्य करतात. पब्लिक रिसर्च कौन्सिल्स सशोधनाचा खर्च करतात विज्ञान व मानव्यविद्या, औद्योगिक सशोधन, कृषिविद्या आणि मत्स्यविज्ञान याच्यासाठी चार स्वतत्र कौन्सिल्स आहेत.

□

## व्हिडिओ कॅसेटवर इब्सेनची नाटके

१५.

माझ्या अभ्यासाच्या दृष्टीने इब्सेनच्या नाटकाच्या व टी. व्ही. नाटकाच्या व्हिडिओ कॅसेट्स पाहायला मिळणे हा माझा मोठाच फायदा झाला. इब्सेनची नाटके मी

इग्रजीतून वाचली होती त्याच्यावर आधारित दोन जर्मन फिल्मस पाहिल्या होत्या एक इग्रजी नाटक पाहिले होते एक इग्रजी पण काश्मिरी नटाचे टी व्ही नाटक पाहिले होते इ इ पण येथे इब्सेनची नाटके नॉर्वेजियन मधून पाहण्याचा योग आला

*फ्रूएन फ्रा हावअ, डी युगेस फोरबुण्ड, येगेंगारे, रोझमर्सहोल्म, एत् डुकेहेम, विल्डान्डेन, फ्रू इगेर, सामफुण्डेट स्टयोटर, फोकफिन्डअ, जॉन ग्राब्रिएल बोर्कमान, पेअर ग्यून्ट, हेद्दा गाब्लर, बिगमेस्टर सूलनेस, लिलूअ आय्योल्फ, नॉर वी ड्योड वॉग्नेर,* ही नाटके मी कॅसेट्सवर बघितली यातील बहुतेक नाटके दोनदोनदा पाहिली काही तीनदा नाट्यकलेचा दर्जा किती उच असू शकतो याचा अनुभव आला इब्सेनच्या सुरुवातीच्या जीवनावरीही एक सुरेख चित्रपट आम्ही पाहिला फक्त एक मोठे नाटक पाहता आले नाही ते म्हणजे '*ब्रान्द*' त्याची टेप उपलब्ध होऊ शकली नाही

कॉपी राईट कायदा व NRK वरील कलावताची त्याबाबत भूमिका यामुळे मला या टेप्स विकत घेता आल्या नाहीत वा भेट मिळाल्या नाहीत मात्र जॉन पाऊलसन यानी शैक्षणिक खात्यामार्फत इब्सेनच्या दोन सर्वश्रेष्ठ नाटकाच्या म्हणजे *पेअर ग्यून्ट व एत् डुकेहेम* याच्या आणि ऐतिहासिक नाटक '*फ्रू इगेर* याची, अशा तीन टेप्स मला दिल्या आणि पुढील वाटाघाटी करून बहुतेक सर्व नाटके पाठविण्याचे आश्वासन दिले

मला टेप्स दिल्या जात नाहीत हे पाहून प्रा. ऑर्सेथ, पाऊलसन आणि हेन्रिकसन ही सर्व माणसे सतापली पाऊलसन नेहमी भारतात येणारे गृहस्थ आहेत ते म्हणाले, 'आमच्या माणसाची मला लाज वाटते, इब्सेन एक्सपर्ट आणि करमणुकीसाठी T V पाहणारी माणसे यात ही माणसे फरक करू शकत नाहीत हे मला खरेच वाटत नाही' त्यावर मी म्हणालो, 'पाऊलसन, फिल्मस् पाहायला तर मिळाल्या कायदा आधळा असतो आणि नोकरशाही अडसर असते हे नवीन नाही. तुम्ही तुमचे रक्त तापवून घेऊ नका'

नॉर्वेतून मी येताना इग्लडमध्ये थाबून बी बी .सी. कडून इग्लिश नाटकाच्या टेप्स मिळतात का ते पाहिले. पण तेथेही आश्वासन तेथे विख्यात इब्सेन तज्ज्ञ मायकेल मेयर भेटले त्यानी याबाबतीत आपण काही निश्चित करू हे सागितले शिवाय ब्रिटिश कौन्सिल आहेच.

नॉर्वेजियन इब्सेनच्या नाटक - कॅसेट्सनी माझ्या अभ्यासातील मोठी त्रुटी दूर झाली. इब्सेनची महत्त्वाची सर्व नाटके आज मी जेव्हा विचारात घेतो तेव्हा पाहिलेली नाटके डोळ्यासमोर येतात. बारकावे लपत नाहीत पूर्वीचे काही ग्रहही बदललेत. *लिलूअ आय्योल्फ* नाटक रंगभूमीच्या दृष्टीने अयशस्वी आहे हे आता पटले. त्याचप्रमाणे इब्सेन

रंगभूमीचा किती खोलवर विचार करीत असे हेही आता जाणवत राहते इब्सेनच्या या टेपसमुळे मी प्रो ऑर्सेथ व हेन्रिकसन याच्याशी वेगळ्या स्वरूपाची चर्चा करू शकत होतो ती रंगभूमीविषयीही निगडीत असे

व्हिडिओज् व व्ही सी आर् मुळे यापुढे देशोदेशींचे उत्तमोत्तम साहित्य एकमेकाच्या देशात प्रिय होण्यास खूपच मदत होणार आहे याचा अत्यंत सुखद अनुभव आम्हाला आला.

□

## जीवननाट्यातील खरी पात्रे १६.

बेर्गेनमध्ये असताना आम्हाला एकंदर चार कुटुंबातील ' इंडियन ' भेटले. त्यापैकी तिघानी आम्हाला घरी जेवायला बोलावले एकीने बोलावले नाही कारण ती अठरा वर्षांची मुलगी होती. तिलाच आमच्या हेन्रिकसन मंडळींनी जेवायला बोलावले. या चारही कुटुंबातील व्यक्तिपरिचयामुळे आम्हाला नॉर्वेविषयी माहिती कळली

फोकुस बँकेत आम्ही डॉलर्स देऊन क्रोनर्स घ्यायला गेलो. भल्या मोठ्या बँकेत कर्मचारी माणसे फारच कमी होती. बँकेचे वातावरण आलिशान होते आमची गाठ ऑलिव्हो परेरा याच्याशी पडली आमचे पासपोर्ट पाहताना ते आनंदून व चमकून उठले ते पुण्यातील वाडिया कॉलेजचे एके काळचे विद्यार्थी होते आणि वयाने ते माझ्यापेक्षा थोडे जास्त म्हणजे ४७ - ४८ वर्षांचे होते त्यानी आमची माहिती घेतली आम्हाला जेवायला रात्री बोलाविले

परेरा ' ॲस्कि ' बेटावर राहत होते. सध्याकाळी आम्ही दोघे फेरी बोटीने ॲस्कि बेटावर गेलो फेरी बोट टोलेजंग होती. लहान मुलांचे हसरे खेळते थवे बोटीवर भेटले. त्यांचे कपडे भरपूर व आकर्षक होते डोक्यावर सुंदर टोप्या होत्या या मुलांचे फोटो आम्ही घ्यायचा प्रयत्न केला की ती हसत उड्या मारीत आणि फोटो येऊ नये असा प्रयत्न करीत बोटीवर लपंडावासारखा खेळही त्यानी सुरू केला. बेटावर आमची फेरी बोट पंधरा - वीस मिनिटात पोहोचली परेरा गाडी घेऊन आले होते

परेरा जोड - बंगल्याच्या कॉलनीत राहत होते त्याची बंगली सहा खोल्याची पण पुरेशी मोठी होती त्याना वीस वर्षांचा मुलगा आणि पंधरा सोळा वर्षांची मुलगी होती. सौ. जेसी परेरा ह्या पुण्याच्या होत्या तर ऑलिव्हो हे गोवेकर ख्रिश्चन होते.

परेरा व सौ परेरा नशीब काढण्यासाठी युगांडात गेले तेथे त्याचे बरे चालले पण इदे अमीनच्या कारकीर्दीत नेसत्या वस्त्रानिशी जीव मुठीत धरून त्याना युगाडा सोडावा लागला अनेक भारतीयावर त्या वेळी ही वेळ आली नतर ही मडळी इटलीत, रोमला निर्वासित छावणीत तीन महिने होती जेथे थारा मिळेल तेथे जायचे होते इग्लड, अमेरिकेत मिळेल याची खात्री नव्हती जो देश प्रथम हो म्हणेल तेथे जायचे. नॉर्वेने हो म्हटले आणि ही मडळी येथे आली. फुटक्या कवडीपासून सुरुवात केली गेली सोळा वर्षे ही मडळी येथे आहेत व स्थिरावली आहेत त्याचा सामाजिक दर्जा फार वरचा नाही पण राहणीमान भारतात असते तसे चागले आहे. धर्म ख्रिश्चन असल्यामुळे ह्या मडळींना येथे जुळवून घेणे सोपे वाटले आहे

परेरा याच्या वाडिया कॉलेजच्या आठवणी ताज्या आहेत पुण्यातील शैक्षणिक वातावरण जेव्हा कळकळीचे होते त्या वेळच्या त्याच्या आठवणी आहेत ही मडळी ३ - ४ वेळा भारतात येऊन गेली आहेत आणि गोव्याशी नाते ठेवून आहेत परेराची मुले कॅथलिक शाळेत शिकली आहेत सौ परेराही नोकरी करतात

परेराच्या मते नॉर्वेजियन मडळी रिझर्वड आहेत बाहेरच्याना ते स्वत त मिसळून घेत नाहीत. हा समाज सनातनी - कझर्वेटिव आहे पण माणूस गुणी असेल तर त्याच्या गुणाची कदर करणारा आहे आणि न्यायी आहे. आमच्यावर अन्याय होत नाही म्हणून आम्ही सुखी व आनदी आहोत असे ते म्हणाले.

परेरानी खायला भरपूर पदार्थ केले होते आणि आग्रह करून आम्हाला खायला घातले. त्याना इब्सेनविषयी काही माहिती नव्हती. पण आम्ही काही महत्त्वाचे काम करतो आहोत हे त्याना आवडले आम्ही पुण्याचे होतो हे फार महत्त्वाचे होते परेराच्या मुलाने पियानोवर सुस्वर रचना वाजविल्या पण तो अतिशय अबोल होता.

परेरा कुटुब काळे होते काळ्या रगाचा म्हणून काही त्रास होतो का ? असे आम्ही विचारले ते म्हणाले येथे तसे डिस्क्रिमिनेशन केले जात नाही कारण काळी माणसे येथे खूप नाहीत. पाकिस्तानी निर्वासित अलीकडे येऊ लागले आहेत.

डॉ कृष्णा व सौ कृष्णा हे येथे गेली तीन वर्षे स्थायिक आहेत हे आधी इग्लड व डेन्मार्कमध्ये राहून आता येथे हागाविक् हॉस्पिटलमध्ये कामाला आहेत डॉ .कृष्णा अल्पावधीतच उस भागात प्रिय झालेले दिसतात ते मूळचे आध्र प्रदेशातील मुलामुलींची लग्ने झाल्याने ते आता जबाबदारीतून मोकळे झाले आहेत

डॉ. कृष्णानी आम्हाला राहायलाच येता का म्हणून विचारले पण आम्ही डिनरला गेलो. आमच्याबरोबर हेन्रिकसन पतिपत्नीही होते. डॉ. कृष्णानी आमचे जोरदार स्वागत

केले. त्याचा आनद जणू गगनात मावत नव्हता. आमच्या कुटुबाविषयी, विशेषत ऋतुविषयी त्यानी फार आस्था दाखविली आमच्या कुटुबाचे फोटो मी त्याना दाखविले डॉ कृष्णाचा पुतण्या इराणहून तेथे आला होता. त्याचीही आमच्याशी ओळख झाली

डॉ. कृष्णा भारतीय सस्कृतीचे अभिमानी दिसले. प्राचीन आर्यवशाविषयी त्याच्या मनात काही कल्पना दिसल्या. युरोपिअन माणसांपेक्षा भारतीय माणसे जास्त सुसस्कृत आहेत असे मत ते मांडत होते त्याच्या मुलीच्या लग्नाची भारतातील फिल्म त्यानी आम्हास दाखविली ते लग्न जोरदार होते ती फिल्म हेन्रिकसन मडळींना आकर्षक वाटली पण लग्नाला इतकी माणसे जमतात हे पाहून ते हादरले असावेत.

त्याचा बगला थोड्या वेगळ्या रचनेचा पण ऐसपैस होता डॉ. कृष्णा येथे समरस झालेले वाटले. त्याच्या मते नॉर्वेजियन माणूस सनातनी आहे त्यापेक्षा त्याला ' सोशल लाईफ ' असे नाही ही माणसे एकलकोंडी आहेत इब्सेनच्या नाटकाच्या दृष्टीने हे उद्गार मला अत्यत महत्त्वाचे होते डॉ. कृष्णाच्या मते इग्लिश माणूस तुम्हाला कमी लेखतो आणि तुम्हाला दडपू पाहतो, असा प्रकार येथे नाही. नॉर्वे हे युरोपचे पाठीमागचे प्रवेशद्वार आहे हे त्याचे उद्गारही मला विचार करण्यासारखे वाटले

जस्मिन ही एक रूपवान मुसलमान तरुणी आहे बाराव्या वर्षी तिने लाहोर सोडले व ती इग्लडमध्ये वडिलाकडे गेली तेथे तीन - चार वर्षे शिक्षण घेतले वडिलानी तिचे लग्न नॉर्वेतील पाकिस्तानी मुसलमान गृहस्थाशी लावून दिले हे बिजवर गृहस्थ व त्याना आधीची एक मुलगी. मारहाण करण्यापर्यंत त्याची मजल जाते हे पाहताच जस्मिनने घटस्फोट घेतला व ती आता स्वतत्र राहते आहे आणि नोकरीही करते आहे वडील तिला इग्लडमध्ये परत घेण्यास तयार नाहीत.

जस्मिनने माझे फोटो वर्तमानपत्रात पाहिले. तिचा ऑर्सेथ कुटुबाशी परिचय आहे. त्याच्याकडेच डिनरला आमचा परिचय झाला तिने आग्रह कर करून आम्हाला घरी जेवायला बोलाविले. रेखा म्हणाली, ' तू एकटीच आहेस. कशाला तसदी घेतेस ? ' पण तिने लकडा लावला. आम्ही गेलो

उस आणि बेर्गेनच्या मध्यावर अपार्टमेंट्ससारखी गृहरचना आहे तेथे चार खोल्याच्या अपार्टमेंटमध्ये जस्मिन राहत होती आम्ही हिंदू ब्राह्मण आहोत. तेव्हा मला हस्तसामुद्रिक येत असणार वा पत्रिका - ज्योतिष येत असणार अशी तिची अटकळ होती मला मनातून हसू आले पण ती ज्या कोंडीत सापडली होती ती उघडउघड डोळ्याला दिसत होती.

तिला आम्ही खूप धीर दिला तिला लग्न करायचे आहे, मूल हवे आहे हे ओळखले. पण तिला मुसलमान तरुणच हवा होता अगोदरच ती पोळलेली होती बेर्गेनमध्ये राहणारी पाकिस्तानी माणसे ही तिच्यावर दडपण होती बेर्गेनमधले पाकिस्तानी कसे फॅनॅटिक आहेत हे तिने आम्हाला सांगितले तिला मिळालेला जॉब चांगला होता असे ती म्हणाली मात्र लाहोरच्या लाडक्या आठवणी ती वारवार कुरवाळीत होती 'नियतीचे फटकारे' बसलेली जस्मिन आज नॉर्वेत आहे पण त्या थंड देशात तिचे मन धगधगते आहे.

जस्मिनने छान पदार्थ केले होते छोले भटुरे चमचमीत होते उंची आईस्क्रीम तिने आणले होते. गप्पा मारीत असताना जस्मिन मला म्हणाली, 'अनिरुद्ध तुम्ही आज खूप मोठे झाले आहात आणि नॉर्वेजियन मंडळी तुमचे कौतुक करताना दिसत आहेत याचे कारण काय ? अल्लाची कृपा का तुमचे कार्य ?'

तिला मी म्हणालो, 'मी मोठा माणूस नाही पण मोठा होऊ शकणाऱ्यापैकी आहे. पण अल्लाच्या कृपेपेक्षा रेखा माझ्याकडून काम करवून घेते आणि तिच्या शिस्तीत मी वागतो हे महत्त्वाचे आहे' हे उत्तर ऐकून जस्मिनचे टपोरे सतेज डोळे विस्फारले माझी परमेश्वरावर श्रद्धा आहे की नाही याचे उत्तर तिला मिळाले नव्हते

'आपल्या भेटीतून काही निघेल का ? माझ्या नियतीत काय वाढून ठेवले आहे ते आपण मला सांगाल का ?' हे तिचे पालुपद होते तिला मी म्हणालो, 'मला ज्योतिषातील काही कळत नाही माझा विश्वासही नाही पण माझे आजोबा - आईचे वडील व्यासंगी वृद्ध ज्योतिषी आहेत त्यांच्याकडून तुझी कुंडली तयार करून काही सांगता येते का ते पाहण्याचा मी प्रयत्न करीन' ह्या उत्तराने जस्मिनचा जीव भांड्यात पडला तरी ती असहाय्यपणे म्हणाली,

'माझ्याबाबत काही अनुकूल कधीच घडलेले नाही. कधीतरी मी आनंदी होईन या आशेवर मी जगत आले आहे इथल्या मुसलमानांचा मला आधार नाही प्राध्यापक ऑर्सेथ यांची पत्नी श्रद्धावान व भली बाई भेटली आहे पण मी एकाकी आहे'

त्या भेटीत जस्मिनने तिच्या साड्या रेखाला दाखविल्या उंची राहणी असावी, भारी साड्या नेसाव्यात, येथील मंडळींच्या पार्ट्यांत बोलावले तर खूप चमकावे असे जस्मिनला वाटत होते. तिला इंग्रजी व नॉर्वेजियन येत होते हिंदी पण चांगल्यापैकी येत होते तिच्या घरात कुराण व हादीसच्या प्रती मांडून ठेवलेल्या दिसल्या

जस्मिनविषयी मला काय वाटते हे जाणून घेण्याविषयी ऑर्सेथ उत्सुक होता. मी त्याला म्हणालो,

'जस्मिन दुर्दैवी आहे. ती येथे राहू शकेल पण तिला अतिम समाधानासाठी लाहोरला परतावे लागेल असे दिसते तुम्ही व तुमची पत्नी तिला मोठा मानसिक आधार आहात ही गोष्ट मात्र खरी आहे '

बेर्गेनमध्ये असताना आम्ही आवर्जून उस चर्चमध्ये प्रवचनाला गेलो प्रवचनापेक्षा तेथे होणारे बारसे आम्हाला पाहायचे होते. तेथे सुगान्तिनी नावाची सिलोनी तमिळ मुलगी आम्हाला भेटली हेन्रिकसन तिचे पालक होते. त्यानी आमचा परिचय व्हावा म्हणून तिला मुद्दाम जेवायला बोलविले

सिलोनमध्ये जे तमिळ टायगर्स समुद्रात फेकले गेले वा पळाले त्यातील दोन तमिळ तरुण नॉर्वेजियन जहाजावर उचलले गेले ते सुगान्तिनीचे भाऊ हे भाऊ उस्लोत आहेत. सुगान्तिनी उसच्या शाळेच्या हॉस्टेलवर आहे. सुगान्तिनीने लहानपणापासून मारामाऱ्या, गोळीबार, दगली हेच पाहिले आहे तिचा परमेश्वरावर कमालीचा विश्वास दिसला आपल्याला आई परत भेटेल, ती सिलोन सोडून नॉर्वेला येईल या आशेवर सुगान्तिनी आहे.

सुगान्तिनी आम्हाला भेटली पण आमच्या भेटीने त्या चिमुकल्या जिवाला किती आनद झाला ते स्पष्ट कळले नाही. ती नॉर्वेत येऊन दीड - दोन वर्षेच झाली आहेत हेन्रिकसन याची मुलगी लिव रायडून ही तिला मायेने वागवत होती. हेन्रिकसन मडळींचा प्रश्नच नव्हता ती देवमाणसे आहेत असेच सुगान्तिनीच्या बोलण्यातून दिसले.

सुगान्तिनीला सिलोनची ओढ होती पण सिलोन म्हणजे दगली, मारामाऱ्या आणि दु ख असे ती म्हणाली नॉर्वेतून तिला परत सिलोनमध्ये पाठविले जाऊ नये अशी तिची कळकळीची इच्छा दिसली

सुगान्तिनी अठरा वर्षांची होती व बुटकी होती. तिचे डोळे चमकदार होते पण त्यात कारुण्य दाटले होते ती अनाकर्षक होती आणि तिचा आवाज किनरा होता ख्राईस्ट, बायबल याच्यावर तिचा गाढा विश्वास होता हिंदुधर्माचे सस्कारही होते तिला बऱ्यापैकी नोर्श्क भाषा येत होती ती बेर्गेनमधील बोलीप्रमाणे नेमके तसेच हेल काढून बोलत होती आणि तिचे इंग्लिशही तामिळ वळणाचे न वाटता नॉर्वेजियन वळणाचे वाटत होते

तिच्या मते नॉर्वेजियन लोक खूप धार्मिक आहेत तिला हॉस्टेलवर विषम वागणूक मिळत नव्हती पण नॉर्वेजियन मुली त्याचे त्याचे गट करतात, आपण बाजूला पडतो अशी तिची तक्रार होती हॉस्टेलवर ती सुखी होती पण हा देश फार महाग आहे, तुम्हाला भेटायला मला ३० क्रोनर्स पडले असे ती म्हणाली. सुगान्तिनीविषयी आम्हाला

कणव वाटली पण ती हेन्रिकसन पतिपत्नींच्या आधाराने तेथे आहे याचा धीर वाटला तिला आम्ही खूप धीर दिला पण आमच्या लक्षात आले की आम्ही भारतीय होतो म्हणून ह्या धीर देण्यावर तिचा पूर्ण विश्वास बसत नव्हता आम्ही सिलोनी तामिळ असतो तर तिला जास्त जवळचे वाटलो असतो.

सुगान्तिनीची आई सिलोनमध्ये खरोखर जिवत आहे का ? भविष्यकाळात या माय - लेकी खरोखर एकमेकीला भेटू शकणार आहेत का ? या प्रश्नांना उत्तरे नव्हती.

मी नॉर्वेत इब्सेनसाठी आलो होतो माझे उद्दिष्ट निश्चित आणि सुस्पष्ट होते तरी या व्यक्ती मला भेटल्या हा मला माझा फायदा वाटला त्यांच्यावर मी आणि रेखाने मिळून खूप विचार केला. या व्यक्तींचे आणि त्यांच्या परिस्थितीचे आम्ही आकलन करू पाहिले सुखाच्या क्रमवारीत डॉ. व सौ कृष्णा, परेरा कुटुंब, जस्मिन व सुगान्तिनी असा क्रम लागत होता पण डॉ. कृष्णा व सौ कृष्णा यांची मने सोडली तर इतरांची मने समजण्यास अवघड वाटत होती

□

## १७. स्थलांतरित निर्वासितांची समस्या

बाहेर देशातील जी युद्धे होत आहेत त्यामधून, बाहेर देशातील टाकून दिलेल्या अर्भकामधून, तसेच येथे बाहेर देशातून नोकरीच्या निमित्ताने येणाऱ्या व स्थायिक होणाऱ्यामुळे स्थलांतरितांची समस्या नॉर्वेतही निर्माण झाली आहे युरोपप्रमाणे ही समस्या नॉर्वेतही भेडसावीत आहे सुमारे हजार स्थलांतरित, निर्वासित बेर्गेनमध्ये तर चार हजार उस्लोत आहेत नॉर्वेच्या इतर प्रमुख शहरातूनही असेच निर्वासित आहेत

निर्वासितात पाकिस्तानी, इराणी, सिंहली, तामिळ, व्हिएटनामी अशी काळी माणसे आहेत यातील काही विद्यार्थी भत्ता घेतात तर काहींना नोकऱ्या मिळाल्या आहेत हळू हळू नॉर्वेतील ज्या खालच्या दर्जाच्या व खालच्या पगाराच्या नोकऱ्या आहेत त्या या माणसांना मिळणार व ही माणसे तेथे राहणार युरोपातील अनेक सुधारलेल्या प्रगत देशात हे घडत आहे.

नॉर्वेचे आजवरचे स्वरूप वांशिक व सामाजिक दृष्ट्या एकसंध राष्ट्राचे आहे ते या नव्या घटनेने बिघडणार की काय अशी धास्ती येथे निर्माण झाली आहे नॉर्वे क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या २/३ आहे व त्याचा मोठा भाग दुर्गम आहे. त्यामुळे

ही समस्या चर्चेस आली आहे युरोपात सध्या सुमारे १३ दशलक्ष निर्वासित आले आहेत. नॉर्वेच्या समस्येची चर्चा या एकंदर पार्श्वभूमीवरही चालते नॉर्वेतील अनेक माणसे आजवर प्रगत अमेरिकेत निर्वासित स्थलांतरित म्हणून गेली पण आलेले निर्वासित कसे सामावून घ्यायचे ही मोठी समस्या नॉर्वेला प्रथमच जाणवते आहे

नॉर्वेचे आजवरचे स्वरूप वांशिक व सामाजिक दृष्ट्या एकसंघ राष्ट्राचे आहे ते या नव्या घटनेने बिघडणार की काय अशी धास्ती येथे निर्माण झाली आहे नॉर्वे क्षेत्रफळाच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या २/३ आहे व त्याचा मोठा भाग दुर्गम आहे त्यामुळे ही समस्या चर्चेस आली आहे युरोपात सध्या सुमारे १३ दशलक्ष निर्वासित आले आहेत. नॉर्वेच्या समस्येची चर्चा या एकंदर पार्श्वभूमीवरही चालते नॉर्वेतील अनेक माणसे आजवर प्रगत अमेरिकेत निर्वासित स्थलांतरित म्हणून गेली पण आलेले निर्वासित कसे सामावून घ्यायचे ही मोठी समस्या नॉर्वेला प्रथमच जाणवते आहे.

□

## उसच्या माध्यमिक शाळेत १८.

ओदबाईंना आम्ही त्यांच्या शाळेत येऊ आणि त्यांच्या विद्यार्थ्यांना काही सांगू की नाही याबद्दल शंका होती. त्यांना विचारण्याबाबत संकोच वाटत असावा उलट आम्हाला नॉर्वेजियन शाळा पाहण्याची दांट इच्छा होती. विशेषत तेथील मुलांना स्वयपाक शिकवितात ते कसे हे पाहण्याची मला इच्छा होती. कारण आपल्याकडे अजूनही हा विषय मुलींचा मानतात व तोही शाळेत नसतो अनेक वर्षे टाहो फोडूनही आपले शिक्षण जास्त जास्त पुस्तकी होते आहे

शाळेत जाऊन आम्ही मुलांना ओदबाई स्वयपाक कसा शिकवितात ते पाहिले आम्ही गेलो त्या दिवशी त्यांना चीज कसे करावे हे दाखविले पाककलेची फोल्डर्स व पाठ्यपुस्तकेदेखील आहेत स्वच्छता, कॅलरीज, उष्णता, प्रमाण या दृष्टीने प्रत्येक पदार्थ केला व पाहिला जातो अद्ययावत स्वयपाकघर प्रत्येक माध्यमिक शाळेत असते माध्यमिक शाळात अभ्यास असतो पण परीक्षा मात्र नसते

शाळेचे प्राचार्य मधल्या सुटीत, आखडूगिरी न करता स्टाफरूममध्ये येऊन आमच्यात बसले. ते नेहमी असे येतात का हा प्रश्न मी त्यांना विचारल्यावर ते म्हणाले, ' टी - ब्रेकला मी येथेच येतो ' मला समाधान झाल्याचे मी त्यांना सांगितले.

त्या शाळेत मी भारताविषयी एक व्याख्यान दिले. भारताचा भूगोल - इतिहास थोडक्यात सांगितला मुले त्याचे प्रश्न इंग्लिशमधून विचारीत होती. भारताविषयी त्याची प्रतिकूल दृष्टी अजून तयार व्हावयाची होती साडी, कुकू, कास्ट, दुष्काळ, गरिबी, इ विषयी मुलानी प्रश्न विचारले रेखानी त्याना एक कोळीगीत म्हणून दाखविले छापून नेलेली इग्रजी फोल्डर्स आम्ही मुलाना दिली. त्यात आमच्याविषयी व महाराष्ट्राविषयी माहिती होती.

अनेक शाळातून सुमारे १६ विषय शिकवितात शाळा पाच तास असते पण आपल्याकडे जी दृढता ( रिजिडिटी ) असते ती नसते. परीक्षा प्रकार नसतो. पाठ्यपुस्तकांचा दर्जा अत्युत्कृष्ट असतो ही पुस्तके जाड पुठ्ठाबाधणीची, डबल क्राउन व डबल डेमी आकाराची रगीत छपाईची असतात. पुस्तके वापरून चागल्या स्थितीत शाळेला परत करायची शाळातून खेळ आणि व्यायाम याना महत्त्व असते. त्याचे रेटिंगही एकूण प्रगतीत धरतात शाळेच्या क्लासरूम्स्, इतर दालने, ग्राऊडस्, फार वरच्या दर्जाच्या होत्या उत्तमोत्तम चित्रे, नकाशे, पुतळे, सर्वत्र होते शाळेत झोपण्याचीही व्यवस्था होती शनिवार - रविवार शाळेला पूर्ण सुट्टी होमवर्क मात्र देत होते. भारतात होमवर्क देतात का ? हा प्रश्न मुलानी विचारलाच.

शाळेत तीनशे मुले होती एकेका वर्गात फारतर १५ - २० मुले. शाळेला स्थानिक कॉर्पोरेशनचे अनुदान होते. शिक्षण फुकट होते शाळेचे वातावरण अतिशय रम्य होते. एका लहानशा टेकडीवर ही शाळा होती आणि सूचिपर्णी वृक्षाच्या छायेत तिची इमारत होती शिक्षकात स्त्री - पुरुषाचे प्रमाण सारखे होते मुलामुलींचे वेगळे वर्ग नव्हते एकत्रितच ती शिकत होती. मोजकी मुले आणि अभ्यासू शिक्षक असले की शाळेचे वातावरण कसे खुलते हे आम्हाला तेथे पाहायला मिळाले.

□

## ११. लूण्ड रोपवाटिका

उसचे जे मेयर आहेत त्याच्या पत्नीची गुलाब नर्सरी आहे हेन्रिकसन याच्या मनात ही रोपवाटिका दाखवायची असे होते आणि एक दिवस आम्ही तेथे गेलो मनावर छाप पडलीच पाहिजे असे तेथील सारे काही होते.

रोपवाटिका म्हणजे प्रचड ग्रीन हाऊस होते. किंबहुना तीन ग्रीन - घरे होती. एकूण

दहा हजार रोपे - झाडे होती आणि केवळ सहा स्त्रिया हा पसारा सांभाळत होत्या. ऑटोमेशन परिपूर्ण होते अगदी हिवाळ्यातही दीड - दोन हजार गुलाबाची फुले रोज विक्रीसाठी बाहेर पडत होती पाणी, औषधे, खते देणे घड्याळ्याच्या काट्यावर चालू होते.

मादाम लूण्ड युरोपच काय पण जगभर फिरतात आणि उत्तमोत्तम गुलाब घेऊन येतात. त्याच्या फुलाना युरोपीय प्रदर्शनातून अनेक बक्षिसेही मिळालेली आहेत हेन्रिकसन त्याच्या गुलाब - ज्ञानावर खूष आहेत तर त्या हेन्रिकसन याच्या साहित्य व संस्कृती प्रेमावर.

ग्रीन - घरांचे महात्म्य स्कॅण्डिनेव्हियात फार आहे. रोपे तयार करायची आणि उन्हाळा ( कमी, थंडी ) आला रे आला की ती शेतात लावून पीक घ्यायचे हे सारे उरकावेच लागते कारण कमी थंडीचा काळ फार नसतो आणि येथील उन्हातही जोर नसतो आम्ही हिवाळ्यात आल्यामुळे येथील शेते, पिके, फुलझाडे पाहण्याचा प्रश्नच नव्हता. सारी बर्फाखाली गाडली गेलेली होती आणि कितीही झाले तरी नॉर्वे काही फळाफुलासाठी प्रसिद्ध असलेला देश नव्हे.

☐

## *उस साहित्यमंडळ* २०.

एका सध्याकाळी ( १७ - १ - ९० ) सहा वाजता जेवण झाल्यावर आम्ही ' सूलबाकेस्तोवो हॉल ' पाहावयास गेलो. याठिकाणी उसमधील वाङ्मयप्रेमी मंडळी वर्षातून चार वेळा एकत्र येत असतात आणि साहित्यिक कार्यक्रम करीत असतात हेनिंग हेन्रिकसन हे या कार्यक्रमाचे प्रमुख सयोजक आहेत गेऑर्ग स्ताग - निवृत्त ग्रंथविक्रेते, शिक्षिका व कवियित्री बेन्टे ब्रातलुण्ड मेलान्द आणि शिल्पकार चित्रकार आर्नअ मेलाद हे इतर तीन सयोजक असून याच्या कमिटीला ' कोसे कमिटी ' असे नाव आहे. वसत ऋतूत, ऑटममध्ये, ख्रिसमसच्या आधी आणि हिवाळ्यात असे चार वेळा हे कार्यक्रम होतात.

कार्यक्रमाना ७० पर्यंत कलावत व साहित्यिक येतात अलीकडच्या एका मेळाव्याला तर १२० माणसे आली होती कविता म्हणणे, कादबऱ्याविषयी चर्चा करणे, कथाकथन असे कार्यक्रम असतात सपूर्ण कार्यक्रम अडीच ते साडेतीन तास

दहा हजार रोपे - झाडे होती आणि केवळ सहा स्त्रिया हा पसारा सांभाळत होत्या ऑटोमेशन परिपूर्ण होते अगदी हिवाळ्यातही दीड - दोन हजार गुलाबाची फुले रोज विक्रीसाठी बाहेर पडत होती. पाणी, औषधे, खते देणे घड्याळ्याच्या काट्यावर चालू होते.

मादाम लूण्ड युरोपच काय पण जगभर फिरतात आणि उत्तमोत्तम गुलाब घेऊन येतात त्याच्या फुलाना युरोपीय प्रदर्शनातून अनेक बक्षिसेही मिळालेली आहेत हेन्रिकसन त्यांच्या गुलाब - ज्ञानावर खूष आहेत तर त्या हेन्रिकसन याच्या साहित्य व सस्कृती प्रेमावर.

ग्रीन - घराचे महात्म्य स्कॅण्डिनेव्हियात फार आहे. रोपे तयार करायची आणि उन्हाळा ( कमी थडी ) आला रे आला की ती शेतात लावून पीक घ्यायचे हे सारे उरकावेच लागते कारण कमी थडीचा काळ फार नसतो आणि येथील उन्हातही जोर नसतो. आम्ही हिवाळ्यात आल्यामुळे येथील शेते, पिके, फुलझाडे पाहण्याचा प्रश्नच नव्हता सारी बर्फाखाली गाडली गेलेली होती आणि कितीही झाले तरी नॉर्वे काही फळाफुलासाठी प्रसिद्ध असलेला देश नव्हे

□

## उस साहित्यमंडळ २०.

एका सध्याकाळी ( १७ - १ - ९० ) सहा वाजता जेवण झाल्यावर आम्ही ' सूलबाकेस्तोवो हॉल ' पाहावयास गेलो. याठिकाणी उसमधील वाङ्मयप्रेमी मडळी वर्षातून चार वेळा एकत्र येत असतात आणि साहित्यिक कार्यक्रम करीत असतात हेनिग हेन्रिकसन हे या कार्यक्रमाचे प्रमुख सयोजक आहेत गेऑर्ग स्ताग - निवृत्त ग्रथविक्रेते, शिक्षिका व कवियित्री बेन्टे ब्रातलुण्ड मेलान्द आणि शिल्पकार चित्रकार आर्नेअ मेलांद हे इतर तीन सयोजक असून याच्या कमिटीला ' कोसे कमिटी ' असे नाव आहे. वसत ऋतूत, ऑटममध्ये, ख्रिसमसच्या आधी आणि हिवाळ्यात असे चार वेळा हे कार्यक्रम होतात

कार्यक्रमाना ७० पर्यंत कलावत व साहित्यिक येतात. अलीकडच्या एका मेळाव्याला तर १२० माणसे आली होती कविता म्हणणे, कादबऱ्याविषयी चर्चा करणे, कथाकथन असे कार्यक्रम असतात. सपूर्ण कार्यक्रम अडीच ते साडेतीन तास

चालतो वयस्क व विद्यार्थी मडळींसाठी वीस क्रोनर तर इतरासाठी तीस क्रोनर अशी वर्गणी घेतली जाते चहा, कॉफी आणि केकस् ठेवले जातात. हे कार्यक्रम अतिशय प्रिय झाले असून वृत्तपत्रे त्याना प्रसिद्धीही देतात विशेष म्हणजे एका कार्यक्रमाला अध माणसेही आली होती.

कार्यक्रमात भर साहित्यावर असला तरी सगीत आणि गाणी यानाही स्थान आहे काही चित्रकार स्वत ची ताजी चित्रे घेऊन येतात साहित्यिक आणि इतर कलावतात सौहार्द निर्माण करणे हा हेतू या मेळाव्याने साध्य होतो कमिटीसाठी निवडणुका, मतमोजणी इत्यादी प्रकार होत नाहीत.

श्रीमती मेलाद यानी आमचे स्वागत केले आणि मडळाची तपशीलवार माहिती दिली सूलबाकेस्तोवो हॉल शेजारीच त्याचे जुन्या वायकिंग पद्धतीने बाधलेले घर आहे सूलबाकेस्तोवो हॉल प्रशस्त व अप्रतिम होता त्याच्या सौंदर्याने आम्ही अक्षरश थक्क झालो तेथील गालिचे, टेबले, चित्राच्या तसबीरी यांची गुणवत्ता केवळ असाधारण होती. काही नवी मासिके व पुस्तके तेथे दिसली श्रीमती मेलाद यानी पुण्यात असे काही आहे का विचारले त्याना आम्ही साहित्यपरिषदेची थोडक्यात कल्पना दिली. आपले गुण तेवढे माडले

सूलबाकेस्तोवो हॉल पाहून आम्ही गार पडलो व भारावून गेलो हे हेन्रिकसनना सहज उमजले. या सास्कृतिक हॉलविषयी व त्यांच्या साहित्यिक कार्यक्रमाविषयी ते आनदाने बोलत होते. अशा गोष्टी नॉर्वेत इतरत्र फारशा नाहीत ही खतही त्यानी व्यक्त केली. नोर्स माणूस मुळातच एकाडा व सोशल नसणारा असा आहे असे त्याना वाटत होते

ह्या साहित्यिक कार्यक्रमात बक्षिसे, पारितोषिके देणे असा भाग नसतो. गुणवत्तेची निश्चिती व खात्री असल्याखेरीज नॉर्वेजियन माणूस कशातही भाग घेणार नाही किंवा काहीही अगावर घेणार नाही क्वॉलिटी - दर्जा या गोष्टीला नॉर्वेत अपार महत्त्व आहे.

□

## २१. एडवर्ड ग्रीग आणि संगीत रजनी

योरूनबाईच्या लक्षात जेव्हा आले की एडवर्ड ग्रीग या सगीतकारामध्ये मला आणि रेखाला वेगवेगळ्या कारणासाठी रस आहे तेव्हा त्यानी दोन गोष्टी उत्साहाने केल्या. पहिली म्हणजे एका सकाळी त्यानी आम्हाला एडवर्ड ग्रीगचे घर दाखविले. आणि दुसरी

म्हणजे वीगाड पतिपत्नी एक दिवस आम्हाला ' एडवर्ड ग्रीग हॉल ' मध्ये कॉन्सर्टला घेऊन गेले.

जर्मनीला बीथोफेनचे महत्त्व वाटते किंवा ऑस्ट्रियाला जे महत्त्व मोत्सार्टचे वाटते तसेच महत्त्व नॉर्वेला एडवर्ड ग्रीगचे वाटते वाद्य सगीताला देशाच्या आणि भाषेच्या मर्यादा नसतात. पण एखाद्या सगीतकारावर त्याचा देश मनापासून प्रेम करतो. त्याच्या सगीतात राष्ट्राच्या ठेवणीचे प्रतिबिंब पडले आहे असे त्याना वाटते एडवर्ड ग्रीगची गोष्ट अशापैकी आहे आणि त्याचा ज्येष्ठ समकालीन व्हॉयलीनवादक ओले ब्युलचे महत्त्वही तसेच आहे.

एडवर्ड ग्रीग हा युरोपातील श्रेष्ठ सगीतकारापैकी एक होय. आणि त्याचे महत्त्वाचे वैशिष्ट्य हे की त्याने अभिजात सगीत आणि लोकसगीत याना अपूर्व मिलाफ घडवून आणला ( १८४३ - १९०७ ) वयाने लहान असला तरी तो इब्सेनचा समकालीन होता म्हणून मला त्याच्यात विशेष रस. इब्सेनच्या *'पेअर ग्यून्ट'* नाटकाला ग्रीगचे सगीत आहे.

बेर्गेनमध्ये फाना तळ्याच्या पलीकडील बाजूला ' ग्रीग्ज होम ' आहे एका अतिशय रम्य स्थळी ग्रीगचे भव्य घर उभे आहे. ऐन बहरात असताना ग्रीग युरोपात कार्यक्रम करीत हिंडत असे पण उन्हाळ्यात आवर्जून परत येई आणि येथे राही.

नॉर्वे एक स्वतत्र राष्ट्र म्हणून जन्मास यावे यासाठी जी मडळी कार्यरत होती त्या सर्वांशी ग्रीग निगडीत होता मराठी माणूस राजेरजवाड्याना, राजकारणी माणसाना किंवा सतमहात्म्याना डोक्यावर घेणारा आहे. पण इतराना मानले तरी तो दुय्यम महत्त्वाचे मानत असतो. त्यामुळे ग्रीगचा दबदबा कशा स्वरूपाचा आहे हे त्याला कळणे सोपे नाही.

ग्रीगच्या घरात त्याच्या सर्व गोष्टी व्यवस्थित जतन करण्यात आल्या आहेत. घर अतिशय सुरेख आणि मूळच्या स्वरूपात रगविलेले आहे. सभोवती शिखराची आणि सूचिपर्णी वृक्षाची गर्दी आहे आणि या भव्य घराबाहेर जी उत्कृष्ट हिरवळ आहे तीवर उन्हाळ्यात सगीत रजनी साजरी केली जाते. पश्चिमी जगातील नावाजलेले वाद्यवृद त्यात भाग घेण्यासाठी येतात आणि ग्रीगला आपली श्रद्धांजली अर्पण करतात. या वेळी उत्साह, आनद ओसडून वाहतात. जणू एक राष्ट्रीय सणच साजरा होत असतो

मुख्य घराच्या बाजूने, तळ्याच्या दिशेने आपण गेलो की अगदी काठावर एक झोपडी आहे या झोपडीत ग्रीगचा पियानो आणि इतर वाद्ये आहेत. या ठिकाणी हा सगीत महर्षी बसायचा आणि त्याच्या स्वर्गीय सगीत रचनाची निर्मिती करायचा. झोपडी

सुस्थितीत आहे आणि तिथे उभे राहताच आपले मन हेलावून जावे असे तिचे सौंदर्य आहे. हे स्थळ किती सुदर आहे याची कल्पना हिमालयातील अतिशय रम्य ठिकाणे ज्यानी पाहिली आहेत त्यानाच येईल

विशेष म्हणजे या झोपडीलगत डोंगराचा जो लहानसा कडा आहे त्यात एक छोटीसी गुहा खोदण्यात आली आहे आणि या गुहेत एडवर्ड ग्रीगचा देह चिरविश्राती घेत पहुडला आहे एक म्हातारे जोडपे त्या स्थळाचे छायाचित्रण करीत होते. त्याचे आम्ही अनुकरण केले दुर्दैवाने फरक एवढाच पडला की त्याचे फोटो आले पण माझे फोटो, छायाचित्रणाचे ज्ञान अगदी तुटपुजे असल्यामुळे आलेच नाहीत. अर्थात् हे मला नतर कळले

अशाच प्रकारचे स्थान व्हॉयलीनवादक ओले ब्युल याचेही आहे आणि तेही आम्ही पाहिले. पण हिवाळा असल्याने ते उघडे नव्हते आणि तेथे जाण्यासाठी बोटीने जावे लागते. पण हे ठिकाण बाहेरून पाहताना मला एका तपशिलाची आवर्जून आठवण झाली आणि तो मी हेनिंगला तितकाच आवर्जून सागितला.

ओले ब्युलने पहिली पत्नी वारल्यावर दुसरे लग्न केले. ही पत्नी त्याच्यापेक्षा वयाने खूपच लहान होती ओले ब्युल हा स्वतत्र नॉर्वेच्या चळवळीचा जनक ( या चळवळीत इब्सेन कधी सहभागी झाला नाही ) हा वारल्यावर त्याची विधवा पत्नी भारतात आली आणि विवेकानदाच्या भक्ति - परिवारात सामील झाली आज कलकत्याला जो बेलूर मठ आहे त्याच्या निर्मितीत या स्त्रीचा आणि ओले ब्युलने मागे ठेवलेल्या सपत्तीचा वाटा आहे ही माहिती मला कळली असतीच असे नाही पण पुण्याच्या डॉ वि. रा करदीकरानी एक दिवस मला ब्युलविषयी विचारले. कारण मी नॉर्वे व इब्सेनचा अभ्यासक आहे हे त्याना माहिती होते आणि मग मी मागोवा घेतला

ओले ब्युलचा पॅलेस पाहताना मला ही आठवण होणे साहजिकच होते पण मी सधी घेऊन हेन्रिकसनला विवेकानदाची माहिती दिली ओले ब्युलची विधवा पत्नी भारतात गेली होती आणि या सत्पुरुषाची भक्त बनली होती हा तपशील ऐकून हेन्रिकसन चक्रावून गेला. तो म्हणाला, ' सामान्यत आमच्या स्त्रिया किंवा विधवा इटालियन मडळींच्या नादी लागतात बगाली पुरुषाबाबत ' मी प्रथमच ऐकतो आहे.' मग मी त्याला महाराष्ट्राखालोखाल बगाली मडळी कशी महत्त्वाची आहेत तेही सागितले.

१८ जानेवारीला आम्ही एडवर्ड ग्रीग हॉलमध्ये सध्याकाळी सात वाजता सगीत रजनीस गेलो. हा हॉल बेर्गेनच्या महत्त्वाच्या भागात असून अतिशय भव्य व सुदर आहे. सुमारे १८०० माणसे येथे बसू शकतात आपल्या बालगधर्व रगमदिराच्या दुप्पट त्याचा

पसारा आहे हॉल आतून तर अप्रतिम आहेच पण बाहेर अनेक दालने असून गालिचे, झुंबरे, आरसे, पेंटिंग्ज याची रेलचेल आहे.

या वेळी रेखा निळी कांजीवरम सिल्कची साडी नेसली होती तिच्या एकदम वेगळ्या वेशभूषेमुळे तेथील श्रोतृवर्गाचे ती लक्ष्य बनली. वीगाड पतिपत्नींना रेखा भारतीय वेषात तेथे आली ही घटना विलक्षण आवडली. मी नेहरू शर्ट आणि सुरवारमध्ये असेन असा त्याचा अदाज असावा तो फसला. मी थडीचे कारण दिले. त्यावर त्यानी मला दलाई लामानेदेखील कसा वेष बदलला व त्याला जाड कोट परिधान करावा लागला याचा किस्सा रगवून ऐकविला

ही कॉन्सर्ट फार छान झाली 'बेर्गेन सिफनी ऑर्केस्ट्रा' ने ब्रॅम आणि बर्नस्टाईनच्या दोन सिफनी सादर केल्या इटालियन सगीतकार चेकाटो हा या वाद्यवृंदाचा मुख्य आहे. त्याने त्या दिवशी कमाल केली असे मला वाटले नाही पण बेर्गेनच्या श्रोत्यानी त्याला आणि नतर ग्रीगच्या रचना पियानोवर वाजविणाऱ्या सुसाना स्टार्ट हिला डोक्यावर घेण्याचेच बाकी ठेवले. प्रत्येक कार्यक्रमाला तीनतीनदा टाळ्याचा कडकडाट आणि शेवटी दोघानाही उभे राहून मनमोकळी मानवदना.

मी ब्योर्न वीगाडला म्हणालो, 'मी काही कॉन्सर्ट्स ऐकल्या आहेत. तुम्हाला असे वाटेल की हा कार्यक्रम चागला झाला आणि रेखा अनिरुद्धासाठी आपण खास काही केले. पण ही गोष्ट एवढ्यापुरतीच नाही आमच्या आयुष्यातील हे क्षण विसरले जाणार नाहीत कार्यक्रमाच्या शेवटी रेखाच्या डोळ्यात आलेले आसू याची साक्ष आहेत असे आसू भारतात आम्ही एकदा मद्रासला गेलो असताना सुब्बलक्ष्मीचे भजन ऐकताना तिच्या डोळ्यात तरळलेले मी बघितले आहेत. यानतर आज पाहतो आहे.' त्यावर वीगाड म्हणाला, 'रेखाची प्रतिक्रिया मी समजू शकतो तिला सगीत समजते आणि ती स्वत गायिका आहे यामुळे हे घडले' योरूनबाईंनाही हा कार्यक्रम आम्हाला ऐकविता आला याबाबत धन्यता वाटलेली दिसली

त्या सध्याकाळी आम्ही कन्झर्वेटिव नॉर्वेजियन रसिकतेच्या गाभ्यात होतो. आपल्याकडे जशी सनातनी सगीत रसिकमडळी सवाई गधर्व पुण्यतिथीला एकत्र येतात तशी तेथील क्लासिकल सगीताची चाहती मडळी एकत्र आली होती कपडे आणि रुबाब विलक्षण होता बायका उची फ्रॉक्स व नेमके दागिने घालून आल्या होत्या तर पुरुष उत्कृष्ट सूट घालून आले होते सहा - सहा फुटी उच बायका आणि साडे सहा फुटी धिप्पाड पुरुष एकत्र आल्यावर आकर्षक दिसू शकतात हे मला त्या वेळी प्रकर्षाने जाणवत होते.

समजा त्या वेळी त्या सर्वांची ओळख मी करून घेऊ शकलो असतो तर बेर्गेनमधील बहुतेक खानदानी मडळींची मला ओळख झाली असती असे म्हणणे अतिशयोक्तीचे ठरले नसते. आपल्याकडे भारदस्त आणि उची संगीताचे कार्यक्रम घडतात पण त्यांना ऐश्वर्याचा झगमगाट क्वचितच् लाभत असावा पण हाही माझा अदाजच कारण ज्याला युरोपात 'ॲरिस्टोक्रसी' म्हणतात ती काही वेगळीच चीज आहे त्या वातावरणात निरीक्षण करण्याजोगे मला भरपूर आढळले त्यामुळे मी खुषीत होतो

बेर्गेन वाद्यवृद मला अतिशय अनुभवी व तयार वाटला. यात एकदर कलाकार ७६ होते. उस्लोतील वाद्यवृदाचा नेता रशियन सगीतकार तर या वाद्यवृदाचा नेता प्रमुख इटालियन हे मला खटकले नॉर्वेतील सगीताचा दर्जा उचविण्यासाठी अशी व्यवस्था केली जाते हे याचे स्पष्टीकरण होते. डॅनिश आणि स्वीडिश मडळी संगीत, चित्रपट या क्षेत्रात भरपूर परिश्रम घेऊन उंची गाठायचा प्रयत्न करतात त्यांच्या स्पर्धेत नॉर्वेजियन मडळींनाही खूप धडपड करावी लागते नॉर्वेजियन चित्रपटसृष्टी स्वीडिश मडळींपुढे कमी पडते ती उणीव नोर्स्क मडळी सगीत आणि नृत्य यांची उची वाढविण्यातून करतात

नॉर्वेत आज पन्नाशीत असलेल्या पिढीवर रॉक, पॉप आणि जाझ या सगीताचा परिणाम आहे. खुद्द वीगाड पतिपत्नी जाझ सगीताचेही चाहते दिसले याचे कारण क्लासिकल सगीत काही प्रसगी योग्य वाटत नाही. त्याचा सदोदितचा गभीरपणा हलक्या फुलक्या प्रसगी व बेहोषीच्या वेळी नको वाटतो. यावर माझे मत ते अजमावू पाहात होते.

मी म्हणालो, 'या प्रकारचे संगीत ठीक आहे पण कोकाकोला कल्चरपासून नॉर्वेने स्वत.ला शाबूत ठेवावे आमच्याकडे हिंदी चित्रपट निर्माते आणि हिंदी धागडधिंग्याचे सगीतकार यानी वातावरण इतके खराब करून ठेवले आहे की त्यातून बाहेर पडायला मराठी मडळींना कित्येक दशके लागतील. तसे नॉर्वेचे होऊ नये एवढेच'

त्यावर वीगाड म्हणाले, 'आपण ज्या कॉन्सर्टला गेलो होतो तिचाच आणखी एक कार्यक्रम चार दिवसानी निम्म्या दरात विद्यार्थ्यासाठी होणार आहे आणि असे प्रयोगही भरपूर गर्दीत होतात' हे ऐकल्यावर मला आश्चर्य वाटले शिवाय वाद्यवृदात अगदी तरुण माणसे मला फारशी आढळलेली नव्हती

डॅनिश वाद्यवृदाचे कार्यक्रम नॉर्वेत बऱ्याचदा होतात ह्याचे दर्शन टी. व्ही. वर होते. ही मडळी जरा जुनी आणि भावुक गाणी व सगीत सादर करीत असतात. त्यात जोर आणि सभ्यता असते. मला विशेष वाटले ते वेगळ्याच गोष्टीचे डॅनिश मडळींच्या मुलाखती होतात कार्यक्रम चालू असतानाच त्याना प्रश्नही विचारतात प्रश्न नोर्स्कमधून

विचारले जातात आणि उत्तरे डॅनिशमधून दिली जातात आणि असे बराच वेळ चालते हाच प्रकार स्वीडिश बाबतीतही होतो.

नॉर्वेजियन, स्वीडिश आणि डॅनिश माणसे एकमेकाशी त्याच्या त्याच्या भाषेतून बोलू शकतात आणि सभाषण होऊ शकते इतक्या ह्या भाषा एकमेकीच्या जवळ आहेत याबाबत मी वीगाडला विचारल्यावर तो म्हणाला, ' हीच तर खरी गमत आहे आम्ही एकमेकाना फार वेगळे वाटतो पण परदेशी मडळीना आम्ही एकमेकाशी बोलू शकणारे आणि एकमेकासारखेच दिसणारे आहोत हे चित्र दिसते.'

याचा माझ्या दृष्टीने आणखी एक फायदा आहे असे लक्षात आले. इब्सेनची जी नाटके मला नोर्स्क - नॉर्वेजियन भाषेत मिळू शकणार नाहीत अशी होती ती डॅनिश किंवा स्वीडिश व्हिडिओ कॅसेट्सवर उपलब्ध होऊ शकणार होती, शकतात. आणि '*घोस्ट्स*' बाबत तसेच घडले या नाटकाची व्हिडिओ कॅसेट नोर्स्कमध्ये न मिळाल्याने मी ती स्वीडिशमध्ये पाहिली. मला माहीत होते म्हणून ठीक पण एँवी भारतीय माणसाला ती नॉर्वेजियन म्हणूनही दाखविता येईल.

□

## अर्थशास्त्राकडून पर्यावरणशास्त्राकडे २२.

१९ जानेवारीला हेनिगच्या मुलीच्या मृत अपत्याचा अत्यविधी होता मेल्यानतर जवळजवळ आठवड्याने हा अत्यविधी होता. अत्ययात्रा आणि दफनविधी पाहण्याची माझी इच्छा होती. पण आपणहून तसे सुचविण्याचे धाडस झाले नाही. हेनिगनेही विषय काढला नाही उस जिमनॅसवर माझी दोन व्याख्याने होती त्याची मी सकाळीच उठून तयारी केली. एक व्याख्यान ' भारतीय सस्कृती ' वर तर दुसरे ' भारताचे इतर शेजारी राष्ट्राशी सबध ' या विषयावर दिले अत्ययात्रेस गेलो तर ह्या व्याख्यानात व्यत्यय येईल अशी रास्त आशका हेन्रिकसनच्या मनात असणार कारण अत्ययात्रा, दफनविधी याचा मूड सर्वस्वी भिन्न असतो

व्याख्यानानतर खूप प्रश्न विचारले गेले त्यावरून ती विद्यार्थ्यांना, विचाराना चालना देणारी वाटली असावीत. कास्ट - जाती पद्धती, दारिद्र्य, लोकसख्या, ठरविलेली लग्ने यांच्यावर प्रश्न होतेच. याची थोडक्यात पण अचूक उत्तरे देण्याचा मी प्रयत्न केला. भारत आणि युरोप याची तुलना करत गोष्टी स्पष्ट कराव्या लागल्या. ब्रिटिशाचे राज्य,

इग्लिशचा स्वीकार, काश्मीर हे प्रश्नही होतेच मुले, शिक्षक बोलून दाखवीत नव्हते पण अनेकाच्या मनात भारताबद्दल अनुकूल ग्रह नव्हता अनेकाना पुरेशी माहिती नव्हती तर अनेकाच्या मनात खूप उत्सुकता होती

या भाषणाचा परिणाम म्हणून की काय पण प्रा. आयरिक व सौ. मिया नूरह्येम यानी रात्री आम्हाला जेवायला बोलाविले आम्हाला वाटले की अत्यविधीचा दिवस म्हणून हेन्रिकसन पतिपत्नी येणार नाहीत, फक्त आम्हाला दोघानाच जावे लागेल पण ते दोघेही आनदाने आले सकाळचे दु ख, सध्याकाळी त्यानी दूर ठेवलेले दिसले मात्र सौ ओद अगदीच कमी बोलत होत्या. प्रा आयरिक नूरह्येम अर्थशास्त्राचे व राज्यशास्त्राचे प्राध्यापक होते. पत्नी जर्मनच्या प्राध्यापिका होत्या नूरह्येम व्यासगी व तल्लख होते. मियाबाईंनी खूप पदार्थ केले होते नव्या समाजरचनेत स्त्रीला कसे जास्त काम पडते हे त्यानी नतरच्या चर्चेत बारकाव्यानिशी माडले. नूरह्येम याना चार मुले होती. घरात दोनच होती. मोठी दोन मुले बाहेर गेली होती व घरी येणार नव्हती.

नूरह्येम यांच्याकडे जी चर्चा झाली ती फार उद्‌बोधक ठरली लहान लोकसख्या असणाऱ्या काहीशा विस्तृत देशाचे प्रश्न काय काय असू शकतात हे मला कळू शकले. नॉर्वेमध्ये तेलाच्या केंद्रावर काम करणाऱ्या साध्या कामागारालाही प्राध्यापकापेक्षा जास्त पैसे मिळतात, आधुनिक तत्रज्ञानामुळे व नव्या बोटींमुळे जुने मच्छीमार बेकार होत आहेत, नॉर्वेला मिळणारा पेट्रोल पैसा उत्पादक कार्यात खर्च न होता सुखवस्तू, चैनी राहणीवर खर्च होत आहे, नॉर्वेतील मोक्याची शेते गोल्फ किंवा अन्य खेळाच्या मैदानात रूपातरित होत आहेत. अशा अनेक समस्या नूरह्येमने आम्हाला समजावून दिल्या

भारताची अफाट लोकसख्या, बेसुमार जगलतोड, रासायनिक खते वापरण्याची प्रवृत्ती, मोठी धरणे व मोठी कारखानदारी, राजकारण्याचे अर्थशास्त्राशी खेळणे या साऱ्या गोष्टींवर नूरह्येम यानी हल्ला चढविणे अपेक्षितच होते मी समर्थन किंवा लपवाछपवी न करता या गोष्टींमधील विविध बारकावे सागून गुतागुत स्पष्ट करीत होते भारतातही अर्थशास्त्राचे महत्त्व लवकरच पर्यावरण - शास्त्रास येईल असा दिलासा मी त्याना दिला. भारतातील मुसलमान व शीख याच्या प्रश्नाबाबतही त्याना सागावे लागले. नूरह्येम हे पाकिस्तान व आग्नेय आशियात येऊन गेलेले होते.

नॉर्वे पर्यावरणविषयक किती कमालीचे जागरूक आहे हे नूरह्येम यानी रगवून सांगितले त्याचे मुद्दे प्रभावी वाटले. गुन्नार म्यूरदाल याच्याविषयी नूरह्येम याना विशेष आदर दिसला. आम्ही सध्याकाळी गेलो होतो रात्रीचा पाऊण वाजला तरी आमच्या गप्पा सपल्या नव्हत्या. आम्ही सारेच जण पार रगून गेलो होतो. मिया नूरह्येम यानी

स्वीडनमधील स्त्रीमुक्तीच्या पराकोटीच्या कल्पनावर टीका केली. पण त्याना स्वत ला नक्की काय हवे आहे हे मी खोदून खोदून विचारताच त्या गडबडल्या. त्याची वैयक्तिक दु खे फारशी खोल नाहीत हे मी त्याना दाखवून दिल्यामुळे त्याना बरे वाटले असावे

नूरह्येम याचे नवे मोठे घर, मोटार, फर्निचर इ सारा थाट आपल्याकडील श्रीमत माणसाला शोभावा असा होता मिया नूरह्येम माहेरच्या ' घरदाज ' वाटल्या भिंतीवर पद्धतशीर लावलेली दोघाच्या मागच्या पिढ्यातील पूर्वजाची छायाचित्रे याचीच साक्ष देत होती नूर म्हणजे उत्तरदिशा, ह्येम म्हणजे घर. खरोखरच हे उत्तरेच्या घरात राहणारे उत्तरकर होते. नूरह्येम पतिपत्नी हेन्रिकसन मडळींची लाडकी असावीत असे वाटले.

नूरह्येम याच्याकडे जावयास निघालो तेव्हा जबर पाऊस पडत होता. पण गेलो हे फार चागले केले असे परतताना वाटत होते नॉर्वेत जाणवलेले निसर्गाचे सौंदर्य, पर्यावरणशास्त्राची वाढती माहिती करून घेण्यासाठी स्फूर्ती म्हणून वापरावयाचे आहे असा निश्चय करून मी नूरह्येम याच्या घरातून बाहेर पडत होतो. निघताना रेखाने तिच्या जवळच्या छोट्या चदनी वस्तू नूरह्येम याच्या मुलाना भेट दिल्या.

□

## उद्योग क्षेत्र २३.

कुठल्या क्षेत्रात जास्त कामगार आहेत हे बघितले तर औद्योगिक क्षेत्र नॉर्वेला खूप महत्त्वाचे आहे. एकूण कामगारांपैकी एक पचमाश कामगार उद्योगात, वीजपुरवठा आणि बाधकाम खाते या भागांत आहेत खुद्द देशातील बाजारपेठ मर्यादित असल्याने नॉर्वेजियन उद्योगधंदे निर्यातीच्या दिशेने धडपडत असतात कच्चा माल आणि तत्सम माल बाहेर पाठविला जातो नाही असे नाही पण नॉर्वेत तयार केलेला माल बाहेर जावा याला प्राधान्य देण्याचा प्रयत्न होतो

अलीकडच्या काळात उद्योगधद्याचे मोठ्या प्रमाणात आधुनिकीकरण करण्यात आले आहे आणि स्पेशलायझेशनही वाढले आहे. उस्लो आणि त्याच्या भोवतीच्या भागात खूप औद्योगिकीकरण दिसले अर्थात त्यामुळे बकाली आलेली दिसली नाही. नॉर्वेच्या इतरही भागात उद्योगधदे आहेत.

उद्योगधद्याला वीजपुरवठा भरपूर लागतो त्यामुळे उद्योगधद्याचे विकेंद्रीकरण भाग पडते. किनारा, समुद्र आणि वीजपुरवठा या तिन्हींचा विचार करून उद्योगधंदे सुरू

केलेले आढळले ओर्दाल आणि सून्दाल वेर्क याचे उदाहरण होते येथे ॲल्युमिनिअम निर्माण होते नॉर्वेच्या पश्चिम विभागात मध्यापर्यंत जाणाऱ्या सुन्दाल्स फ्योर्दवर हा उद्योग आहे हे फ्योर्द इतके खोल आहे की जहाजे शेवटपर्यंत येऊन तेथून निर्मितीसाठी ॲल्युमिनिअम घेऊन जातात या ॲल्युमिनिअम प्रकल्पाला लागणारी प्रचंड वीज नजीकच्याच वीजनिर्मिती केंद्रातून पुरविली जाते.

वजनाने हलके धातू आणि लोखडापासून तयार झालेले समिश्र धातू नॉर्वे फार मोठ्या प्रमाणावर उत्पादित करते आणि त्याला प्रचंड प्रमाणावर हातभार लागतो तो वीज पुरवठ्याचा. याबाबतीत जगातील महत्त्वाच्या देशात नॉर्वेची गणना होते 'हायड्रो - ॲल्युमिनिअम' ही जगातील फार मोठी कंपनी आहे मॅग्नेशियम निर्माण करणाऱ्यात नोर्स्क हायड्रो ही जगातील दुसऱ्या क्रमाकाची कंपनी आहे आणि तिच्या कॅनडातही शाखा आहेत एल्केम ही लोखडापासून झालेले समिश्र धातू बनविणाऱ्यात जगातील अग्रेसर कंपन्यात मोडते. 'नोर्स्क हायड्रो' ही तर खते बनविण्यात जगातील सर्वात मोठी फॅक्टरी आहे या कंपनीचे कारखाने अनेक देशातून आहेत कार्बाईड्स, मॅग्नेशियम, वाळू आणि फेरोसिलिकॉन यात निर्यात करण्यात नॉर्वे जागतिक आघाडीवर आहे. नॉर्वेपेक्षा फक्त कॅनडा जास्त ॲल्युमिनिअम निर्यात करते नॉर्वेतील निर्यातीपैकी एकतृतीयांश भाग - पेट्रोलियम सोडून - धातू कार्बाईड्स, लोखडापासूनचे समिश्र धातू, अमोनिया, कागद यानी व्यापालेला आहे.

इतर देशातील उद्योगधद्याशी तुलना करता नॉर्वेतील औद्योगिक वातावरण स्थिर आणि शांत आहे व्यवस्थापन संघ आणि कामगार संघ याच्या आमनेसामने चर्चेतून पगार, बोनस इ बाबी ठरविल्या जातात कामागारांची सुरक्षितता पाहणे आणि उद्योगक्षेत्रात लोकशाही घटकाची वाढ करणे यावर नॉर्वेत भर देण्यात येतो.

□

## २४. मच्छीमारी

तसे पाहिले तर नॉर्वेतील एकदर लोकसंख्येच्या फक्त एक टक्का लोक मच्छीमारी व्यवसायात गुतलेले आहेत आणि असे असले तरी मच्छीमारी हा नॉर्वेतील प्रमुख उद्योगापैकी एक आहे देशातर्गत वापर आणि निर्यात या दोन्ही दृष्टीने ही वस्तुस्थिती आहे उत्तर नॉर्वेत आणि किनाऱ्यावरील वस्त्याना या व्यवसायाने आर्थिक स्थैर्य मिळवून दिले आहे

नॉर्वेची किनारपट्टी मासेमारीच्या दृष्टीने आगरच आहे. कित्येक वर्षे मासेमारी चालू आहे पण आधुनिक तंत्रविज्ञानाच्या विकासामुळे मासेमारीचे स्वरूप इतके मोठे झाले आहे की मासेमारीवर अतिशय कडक निर्बंध घालावे लागलेले आहेत इ स १९७७ पासून किनारपट्टीलगतचा दोनशे मैल रुंद पट्टा नॉर्वेने राखीव व सरक्षित म्हणून ठरविला आहे तेथे मर्यादित मासेमारी चालते स्वालबार बेटाभोवतीदेखील असाच पट्टा ठेवला आहे आणि १९८० पासून यान मायेन भोवतीदेखील सरक्षित पट्टा निर्माण करावा लागला आहे एकूण मच्छीमारांपैकी २/३ मच्छीमार मुख्य बेटाभोवती मासेमारी करतात बेसुमार जगलतोडीप्रमाणेच बेसुमार मासेमारी पर्यावरणाचा व पर्यायाने त्या देशाचा विनाश घडवून आणते हे सत्य या मडळींना उमगले आहे.

वाहतुकीच्या बोटींप्रमाणे मासेमारीच्या बोटींमध्येही आधुनिकीकरण झाले आहे. मासे खरडणे आणि गोठविणे यासाठी देखील अत्याधुनिक बोटी बाधण्यात आल्या आहेत समुद्रावरील तरगते कारखाने असे या बोटींचे वर्णन करावे लागेल अशा बोटी समुद्रात आत दूरवर जाऊन मासेमारी करण्यासाठी उपयुक्त असतात मात्र बहुसख्य बोटी छोट्या छोट्या असतात त्याही पूर्णतया आधुनिक आहेत उत्तर ॲटलाटिकमध्ये विस्तृत क्षेत्रात, पश्चिमेस न्यू फाऊण्डलडपासून पूर्वेस बारेन्तसपर्यंत आणि स्वालबार व ग्रीनलड या उत्तरेतील बेटापासून दक्षिणेत किनाऱ्याच्या शेवटपर्यंत मासेमारी चालते. नॉर्वेमधील फ्योर्दसवरही मासेमारी चालू असते.

मासे खरडणे आणि पॅकबद करणे हा नॉर्वेतील एक व्यवसायच आहे छोटे आणि मध्यम आकाराचे अनेक कारखाने नॉर्वेच्या किनाऱ्यावर आहेत मासेमारी जहाजे, बोटी त्याना कच्चा माल म्हणजे पकडलेले मासे आणून पुरवितात. ह्या कारखान्याचा विचार नॉर्वेतील अर्थशास्त्राच्या स्थैर्याच्या दृष्टीने करावा लागतो विशेष म्हणजे हा व्यवसाय प्रामुख्याने स्त्री कामगारानी साभाळलेला आहे. मासेमारी आणि मासे - कारखानदारी सपूर्णपणे मासेमारी सघटनाच्या हातात आहे त्याचे सरकारीकरण टाळले आहे. कच्चा माल आणि पक्का माल याच्या निर्मितीत वारवार चढउतार होतात यामुळे या साऱ्या व्यवसायास स्थैर्य कसे लाभेल हा विचार प्रमुख असतो किमान उत्पन्न प्रत्येक सहभागी व्यक्तीस मिळेल याची काळजी सघटनाना घ्यावी लागते. पकडलेल्या माशापैकी ९० टक्के माल निर्यात केला जातो खाण्याचे मासे, माशाचे तेल, गोठवलेले आणि खारवलेले मासे असे मालाचे प्रकार आहेत.

'मासे - शेती दिवसेंदिवस झपाट्याने वाढत आहे गेल्या १५ वर्षांत मासे - शेतीतील उत्पादन शभर टक्क्यानी वाढलेले आहे. सामन मासे ही मासे - शेतीच्या दृष्टीने फार महत्त्वाची जात आहे १९८६ मध्ये पचेचाळीस हजार टन

इतके या जातीचे विक्रमी उत्पादन करण्यात आले ट्राऊट मासे प्रतिवर्षी पाच हजार टन इतके तयार करण्यात येतात सामन माशाना बाहेर मागणीही भरपूर असल्याने त्याचे उत्पादन वाढविणे चालू आहे. आपल्याकडे कोंबडी - पालन जसे लोकप्रिय झाले तसे सामन मासे - शेती नॉर्वेच्या किनाऱ्यावरील गावातून लोकप्रिय झाली आहे. हालीबूत आणि तुर्बोत हे मासेही लोकप्रिय ठरू पाहात आहेत

फ्योर्दस्, मासे - शेतीला फार पूरक. शात, अनुकूल आणि सदोदित वाहाते पाणी. लिन्देसनेस या दक्षिणेतील ठिकाणापासून पार नॉर्थकेप या उत्तरेतील ठिकाणापर्यंत सहाशेच्यावर माशांची ‘ शेते ’ आहेत. आणि जवळजवळ तितकीच माशाची पैदास करण्याची केंद्रे आहेत फ्रान्स, अमेरिका, आणि डेन्मार्क ही नॉर्वेची मासे विकत घेणारी बडी गिऱ्हाईके आहेत १९८६ मध्ये १०८ बिलियन नॉर्वेजियन क्रोनर्स एवढी प्रचड रक्कम नॉर्वेला मासे निर्यातीतून या व्यवसायाला मिळाली

□

## २५. जहाज - व्यवसाय

जहाजे वापरून जगभर वाहतूक करायची, इकडचा माल तिकडे पोहोचवायचा हा नॉर्वेचा फार मोठा व्यापार आहे. या व्यवसायाला एक हजार वर्षांची परपरा आहे. ‘ तरगते साम्राज्य ’ म्हणून नॉर्वेचा गौरव केला जात असतो नॉर्वेच्या एकूण जहाजांपैकी ९० % जहाजे आतरराष्ट्रीय वाहतुकीच्या कामात गुतलेली आहेत इग्लिश माणसाप्रमाणेच नॉर्वेजियन माणसे दर्यावर्दी म्हणून प्रसिद्ध आहेत नॉर्वे या देशाचे स्थान व रचनाच अशी आहे की समुद्र - जीवन सामाजिक जीवनाचाच एक भाग बनून जावे नॉर्वेत असे कुटुब नसते की ज्यातील कोणीना कोणी कधी दर्यावर्दी जीवन जगलेले नसते.

जहाजामार्फत वाहतूक आणि जहाज - बाधणी या दोन्ही कामात नॉर्वेची मडळी वाकबगार आहेत जहाज बाधणीत उत्कृष्ट रचना आणि आधुनिक तत्रविज्ञानाचा वापर या दोहोंनाही महत्त्व दिले जाते. नॉर्वेतील प्राचीन वायकिंग - जहाजे पाहिली तरी ती डौलदार व उत्कृष्ट बाधणीची दिसतात जहाज बाधणीसाठी लागणारे उत्कृष्ट आणि टिकाऊ लाकूड नॉर्वेत शेकडो वर्षे उपलब्ध आहे दुसऱ्या महायुद्धानतर तर नॉर्वेचा जहाज व्यवसाय जगातील अग्रेसर ठरला

१९७० सालापासून प्रत्येक शक्य त्या देशाने जहाज बांधणीस सुरुवात केली आणि नॉर्वेला आपल्या व्यवसायाचे स्वरूप बदलणे भाग पडले इतर देशाच्या व्यवसायात नॉर्वेने हळू हळू सहभाग घेतला परिणमत आज अनेक जहाजे नॉर्वेची असतात पण त्याच्यावरील झेंडा व खलाशी मात्र दुसऱ्या देशाचे असतात

बदलत्या काळाची पावले ओळखून नॉर्वेजियन तरुण पूर्वीएवढे या व्यवसायात जात नाहीत. त्याना इतर क्षेत्रेही उपलब्ध होत आहेत "असे असले तरी आतरराष्ट्रीय जहाज वाहतुकीचा नॉर्वेजियन व्यवसाय मात्र थोडा वाढलाच आहे सुमारे पधराशे आतरराष्ट्रीय जहाजे नॉर्वेतून व्यवस्थापित केली जातात. यातील बहुतेक जहाजे नॉर्वेजियन मडळींच्या मालकीची आहेत थोडक्यात परकीय चलन मिळवून देण्यात आजही जहाज व्यवसायाचा मोठा वाटा आहे.

NIS ' नॉर्वेजियन इटरनॅशनल शिप रजिस्टर ' ची १९८० मध्ये स्थापना करून नॉर्वेने इतिहास घडविला आहे. या यत्रणेमुळे अनेक जहाजे आतरराष्ट्रीय वाहतूक कोठे व कोणासाठी करायची याबाबत स्वतत्र राहतात पण कार्यवाहीसाठी मात्र नॉर्वेशी सधान साधून राहतात अनेक दुसऱ्या देशाची जहाजेही या यत्रणेत भाग घेत आहेत राष्ट्रीय ध्वज आणि वाहतूक निर्णयाचे स्वातत्र्य हे दोन्ही फायदे यात त्या त्या जहाजाना घेता येतात वाहतुकीच्या बाबतीत विशिष्ट वाहतुकीसाठी विशिष्ट जहाजे असे स्पेशलायझेशनही झाले आहे. आणि नॉर्वेने त्यात यश मिळविले आहे उदा पनामा कॅनालमधून वाहतूक करणारी नोर्स्क जहाजे. माल वाहाण्याची जास्तीत जास्त क्षमता आणि जास्तीत जास्त सुरक्षितता या दोन बाबी या सदर्भात महत्त्वाच्या ठरल्या आहेत तेल, मोटारगाड्या, कच्चे पोलाद, गॅस, औषधे, लाकडी वस्तू, सिमेंट, खनिजे आणि प्रवासी याची वाहतूक करण्यासाठी वेगवेगळी जहाजे वापरली जातात ती तशी तयार करण्यात नॉर्वेने यश मिळविले आहे.

तेल व्यापारात नॉर्वेची जहाजे मोठ्या प्रमाणावर भाग घेतात यात अद्ययावत बाधणीची दोनशे जहाजे गुतलेली आहेत. या सदर्भातील तत्रज्ञानाचा दिवसेंदिवस जास्त विकास होत आहे त्याचा वापर नॉर्वेजियन मडळी करून घेत आहेत साठ ते सत्तर हजार नॉर्वेजियन मडळी जहाज वाहतुकीच्या सदर्भातील व्यवसायात रमलेले आहेत. जहाज - व्यवसायासबधीच्या जास्तीत जास्त बातम्या नॉर्वेतील वृत्तपत्रे आणि मासिके देत असतात

□

नॉर्वेत जी काही शेती आहे ती कमी प्रमाणावर आहे साधारण एखादे शेत म्हटले की ९५ decares ही मशागतीसाठी जमीन असते आणि ४५० decares ही जगलाची जमीन असते. पण छोट्या छोट्या शेताची मिळून मोठी शेते बनवावीत आणि शेतीखालील जमीन वाढवावी ह्याचे प्रयत्न चालू आहेत. सर्व शेतजमीन खासगी आहे आणि कुटुबपरपरागत आहे. कुटुब परंपरेने शेती ही जुनी वहिवाट आहे.

नॉर्वेच्या एकूण लोकसख्येपैकी ६ % लोक शेतकरी आहेत. म्हणजे सुमारे अडीच लाख लोक शेतीत आहेत आणि ही मडळी अतिशय प्रतिकूल व खडतर वातावरणात शेती करतात. शक्यतो सारी अद्ययावत अवजारे वापरतात. शेतकऱ्याना शेतीचे उत्तम शिक्षण दिले जाते व मदतही केली जाते त्यामुळे नॉर्वेत त्या हवामानात होऊ शकणारी पिके घेतली जातात जमिनीखाली होणारे कद, भाज्या, मुळे घेतली जातात.

उस्लोफ्योर्द, यारेन, स्तवागरच्या दक्षिणेस, मध्ये नॉर्वेत त्र्योनह्येमफ्योर्द, आणि उत्तरेस त्र्योम्स् या ठिकाणी चागल्यापैकी शेती केली जाते. दक्षिण नॉर्वेतील काही दऱ्यात ही उत्तम शेतजमीन आढळते व तेथे शेती केली जाते.

नॉर्वेत पीक घेण्याचा काळ फार थोडा असतो. ग्रीन - हाऊसमध्ये रोपे करून, उन्हाळा सुरू होताच ती शेतात लावली जातात शेती इतकाच भर गुरेढोरे याच्यावर दिला जातो दुध - दुभते, मास, अडी, चीज याचे पुरेसे उत्पादन नॉर्वेत होते. बटाटे आणि काही भाज्या होतात पण ब्रेडसाठी लागणारा गहू किंवा अन्य कडधान्ये बाहेरून आणावी लागतात. असे म्हणता येईल की अन्नधान्याची निम्म्याच्यावर गरज स्वत नॉर्वे भागवितो पण एक तृतीयाश गरज बाहेरून भागवावी लागते. नॉर्वेजियन चीज बाहेर निर्यात केले जाते कारण ते लोकप्रिय आहे

भरपूर श्रम करायचे पण आपली शेती उत्तम स्थितीत ठेवायची हे या देशाचे उद्दिष्ट आहे पण कमी लोकसख्या आणि प्रतिकूल हवामान हे अडसर आहेत यावर मात करण्यासाठी शेतकरी सघ आहेत आणि त्याना सरकार अनुदाने, कर्ज व सवलती देते.

भारत शेतीप्रधान देश म्हटला जातो तसा नॉर्वे बिलकुल नाही.

## वन - वैभव

नॉर्वेच्या एकदर जमिनीपैकी १/५ भाग जगलानी व्यापलेला आहे पाईन, स्प्रूस, फ्यूरअ् हे वृक्ष जास्तीत जास्त आहेत. म्हणजे जगले आहेत ती सूचिपर्णी वृक्षाची जे शेतकरी शेती करतात तेच जगलाकडे लक्ष देतात दोन तृतीयाश जगले या शेतकऱ्याच्या मालकीची आहेत दक्षिण नॉर्वेच्या मध्यभागी आणि मध्य नॉर्वेत घनदाट आणि भरपूर जगले आहेत शेतीप्रमाणेच वनविज्ञान व वनशेती याचेही आधुनिकीकरण व यात्रिकीकरण झालेले आहे. झाडे आणि लाकडे यत्रानी कापली जातात. आपण घरे बाधण्यासाठी जशा विटा पाडतो तशा ही मडळी फळ्या वापरतात. क्रेन्स, ट्रॅक्टर्स, लॉऱ्या याचा वापर जंगलभागात केला जातो.

नॉर्वेत हवामान अतिथड असल्याने पूर्ण भरलेले ठोस असे कच्चे लाकूड व्हायला साठ - सत्तर वर्षे जावी लागतात. झाडे झपाट्याने वाढत नाहीत पण लाकूड चागल्या प्रतीचे होते झाडाना कीड लागणे हा प्रकार जवळजवळ नाही

□

# ध्रुवताऱ्याचे दर्शन २७.

नॉर्वेच्या वास्तव्यात उत्तर ध्रुवतारा पाहण्यासाठी आम्ही तळमळत होतो ६० अक्षाशाच्या आसपास आर्क्टिक परिसरात आम्ही होतो जेथे सूर्यबिब दिसायला तयार नव्हते तेथे ध्रुव कसा दिसणार? आकाश सदोदित अभ्राच्छादित, त्याचा निळा रग फक्त आमच्या मनात होता.

एका रात्री उसला अचानक हा योग आला दिवसाची नोंद नाही पण ती रात्र होती रात्री ८॥ - ९ ची वेळ उलटून गेली होती मी हेन्रिकसन याच्या दिवाणखान्यातून बाहेरच्या गच्चीत आलो गच्चीच्या उजव्या हाताला जो डोंगर होता व जगल होते त्या दिशेला एक तारा चमचमत होता डोक्याच्या बाजूला सप्तर्षी होता त्याच्या पुढील दोन ताऱ्यातून मी सरळ रेष आखली आणि आनदून गेलो धावत जाऊन मी रेखा व हेन्रिकसनला बाहेर बोलावून आणले खातरजमा झाली. तो ध्रुवाचाच तारा होता.

ध्रुवतारा अगदी डोक्यावर दिसत नव्हता. आपल्याकडे क्षितिजाच्या आसपास दिसतो तसाही दिसत नव्हता तर मध्यावर दिसत होता मी डोळे भरून त्याला पाहत होतो. 'त्र्योमसो किंवा हॅमरफेस्टवरून ध्रुवतारा डोक्यावर दिसतो का ?' मी हेनिगला

विचारले 'त्यासाठी आणखी पुढे जावे लागते.' त्यानी सागितले. ध्रुव दिसण्याचा आनद फार काळ टिकला नाही. पाच मिनिटात पुन्हा ढगानी आकाश व्यापून टाकले.

ध्रुवतारा त्या प्रदेशातून पाहण्याचा क्षण मला फार मोलाचा वाटला नेमका असा आनंद परत मिळेल न मिळेल ज्या प्रदेशाला ध्रुवीय प्रदेश म्हणून ओळखतात त्या प्रदेशातून ध्रुवतारा पाहता आला इतके वर्षांत अतराचा दुरावा होता तो दुरावा काही क्षण का होईना गळून पडला आपल्याकडे ध्रुवतारा अधुक दिसतो. शहरात तर तो रात्रीच्या दिव्याच्या झळाळीत दिसतही नाही आम्हाला जे दर्शन झाले ते ठळक आणि चमचमत्या धुव्रताऱ्याचे नतरही एक - दोनदा दर्शन झाले, पणे ते आकाशात स्वच्छता नसल्याने तितके स्पष्ट नव्हते धुक्याचा तवग आम्ही आणि ध्रुवताऱ्यात होता.

नॉर्वेतील सहा आठवड्यात सूर्यबिंब मात्र एकदाच दिसले. नॉर्वेजियन रेडिओ - टेलिव्हिजन कॉर्पोरेशनवरून आम्ही उस्लोतील आमच्या घरी परतलो होतो ४ चा सुमार होता रस्त्याच्या डाव्या हातावर ताबडा रग होता आणि भले मोठे सूर्यबिंब झगमगत होते. आपल्याकडे सूर्य पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो येथे (पूर्वेच्या) क्षितिजावर धावतो सूर्यबिंब डोक्यावर येण्याचा - दिसण्याचा प्रकार उद्भवत नाही.

ज्ञानेश्वरीतील पसायदानात 'मार्तंड जे तापहीन,' असे शब्द आहेत. म्हणजे सूर्य आहे, त्याचा प्रकाश आहे, पण त्यात त्रास व्हावा अशी उष्णता नाही आम्हाला त्या वेळी सूर्यबिब दिसत होते ते असे होते अर्थात त्या तांबड्याभडक व मोठ्या वाटणाऱ्या आकाराकडे आम्ही रोखून बघू शकत नव्हतो, कारण सूर्यबिंब दिसण्याची सवयच मोडली होती.

आपल्याकडे ज्या आकाराचे सूर्यबिंब दिसते त्याच्यापेक्षा येथून आकार मोठा वाटतो आणि त्यातील लाल रग जास्त स्थिर व गडद वाटतो असे का व्हावे? एखाद्या तज्ज्ञाला गाठून या प्रश्नाचे उत्तर मला विचारायचे आहे.

□

## २८. अद्वितीय रेल्वे - प्रवास

बेर्गेनमधील आमचा मुक्काम सपवून आम्ही नॉर्वेची राजधानी उस्लो येथे गेलो. 'बेर्गेन ते उस्लो' हा रेल्वे - प्रवास जगद्विख्यात रेल्वे ट्रॅक्सपैकी मानला जातो. सुमारे

पाचशे किलोमीटर आणि सात तासाचा हा प्रवास हिमाने आच्छादिलेल्या पर्वतराजीतून व सूचिपर्णी जगलातून होतो काही काही वेळा तर दुतर्फा दहा - दहा, बारा - बारा फूट साचलेले बर्फ असते देवमासा जसा पाण्याचे कारजे उडवीत समुद्रातून पुढे जातो तशी तुमची ट्रेन हिमाचे कारजे उडवीत पुढे - पुढे जाते ऋतू, महिना कोणताही असो, नॉर्वेचा हा भाग बहुतेक बर्फाने आच्छादिलेला असतो हिम कमी - जास्त असते एवढेच अनेक युरोपीय जोडपी हा प्रवास आवर्जून करतात काही प्रवासी बेर्गेन - उस्लो एवढेच अतर न कापता बेर्गेन - स्तोकहोल्मपर्यंत जातात. म्हणून एक पूर्ण दिवस, २४ तास ट्रेनवर घालवितात आणि नॉर्डिक निसर्गाचे डोळे भरून दर्शन घेतात. उन्हाळ्यातही या पट्ट्यावर थंडीच थडी असते आणि दिवस बावीस तासापर्यंत असतो उन्हाळा या शब्दाला नॉर्डिक देशात खरे म्हणजे अर्थ नाही उन्हाळा म्हणजे सूर्यप्रकाशाचा काळ एवढेच त्याही वेळेला कोट, स्वेटर घालण्याइतपत थडी असते.

१९ व्या शतकात पश्चिम किनाऱ्यावरचे प्रमुख गाव बेर्गेन आणि पूर्व किनाऱ्यावरील प्रमुख गाव उस्लो ( क्रिस्तिआनिया ) याना जोडणारी रेल्वे अस्तित्वात नव्हती. रस्ता होता; पण तो प्रवास अतिशय दुरापास्त असे बेर्गेन ते उस्लो अतर समुद्रातून पार करावे लागे थोडक्यात गोव्याहून मद्रासला बोटीने जाण्यातला प्रकार. आता विसाव्या शतकात रेल्वे प्रवास लोकप्रिय आहे. हिवाळ्यात काही काही वेळा प्रचड हिमवृष्टीमुळे रुळावर इतके बर्फ साचते की प्रवास थाबतो, पण असा बर्फ दूर करण्याची तयारीही ठिकठिकाणी जय्यत आहे. प्रवासात वाटेत ठिकठिकाणी छोटी - छोटी गावेही आहेत अगदी वेळप्रसगी तेथे आसरा घेता येतो ट्रेनवरही खायला मिळू शकते

बेर्गेन - उस्लो धावणाऱ्या रेल्वेच्या डब्याचा दर्जा अत्युत्कृष्ट आहे. सेकडक्लास आणि फर्स्टक्लासमधील फरक किरकोळ आहे. फर्स्टक्लासमध्ये झोपता येते एवढेच आम्ही दोघानीही भरपूर रेल्वे - प्रवास केला आहे फ्रान्स, जर्मनी, इटली येथे आम्ही पूर्वी रेल्वेने हिंडलोय, पण आमचे एकमत झाले की या प्रवासास तोड नाही. बर्फ, तळी, दऱ्याखोऱ्या, जगले, बोगदे, धबधबे याची या मार्गावर रेलचेल आहे अत्युत्कृष्ट पूल आणि लाब बोगदे पाहताना मानवी कर्तृत्वाचे रम्य दर्शन घडते डबे पॅकबद असल्याने आवाजाचा त्रास बिलकूल होत नाही आणि खिडक्याची तावदाने भव्य असल्याने बाहेरच्या निसर्गाची साथ सतत राहते तुम्ही पडदे ओढून घेतले तर अलाहिदा.

रेल्वे - प्रवासात वाचायची किंवा नोट्स घ्यायची माझी पद्धत आहे. या प्रवासात वाचणे विसरून गेलो कारण भोवतालच्या निसर्गाच्या दर्शनाने देहभान हरपले. जेवढे पाहून घेता येत होते तेवढे पाहून घेतले. कारण मला माहीत होते की, परतताना आमचा प्रवास इतका उत्कृष्ट होणार नव्हता प्रवासात काही नोंदी मात्र आवर्जून घेतल्या

'आमची ट्रेन पर्वतातून चालली आहे डोंगराचे माथे आणि उतार हिमाने आच्छादलेले आहेत डोंगराची उची हिमालयाएवढी नाही तर आपल्याकडील डोंगरापेक्षा हजार - दोन हजार फूट जास्त एवढीच आहे वारवार तळी आणि बोगदे लागत आहेत उतरणीवर आणि अगदी निर्जन वाटणाऱ्या भागातही टुमदार घरे आहेत घराचे रग मात्र जुनसर वाटतात निष्पर्ण जगलातील बर्फ फार मजेशीर दिसते ( आज सकाळी ध्रुवतारा पाहायला मिळाला मोठा आणि चकचकीत फार आनद वाटला ) पाईन, स्प्रूस आणि फर झाडावर हिरवी पाने दिसतात बर्च वृक्षाची मात्र फक्त खोडे आणि फाद्या दिसतात. खोडे पाढरी आहेत या वृक्षाना मी पूर्वी पॉपलर समजत असे काही दऱ्या अरुद तर काही दऱ्या पसरट आहेत, विस्तीर्ण आहेत, पण दरी म्हटली की रेल्वेच्या डाव्या किंवा उजव्या बाजूला तळे आलेच दगडाचा रग काळा आहे आणि क्वचित जमीन दिसते ती काळी कुळकुळीत आहे '

'आम्ही सेकड क्लासमध्ये आहोत, पण डबा डेक्कन क्वीनच्या फर्स्ट क्लासपेक्षाही अनेकपटीने चागला आहे पुढच्या सीटवर गुलाबी कपड्यातील छोटीशी मुलगी आमचे लक्ष वेधून घेत आहे मी तिला माझ्या काळ्या रगामुळे खूप मजेशीर वाटतो आहे हे उघड आहे. अखेरीस तिने आमच्याकडून चॉकलेट घेतलेच.'

'येथे दऱ्याखोऱ्यात विस्तीर्ण शेते दिसत नाहीत शेताचे तुकडे लहान - लहान आहेत शेती करणे अत्यत जिकरीचे आहे वनशेती केल्यासारखे भागही डोंगरात वारवार दिसतात धबधबेही वारवार लागतात शेतात गवत आहे, पण शेताचे रग पिवळे, हिरवे असे वेगवेगळे दिसतात. केवळ जमीन क्वचितच दिसते व्होस आणि उर्डलाद या दोन स्टेशनामधील अतरात असताना हिमवृष्टी सुरू झाली चारही बाजूला बर्फच बर्फ घराची छपरे बर्फाने गच्च भरलेली आहेत. पाईन वृक्षावरही बर्फ भरपूर आहे बर्चची झाडे तर हिमाने शिगोशीग झाकलेली. झाडाची, जगलाची, अखडता अधूनमधून होणाऱ्या बोगद्यामुळे खंडित होती. उर्डलाद सोडल्यावर मात्र जगले आणि घरे अक्षरश. बर्फाखाली गाडली होती.'

म्यूरदाल

विख्यात अर्थशास्त्रज्ञ गुनार म्यूरदाल याचे मूळ गाव गुनार म्यूरदाल यानी 'एशियन ड्रामा' हे त्रिखडात्मक पुस्तक लिहून आशियाई देशाच्या दारिद्र्याची आणि दारूण परिस्थितीची भेदक चर्चा केली आहे

म्यूरदाल स्टेशनवर व नतर इतके प्रचड बर्फ झाले की दोन्ही बाजूला काही दिसेना. फक्त पाढरा रग आणि शुभ्र लाबवर पसरलेले अतर. बोगद्यातही बर्फ साचलेले होते.

पण हे बर्फ म्हणजे फ्रॉस्ट. स्नो नव्हे आम्ही खाण्याचा डबा काढल्यावर समोरच्या सीटवरील छोट्या मुलीनेही खाण्याचा डबा काढला बोगद्यात आतून काही ठिकाणी प्रकाशासाठी ट्यूब्स लावलेल्या दिसल्या.

फिन्सूअ

या स्टेशनवर दोन केसाळ कुत्रे गाड्या ओढताना दिसले प्रचड बर्फात काही माणसे स्कीइग करीत होती निम्मी घरे बर्फातच गाडलेली दिसली एका घराच्या दारात उभे केलेले खिसमस ट्री सारेच बर्फात होते आणि त्याच्या शेंड्यावर दिवे चमचमत होते. येथील खिसमस अजून सपलेला दिसत नव्हता इतके बर्फ झाले की कॉन्ट्रास्टच उरला नाही आणि फोटो काढण्यात अर्थ उरला नाही

आश्चर्यकारक गोष्ट म्हणजे प्रचड बर्फातही काही ठिकाणी उच तट्ट्यासारखी लाकडी कुपणे दिसली विजेच्या तारावर बर्फ साचून त्या जाड रुळासारख्या झाल्या होत्या आणि तारा तुटतील की काय असे वाटत होते. आपण कोणत्या दिशेने जात आहोत हेच बर्फामुळे कळेनासे होते येथील घरे सोडून लोक बहुधा अन्यत्र राहायला गेले असणार. येथे जर का एखाद्याचा रस्ता चुकला की तो सपलाच

जगलाची उची कमी झालेली आहे आणि हजारो झाडाचे नुसते सापळे उभे आहेत कोठल्याच झाडावर आता पानाचा मागमूसही नाही. शेराची झाडे जशी असतात तशी ही झाडे आहेत. बर्फाची वाळवंटे आणि त्यात ओॲसिस वाटावीत, अशी झाडे आणि घरे. एकाही पक्ष्याचा मागमूस नाही.

उस्तोस्येत - क्योरफेल्त

'अप इन दि माऊटन्स' या वाक्प्रचाराचा नॉर्वेजियन अर्थ आपल्याला कळणे कठीण आहे बर्फ, बर्फ आणि बर्फ, पण गाडी डोंगरातून जात असल्याने शिखराची उची फार नाही. डोंगर - माथ्यावर जगले दिसतात स्वच्छ सूर्यप्रकाश ही गोष्टच नाही.

चायलो

हे बरेच मोठे गाव आहे आणि तितक्याच मोठ्या बर्फाखाली ते गाडले गेले आहे. या गावाभोवती झाडी आणि जगलेही भरपूर आहेत. येथे आल्यावर नॉर्वेतील डोंगरभागाच्या आत्म्यातच प्रवेश केल्यासारखे वाटते.

गोल

दुपारचे अडीच वाजले आहेत. आता हिरव्यागार पाईन्सची प्रचड जगले दुतर्फा सुरू झालीत. हिमाचे प्रमाण कमी झाले आहे. डोंगरावर झाडीचा हिरवागार रग आणि

माथ्यावर निळे आकाश, दृश्य उलटावे असा प्रकार झाला आहे. पाईन स्प्रूस, फर हे सूचिपर्णी वृक्ष फार दाडगे नाहीत, पण झाडी कमालीची दाट आहे. लाकूडतोड हा येथील व्यवसाय असणार हे उघड आहे लाकडाच्या लाब - लांब कापलेल्या पट्ट्या घरबाधणीच्या आहेत, हे सहज कळते माझे पाय पार गारठून गेले आहेत डब्यातील उष्णता कमी झाली असावी.

सातच्या सुमारास आम्ही उस्लो स्टेशनवर दाखल झालो डब्यातून आम्ही सामान उतरवून घेतले ह्योग पतिपत्नीची बराच वेळ वाट पाहिली. हिमवृष्टी चालू असल्याने त्याना उशीर झाला असावा.

तेवढ्यात ह्योग पतिपत्नी आले त्यानी आम्हाला ओळखले दोघानाही चष्मा होता व ही माणसे धिप्पाड नव्हती आमच्या उचीची होती. त्याच्याशी हस्तांदोलन करताना आम्हाला कल्पनाही नव्हती की, आम्ही केवळ मित्राना भेटत नसून अक्षरश. देवमाणसांना भेटत होतो

□

## २९. डाल्सवाएन ४६

आम्ही उस्लोस ह्योग याच्याकडे उतरलो होतो. श्री इयान ह्योग हे एका शाळेचे मुख्याध्यापक होते त्याना जर्मन भाषा येत होती इंग्लिश येत नव्हती. ते इतिहासाचे प्राध्यापक होते. त्याची पत्नी सौ. रॉन्दी ह्योग ही फिजिओथेरपिस्ट होती तिच्याकडे अनेक पेशटस येत जात ह्योग याचे घर खूपच मोठे होते आणि ते उस्लोच्या होल्मनकोलन या डोंगराच्या रमणीय परिसरात होते.

ह्योग पतिपत्नींना दोन मुलगे व दोन मुली होत्या एक मुलगा जर्मनीत शिकायला होता दुसरा मुलगा फ्रेदरिक हा कम्प्यूटर तत्रज्ञ होता हा आम्हाला भेटला. मोठी मुलगी एलिस ही लग्न झालेली होती आणि धाकटी मुलगी सिसेल ही भारतात मदर तेरेझा याच्याबरोबर कलकत्त्यात समाजसेवा करीत होती सिसेल पाचगणी - महाबळेश्वरला येऊन गेली होती पण तिची आमची गाठभेट होऊ शकली नव्हती

ह्योग पतिपत्नी, वीगाड जोडप्याचे व्याही विहीण होते. वीगांड याची मुलगी हिल्डअ आणि ह्योग याचा मुलगा फ्रेदरिक ह्यानी धार्मिक पद्धतीने विवाह केला होता व ते रॉन्दीच्या माहेरच्या वास्तूत स्वतत्र राहात होते. हिल्डअ दातांची डॉक्टर होती. तिला एक

मुलगी होती तिचे नाव निकोलिना. हे मुलगा -मुलगी स्वतंत्र राहात असल्याने ह्योग कुटुबाचे भलेमोठे घर रिकामेच होते. त्यात एक खोली आमच्यासाठी सहज देता आली. आणि आम्हीही तेथे लवकर समरस झालो.

रॉन्दीबाई इंग्लिश चागल्या बोलत होत्या त्याहीपेक्षा म्हणजे अतिशय मधुर आणि हळुवार बोलत होत्या त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे ओतप्रोत गोडवा, सामजस्य आणि हास्य. त्या चार मुलाची आई होत्या हे सांगूनही खरे वाटले नसते रेखाची आणि त्याची गट्टी जमली इयान हा गृहस्थ अतिशय शिस्तशीर पण कमी बोलणारा होता त्याचे आणि आमचे सभाषण मोडक्या तोडक्या जर्मनमधून चाले किंवा रॉन्दी असे तेव्हा तिच्यामार्फत चाले इयानला इतिहासाची चागली आवड होती. त्याच्या ज्ञानाचा जास्तीत जास्त उपयोग मी करून घेऊ पाहात होतो पण भाषेची अडचण मध्ये उभी होती मला इब्सेनविषयी जास्तीत जास्त माहिती देण्याची इयानची इच्छा होती आणि भारताविषयीही त्याला त्याची मुलगी भारतात असल्याने औत्सुक्य होते पण तो रॉन्दीबाईंच्या मदतीखेरीज ते करू शकत नव्हता.

ही माणसे मुळातच मऊ आणि समजस असल्याने आणि आम्हाला पाहुणे म्हणून त्यानी मनापासून स्वीकारले असल्याने सारे काही ठीक आहे असे नव्हते. रेखाच्या बायोडेटात ती इडो - जर्मन सोसायटीची सभासद आहे असा उल्लेख होता भारतीयाना मराठी माणसाना जर्मनांविषयी आकर्षण असते असे समजले जाते. उलट नॉर्वेजियनाच्या मनात जर्मन, विशेषत जर्मन नात्झींविषयी तिटकारा असतो. त्यामुळे आम्हाला जर्मनीविषयी नक्की काय वाटते हे ह्योग मडळींना अजमावून पाहायचे होते दुसरे म्हणजे ही मडळी ख्रिश्चन होती त्याची मुलगी सिसेल ही मदर तेरेझानी भारलेली होती त्यामुळे आमची तेरेझा व ख्रिश्चन धर्माकडे पाहण्याची दृष्टी काय आहे हे ते जाणू इच्छित होते. पण माझी दोन बलस्थाने होती मी इब्सेनप्रेमी होतो आणि माझे दस्तुयेवस्कीवर पुस्तक होते. दस्तुयेवस्की प्रॉटेस्टट नसला तरी ख्रिस्तप्रेमी आहे.

या माणसानी सुरुवातीसच एक युक्ति केली. एका रात्री आम्हाला हिटलर आणि नात्झी मडळींची एक फिल्म दाखविली. हिटलरच्या लष्करी सामर्थ्याचे यात प्रदर्शन होते

ही प्रचारकी फिल्म पाहून झाल्यावर मी म्हणालो, ' हिटलर हा पराभूत हुकूमशहा होता भारतीय माणसे अशिक्षित, अडाणी वाटतात. पण त्यानी असा हुकूमशहा निर्माण केलेला नाही आणि ते होऊही देणार नाहीत '

माझी ही प्रतिक्रिया पाहिल्यावर इयानने सुटकेचा नि श्वास टाकला. आमच्याकडील

घोरकट मडळींना हिटलर हा भारतीय समस्यावर तोडगा वाटतो पण ही मडळी मूठभर आहेत. भारतीय समस्या व भारतीय मनोवृत्ती जर्मनीपेक्षा अगदी भिन्न आहेत हे मी त्याना समजावून सागितले भारताच्या तीन बाजूनी समुद्र आणि उत्तरेस हिमालय असल्याने आम्ही आक्रमण करू शकत नाही उलट वायव्येकडून आमच्यावर आक्रमणे झाली हा भाग मी त्याना समजावून दिला त्यावर इयानने देखील ' वायकिंग्ज ' आक्रमणाचे स्वरूप मला सागितले आणि खरे नॉर्वेजियन्स शाततप्रेमीच आहेत असे सागितले

मदर तेरेझाना मी पाहिले आहे. त्या महात्मा आहेत हे मी त्यांना सागितले त्यामुळेही त्याना समाधान वाटले. पण मदर तेरेझा या सतती नियमनाच्या विरुद्ध असल्याने आणि धर्मप्रसार हा त्याचा एक हेतू असल्याने भारतात त्या राष्ट्रीय ठरू शकत नाहीत हे न बोचेल अशा भाषेत मी स्पष्ट करून सागितले. त्याचबरोबर गीता आणि बायबलचा नवा करार याचा मी नीट अभ्यास केलेला आहे हीही माहिती मी त्याना दिली

या दोन विषयावरील आमच्या भूमिका त्याना स्वीकारणीय वाटल्या असाव्यात. इब्सेनविषयीच्या आमच्या कामात त्यानी मनापासून मदत केली त्यात दुरावा निर्माण झाला नाही ' तुमच्या देशाच्या चालीरीती आम्हाला माहीत नाहीत त्यामुळे आमच्या हातून नकळत चुका होतील त्या आम्हाला समजावून द्या ' हे जेव्हा मी त्याना म्हणालो तेव्हा रॉन्दी म्हणाली, ' तुम्ही चुका करू शकाल ? मला वाटते तू थट्टा करतो आहेत !'

' तसे नाही अगदी बारकावे, मी इब्सेनवर लक्ष केंद्रित केले असल्याने लक्षात येत नाहीत. ' मी.

' रेखा, अनिल काय सागतो त्यावर मी विश्वास ठेवू ?' - रॉन्दी

' अनिरुद्धच्या लक्षात काही गोष्टी येत नाहीत आणि त्याची स्मरणशक्ती सोयिस्कर आहे. ' रेखा हसत हसत म्हणाली

ह्योग कुटुबातील आमचा मुक्काम नुसताच चागला झाला नाही तर हसत खेळत झाला. मी आणि रॉन्दीबाई याना विनोदी गप्पागोष्टींची आवड. त्यामुळे वातावरण नेहमीच प्रसन्न राहिले रेखा नेहमी सयमित भावना व्यक्त करणारी पण काही वेळा तिचीही हसता हसता पुरेवाट होई

' ग्रिमस्टामध्ये, ब्योर्कलुण्डने मी इब्सेनची टोपी घालावी असे सुचविले ' हे मी हसत हसत रॉन्दीबाईंना सागितले त्यावर त्या म्हणाल्या,

' टोपीपर्यंत ठीक आहे. पण त्यानी सागितले म्हणून तू कपडे तर उतरविले नाहीस ना ?'

त्यावर मी म्हणालो, ' इब्सेन प्रेमापोटी तेही धाडस होऊ शकेल पण सुदर नाचणारी, देखणी अनित्रा कोठून आणणार.'

उस्लोचा एक नकाशा या मडळींनी आम्हाला दिला होता त्यावरील जोडप्यातील सुदरीकडे मी निरखून पाहात होतो त्यावर रॉन्दीबाई म्हणाल्या,

' अनिल या नॉर्वेजियन बाईच्या प्रेमात पडला आहे. त्याना फोन करून कळवायला पाहिजे.'

त्यावर मी म्हणालो, ' मी या बाईंच्या सुदर स्वेटरकडे पाहात होतो. पण स्वेटरच्या आतील सौंदर्य खरे त्यांचे त्यानाच ठाऊक.'

एकदा ' ग्राद काफे ' या विख्यात हॉटेलात ज्या टेबलावर इब्सेन कॉफी घेई व वर्तमानपत्र चाळीत बसे तेथे बसून आम्ही कॉफी घेत होतो तेथील प्लेट्सवर इब्सेनचे कार्टून होते

' ही प्लेट बरोबर न्यावी असे मला वाटते नॉर्वेजियन मडळी इब्सेनवर किती प्रेम करतात ह्याचा हा पुरावा आहे ' - मी.

त्यावर रॉन्दीबाई म्हणाल्या, ' कल्पना छान आहे पण हे जर तू केलेस तर उस्लोच्या वर्तमानपत्रात ही बातमी छापून येईल आणि आमचे लोक बरीच जुनी पानी क्रोकरी तुला आणून देतील '

' ती मी आनदाने नेईन पण आमचे मुबईचे कस्टम अधिकारी त्यावरही टॅक्स बसवतील ' मी म्हणालो.

' इब्सेनप्रेमापायी तू स्मगलर व्हावेस असे मला वाटत नाही ' रॉन्दीबाई हसत हसत म्हणाल्या.

रॉन्दीबाईकडे अनेक पेशट्स येत. त्याना मी म्हणालो, ' तुमच्याकडे वयस्कर मडळी पेशट्स येत आहेत व उपचार चालू आहेत. त्यात तरुण मुली दिसत नाहीत ?'

त्यावर रॉन्दीबाई मजेत म्हणाल्या, ' आमच्याकडे माणसे ८० - ८०, ९० - ९० वर्षे जगतात त्यामुळे माझ्याकडे येणाऱ्या स्त्रिया तुला म्हाताऱ्या वाटल्या तरी तरुणच आहेत यू कॅन गो अहेड !'

असे हसते खेळते वातावरण आणि उस्लोसारखे नितान्त रमणीय आणि बकालतेचा स्पर्शही नसलेले टुमदार शहर. त्यामुळे आम्ही उस्लोतील प्रत्येक कार्यक्रम दुप्पटतिप्पट उत्साहाने पार पाडला उस्लोची हवाही बेर्गेनपेक्षा जास्त मोकळी व थड, जास्त हिमवृष्टीची. तेथील दिवस कसे गेले तेच समजले नाही.

ह्योग ह्याचे घर जवळजवळ तीन पिढ्याचे होते. तळमजल्यावर मध्यभागीच्या दरवाज्यातून गेल्यावर डाव्या हाताला स्वयपाकघर होते आणि मोठी डायनिग रूम होती उजव्या हाताला तळघरात जाण्याला जिना होता व ह्योग याची अभ्यासिका होती मध्यभागीच्या दरवाज्यातून पुढे गेल्यावर समोर आडवा आणि खूप मोठा दिवाणखाना होता दारातून आत जाताच डाव्या हाताला टॉयलेट होती वरच्या मजल्यावर डाव्या - उजव्या भागात तीन तीन खोल्या होत्या आणि त्याना जोडणारी एक खोली होती. खालील दरवाज्यातून आत जाताच उजव्या हाताला वर जाण्यासाठी जिना होता. आम्हाला वरच्या भागातील उजव्या हाताची मधली खोली देण्यात आली. वर डाव्या हाताला बाथ व टॉयलेट रूम होती. या घराचे तळघर प्रशस्त होते आणि त्यात अनेक वस्तू होत्या कपडे धुण्याचे यत्रही तळघरातच होते. स्टोअररूममध्ये म्हणून जाऊ शकेल असे सारे सामान तळघरात होते.

घराच्या पुढच्या आवारात फारशी बाग नव्हती उरलेल्या तीनही बाजूना बाग व हिरवळ होती आणि हा परिसर मोठा होता घरात शिरताना उजव्या भागातील आवारात सफरचदाची बाग होती तर डाव्या बाजूला कोपऱ्यात गॅरेज व मागे मोठी हिरवळ होती. अर्थात हिमाच्छादित. घराच्या पुढच्या व मागच्या प्रवेशद्वारापाशी बदिस्त छोटी पोर्च होती हेनिंग किंवा वीगाड याच्या घरापेक्षा हे घर आकारमानाने मोठे होते पण त्याहीपेक्षा नॉर्वेजियन घराची पारपरिक पठडी स्पष्ट करणारे होते. नूरा जे घर सोडून जाते ते ' घर ' या प्रकारचे होते असा निष्कर्ष मी काहींशी चर्चा करून काढला हेनिग हेन्रिकसनचे घर अलीकडील आहे आणि त्याची रचना मला जास्त सुटसुटीत व नेटकी वाटली पण ह्योग ह्याचे घर मी जास्त तपशीलवार अभ्यासले कारण ते इब्सेनकाळाच्या लगोलगच होते मोठमोठाली घरे काटेकोर विभक्त कुटुबपद्धतीमुळे रिकामी रिकामी राहात. तो प्रकार येथेही अनुभवास आला ह्योग ह्याच्यासमोर त्याच्यासारखेच घर होते आणि त्यात एकच वृद्ध माणूस राहात होता.

नॉर्डिक घर म्हटले की काही वस्तू, गोष्टी दिसणारच त्या ह्योग याच्या घरात दिसल्या. शेकोटीची जागा नवीन सेंट्रल हीटिंगची व्यवस्था सर्वत्र रूढ असली तरी शेकोटीची जागा नॉर्वेजियन मडळी ठेवतातच. त्याचे रूपही कलात्मक असते क्लोकरूम म्हणजे वरकोट व रेनकोट, छत्र्या ठेवण्याची जागा प्रत्येक घरात पियानो हा असतोच. बरेच ठिकाणी तो वापरला जातही नाही. ह्योग याच्याकडेही पियानो होता. गेल्या तीन पिढ्यांना त्याने आनंद दिला आहे हे दिसत होते. ह्योग याच्या घरात पुस्तकाची कपाटेही होतीच. आणि पुस्तकाचा साठा खूप मोठा. ही पुस्तके पिढ्यान् पिढ्या जतन केलेली असतात. त्याचप्रमाणे स्कीईंगचे सामान. हे लाब लाब, पायात अडकावयाचे लाकडी

पट्टे आणि हातातल्या भाल्यासारख्या काठ्या ह्योग यानी गॅरेजमध्ये न ठेवता तळघरात ठेवलेल्या होत्या जवळजवळ एक भित या स्कीइंगच्या सामनाने व्यापलेली होती. टबबाथसाठी टब हाही होता अतिथड हवामानाने अग धरणे, मान अवटळणे असे प्रकार वारंवार होतात. त्यासाठी गरम पाण्याचा टबबाथ ही नॉर्डिक मडळींची गरज आहे घरात टागलेली जहाजाची चित्रे व डोंगराची चित्रे येथेही दिसली

विशेष म्हणजे या घरात मला आयकॉन्स दिसले. आयकॉन्स म्हणजे ख्रिस्ताचे किंवा अन्य ख्रिस्ती संताचे तसवीरवजा टाक हे जाड काचाचे वा लाकडाचे असतात आणि आपल्याकडल्या फोटोफ्रेम्स एवढे मोठे असतात. अशाप्रकाराचे टाक रशियात किंवा ग्रीसमध्ये असतात आणि ते ऑर्थोडॉक्स चर्चशी सबंधित आहेत पण ह्योग हे कुटुब प्रॉटेस्टंट असूनही त्याच्याकडे आयकॉन्स होते हे विशेष वाटले या आयकॉन्सपाशी मेणबत्त्या लावतात पण फुले वगैरे वाहून पूजा करीत नाहीत, की त्याना देव्हाऱ्यात ठेवीत नाहीत ह्योग पतिपत्नींनी आयकॉन्स भितीला टागले होते एक जिन्यात होता आणि दुसरा वरच्या मजल्यावर मधल्या खोलीत होता

□

## नॉर्वेची राजधानी उस्लो (Oslo) ३०.

उस्लो ही नॉर्वेची राजधानी आहे. एक आतरराष्ट्रीय नगरी आहे. पण राजधानी, मेट्रोपॉलिटन सिटी म्हटल्यावर आपल्या डोळयासमोर जे वातावरण उभे राहते त्याचा मागमूसही येथे नाही टुमदारपणा, मोकळे वातावरण, उच्च बिल्डिंग्जचा अभाव, भरपूर झाडे, बागा, हिरवळी हे येथे जतन केले आहे पर्यावरणाविषयी अत्यत जागरूकता असल्याने रोम किंवा लडनमध्ये जो बकालीपणा व गर्दी आहे, ती येथे नाही. त्यामुळे आजही उस्लो सुदर व पहिल्या दर्जाचे शहर आहे. फक्त कामासाठी नाइलाज म्हणून जेथे जावे लागते असे नसून, राहण्याच्या लायकीचे शहर आहे उस्लोची लोकसख्या फक्त साडेचार लाख आहे

उस म्हणजे शेवट, लो हे नदीचे नाव आहे. लो नदीचा शेवट जेथे होतो ते उस्लो येथे लो नदी वस्तुत भूमिगत झाली आहे उस्लो दक्षिण नॉर्वेच्या पूर्व किनाऱ्यावर आहे ते मोठे बदरही आहे आणि तेथून बोटी स्वीडन, फिनलंड आणि जर्मनीकडे जा - ये करीत असतात एकोणिसाव्या शतकात, नॉर्वे पूर्ण स्वतत्र होण्याअगोदर बेर्गेन हे महत्त्वाचे केंद्र होते विसाव्या शतकात पूर्ण स्वातत्र्य मिळाल्यावर उस्लो राजधानी व

जास्त महत्त्वाचे केंद्र झाले आहे. पण बेर्गेन - उस्लो ही दोन मोठी शहरे रेल्वे, रस्ते व बोटींनी जोडलेली आहेत गमतीने असेही म्हणता येईल, की उस्लोतील अनेक विवाहित स्त्रियाची माहेरघरे बेर्गेनमध्ये असतात, तर बेर्गेनमधील अनेक विवाहित स्त्रियाची माहेरघरे उस्लोत असतात बेर्गेनमधील लोकाना असे वाटते की उस्लो व्यक्तिनिरपेक्ष आणि अस्ताव्यस्त होण्याच्या मार्गावर आहे मी त्याना म्हणालो, ' की तसे नाही. तुम्ही आमची मुबई, कलकत्ता शहरे पाहिली नाहीत ती पाहिलीत तर तुम्हाला धडकीच भरेल ही तथाकथित आतरराष्ट्रीय शहरे पृथ्वीतलावरचे जणू नरक झालेले आहेत जग कसे आहे आणि माणसे किती हलाखीच व किती घाणेरेड जीवन जगतात, याची तुम्हाला कल्पनाही नाही '

## औद्योगिक नगरी

उस्लोतही युरोपीय पद्धतीने कामकाज सकाळी आठ - साडेआठ वाजता सुरू होते. सकाळीच ब्रेकफास्ट करून बाहेर पडावे लागते त्या वेळी बाहेर अंधारच असतो कामाच्या ठिकाणी दुपारचा लच - ब्रेक होतो नंतर परत काम होते. तीन - साडेतीनलाच सस्था, कार्यालये बद होतात पाच - साडेपाचला अधार पडतो त्या सुमारास डिनर होते. उस्लोत लोकल ट्रेन्स आहेत, पण त्याचे स्वरूप फार छोटेखानी आहे पॅरिसची मेट्रो किंवा लडनची ट्यूब रेल्वे प्रचड यंत्रणा आहेत तसा प्रकार येथे नाही. याचे कारण उस्लोची भरमसाट वाढ झालेली नाही उस्लोपासून चाळीस किलोमीटरवर ट्रामेन नावाचे स्वतत्र शहर वसविण्यात आले आहे त्याचे स्वरूप औद्योगिक नगरी असे आहे, पण तेथेही बकाली, झोपडपट्ट्या, साडपाणी, उघडी गटारे इत्यादी प्रकार आढळत नाहीत. उस्लो हे या शहराचे मूळ नाव अठराव्या व एकोणिसाव्या शतकात हे शहर क्रिस्तिआनिया म्हणून ओळखले जाई. १९०५ मध्ये नॉर्वे पूर्ण स्वतत्र झाल्यावर पुनश्च उस्लो हे नाव वापरण्यात येऊ लागले आहे.

विमानतळ, पार्लमेंट हाऊस, राष्ट्रीय थिएटर, ग्रथालय, राजवाडा, विद्यापीठ इत्यादी कोठल्याही राजधानीत आढळणाऱ्या सर्व सस्था येथे नव्या - जुन्या स्वरूपात आहेत, पण कोठेही त्याचे स्वरूप अगडबब आणि अस्ताव्यस्त नसल्याने सारे काही आनदाने पाहता येते रस्तेही भव्य, नेटके व सुस्थितीत आहेत. सर्वावर ' नॉर्डिक ' वस्तुविद्येची आणि सस्कृतीची छाप आहे या साऱ्याचा आपल्या मनावर ठसा उमटतो. इतका, की लडनमध्ये परतलो तर आपण खिन्न होतो आणि बकाल शहरात येऊन पडल्याची भावना पुसू म्हणताही पुसता येत नाही. अर्थात उस्लोतही निर्वासित व स्थलातरित आहेत. त्यात चार हजार व्हिएतनामींचा समावेश आहे. या निर्वासितामुळे उस्लोचे मूळचे ' नॉर्विजियन शहर ' हे स्वरूप जराही बिघडलेले नाही

बेर्गेनप्रमाणे उस्लोभोवती कशा प्रकारची शेती आहे हा प्रश्न मी विचारला त्याची समाधानकारक उत्तरे मिळाली नाहीत शहर व भोवतालचा परिसर हिमाच्छादित असल्याने मला नक्की कळेना. नॉर्वेत शेती करणे फार कठीण आहे. त्यामुळे शेतकऱ्याची सख्या हवी तेवढी नाही. तरुण मुले शेती करण्याऐवजी अन्य व्यवसायाकडे वळतात. परिणामी धान्य, भाज्या आवक करण्याची वेळ येते, अशी उत्तरे मिळाली तर काहींनी उस्लोच्या आसपास स्तवागर, त्र्योनह्येम आणि यारेन इतकी चागली शेती होऊ शकते, असे सागितले. नॉर्वेच्या एकूण लोकसख्येच्या फक्त सहा टक्के लोक शेतीत गुतलेले आहेत व शेती कौटुबिक पद्धतीने होते दुर्दैवाने एकही शेत मला पाहायला मिळाले नाही. बेर्गेनपेक्षा शेतीच्या दृष्टीने उस्लो भाग बरा आहे. ही माहिती मला पडताळून पाहता आली नाही बेर्गेनभोवती धूसर का होईना, काही शेते दिसली. उलट येथे सारा परिसर शुभ्र हिमाखाली पार गाडला गेला होता.

उस्लोत उच - सखल टेकड्या आहेत, त्याची मौज आहे. घराभोवती विस्तृत बागा आहेत. त्यात चेरी, पोम, सफरचंदे याची निष्पर्ण झाडे दिसत, त्यावरून उन्हाळ्यात उस्लो हिरवेगार दिसत असणार असा कयास बाधला विशेष गोष्ट ही दिसली की, सफरचदाच्या झाडाखाली फळाचे सडे पडलेले होते आणि ही फळे हिमात अडकली होती, ती कुजत होती. पण तपमान उणे अशाखाली असल्याने कुजण्याची प्रक्रिया अतिशय मद होती फुलझाडे खूप मोठ्या प्रमाणावर लावली जातात, पण फुलाचे ताटवे क्वचित दिसले. हिवाळा असूनही उत्कृष्ट हिरवळ आणि काही फुलांचे ताटवे राजवाड्याच्या प्रागणात आढळले

उस्लोतून हिंडताना आम्हाला केव्हाही गर्दी दिसली नाही. अगदी स्टेशन भागातही नाही. सर्व कामे सुरळीत चालू होती. पण सर्वत्र शुकशुकाट व विलक्षण शातता होती शातता स्वच्छता आणि सर्व प्रकारचे सौंदर्य याचा आदर्श म्हणजे उस्लो नगरी

□

## चुकीच्या आदर्शांपासून दूर ३१.

रोममध्ये टोलेजग चर्चेस दृष्टीस पडतात न्यूयॉर्क, टोकियो, लडनमध्ये उचच उच इमारतींची जगले दृष्टीस पडतात ह्या गोष्टी आदर्श आहेत असे मला वाटत नाही. या गोष्टी disproporationately प्रचड आहेत. तेथे आपण हरवून जात आहोत अशी भावना येते. अनेक कृत्रिम गोष्टींना त्या जन्म देतात

नॉर्वेतील अनेक बाधकामे किंवा लाकडी घरे आम्हाला आवडली याचे कारण त्याची भव्यता टोलेजग स्वरूपाची नाही. अगडबंब नाही. बाधकामे आणि सभोवतालचा निसर्ग याचे सबध शाबूत आहेत आणि या सबधाचे सौंदर्य टिकून आहे

हिटलर, स्तालिन, खोमेनी, इदे अमीन, असे आदर्श स्वीकारणे जसे चूक आहे तसेच अन्य क्षेत्रातही चुकीचे आदर्श स्वीकारले जाऊ नयेत.

खूप लोकसख्या असणारी समाजवादी राष्ट्रे गाळात रुतल्याचे चित्र आज आहे. उलट कमी लोकसख्या असणारी व कल्याणकारी प्रणाली असणारी नॉर्वे, स्वीडन सारखी राष्ट्रे सुखात व प्रगत आहेत. शनिवार - रविवारची सुटी सर्जनशील तऱ्हेने उपभोगत आहेत असे चित्र आहे. याचे कारण चुकीच्या आदर्शांपासून ही माणसे दूर राहिली आहेत हे आहे

त्याना लहान म्हणून सबोधणे हिणविणे ही घोडचूक आहे

□

## ३२. इब्सेनचा दिवाणखाना

उस्लोत सिटी म्युझियम आणि उस्लो फोक म्युझियम अशी दोन म्युझियम्स आहेत. ही दोन्ही इब्सेन अभ्यासाच्या दृष्टीने महत्त्वाची आहेत. फोक म्युझियममध्ये इब्सेन - रूम आहे तर सिटी म्युझियममध्ये १९ व्या शतकातील नॉर्वेतील घरे, राहणी याचे दर्शन घडते.

फोक म्युझियम हिवाळ्यामुळे बद होते हे गावाबाहेर आहे पण आमची ‘ स्पेशल केस ’ म्हणून आणि रोटरीतील बॉटनीचे प्रो. डॅनिएल्झअ यानी मनावर घेतले म्हणून हे पाहता आले. या म्युझियममध्ये पूर्वी १३ - आर्बिन्स गाटअ ( रस्ता ) मध्ये असलेला इब्सेनचा दिवाणखाना ततोतत आकारमानासहित व वस्तूसहित जतन करण्यात आला आहे. हा दिवाणखाना फोक म्युझियममधून काढून पुन्हा मूळ जागी म्हणजे १३ - आर्बिन्स रोडवर आणण्याची खटपट चालू आहे कारण आर्बिन्स गाटअवरील इमारतीच्या मालकाच्या वारसानी ही जागा म्युझियमसाठी देण्याचे मान्य केले आहे.

इब्सेनचा दिवाणखाना साधारण एल आकाराचा आहे आणि याच दिवाणखान्याच्या छायाचित्राची रगीत पोस्टकार्डे किंवा पुनर्मुद्रणे आपण पाहत असतो. इब्सेनचे बालपण एका शात नगरीच्या बाजूच्या ऐसपैस निसर्गरम्य घरात गेले. त्याच इब्सेनचे अखेरचे

दिवस उस्लोतील अत्यत महत्त्वाच्या आलिशान वस्तीत गेले. तेथील हा दिवाणखाना आहे

दिवाणखान्यात उंची गालिचे, निसर्गदृश्ये रगविलेली चित्रे, पियानो, शेकोटी, उत्कृष्ट पडदे, लिहिण्याची टेबले या नॉर्वेजियन घरात आढळणाऱ्या साऱ्या वस्तू आहेत. इब्सेनला भेट म्हणून आलेली अनेक पुस्तकेही येथे आहेत पण विशेष वेगळ्या वाटतात त्या दोन गोष्टी एक पृथ्वीचे मोठे गोलाकार मॉडेल आणि दुसरी म्हणजे सोफासेटनजीकच्या टेबलावर ठेवलेले दांडगे सचित्र बायबल आणि या दोन्ही गोष्टी सूचक आहेत. इब्सेनला ग्लोबल कॉन्शसनेस होता आणि बायबलविषयी आस्था होती, या गोष्टी कळतात. हे नॉर्वेजियन बायबल इब्सेनपेक्षा त्याची बायको सुझाना हिच्या वाचनातले असावे असे वाटते

येथे एकदर सतरा चित्रे आहेत कोंबड्याची झुज, अनामिक व्यक्तीचे चित्र, दोन मध्यम आकाराची निसर्गचित्रे, स्वीडिश नाटककार स्ट्रिण्डबर्गचे मोठे व्यक्तिचित्र, पाथरवट दगडाचे ब्लॉक्स तयार करतो आहे, एका शहरातील अरुद गल्ली, झरा व तुटलेली झाडे, छोटी मुले, गल्ली, बायको व मुलगा असणारी तीन कुटुबचित्रे, एका चित्रकाराचे सेल्फ पोर्ट्रेट, ' घोस्टस ' नाटकातील छायाचित्रे, हमाल गाडी ओढताहेत, हिरवळीवर पाढरा झगा घातलेली एक स्त्री अशी ही तैलचित्रे आहेत प्रत्येक चित्राचा अन्वय इब्सेनच्या नाट्यसृष्टीशी व त्याच्या जीवनाशी लावणे शक्य आहे. आमच्याबरोबर ज्या गाईडबाई होत्या त्या माझ्याकडून अशी अपेक्षा करीत होत्या

हा दिवाणखाना काचात बदिस्त केला आहे पण मी इब्सेनचा अभ्यासक आहे म्हणून काचा दूर सारून मला ( आणि आम्हाला ) आत नेण्यात आले विशेषत प्रत्येक वस्तू व चित्र गाईडबाई नीट सागत होत्या चित्राविषयी मी म्हणालो,

' इब्सेनसारखी व्यक्ती जेव्हा चित्रे ठेवते तेव्हा त्याला विशेष अर्थ प्राप्त होतो. उदाहरणार्थ कोंबड्याची झुज हे नाटकातील सघर्षाची जाण व्यक्त करते होकॉन आणि स्कूल्ये किंवा स्टोकमान आणि त्याचा मेयर भाऊ निसर्गचित्रे इब्सेनची निसर्गाची आवड दर्शवितात विशेषत झरा आणि तोडलेली झाडे यातील तफावत नाट्यपूर्ण आहे दगड आणि पाथरवट इब्सेनची कलेमागे किती कष्ट घ्यावे लागतात याची जाणीव व्यक्त करतात इ इत्यादी पण आपण हे लक्षात घेतले पाहिजे की, या चित्राच्या निवडीमागे ' अबोध जाणिवा ' देखील कार्यरत असतात.'

त्यावर गाईडबाई म्हणाल्या, ' अबोध जाणिवा व्यक्त करणारे चित्र कोणते वाटते ? '

मी उत्तरलो, ' अरुद गल्ल्या रगविणारी चित्रे, '

' ते कसे ? ' गाईडबाई

मी म्हणालो, ' अरुद गल्ल्या त्याच्या बालपणीच्या किंवा इटलीतील अनुभवाशी निगडीत असतील जे अनुभव पूर्ण दडपले गेले असतील कदाचित ही चित्रे त्याच्यावर फ्योर्दचे जे सस्कार झाले असतील, त्याच्याशीही संबंधित असतील फ्योर्द आणि समुद्र याचे नाते अरुद गल्ली व पलीकडील मोकळा भाग याच्यासारखे नाही काय ? '

गाईडबाई काहीशा चकित झालेल्या वाटल्या. पण त्याना तितकाच आनंदही झाला दिवाणखान्यावर मी भरपूर वेळ खर्च केला व अनेक गोष्टींचीही नोंद करून घेतली हे त्याना आवडले.

स्ट्रिण्डबर्गचे एवढे मोठे चित्र इब्सेनच्या दिवाणखान्यात असावे ही गोष्ट मला बुचकळ्यात टाकणारी होती. स्ट्रिण्डबर्गचे चित्र इब्सेनच्या दिवाणखान्यात आहे हे मी वाचले होते पण ते एवढे मोठे असेल, अशी अपेक्षा नव्हती. इब्सेनचे जे एक चित्र येथे आहे, त्यापेक्षा मोठे चित्र हे आहे इब्सेन - स्ट्रिण्डबर्ग याची तुलना काही समीक्षक टॉल्स्टॉय - दस्तयेवस्की याच्याशी करतात, त्याचा एक आधार मला वाटते हे चित्र असावे. अर्थात ही तुलना योग्य नाही

गाईडबाईनी आणखी एक प्रश्न उपस्थित केला.

' हा दिवाणखाना इब्सेनच्या निवासस्थानी १३ आर्बिन्स गाटअला नेण्याची मोहीम तरुण साहित्यिक - कलावतानी उघडली आहे तुमचे मत काय आहे ? '

मी म्हणालो, ' यावर दोन विचार मला सामोरे येतात. एक - उस्लोत एकच इब्सेन सेंटर असेल व तेथे सर्व गोष्टी एकत्रित दिसतील, अशी माझी कल्पना होती प्रवाशाच्या दृष्टीने अर्थातच हे सोईचे ठरते पण हे तर नाही. दुसरा विचार हा की, जर एवीतेवी इब्सेन म्युझियम्स सर्वत्र विखुरलेली राहणार असतील तर हा दिवाणखाना मूळ जागी, आर्बिन्स गाटअला जाणे जास्त उचित. '

' त्याचे कारण ? ' गाईडबाई.

' आर्बिन्स गाटअ भरवस्तीत आहे तेथे इब्सेन राहिला तो सदर्भ जिवत आहे. म्युझियम अशा तऱ्हेने जिवत नसतात. हाच दिवाणखाना १३ आर्बिन्स गाटअमध्ये पाहताना इब्सेनप्रेमी जास्त स्वाभाविक विचार करतील व त्याचा अनुभव जास्त स्वाभाविक राहील. '

' तुम्हाला असे वाटते ? '

' होय येथील कित्येक वस्तूवर, बाबींवर ती जागा जास्त प्रकाश टाकू शकेल. '

'उदाहरणार्थ ?'

'उदाहरणार्थ येथील फर्निचरची रचना खिडक्यातून येणाऱ्या प्रकाशावर वस्तूची रचना अवलबून असते पडद्याची जाडी अवलबून असते.' मी

( हे उत्तर देताना आणि हा दिवाणखाना पाहताना मला मराठी नाटककार देवल याच्या हरिपूर या गावातील छोट्याशा घराची आठवण होत होती. )

'याचा अर्थ हा दिवाणखाना १३ आर्बिन्स गाटअला जावा हे तुमचे मत आहे'

'हे माझे मत आहे, पण तुमच्या येथील परिस्थिती व बारकावे याची कल्पना तुम्हा मडळींना जास्त आहे, तेव्हा माझे मत चुकीचे असू शकते.' मी सोडवणूक करून घेतली.

१८९५ ते१९०६ या काळात इब्सेन १३ आर्बिन्स गाटअच्या कोपऱ्यावरील इमारतीत दुसऱ्या मजल्यावर राहत होता तेथील दिवाणखाना फोक म्युझियममध्ये का आणला गेला? अशा शहराबाहेरच्या म्युझियममध्ये तो आणण्यात काय औचित्य होते ? इब्सेनच्या वारसाची भूमिका याबाबतीत काय होती ? नुसत्या मोठ्या नव्हे तर जागतिक कीर्तीच्या साहित्यिक - कलावताची म्युझियम्स त्याच्या निवासस्थानीच मर्यादित जागेत जतन करणे कितपत इष्ट आहे ? जेव्हा साहित्यिक ४ - ६ स्थळी किंवा ४ - ६ देशात टप्प्याटप्प्याने राहिला असेल तेव्हा कुठले ठिकाण वा देश म्युझियमच्या दृष्टीने प्रमुख मानायचा ? उस्लो राजधानी आहे, तेथे इतर ऐतिहासिक गोष्टी अनेक आहेत मग शिएन येथेच इब्सेनचे केंद्रवर्ती म्युझियम उभारणे उचित नाही का ? त्या त्या नगरांची अस्मिता व महत्त्व ओळखून इब्सेनची अनेक म्युझियम्स विखुरलेली ठेवणेच जास्त योग्य आहे का ? असे अनेक उलटसुलट प्रश्न माझ्या मनात गर्दी करीत होते.

प्रत्यक्षात १३ आर्बिन्स गाटअ ही इमारत आम्ही पाहिली या इमारतीत इब्सेन एका अपार्टमेंटमध्ये राहत होता ही वस्तुस्थिती असली तरी ही इमारत म्युझियम म्हणून रूबाबदार ठरणार नाही. फोर्टमधील ( मुबई ) इमारती आहेत तशी ही इमारत आहे इब्सेनचा मूळ फ्लॅट आणि त्याच मजल्यावर बरीच जागा मिळाली तर हे म्युझियम होऊ शकेल स्टॉकहोममध्ये स्ट्रिण्डबर्गचे म्युझियम 'ब्लू टॉवर' नावाचे आहे, ते अशा प्रकारचे आहे अशा म्युझियमची छाप फार पडत नाही. रवींद्र बारी किंवा आगाखान पॅलेसमधील कस्तुरबा म्युझियम मनावर छाप पाडतात कारण या वास्तू भव्य आहेत आणि भोवती भरपूर मोकळी जागा आहे म्युझियम असे असले पाहिजे की, त्या विषयात लहान मुले, तरुणाना रस निर्माण होईल. विषयात रस असल्यामुळे म्युझियम पाहायला येणारी माणसे असतात, पण ती सख्येने मर्यादित असतात.

आपल्याकडे वस्तू जतन करणे, म्युझियम निर्माण करणे आणि साभाळणे हा प्रकार कमीच. आपला सास्कृतिक दृष्टिकोण याला कारणीभूत आहे, त्यामुळे आपल्या माणसाना असे वाटेल की, इब्सेनचा दिवाणखाना तो काय आणि त्याचा प्रश्न तो काय ? पण इब्सेनचा दिवाणखाना पाहून मला आनद वाटला मी ज्या खोलीत व ज्या जाजमावर वावरतो आहे त्यावर इब्सेनसारखा महान नाटककार वावरत होता ही कल्पना मला हृद्य वाटत होती त्या दिवाणखान्यातील वस्तू माझ्याशी बोलत होत्या इब्सेनची बरीच नाटके ' स्थळ दिवाणखाना ' सदरातील आहेत, हे मला माहीत होते, त्याचाही हा परिणाम असावा.

□

## ३३. चर्चमधील दोन रविवार - सकाळी

बेर्गेनला असताना उसच्या चर्चमध्ये आणि उस्लोला असताना होल्मनकोलनच्या टेकडीवरील चर्चमध्ये आम्ही ' मास ' ला गेलो. चर्चच्या या प्रार्थना प्रवचनाला जाण्याचे माझ्या मनात नव्हते. किंबहुना हा मुद्दा माझ्या मनात आला नव्हता चर्चच्या मासच्या वेळेलाच एक बारसे होते हे रेखाला ओदबाईंकडून कळले आणि ती म्हणाली, ' आपण बघू यात तर खरे कसे असते याचे बारसे. '

दोन्ही ठिकाणी रविवारी सकाळीच मास होते ९॥ - १० ची वेळ होती. चर्चेस आतून साधी होती स्वच्छता व नीटनीटकेपणा कमालीचा होता. ऑर्गन सगीत आणि गाण्यावर भर होता कोणकोणती सामगीते म्हणायची याचे आकडे डाव्या बाजूला लावलेले होते. काय चालले आहे हे समजावे म्हणून मला इग्लिश बायबल देत. वेदीवर जो कार्यक्रम चाले त्यात स्त्री - पुरोहित सहभागी होत होत्या.

दोन्ही ठिकाणी प्रवचने झाली. होल्मनकोलन चर्चचा पुरोहित रोटरी क्लबचा उपाध्यक्ष होता व व्यासगी होता कार्यक्रम सपताना जो पाव व वाईन प्रसाद म्हणून देतात त्याला आम्हाला नेण्यात आले नाही. प्रवचन आणि सामगीताच्या मध्येच दोन्ही ठिकाणी बारशी उरकण्यात आली मुलाच्या अगावर पाणी शिपडून पुरोहित नाव उद्घोषित करतो की झाले बारसे बारशासाठी मुलाचे पालक व मुलाचे गॉड - पेरेंट्स उपस्थित असतात. होल्मनकोलनच्या प्रीस्टने नाव उद्घोषित करताना कार्तेरिनाच्या ऐवजी निकोलिना म्हटले नतर चूक दुरुस्त केली परिणामी त्या मुलीला दोन नावे मिळाली. बारशाच्या वेळी केक वगैरे वाटले जात नाहीत.

चर्चमध्ये प्रॉटेस्टट परपरा जतन केल्या जातात ऑर्गनवरील सगीत, सामगीताचे समूह गायन आणि केवळ दहा - बारा मिनिटे चालणारे पुरोहिताचे बायबलमधील उताऱ्याचे वाचन व प्रवचन असा कार्यक्रम असतो. यात सुमारे दोन तास जातात बायबल आणि सामगीताची पुस्तके प्रत्येक जोडप्यास दिली जातात जाताना ती परत करावी लागतात प्रवचनासाठी प्रीस्ट्स बऱ्याच वेळा कालोचित विषय किंवा घटना निवडतात आणि प्रॉटेस्टट दृष्टिकोणातून त्याच्यावर भाष्य करायचा प्रयत्न करतात सुमारे ८० - ८५ माणसे उपस्थित असावीत उसला एवढी गर्दी होती. होल्मनकोलनलाही याच्या आसपासच मडळी असावीत.

ख्रिश्चन धर्माची मला भरपूर माहिती असल्याने व रेखानेही पूर्वी असे कार्यक्रम पाहिले असल्याने सर्वतोपरी नवीन काही नव्हते. नवीन होती ती येथील चर्चेस *स्टाव* - प्रभाव जतन करणारी ही छोटेखानी लाकडी चर्चेस आम्हाला आवडली. Small is beautiful या वचनाचा प्रत्यय तेथे येत होता. इब्सेनच्या *ब्रान्द* या नाटकात ब्रान्द हा प्रमुख नायक प्रीस्ट आहे या दृष्टीने मी हे दोन मास ऐकले - पाहिले हे उचित झाले. एक मास सुरू होण्याआधी माझी तेथील माणसाशी ओळख करून देण्यात आली. एका बाईचे नाव आग्निस असे होते. त्याच्याकडे पाहून रॉन्दीने मला आग्निस कोण म्हणून विचारले मी म्हणालो आग्निस मला भेटली आणि हसत हसत मी प्रीस्टकडे पाहून हस्तांदोलन करताना म्हणालो, ' आपण ब्रान्द तर नाहीना ?' हास्याचा मोठा कल्लोळ झाला नाटकात आग्निस ही दुसऱ्याची वाग्दत्त वधू असते आणि ती ब्रान्दवर खूष होऊन त्याच्याशी लग्न करते असा प्रसग आहे. हो ! प्रॉटेस्टट प्रीस्ट लग्न करू शकतो, कॅथलिक नाही.

आम्ही ज्या कुटुबातून उतरलो होतो त्यापैकी हेन्रिकसन आणि ह्योग पतिपत्नी ख्रिश्चन होते, म्हणजे आचरणानेही ख्रिश्चन होते. वीगाड पतिपत्नी जन्माने ख्रिश्चन होते पण आचरणाने नव्हते ऑसेथ हे निधर्मी होते तर त्याची पत्नी इगेर ही धार्मिक होती

आम्ही उस्लोहून जाण्याच्या आदल्या रात्री आम्हाला ह्योग मडळींनी जी पार्टी दिली तीत जी मडळी आली होती ती ख्रिश्चन होती त्यानी अनेक ख्रिश्चन गीते म्हटली No No, No, I will forget him not anymore !' हे गीत फारच सुदर होते.

नॉर्वेतील चर्च हे स्टेट - चर्च आहे आणि त्याचा आर्थिक भार सरकार पेलते अर्थात देणग्या येतात चर्चचा पुरोहित वर्ग पगारी असतो व हा पगार सरकारमार्फत दिला जातो पण याचा अर्थ नॉर्वेजियन सरकार धार्मिक सरकार आहे असा नाही राज्य Welfare State असल्याने हा खर्च सरकार करते एवढेच. नॉर्वेत सर्वात केंद्रीय महत्त्वाचे

चर्च ' त्र्योनह्येम ' या शहरी आहे. या चर्चच्या ऐतिहासिक पार्श्वभूमीवर इब्सेनने एक नाटक *' कोंग्जएम्नेर्ने '* हे लिहिले आहे.

नॉर्वेतील ख्रिश्चॅनिटीविषयी मला विचारण्यात येई तेव्हा मी म्हणे - ' तुमचा देश, येथील निसर्ग अतिशय वेगळे आहेत का कोण जाणे पण ख्रिश्चॅनिटी येथील वातावरणात मला परकी वाटते. ती येथील वातावरणाशी मॅच होत नाही '

माझ्या निरीक्षणावर मी विचार केला आहे. स्कॅण्डिनेव्हियातील नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क हे प्रमुख देश मुख्य युरोप खडापासून समुद्रामुळे व पर्वतामुळे बाजूला पडलेले आहेत येथे ख्रिश्चॅनिटी आली ती उशिरा आणि तिचा प्रभाव जोरदार नाही. येथील लोकाना त्याची ख्रिश्चॅनिटी ' प्रॉटेस्टट ' म्हणून वेगळी करावी लागली यातच सारे आले ख्रिश्चॅनिटीचे खूप जोरदार दर्शन घडते ते इटलीत नॉर्वेत जोरदार व प्रभावी दर्शन घडते ते निसर्गशक्तीचे ख्रिश्चन म्हणून जगण्यापेक्षा निसर्गाचे अपत्य म्हणून जगणे नोर्स्क मडळींना साधले आहे. आणि आम्हा दोघाना नॉर्वे आवडले ते त्याच्या या वैशिष्ट्यामुळे

दोन मास आम्ही ऐकले, पाहिले. या दोन्ही रविवारच्या कार्यक्रमात तरुण - तरुणींची म्हणावी अशी उपस्थिती आम्हाला जाणवली नाही. जास्त करून विवाहित व वयस्क माणसे आढळली याविषयी विचारता असे दिसले की तरुणामध्ये ख्रिश्चॅनिटी विशेष प्रिय नाही

नॉर्वेतील वास्तव्यात एक गोष्ट लक्षात आली ती ही की ' इंडिया ' कडे हिंदूचा देश म्हणूनच पाहिले जाते इथली माणसे मुस्लिम धर्माची जागा मध्यपूर्वेतील देश मानतात. आपल्याकडे बौद्ध व ख्रिश्चन धर्म आहेत हेही त्याना माहीत आहे पण सारे प्रश्न येतात ते हिंदुत्वाच्या रोखाने आणि सारी माहिती विचारली जाते ती हिंदुत्वाच्या रोखाने इडियामध्ये प्रमुख मान व स्थान आहे ते हिंदुधर्माला असेच येथील लोक मानतात. इडियातील गुण - दोषाचा अन्वय ही मडळी हिंदुधर्माशी लावण्याचा प्रयत्न करतात

अनुभवास असे आले की आम्ही हिंदू आहोत ही आमची जमेची बाजू मानली जात होती. हिंदुधर्मातील कास्टवर आणि सतती नियमनाच्या अभावावर प्रश्न विचारले जात. अस्पृश्यता, सती याच्याविषयीही प्रश्न येत इडिया प्रामुख्याने हिंदू आहे, भारत सरकार सेक्युलर आहे तर सलमान रश्दींच्या पुस्तकाला भारतात बदी कशी हा प्रश्न मला विचारीत. त्याचा रोख असा असे की तुम्ही या प्रश्नावर धर्मांध मुसलमानाच्या बाजूने कसे ? यावर हिंदु - मुस्लिम दगलींची आजही कशी भीती वाटत असते हे मला समजावून सागावे लागे.

# एन आर को



नोर्स्क रेडिओ कॉर्पोरेशन (NRK) आणि 'टेलिव्हिजन सेंटर' (फेर्नसिन्सतेआत्रेत) या दोन यत्रणा आहेत. या दोन ठिकाणी जाऊन आम्ही इब्सेनची व्हिडिओ फिल्म केलेली नाटके बघितली. काही चक्क फिल्म्स होत्या ब्रिचमान आणि पेअर ब्योंकेन हे नॉर्वेचे मातबर दिग्दर्शक आहेत. इब्सेनची झाडून सर्व नाटके टी व्ही. वर अत्यत समर्थपणे आणण्याची कामगिरी त्याच्यावर सोपविली आहे.

आम्हाला दोन्ही केंद्रावर स्वतत्र खोली दिली होती फिल्म्स लावल्या जात आणि त्या पाहून मी नोट्स घेई. *सामफुण्डेटस् स्ट्योटर आणि विल्डान्डेन* सोडल्यास सर्व फिल्म्स रगीत होत्या. नटमडळी, आणि अभिनय याचा दर्जा कमालीचा वरचा होता सोळा कॅसेट्स आम्हाला उपलब्ध करून देण्यात आल्या पण दुर्दैव म्हणजे *ब्रान्दची* कॅसेट अजूनही उपलब्ध झाली नाही. शीर्षके व सवाद अक्षररूपाने पडद्यावर उमटत असत शिवाय आम्ही हातात इंग्लिश नाटक ठेवलेले असे त्यामुळे सगती लागणे व अर्थ उलगडणे शक्य होत असे.

एकदा मौज झाली बाहेर पडताना आमची लिफ्ट तळघरातील मजल्यावर गेली आम्ही बाहेर पडलो आणि हिंडू लागलो, पण सर्वत्र खोल्या व कॉरिडॉर्स अनोळखी माणूसही कोणी नाही चक्रव्यूहात अडकावे आणि बाहेर निघता येऊ नये अशी स्थिती होती सारे दरवाजे एकसारखे! कोठून आलो आणि कोठे जात आहोत कळेना तेवढ्यात एक माणूस भेटला आणि त्याने आम्हाला लिफ्टपाशी नेऊन, पहिल्या मजल्यावर सोडले हा प्रसग (NRK) एन् आर के त घडला. टी व्ही सेंटरवर दुसरा घडला आम्ही कारमधून बाहेर पडलो. इमारतीचे सौंदर्य पाहात मी पावले टाकली आणि दाणकन् खाली पडलो अक्षरश लोटागण माझ्या डाव्या हाताच्या पज्याला खरचटले व खाद्याला मार बसला. अगावर जाडजूड कपडे असल्यानेच बचावलो पण खादा पुढे ४ - ५ दिवस दुखत होता

टी व्ही सेंटरवर जाणे फार आल्हाददायक होते शेतजमिनीतून मार्ग जात होता आणि एखाद्या रम्य खेड्यात आल्याची भावना होत होती आम्ही तेथे चालत जात असू व चालत परत येत असू

□

## ३५. नॅशनल थिएटर

उस्लोचे राष्ट्रीय रंगमंदिर - नॅशनल थिएटर पार्लमेंट रस्त्यावर उभे आहे. इमारत भव्य असून दगडी आहे आपल्याकडील बालगंधर्व रंगमंदिर आहे त्याच आकाराचे पण जास्त उंच अशी ही इमारत आहे आणि अठराव्या शतकातील निओ क्लासिकल शैलीत तिची बांधणी आहे. इमारतीभोवती कुंपण नाही दर्शनी भागाच्या पुढेच नाटककार इब्सेनचा भव्य पुतळा आहे.

दर्शनी भागातून आपण आत गेलो की दोन्ही बाजूला वर जाणारे वैभवशाली जिने आहेत आणि त्याच्यावर लालभडक गालिचे पसरले आहेत प्रेक्षागृहातही सर्वत्र लाल गालिचे पसरलेले असून अन्यत्रही जास्तीत जास्त लाल व सोनेरी रंगाचा वापर केला आहे खुर्च्या जरा दाटीवाटीच्या वाटल्या त्याच्यावरही लाल रंगाची कुशन्स आहेत प्रेक्षागृहातील सभोवतीची बाल्कनी दुमजली आहे आणि एकूण सोळाशे प्रेक्षक या ठिकाणी बसू शकतात. हे नाट्यगृह संगीताचा कॉन्सर्ट हॉल म्हणून देखील वापरता येते हे त्याची रचना पाहताच लक्षात येते

युरोपीय नाट्यकला व रंगमंदिरे प्राचीन ग्रीक नाट्यकला, परंपरा आणि पुतळे यांचे संस्कार वागवीत असे निदान १९ व्या शतकापर्यंत तरी हे होतेच या खुणा या रंगमंदिरातही दिसतात बाल्कनी व अन्य भाग सजविण्यासाठी ग्रीक धर्तीच्या लहान मोठ्या पुतळ्यांचा भरपूर वापर केला आहे रंगमंदिरात जी दालने आहेत तेथे नॉर्वेत होऊन गेलेल्या मोठ्या नट नट्यांची तैलचित्रे, पुतळेही आहेत त्यामुळे हे रंगमंदिर एक म्युझियमही बनले आहे

रंगभूमीच्या उजव्या हाताच्या बाल्कनीत एक खास विभाग बांधलेला आहे. राजकुटुंबातील व्यक्ती व त्यांच्यासमवेतचे परदेशी पाहुणे जेव्हा नाटक पाहण्यासाठी येतात तेव्हा त्यांना या ठिकाणी बसविण्यात येते एरवी कितीही गर्दी असली तरी या विभागात कोणीही बसत नाही. आपल्याकडे पुढील दोन रांगा आपण भारी तिकिटांसाठी किंवा सन्माननीय पाहुण्यांसाठी वापरत असतो. येथे असा प्रकार नाही तर अशा खास सीट्स थोडी मागे डाव्या - उजव्या हाताला सोडतात आम्ही अशाच भागात बसलो होतो असे आम्हाला सांगण्यात आले. अशा भागातून रंगमंच शेवटपर्यंत नीट दिसतो व नाटकाची दृश्ये नेमक्या अंतरावर दिसतात. नाटकाचा प्रयोग चालू असताना फोटोग्रफीस परवानगी नसते.

आपल्याकडे रंगमंदिराच्या बाहेरच्या दालनातून चहाकॉफी, बटाटेवडे, आईस्क्रीमचे स्टॉल्स असतात. अशा प्रकारचा स्टॉल येथे दुसऱ्या मजल्यावर आढळला. तेथे काळी कॉफी, आईस्क्रीम मिळत होते एवढेच नव्हे तर ३ % अल्कोहोल असणारी बीअर व वाईनदेखील मिळत होती

रंगमंदिराच्या बाजूच्या दालनात भव्य आरसे आणि झगमगती झुंबरे याची रेलचेल होती आरशामुळे जागा प्रत्यक्षात आहे त्यापेक्षा दुप्पट वाटत होती आणि माणसेही जास्त वाटत होती. अर्थात नाटकाची सर्व तिकिटे झाडून विकली गेली होती. येथे थंडी हा नाटकाचा सीझन समजला जातो. उलट उबदार हवेच्या दिवसात नाट्यगृहे बंद असतात. सात महिने जबरदस्त थंडीने घरात, ऑफिसात कोंडून पडलेले नॉर्वेजियन्स या दिवसात जास्तीत जास्त वेळ बाहेर घालवितात. समुद्रावर वारवार पर्यटनास जातात

येथील नाट्यगृहांची एक चागली पद्धत म्हणजे विद्यार्थ्यांसाठी खास प्रयोग केले जातात. या वेळी तिकिटाचे दर खूप कमी असतात. विद्यार्थ्यांना सहज परवडण्यासारखे असतात. विद्यार्थ्यांनी अभिजात नाटके पाहावीत, क्लासिकल संगीताच्या कॉन्सर्टस् ऐकाव्यात यासाठी ही सोय करण्यात आली आहे यामुळे विद्यार्थ्यांची अभिरुची उच्च दर्जाची राहण्यास मदत होते हीन अभिरुचीची व भुक्कड दर्जाची नाटके अर्थातच उस्लोच्या राष्ट्रीय नाट्यगृहात दाखविली जात नाहीत पण याच वेळी हेही लक्षात घेतले पाहिजे की नाटक म्हणून अपरिहार्य असणारा मोकळेपणा येथील मंडळींनी स्वीकारलेला आहे. आपल्याकडील कुटुंबवत्सल नाटकाच्या कल्पनाच्या कक्षात तो सामावणारा नाही.

नाट्यगृहातील प्रकाश योजना आणि ध्वनी नियंत्रण अतिशय समाधानकारक होते. अगदी अल्लाद आवाज व संभाषणही नीट ऐकू येत होती तर अगदी जोरदार संगीतही कर्कश वाटत नव्हते बाहेर जरी कडाक्याचा गारठा होता तरी संपूर्ण नाट्यगृहात सुखद उबदार वातावरण होते ते इतकेही उबदार नव्हते की अंगातील कोट कोढून ठेवावा असे वाटावे आपल्याकडे ट्यूब लाईट वापरतात तशा प्रकारचा प्रकाश येथे वापरत नाहीत. येथे सर्वत्र दिव्याचा प्रकाश ट्यूबलाईटचा प्रकाश फक्त टॉयलेट्समधून आणि सुपर मार्केटमध्ये असतो या नाट्यगृहातही दिव्याचा पिवळसर प्रकाशच होता

उस्लोच्या नाट्यमंदिराचे तळघर फारच मोठे आहे तेथे अनेक ऑफिसेस आहेत, बरीच कागदपत्रेही तेथे जतन केली आहेत. नाटक सुरू होण्यापूर्वीच हा सारा भाग आम्ही नीट हिंडून पाहिला. अद्ययावत प्रकारचे संगणक तेथे आढळले. या विभागाची कल्पना मला फार आवडली राष्ट्रीय थिएटरच्या बाबतीत अगदी ठळक असा दोष एकच

आढळला तो म्हणजे पार्किंगची व्यवस्था नसणे नाटक पाहायला येणाऱ्या प्रेक्षकाना स्वत.च्या मोटारगाड्या नाट्यगृहापासून बऱ्याच दूर अतरावर लावाव्या लागत होत्या. नाट्यगृहाभोवती मोठमोठे उत्कृष्ट वृक्ष आहेत पण म्हणावे असे उद्यान मात्र नाही.

☐

## ३६. फ्रूएन फ्रा हावअचा नाट्यप्रयोग

२४ जानेवारी ९० ला आम्ही सारेच जण सकाळपासून नकळत वाट पाहात होतो रात्री ७॥ वाजता उस्लोतील 'नॅशनल थिएटर' मध्ये आम्ही फ्रूएन फ्रा हाव्अ या नाटकाचा प्रयोग पाहणार होतो योगायोग असा की आयुष्यात मी इग्रजीतून इब्सेनेचे पहिले नाटक वाचले ते हेच होते आणि ते प्रत्यक्षात रगभूमीवर नॉर्वेत येऊन पाहण्याचा योग आला होता विशेष म्हणजे नाटकाचा प्रयोग झाल्यानतर नट व दिग्दर्शक मडळी माझ्याशी बोलणार होती चर्चा करणार होती रॉन्दीबाईंना या गोष्टीचे खूप अप्रूप वाटत होते अगदी सकाळपासून आम्ही व्यग्र होतो पण थकवा आलेला नव्हता

नॅशनल थिएटर दिवसा आम्ही लाबून - जवळून पाहिले होते पण जाताना 'आर्बिन्स गाटअ' - १३ म्हणजे इब्सेन अखेरच्या काळात जेथे राहात होता ती जागा पाहण्याचा मानस होता म्हणून जरा लवकर निघालो. पाऊस भुरभुर होता. प्रत्यक्षात आर्बिन्स गाटअला गेलो तेव्हा तेथील म्युझियम अजून सुरू झाले नसल्याचे कळले म्युझियम म्हणण्यापेक्षा नुसती जागा. फोक म्युझियममधील खोली व फर्निचर पुन्हा या मूळ जागेत आणावे अशी चळवळ काही इब्सेन - प्रेमिकानी चालविली होती तेथून पुढे जाताना काही पोलीस बदोबस्त आणि काही सशस्त्र पोलीस घोड्यावर दिसले. कसला तरी मोर्चा महानगरपालिकेवर येणार होता त्याचा बदोबस्त होता

थिएटर आल्यावर तिकिटे काढण्याचा प्रश्न नव्हता ह्योग मडळींनी तिकिटे अगोदर काढून ठेवली होती थिएटरवर मी नाटकाची स्मरणिका विकत घेतली. एक नाटक लावले की ओळीने आठवडाभर चालते मग दुसऱ्या शहरात हलते महत्त्वाच्या नाटकाच्या स्मरणिका काढल्या जातात. पधरा वीस क्रोनर्सपर्यंत त्याची किंमत असते नाटकाचे कथानक, नटमडळी, प्रयोगाची वैशिष्ट्ये इत्यादी माहिती तिच्यात होती

नाटक सुरू होण्याआधीच आम्हाला आत नेण्यात आले आणि श्री स्टेंगले या तडफदार तरुण नेपथ्यकाराने आमचे स्वागत केले सपूर्ण नाटकाचे प्रोग्रॅमिंग त्याने

कॉम्प्युटरवर कसे केले होते याची माहिती दिली मूळ पाच अंकी नाटक त्यानी तीन अंकात बसविले होते. स्टेंगलेला किती बोलू आणि किती नाही असे झाले होते पण लवकरच नाटक सुरू होणार होते. काहीसा बुटका आणि दाढीवाला स्टेंगले आपल्याकडील हौशी नाटकमडळीत शोभावा असा होता

नाट्यप्रयोग चागलाच झाला आणि शेवटी टाळ्याचा कडकडाटही झाला. नाटकात फ्योर्दचा एकच सेट होता आणि रंगभूमीवर पातळ्या होत्या एक कृत्रिम तळेही केले होते लार्स आन्द्रिआस लार्सन या नटाने डॉ. वागेलची भूमिका केली होती. काम करताना, धावताना, एलिदाची भूमिका करणाऱ्या नटीला - लीव स्टीनला पडून जबर मुकामार बसला पण नशीबाने जखम झाली नाही प्रयोग सर्वांनाच फार आवडला होता आम्हाला मात्र कथानक पूर्ण माहीत असूनही पूर्ण गोडी चाखता आली नाही कारण भाषेची अडचण मधूनच थोडे शब्द उलगडत पण अगदी थोडे

मध्यतरात फार मजा आली वरच्या मजल्यावर आम्ही गेलो. कॉफीपान मात्र टाळले नाट्यगृह जुन्या पद्धतीचे आहे पण शिल्पे, गालिचे, आरसे, उंची पडदे, तैलचित्रे याची ददात नव्हती. झुबरे खूप होती. प्रेक्षकगृह फार मोठे नव्हते सुमारे आठशे माणसे बसतील एवढेच आणि खुर्च्यांच्या रागामधील अतरही कमी वाटले प्रेक्षकगृहात सर्वत्र लाल उंची गालिचा होता रंगभूमीकडे तोंड केले असता डाव्याबाजूच्या गॅलरीत राजकुटुबासाठी बसण्याची खास व्यवस्था होती

रेखाने तांबडी गडद साडी नेसलेली होती सर्व प्रेक्षकाच्या नजरा तिच्याकडे वळत होत्या ह्योग सराची एक देखणी विद्यार्थिनी त्याच्याशी बोलून गेली ते म्हणाले एरवी ही ओळख देणार नाही पण तुम्ही कसे आहात हे पाहून जाण्यासाठी ती आज आवर्जून भेटली स्पॅनिश स्त्रिया जसा पारपरिक वेष करतात तसा तिने केला होता रेखाचे रॉन्दीबाईंना कौतुक वाटत होते आणि त्याना भेटणाऱ्या व्यक्तींना त्या उत्साहाने आमची माहिती देत होत्या त्या म्हणाल्या, ' आमच्या मित्राना रेखा खूप सुरेख वाटते आहे.' त्यावर मी म्हणालो, ' हीच माझी अडचण आहे रेखा खूप छान आहे आणि मी कुरूप ती मला सोडून जाईल अशी भीती मला नेहमी वाटते ', त्यावर रॉन्दीबाई म्हणाल्या, ' ती सुरेख आहे तशी चागली आहे. ती तुला सोडणार नाही ' मी म्हणालो, ' तिला समुद्राचे भारी वेड आहे पण ती ' लेडी फ्रॉम दि सी ' प्रमाणेच कच खाणारीही आहे.'

नाटक सपल्यावर आम्ही आत गेलो. लार्सनला मी चौदा हजार मैलावरून तुमचे नाटक पाहण्यासाठी आलो आहे असे म्हटल्यावर तो खूष झाला पण चटकन म्हणाला,

' फक्त तेवढ्यासाठी ? ' मी म्हणालो, ' असे मात्र नाही, पण आपल्याविषयी मी फार ऐकून होतो आणि आज खुद्द भेटीचाच सुयोग आला. ' नतर कॉफीपान, गप्पासप्पा झाल्या. रॉन्दीबाईनी या मंडळींना केकस् व चॉकलेट्स दिली. आमचे ग्रूप फोटो काढले ` या मडळींनी नाटकासाठी वापरलेली टाईप्ड एगावृत्ती, पोस्टर्स आणि फुले मला दिली आम्हाला खूप आनद झाला

मी नाटकातील चागले भाग सांगितले पण तुम्ही नाटकात ' घराचा घटक ' पूर्ण गाळल्यामुळे सघर्ष दृश्य स्वरूपात समोर उमटत नाही अशी सूचना केली

लार्सनची एक इच्छा होती. माझी छापील माहिती त्याने मागून घेतली इडो - स्कॅण्डिनेव्हियन सोसायटीचा तो अध्यक्ष या सोसायटीचे मी सदस्य व्हावे ही इच्छा त्याने व्यक्त केली आणि मलाही ती कल्पना आवडली नतर प्रत्येक नट, नटीशी बोलून मी माझे त्याच्या भूमिकांविषयीचे आकलन माडले लिव स्टीन, टीना हार्तविग्, यिस्केन आर्मान्द, योआचिम काल्मेयर, पेर ऐगिल, आस्कअ, पेर फ्रिश या कुणात डावे - उजवे केले नाही. हे त्याना पसत पडले प्रत्येक नट नाटकाचा घटक असतो आणि स्वत चा प्रत्यय प्रयोगातून देत असतो याचे भान मी ठेवले. ह्याच्या नाट्यप्रयोगाविषयी वर्तमानपत्रातून खूप अनुकूल अभिप्राय आले होते. जुन्या पिढीतील लोकाना हा प्रयोग विशेष पसत नव्हता. मला त्याचे महत्त्वाचे कारण दिसले ते हे की या मडळींनी अभिनय कृतीतून थोडा मोकळेपणा घेतला होता आणि प्रतीकात्मकतेवर भर दिला होता. नाटकाला पार्श्वसगीताची जोड, फिल्मला असते तशी दिली होती.

या मडळींशी मला सत्यजित रॉय याच्या ' *गणशत्रू* ' विषयी देखील बोलावे लागले आणि माझी प्रतिकूल प्रतिक्रिया नोंदवावी लागली. लार्सन हे रॉय यांच्याशी सबधित होते हे मला माहीत होते पण रॉय यानी धार्मिक घटक आणून मूळ नाटक डिस्टॉर्ट केले आहे आणि शेवट अर्धसुखात्मक केला आहे हे मला योग्य वाटले नव्हते. हे मी प्राजळपणे सागितले.

प्रत्यक्ष प्रयोग - लाईव्ह परफॉर्मन्स ही काही वेगळीच गोष्ट असते. तिची लज्जत आम्हाला चाखता आली. पण हा सारा प्रसग मला भारून टाकणारा मत्रमुग्ध करणारा वाटला नाही. कारण भाषेचा अडसर मूळ इग्रजी नाटक अनेक वेळेला वाचलेले असूनही त्याचे काम करून गेला अशी माझी भावना झाली. मात्र नट मडळींनी ज्या आवेशाने आणि निर्दोषपणे त्याच्या भूमिका वठविल्या त्याची छाप आमच्या मनावर पडली

□

## शंभरी गाठण्यात अर्थ नाही ! ३७.

उस्लोतील आमची एक भेट आगळी वेगळी ठरली. इयान ह्योग याची आत्या वृद्धाश्रमात होती. या बाईच्या भेटीला आम्हाला नेण्यात आले आम्हाला वाटले की बाहेर देशातील प्रवाशांना व पाहुण्याना अनेक सस्था दाखवितात, त्यातील ही एक तिच्या कार्यामुळे जरूर दाखवावी अशी असणार नॉर्वेत आयुर्मर्यादा खूप आहे माणसे ८० - ९० वर्षे जगतात त्याचे दर्शन घडवावे हा हेतू असावा.

प्रत्यक्षात ह्या भेटीचा हेतू वेगळाच निघाला. आम्ही ज्या योहाना ह्योग या बाईंना भेटायला गेलो त्या ९९ वर्षांच्या होत्या मार्च महिन्यात त्या शभरी गाठणार होत्या. आणि विशेष म्हणजे त्यानी त्याच्या कुमारी वयात इब्सेनला पाहिले होते. ( बेर्गेनचे मेयर यानीही इब्सनेला पाहिले होते. ) त्याच्याशी ( योहानाबाईंशी ) आमची गाठ घालून द्यावी ही कल्पना रॉन्दीबाईंच्या डोक्यात चमकली आणि त्यांनी ती अमलात आणली आम्ही भेटायला येणार आहोत हे या बाईंना आधीच कळविण्यात आले होते आमची थोडीफार माहितीही त्याना देण्यात आली होती

उस्लोतील ' ओल्ड पीपल्स होम ' चे दोन वेगळे भाग आहेत. एक वृद्धाचा आणि एक अतिवृद्धाचा. अतिवृद्धाच्या भागात आम्ही गेलो तेथील वृद्धाचे कपडे नीटनेटके होते आणि हॉस्पिटल अतिशयच स्वच्छ सुदर होते दालनामागून दालने ओलाडीत आम्ही दुसऱ्या मजल्यावरच्या एका उजव्या हाताच्या खोलीत गेलो तेथे योहानाबाई शात झोपल्यासारख्या पहुडल्या होत्या. त्याच्या अगावरील पाघरूण मात्र अस्ताव्यस्त झालेले होते

आत गेल्यावर प्रथम काही क्षण आम्ही नुसते उभे राहिलो रॉन्दीबाईंनी हाका मारून त्याना उठविण्याचा प्रयत्न केला पण त्याना जाग येईना. त्यामुळे हळूच हलवून त्याना उठविण्यात आले. रॉन्दीबाईंनी त्याच्या कानात आमच्याविषयी सागितले तेव्हा त्या मोठ्या कष्टाने त्या कुशीवरून या कुशीवर झाल्या त्याचा देह म्हणजे हाडाचा सापळा होता. केस पूर्ण पिकले होते पण डोळ्यात चमक होती त्याच्याकडे पाहताना का कोण जाणे, पण योगी अरविंदाच्या साथी, माताजींची मला आठवण झाली आणि माझ्या वडिलांच्या आत्याबाईंचीही, म्हणजे आमच्या नारायणगावच्या आत्याबाईंची आठवण झाली.

योहानाबाईंना इंग्लिश येत नव्हते त्यांच्या बिछान्यावर पायाशी मी बसलो उशाशी रेखा बसली आणि रॉन्दीबाई खुर्ची ओढून शेजारी बसल्या. रॉन्दीबाईंनी दुभाषाचे काम केले. मी विचारलेल्या प्रश्नांना योहानाबाईंनी खाली गेलेल्या आणि अरळ स्वरात उत्तरे दिली. त्यांचा मिश्किलपणा लोपला नव्हता. योहानाबाईंचे आत्मचरित्र अलीकडे प्रसिद्ध झाले होते त्यातील फोटोंवरून तरुण वयात त्या खूप देखण्या होत्या असे दिसत होते

'तुम्ही कधी भारतात येऊन गेलात का ?' मी

'नाही पण तुमच्या देशाविषयी मी खूप ऐकून आहे !' योहाना.

'भारतातून, इब्सेनविषयी अभ्यास करण्यासाठी आम्ही येथे आलोत. तुमच्या काही आठवणी आम्हाला सागा विशेषत त्याचे चालणे - बोलणे ' मी

'इब्सेन उच टोपी घाली व उच टाचाचे बूट घाली आणि उंच दिसायचा प्रयत्न करी पण तो उच नव्हता.' योहाना.

'म्हणजे किती उच होता ? कारण तुम्ही मडळी फार उच आहात !' मी.

'तो सहा फूट नव्हता त्याची नक्की उची सागता येणार नाही !' योहाना

'त्याचे भाषण ऐकल का ?' मी.

'तो भाषण वगैरे देत नसे पण सभाषणात तो हळुवार व शांतपणे बोले त्याची नाटक वाचण आम्हा मुलींना त्या वेळी धाडसाच वाटे !' योहाना.

'ब्योर्नसन आणि इब्सेनला एकत्र पाहिलत का ? ते दोघ व्याही व्याही होते ' मी

'एकत्र पाहिल नाही ब्योर्नसन लोकाना फार फार आवडे पण अखेरीस इब्सेन जास्त लकी ठरला ' योहाना

'ते कस ?' मी

'इब्सेनला मानसन्मान मिळाले त्याची अत्ययात्रा फार मोठी होती ब्योर्नसन परदेशात फ्रान्समध्ये मेला. त्याला इतमामाची अत्ययात्रा मिळाली नाही ' योहाना

'इब्सेनला तुम्ही कोठे पाहिले ?' मी

'कार्ल योहान स्ट्रीटवर तो बऱ्याचदा दिसे जुन्या युनिव्हर्सिटीपाशी मोठ घड्याळ आहे. तेथे तो रोज फिरत फिरत येई आणि घड्याळ पाहून स्वत च घड्याळ लावी. तो फार नियमित आणि व्यवस्थित माणूस होता.' योहाना.

'इब्सेनबरोबर त्याची बायको असे का ?' मी

' तो एकाटाच फिरताना दिसे एकदा बग्गीतून तो आणि त्याचे कुटुबीय जाताना पाहिले.' योहाना त्या पुढे म्हणाल्या,

' तुम्ही इतक्या दूरवर आलात तुम्ही तरुण मडळी दिसता. तुमची मुल घरी कोणाजवळ आहेत का एकटी ?'

त्यावर रेखा म्हणाली, ' आमची मुले जरा मोठी आहेत अनिरुद्धचे आई - वडील त्याच्याकडे पाहात आहेत.'

योहानाबाईना मी विचारले, ' तुम्ही इब्सेनची नाटक पाहिलीत का ? तुम्हाला सर्वांत कोणतं नाटक आवडल ?'

' इब्सेनची नाटक अनेक पाहिली आमच्या वेळी नट - नटी फार कसून तयारी करीत. मला ' हेद्दा गाब्लर ' फार आवडल होत ' योहाना

' इब्सेनला त्याच कोणत नाटक सर्वात जास्त आवडे ?' मी

' मला वाटत त्यालाही ' हेद्दा गाब्लर ' सर्वांत जास्त आवडत असाव ' योहाना.

योहानाबाईंना मी इब्सेनमध्ये रस घेतो, आमच्या भागात इब्सेनचा कसा प्रभाव आहे, हे थोडक्यात सागितल्यावर त्या म्हणाल्या,

' तुमच्यासारखा भारतीय माणूस कधीकाळी इब्सेनवर अभ्यास करील, त्यासाठी येथे येईल, हे त्या वेळी आम्हाला खर वाटल नसत पण इब्सेन मोठा होता. मेल्यानतर तो जास्त मोठा होत गेला '

इब्सेन मोठा होता हे खर पण मी त्याच्यावर काम करतो आहे कारण त्याचे विचार मला पटतात व तो मला आवडतो म्हणून ' मी

त्यावर योहानाबाई म्हणाल्या, ' हे महत्त्वाच आहे एरवी तुम्ही एवढे कष्ट घेतले नसते. इब्सेनप्रमाणे तुम्हालाही खूप यश मिळेल आणि तुम्ही मोठे व्हाल ' हे वाक्य ऐकताच आम्ही तिघेही नि.शब्द झालो ते वाक्य आशीर्वादात्मक होते. आणि अगदीच उत्स्फूर्त व अनपेक्षितही होते.

त्यानतर रॉन्दीबाईंकडून त्यानी शेल्फामधील एक कोरीवकाम असलेली लाकडी डबी काढविली. ती उघडून त्या डबीतील एक विणलेला गोफ काढला आणि आम्हाला विचारले, ' हे काय आहे ?'

आम्हाला ती रेशमाच्या धाग्यानी विणलेली माळ वाटली. त्यावर योहानाबाईंनी ते धागे रेशमाचे नसून तिचेच तरुण वयातील केस होते असा खुलासा केला. त्यानतर त्याचे

प्रसिद्ध झालेले आत्मचरित्र आम्हाला दाखविले ह्योग याची ही आत्या बहीण एल्झअ आणि मुलगी सिसेल या तिघीही ख्रिश्चन मिशनरी होत्या. सिसेल भारतात होती पण अजून तिचा निर्णय पूर्ण झालेला नव्हता यावरून ह्योग कुटुबात अशा प्रकारच्या त्यागी वृत्तीची उपासना होत होती असे आम्हाला दिसून आले

आमचे जे थोडेफार सभाषण झाले ते अतिशय मंदगतीने व हळू आवाजात होते.

मी विचारले, ' शभर वर्षे जगण्याचा अनुभव कसा वाटतो आमच्याकडे ' जीवेत शरद शतम् ' म्हणतात मला पूर्वी १०० वर्षे जगावेसे वाटे '

त्यावर योहानाबाई उद्गारल्या, ' शभर वर्षे जगण्यात अर्थ नाही. मी कटाळले आहे '

त्यावर रेखा त्याना म्हणाली, ' तुमची तब्येत धडधाकट असती तर ? '

' तरीही नाही पुढे पुढे जगणच नकोस वाटत ' योहाना

आम्हीही आवरते घेतले आमच्या एवढ्याशा सभाषणाचीही त्याना दगदग झालेली होती. रॉन्दीबाईंनी फुले फ्लॉवरपॉटमध्ये खोचून ठेवली

निघताना रेखा व मी त्याच्याजवळ गेलो रेखा म्हणाली, ' बाई, आता आम्ही निघतो आपल्या भेटीने आम्हाला खूप आनद झाला '

त्यावर योहानाबाईंनी रेखाच्या डोक्यावर हात ठेवून तिला आशीर्वाद दिला आम्ही दोघेही गहिवरून गेलो नॉर्वेच्या भूमीवर असा काही नाट्यमय प्रसग घडेल असे आमच्या स्वप्नातही नव्हते

मी त्याना म्हणालो, ' या प्रवासात अनेक आनदाचे क्षण आले पण ही भेट आम्ही विसरणार नाही. तुमच्या १०० व्या वाढदिवसाला शुभेच्छा आधीच देऊन ठेवतो. '

त्यावर योहानाबाई मद हसल्या रॉन्दीने त्याना कुशीवर नीट झोपविले आणि आम्ही निघालो

जाताना आम्हाला दोन तरुण मुली दिसल्या. एक व्हिएटनामी होती व दुसरी कुकू लावलेली भारतीय वाटली. पण ती सिहली होती या मुली आमच्याकडे बघून हसल्या पण पुढे होऊन त्यानी आमच्याशी हस्तादोलन केले नाही त्या विस्फारित नजरेने आमच्याकडे पाहात होत्या

रॉन्दीबाई म्हणाल्या, ' योहाना ही एक मोठी स्त्री आहे की नाही ? '

मी म्हणालो, ' त्याच जीवन त्यागी व दुसऱ्याच्या सेवेत गेल आहे त्यानी रेखाला

दिलेला आशीर्वाद आणि मला दिलेल्या शुभेच्छा आम्हाला किती मोलाच्या वाटत आहेत हे शब्दानी सागता येणार नाही तुम्ही आम्हाला या ठिकाणी घेऊन आलात हे अतिशय चागल केलत '

वृद्धाश्रमातून परतताना, एकत्र कुटुबपद्धतीत भारतीय वृद्धाना घरातच ठेवले जाते, याचा त्रास आणि फायदा दोन्ही असतात, इ. इ. वर सभाषण झाले या भेटीमुळे रॉन्दीबाई ख्रिश्चन त्यागी वृत्तीला मान देणाऱ्या आहेत हे आमच्या लक्षात आले त्या स्वत डॉक्टर आहेत आणि सेवाभावी जीवनाविषयी त्याना त्यामुळे विशेष आस्था आहे हेही दिसून आले. आमच्या या भेटीमुळे आम्हाला आनद झाला हे पाहिलेल्या रॉन्दीबाईंनी ही प्रतिक्रिया त्याच्या स्नेही वर्तुळात प्रसृत केली आणि त्याचा अनुकूल परिणाम झाला.

### आरोग्य व कल्याणकारी योजना

नॉर्वे हे कल्याणकारी राज्य आहे वेल्फेअर स्टेट आहे वृद्धापकाळाची पेन्शन, अपगाना पेन्शन, मोफत वैद्यकीय उपचार, बेकाराना भत्ता, आणि इतर काही फायदे, या साऱ्याची काळजी सरकार घेते. त्यासाठी नागरिकाना टॅक्सही भरावा लागतो. कल्याणकारी राज्याची धाव एवढी आहे की शेतकऱ्याना सुट्टी - भत्ता देण्यात येतो व त्याच्या सुट्टीच्या काळात शेताची काळजी घेण्यासाठी इतर कामगार नेमण्यात येतात.

' राष्ट्रीय सुरक्षा योजना ' नॉर्वेत पूर्णपणे कार्यक्षम आहे हॉस्पिटलमधील उपचार व राहण्याचा खर्चही स्वत ला करावा लागत नाही असे असले तरी खासगी वैद्यकी येथे दिसून आली आणि खासगी वैद्यकीवर टॅक्सही इतके जाचक नव्हते. या खासगी डॉक्टर्सना पैसे मात्र स्वत लोक देतात लहानसहान आजारासाठी, उदा दाढ दुखणे, शिरा आखडणे, सरकारी हॉस्पिटल्सकडे धावावे असे लोकाना वाटत नसावे.

सपूर्ण राष्ट्राच्या आरोग्याच्या काळजीसाठी ५५० केंद्रे आहेत व अधिकारी आहेत त्याच्या हाताखाली कर्मचारी आहेत दतवैद्यकी मात्र त्याच्या कक्षेत येत नाही. पण वयाच्या ६ ते १८ वर्षापर्यंत सर्वांना दाताचे उपचार मोफत मिळू शकतात

अपगासाठी आरोग्य व व्यायाम या बाबतीत नॉर्वे आघाडीवर आहे बायतोस्त्योलेन स्पोर्टस् सेंटर हे सुप्रसिद्ध केंद्र याबाबत जगाला आदर्श घालून देणारे आहे. अपगच नव्हे तर अधांच्याही क्रीडास्पर्धा हे केंद्र भरविते अपगाच्या पुनर्वसनाच्या बाबतीत नॉर्वे पूर्ण यशस्वी ठरले आहे मर्यादित लोकसख्या ही कल्याणकारी राज्याला पूरक बाब ठरते असे दिसते

□

## ३८. होल्मनकोलन बाक्कन

आम्ही उस्लोत ज्या डाल्सबाएन भागात राहात होतो त्या भागाचे वैभव म्हणजे होल्मनकोलन ही अतिभव्य टेकडी. या टेकडीवर एक उच टॉवर आहे. उस्लोतून कोठूनही हा टॉवर दृष्टीस पडतो या टेकडीवरील दुसरे आकर्षण म्हणजे स्कीइगचे स्टेडियम व चहूबाजूला धावणारे हिमपट्टे उस्लोमध्ये आणखी एक स्कीइग केंद्र आहे ते म्हणजे श्लालोल्म. या दोन्ही ठिकाणी ऑलिंपिक आणि त्या दर्जाच्या स्कीइग स्पर्धा होतान यावरून या टेकड्याचा रुबाब आणि दर्जा काय असेल, हे ताडता येईल

एकोणतीस जानेवारीला सध्याकाळी स्कीइग करण्यासाठी आम्ही होल्मनकोलन टेकडीवर गेलो यापूर्वी ही टेकडी आम्ही पाहिली होतीच सूचिपर्णी वृक्षांची गच्च झाडी आणि तीमधील बर्फाचे ट्रेक्स फार मोठे आहेत. वरील टॉवरवरून उस्लोचे विहगम दृश्य दिसते. उस्लो फ्योर्द दिसते आणि पलीकडे पसरलेला सुदर समुद्रही दिसतो. उस्लोत मानवी वस्त्या अर्थातच आहेत पण या वस्त्यानी निसर्गसौंदर्याचा विनाश केला आहे असे कोठेही दिसत नाही मलबार हिलवरून पाहिल्यावर एकीकडे खरा समुद्र आणि दुसरीकडे बिल्डिंगचा व माणसाचा समुद्र असे दृश्य दिसते तसे येथे बिलकूल नाही उलट झाडीत आणि बर्फात उस्लो शहर लपले आहे असे दिसते. गावाच्या मध्यभागी असलेल्या काही उच इमारती लक्ष वेधतात, पण खटकत नाहीत.

निघताना आम्ही स्कीइगचे बूट चढविले, बरोबर स्कीइगच्या बरच्या आणि बुटाला अडकवावयाचे पट्टे घेतले भरपूर कपडे आणि हातमोजे होतेच व्यवस्थित जेवणही झाले होतेच मला खरे म्हणजे जरा पडावे व विश्राती घ्यावी, असे वाटत होते. त्यात ही स्कीइगची कल्पना पुढे आली स्कीइगचे भरपूर सामान तळघरात भरलेले होते. त्यातून आम्ही आम्हाला योग्य बूट निवडले. मोटारीने थेट डोंगरावर आलो.

स्कीइगच्या मैदानावर चढत जाताना आम्हाला खूप त्रास झाला माझ्यापेक्षा रेखाने स्कीइग लवकर उचलले मी अनेकदा आपटलो. ती फार कमी वेळा पडली. स्कीइग करताना उतरणीवर आपण तोल साभाळताना नेमकी उलटी कृती करतो. पुढे झुकावे लागते व गुडघ्यात वाकावे लागते. आपण नेमके मागे झुकतो आणि तोल सावरायला जातो आणि दाणकन पडतो. खाली सर्वत्र बर्फ असल्याने वेडावाकडा मार बसत नाही एवढेच, पण असा मार बसू शकतो.

स्कीइंग करताना मध्येच माझे हात पार काकडून गेले. एकमेकावर चोळूनही त्यात ऊब येईना ही गोष्ट इयान याच्या लक्षात आली व ताबडतोब त्यानी माझे लोकरीचे हातमोजे स्वत ला घेऊन त्याचे कातड्याचे हातमोजे मला दिले. या प्रकारामुळे मी बचावलो एरवी माझ्या हाताचे काय झाले असते याची कल्पनाच न केलेली बरी. या प्रकारामुळे माझे स्कीइंगमधले मन उडाले बाकी तिघेही मजेने खेळत होते. मी मात्र काहीसा वैतागलो होतो. स्कीइंग संपले तर बरे, असे मला वाटत होते.

सध्याकाळ होती तरी सर्वत्र अधार होता. स्कीइंगच्या मैदानावर व ट्रॅक्सवर विद्युत रोषणाई होती. होल्मनकोलन परिसर अतिशय सुदर दिसत होता रगीबेरंगी पोशाख केलेले अनेक छोटे छोटे गट स्कीइंगचा खेळ खेळत होते. काही गटांना शिक्षक शास्त्रशुद्ध स्कीइंग कसे करायचे, याचे शिक्षण देत होते स्कीइंग हा नॉर्वेचा राष्ट्रीय खेळ आहे. त्यामुळे शिक्षक - विद्यार्थी दोघेही अतिशय गाभीर्याने खेळत होते

होल्मनकोलनचा स्की - जंपिंगसाठी वापरला जाणारा उतार व स्टेडियम जीवघेणे वाटले. अतिशय निपुण व अनुभवी खेळाडूच तेथून उड्या मारू शकतात या स्टेडियमजवळच बाहेर फ्रितयोफ नान्सेन या जगद्विख्यात नोर्स उत्तर ध्रुव सशोधकाचा धिप्पाड पुतळा आहे. उत्तर ध्रुवाच्या अगदी जवळ जाणारा नान्सेन हा पहिला मानव होय

होल्मनकोलन टेकडीवर जुन्या स्टाव पद्धतीचे एक चर्च आहे व वायकिंग वास्तुविद्येनुसार बाधलेली भव्य हॉटेल्स आहेत. तीही आम्ही पाहिली वायकिंग वास्तुपद्धत जपानी वा चिनी पारपरिक पॅगोडा व घरे याची आठवण करून देते वायकिंग काळाविषयी नॉर्वेजियन मडळी मनापासून बोलतात. कारण या काळात नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्कचे धाडसी खलाशी युरोपात जाऊन अनेक लढाया जिकून आले व बरोबर लूटही घेऊन आले वायकिंग पद्धतीची घरे भव्यता, दणदणीतपणा आणि शौर्य याची ग्वाही देतात. तेथील नक्षीकामही नाजूक साजूक नसते, तर भक्कम असते

होल्मनकोलन टेकडीवर मला विशेष आढळली ती गोष्ट म्हणजे ताबड्या बेरीज. याना वाईल्ड बेरीज असेही म्हणतात या बेरीज खातात विशेषत त्याचे लोणचे व जॅम आवडीने खाल्ले जातात या ताबड्या बेरीजच्या बिया महाबळेश्वर परिसरात कदाचित लागतील, असे मला वाटून गेले

□

## ३९. खेळ

स्कीइग, स्केटिंग, रोइग, फुटबॉल, सूकर हे नॉर्वेतील लोकप्रिय खेळ आहेत स्कीइगमध्ये तर नॉर्वे जगात प्रथम स्थानावर आहे. येथे हिमवृष्टी भरपूर, हिम वितळणेही सथ होते. त्यामुळे मोठमोठाले हिमपट्टे स्कीइगला उपलब्ध होतात तीच गोष्ट नावाच्या शर्यतींची. वल्हविण्याच्या नावा व एजिनवर चालणाऱ्या नावा दोहोंच्याही शर्यती खेळल्या जातात. खेळ म्हणून सायकलिगही लोकप्रिय आहे.

हिमप्रदेश असल्याने अलीकडे इनडोअर खेळ लोकप्रिय होत आहेत. इनडोअर बॅडमिंटन. टेनिस. टेबलटेनिस, बास्केटबॉल खेळले जात आहेत. स्वीडनने टेनिस, टेबलटेनिसमध्ये फार मोठी आघाडी मारली आहे त्यामुळे नॉर्वेतील मडळीही याबाबत योजना आखू लागली आहेत. नॉर्वेजियन टी व्ही वर मात्र सदोदित स्कीइग दाखवीत असतात. आपल्याकडे क्रिकेटचे वेड आहे तसे तेथे स्कीइगचे वेड आहे हवामान पोहोण्याला मात्र पूर्ण प्रतिकूल आहे. पोहणे फक्त कमी थडीच्या दिवसात शक्य होते. त्यासाठीही इनडोअर तलाव हवेत.

रेखाने योगासनांविषयी त्यांना माहिती दिली. येथे स्त्रीपुरुष व्यायाम खूप घेतात. पळण्याचाही सराव ठेवणारी माणसे दिसतात रस्ते इतके शात असतात की त्यांच्यावरही पळण्याचा सराव करता येतो.

नॉर्वेजियन स्त्रीपुरुष धिप्पाड आणि उच खेळाला त्याचे शरीर साथ देते. पण लोकसख्या अगदी कमी असल्याने स्कीइंग व नावाच्या शर्यती सोडल्या तर नॉर्वेने जागतिक क्षेत्रात नाव मिळावलेले दिसत नाही

□

## ४०. उस्लो - विद्यापीठावर

उस्लो विद्यापीठावर आम्ही गेलो ते तेथील विगदिस युस्ता याना भेटण्यासाठी याना भेटण्यासाठी मी उत्सुक होतो कारण त्या म्हणजे सुप्रसिद्ध इब्सेन - स्कॉलर डॅनिअल होकॉन्सन याच्या पत्नी. होकॉन्सन अलीकडेच वारले पण त्यांनी पाठविलेले इब्सेनचे चित्रमय चरित्र माझ्याजवळ आहे.

विगदिस युस्तानी आमचे उत्साहाने स्वागत केले  सव्वासहा फूट उंच व भव्य देखण्या युस्ता कार्यक्षमतेचे प्रतीक आहेत  त्यानी आम्हाला सहाव्या मजल्यावरील कॅण्टिनमध्ये नेले व तेथेच बाजूला एका खोलीत त्या विद्यापीठातील इब्सेनपडिताची ओळख करून दिली  इब्सेनचे अलीकडील चरित्रकार एडवर्ड बेयर मला तेथे भेटले. इब्सेनच्या नाटकावर तेथे एक परिसवादच साजरा झाला  विशेष म्हणजे ' परिसवादा ' तच युस्ता बाईंनी मला १९९३ साली तुम्ही पुन्हा नॉर्वेला आले पाहिजे असे निमत्रण दिले  ९३ साली इब्सेन - अभ्यासकाची एक विश्वपरिषद ते बोलावीत आहेत.

युस्ताबाईंनी NRK , टेलिव्हिजन सेंटर, आणि रॉयल लायब्ररी सर्वांशी सपर्क साधून आमच्या भेटीगाठी ठरविल्या  यूलेण्डाल प्रकाशन सस्थेशी भेटही मुक्रर केली

उस्लो विद्यापीठ बेर्गेन विद्यापीठापेक्षा खूप मोठे आहे  उस्लोत आढळणाऱ्या मोजक्या अतिउच इमारतींतील तीन इमारती विद्यापीठाच्या आहेत  विद्यापीठाचे आर्ट्सचे डीन प्रो. सिव्हर्ट लागहोल्म यानी आम्हाला फेरफटका घेऊन सर्व विद्यापीठ दाखविले. थडीत काकडत आम्ही ते पाहिले पण ही घटना विगदिस युस्ताच्या भेटीनतर काही दिवसानी घडली  डीनसाहेब सिव्हर्ट लागहोल्म यानी विद्यापीठ चागले असले तरी ' रेड टेपिझम ' च्या लाल फितीच्या त्रासापासून मुक्त नाही हे प्राजळपणाने सागितले

उस्लो विद्यापीठाच्या ग्रथालयातील इब्सेनवरील पुस्तके पाहण्यात आम्ही पाऊण दिवस खर्च केला  पण तेथे बेर्गेन - विद्यापीठापेक्षा फार नवीन पुस्तके आढळली नाहीत तेथे रशियन विभागातील पुस्तकेही मी पाहिली  क्रान्तीच्या काळात रशियन लोकानी इब्सेनमध्ये खूप रस घेतलेला होता त्याचे दर्शन घडले

□

## इब्सेनची हस्तलिखिते

४१.

इब्सेनची हस्तलिखिते पाहणे ही माझ्या साहित्यसाधनेतील अत्युत्कट सुखद स्मृती होती  बेर्गेन विद्यापीठाच्या लायब्ररीत इब्सेनची काही दुर्मिळ पत्रे आहेत ती मी पाहिली होती पण इब्सेनच्या नाटकाची हस्तलिखिते उस्लोच्या ' रॉयल युनिव्हर्सिटी लायब्ररी ' त कडेकोट बदोबस्तात आहेत. हे ग्रथालय उस्लो विद्यापीठाच्या ग्रथालयापेक्षा वेगळे आणि जुने आहे  याचे स्वरूप जास्त करून अर्काइव्हजसारखे आहे  शिवाय जगातील अनेक भाषातील मासिके, वाङ्मयही येथे जतन केले जाते  नॉर्वेचे हे राष्ट्रीय ग्रथालय असल्याने नॉर्वेत प्रकाशित होणारे सारे लिखाण, जुन्या पोथ्या इ  येथेच आहेत.

श्रीमती आन्अ ग्रेतअ् होल्म ओल्सेन आणि श्री. ओदवार वास्तवाईत यांच्या सौजन्यामुळे ही हस्तलिखिते मला पाहावयास मिळाली. कुणासही ही हस्तलिखिते पाहावयास मिळत नाहीत कारण ती हाताळली गेली, त्याची पाने खराब झाली तर हा अमोल ठेवा नुकसानीत जाईल आज एकेका हस्तलिखिताची किंमत लक्षावधी क्रोनर्सएवढी आहे. '*ए डॉल्सहाऊस*'च्या हस्तलिखिताची किंमत तर कोटींच्या घरात जाईल.

ही हस्तलिखिते जाड डबल क्राऊन व डेमीसारख्या खूप जाड पानांच्या वह्यात आहेत. लिखाण दोन्ही बाजूनी केले आहे. काळ्या शाईत आहे इब्सेनचे हस्ताक्षर अतिशय देखणे असून ते डावीकडे कललेले आहे. एका पानात साधारण बावीस ओळी तो लिहीत असे फारशी खाडाखोड आढळत नाही *एत् ध्रुकेह्येम ( डॉल्स हाऊस )*, *विल्दान्डेन ( वाईल्ड डक् )*, *नॉर वी ड्योड वॉग्नेर ( व्हेन वुई डेड अवेकन )* ही हस्तलिखिते मी अगदी काळजीपूर्वक पाहिली *नॉर वी ड्योड वॉग्नेर* जास्त काळजीपूर्वक बघितले कारण ते इब्सेनचे अखेरचे लिखाण

व्यक्तींची नावे इब्सेन शॉर्ट फॉर्मस्ने सक्षेपाने लिहितो म्हणजे Prof R Fru M अशी प्रोफेसर रूबेक फ्रु माया अशी पूर्ण लिहीत नाही. प्रत्येक अकाच्या शेवटी तारखा आहेत. अक सुरू केला तेव्हाची तारीखही सुरुवातीस टाकलेली असते. अनेक ठिकाणी पेन्सिलने चौकोनी कस केलेले दिसतात पानाच्या अगदी डाव्या हाताच्या कोपऱ्यावर पृष्ठ क्रमाक आहेत मौज म्हणजे पुढचा क्रमाक यायला मध्ये तीन पाने जातात. वीस नतर बावीस येतो तेव्हा तीन पाने गेलेली असतात पानाचे आकडे सम पानावर घातलेले आहेत इब्सेनच्या लिखाणाची चार पृष्ठे मिळून छापील दोन पृष्ठे होत असावीत असा हा सकेत दिसतो '*नोर वी ड्योड वॉग्नेर*'ची सुरुवात झाली तेव्हाची २० - २ - ९९ ही तारीख उजव्या हाताला वरच्या कोपऱ्यात पहिल्या पानावर आहे तर २१ - ९ - ९९ ही सपल्याची तारीख अखेरच्या पानाच्या तळाशी उजव्या हाताला आहे Fru MaJa फ्रु माया, गाते ते इब्सेनच्या प्रतिभेचे अखेरचे शब्द-

*Jcg er fri ! Jeg er fri ! jeg er fri !*
*Mitt fangenskaps liv er forbi !*
*Jcg er fri som er fugl ! Jeg er fri !*

*मी स्वतत्र आहे ! मी स्वतत्र आहे ! मी स्वतत्र आहे !*
*तुरुगाचे यापुढे नावादेखील नाही !*
*पक्ष्याप्रमाणे मी स्वतत्र आहे ! मी स्वतत्र आहे !*

हे शब्द हस्तलिखितात वाचत असताना माझे डोळे पाणावले यात आश्चर्य ते काय ? *विल्डान्डेन*चे हस्तलिखित सुट्या पानाचे आहे. हे जास्त दाटीने लिहिलेले आहे. म्हणजे एकेका पानात २६ - २७ ओळी आहेत हस्ताक्षर दर हस्तलिखितागणित किंचितसे बदलताना दिसते

*एत् डुकेह्येम ( ए डॉल्स हाऊस )* ची दोन हस्तालिखिते आहेत. एक कच्चे व एक पक्के या हस्तलिखितांतून पानावर क्रमाक दिलेले नाहीत. कच्च्या हस्तलिखितात Fru slenborg नावाची व्यक्ती दिसते (Fru Lin) पेक्षा वेगळी शिवाय Bornene नावाचे एक पात्र आहे. पक्क्या हस्तलिखिताची आणखी एक कॉपी आहे. अर्थातच ही इब्सेनच्या हस्ताक्षरातील नव्हे. कच्च्या हस्तलिखिताची पहिल्या अकाच्या सुरुवातीची तारीख १९ - १० - ७८ आहे तर अखेरच्या अकाचे लिखाण सपल्याची तारीख ३ - ८ - ७९ ही आहे '*ए डॉल्स हाऊस*' हे नाटक इब्सेनने इटलीत 'आमाल्फी' या निसर्गरम्य गावात पूर्ण केले. *पेअर ग्यून्ट* हे इब्सनचे 'राष्ट्रीय नाटक' मानले जाते तेही इब्सेनने इटलीत लिहिलेले आहे.

पाश्चात्त्य जगतात आणि पर्यायाने अर्वाचीन जगतात इब्सेन, शेक्सपिअर खालोखाल मोठा नाटककार मानला जातो. आणि त्याचे *ए डॉल्स हाऊस* तर जगभर देशोदेशी केले गेलेले, वाचले गेलेले नाटक आहे. आधुनिक नाटकात या नाटकाएवढे गाजलेले नाटक दुसरे नाही त्याच्या रूपातराची व प्रयोगाची तर गणती नाही एवढे विख्यात नाटक इटलीसारख्या परक्या देशात इब्सेनने लिहावे आणि तेही आमाल्फीसारख्या मामुली गावात ही गोष्ट मजेशीर वाटते आमाल्फी गावात ज्या घरात इब्सेन उतरला होता आणि ज्या खोलीत खुद्द त्याने या स्फोटक नाटकाचे लिखाण केले ती खोली व फर्निचर आजमितीस आतरराष्ट्रीय स्मारक म्हणून जतन केले आहे *एत् डुकेह्येम*चे हस्तलिखित प्रथम हातात घेतले तेव्हा मी शहारून गेलो. माझ्या भावना वर्णन करण्याच्या पलीकडच्या आहेत अनेक मातब्बर मराठी लेखकाची हस्तलिखिते माझ्या हातातून गेली आहेत. कल्याण स्वामींच्या दासबोधाची प्रतही मी हातात धरली आहे. पण *डॉल्स हाऊस*च्या हस्तलिखिताला स्पर्श करतानाची अनुभूती अवर्णनीय होती. मी भक्तिसप्रदायी माणूस नाही. तरीही अशा वेळी भावनावेग आवरणे फार कठीण असते असा अनुभव मला आला. मी रेखाला म्हणालो, 'आपण आयुष्यात अनेक अर्थपूर्ण क्षण एकत्र जगलो आणि जगू हे हस्तलिखित तूही काळजीपूर्वक पाहा. ही स्मृती आपण शेवटपर्यंत जतन करू.' तिनेही ही गोष्ट मनापासून केली.

माझ्या मुलीला मी नोरा ( नूरा ) म्हणजे उत्तरा हे नाव देणार होतो पण रेखाने विरोध केला होता कारण नूरा नवऱ्याला सोडून जाते. ही आठवणही हे हस्तलिखित पाहात

असताना निघाली हस्तलिखित हे कागदी पानांचे हे हस्तलिखित जेव्हा तयार झाले तेव्हा इब्सेन युरोपीय कीर्तीचा साहित्यिक होता. पण त्याला वाटले असेल का की ह्या नाटकाचे नाव जगभर दुमदुमणार आहे आणि त्याचे प्रयोग देशादेशी होणार आहेत ? यानतरही इब्सेनने अनेक श्रेष्ठ नाटके लिहिली त्यातील अनेक विश्ववाङ्मयात अजरामर आहेत बदलत्या आवडीनिवडींच्या लाटा त्यांना काही करू शकलेल्या नाहीत. पण त्यातील कोणतेही नाटक *'ए डॉल्स हाऊस'* एवढे गाजलेले नाही. मी या व इतर हस्तलिखिताची काही छायाचित्रे घेतली पण दुर्दैवाने हे फोटो गेले. आज माझ्याजवळ फक्त स्मृती आहेत. ज्यांच्याकडे बघत जुन्या आठवणी जाग्या होतात असे फोटो नाहीत.

ही आणि अन्य दुर्मिळ हस्तलिखिते, स्पेशल रूममध्ये बसवून दाखविली जातात ग्रथपाल श्री. वास्तवाईत आणि त्यांच्या अन्य सहकाऱ्याच्या करड्या पहाऱ्यात आम्ही बसलो होतो म्हणाना। आणखी दोन तीन अ-नॉर्वेजियन मडळी दुसरी काही हस्तलिखिते पाहात होती मी सुमारे साडेतीन - चार तास हस्तलिखिते आणि नतर इब्सेनच्या उस्लोतील व इतर देशातील नाट्यप्रयोगांची चित्रे, छायाचित्रे पाहात होतो २३ जानेवारी १९९० हा दिवस मी विसरणार नाही.

चित्रात पहिल्या प्रयोगाची छायाचित्रे, पोर्ट्रेट्स, सेट्स्ची छायाचित्रे, एनलार्जड कॉपीज, स्केचेस्, पहिल्या प्रयोगाची स्केचेस, वेगवेगळ्या देशातील प्रयोगाची छायाचित्रे असे अनेक प्रकार आहेत. स्तानिस्लावस्कीच्या रशियन प्रयोगाची छायाचित्रे पाहून माझे डोळे निवले १९३० मध्ये इब्सेनच्या नाटकावर चित्रपट निघाले त्याची छायाचित्रे आहेत. एका बॉक्समध्ये छायाचित्रे आहेत त्यात नूराचे outdoor scenes असलेली छायाचित्रे आहेत. नूराची तीन मुले असलेली अनेक छायाचित्रे आहेत.

जुनी छायाचित्रे पाहताना मर्यादा पडते. कारण इब्सेनच्या नव्या नाटकाच्या फिल्म्स कॅसेट रगीत आहेत जुनी ब्लॅक ॲण्ड व्हाईट छायाचित्रे नाही म्हटले तरी कमी जिवत वाटतात. प्रत्येक दशकातून वेषभूषा बदलताना दिसते. दुर्मिळ छायाचित्र वाटले ते मादाम माव ज दुगने केलेले नूराच्या भूमिकेतील. इतर चिनी इब्सेन-प्रयोगाची छायाचित्रेही आहेत. उस्लो रॉयल युनिव्हर्सिटी ग्रथसग्रहालयात इब्सेनच्या नाट्यप्रयोगाची विविध देशातील अक्षरश हजारोंनी छायाचित्रे आहेत. बघताना डोळे थकतात पण ती सपत नाहीत. इब्सेनच्या अनुषगाने देशोदेशींची नाट्यसृष्टी डोळ्याला दिसते

इब्सेनची हस्तलिखित पत्रेही रॉयल युनिव्हर्सिटी लायब्ररीत पाहिली. पत्रे लिहिताना इब्सेन जाड कागदाची लेटरहेड्स वापरीत असे. कागदाच्या माथ्यावर मध्यभागी एच्

आणि आय् ही अक्षरे एकमेकात गुतलेली असल्याचे चित्र छापून घेतलेले दिसते इब्सेनची लिहिलेली छोटी पत्रे आहेत तशीच ४ - ५ पानी मोठी पत्रेही आहेत इब्सेनच्या पत्रव्यवहाराचा इंग्लिश अनुवादही प्रकाशित झालेला आहे ही पत्रे फार महत्त्वाची मानली जातात कारण इब्सेनची साहित्याविषयक व इतर मते त्यातून आपल्याला कळतात इब्सेनला पौर्वात्य विशेषत भारतीय साहित्याची काही माहिती होती याला पत्रव्यवहारातून पुरावा भेटत नाही

इब्सेनची पत्रे मग ती कोणतीही असोत अत्यत सुरेख हस्ताक्षरात नीट नेटकी लिहिलेली आहेत. पत्र घाईत लिहीत आहे असा उल्लेख असलेली पत्रेही व्यवस्थित लिहिलेली आहेत विशेष म्हणजे कोठेही खाडाखोड आढळत नाही इब्सेनची त्याच्या मित्राना, चाहत्याना, नातेवाइकाना, प्रकाशकाना, नाटकातील मडळींना अशी पत्रे लिहिलेली आहेत. ही पत्रे प्लॅस्टिकच्या जाड पारदर्शक पिशव्यातून ठेवलेली आहेत. काही पेट्यातील पत्रे तशीही आहेत

आम्हा सकाळीच अधारात ग्रथालयात गेलो होतो दुपारी पोटात कावळे ओरडू लागले तेवढ्यात होल्म ओल्सेनबाई तेथे आल्या. त्यानी ग्रथालयाच्या वरच्या मजल्यावर कॉफीपान व ब्रीफ लचसाठी नेले त्यामुळे नतरची कामाची बैठकही व्यवस्थित पार पडली. ओल्सेनबाईंनी आमची आस्थेने विचारपूस केली. आम्हाला योग्य सहकार्य मिळते आहे ना याची खात्री करून घेतली ओल्सेनबाईंना भारतातील ग्रंथालये, ग्रथसग्रहालये याच्याविषयी उत्सुकता होती. त्यानी प्रश्न विचारावेत आणि मी मला असलेली माहिती सागावी असे जेवताना चालले होते माझी छापील माहिती मी त्यांना दिली व भारतातून आपणास काही हवे असल्यास मला जरूर सागा असे आश्वासन दिले

उस्लो विद्यापीठातील या ग्रंथालयात कोणी, भारतातील सदानद रेगे नावाचे गृहस्थ येऊन गेले होते का ? त्याचा काही तलास लागतो का हे पाहण्यासाठी मी सकाळी त्याना सांगितले होते त्यानी बरीच रेकॉर्डस पाहून नाही, असे कोणी येऊन गेल्याचे दिसत नाही असे सांगितले मला सदानद रेगे याच्या कामाचा सुगावा येथे तरी लागेल अशी आशा होती कारण येथे प्रत्येकाकडून काही फॉर्मस भरून घेतले जातात. प्रसगी फोटोही मागितले जातात. देशोदेशीचे अभ्यासक स्कॅण्डिनेव्हियन सस्कृती व वाङ्मय याचा अभ्यास करण्याच्या सदर्भात येथे येऊन जातातच आणि येथे सारेच रेकॉर्ड अत्यत काळजीपूर्वक आणि शास्त्रीय पद्धतीने जतन केले आहे. मला हवी असलेली माहिती न मिळाल्याने मी जरा निराश झालो

सकाळच्या वेळेत हस्तलिखिते पाहणे आणि दुपारच्या वेळी तीनपर्यंत म्हणजे

प्रा. ह्योग येईपर्यंत छायाचित्रे पाहणे असे माझ्या कामाचे मी दोन भाग पाडले आहेत आणि सर्व काही निवांतपणे होत आहे हे पाहून होल्म ओल्सेनबाईंना समाधान वाटले. नॉर्वेजियन साहित्यातील दुर्मिळ कागदपत्रे, हस्तलिखिते, संदर्भ जतन करण्याचे काम त्याच्याकडे दिलेले आहे, आणि ते त्या विलक्षण श्रद्धेने आणि चिकाटीने करीत आहेत

ज्या दिवशी आम्ही हस्तलिखिते पाहण्याचे काम केले तो दिवस त्या कामासाठी योग्य ठरला कारण बाहेर वारे व हिम पडणे चालू होते हवा आत बसून काम करण्यासच योग्य होती. कटाळा येई तेव्हा मी अन्य दालनात चक्कर मारून येई. एका दालनात क्नूट हॅमसून या कादबरीकाराविषयी शोकेस होती. त्यात हॅमसूनविषयीची नवी पुस्तके मांडली होती. मी त्या शोकेसचा फोटोही घेतला हॅमसून नात्झींचा साथी होता त्यामुळे नॉर्वेतील अनेक व्यक्ती त्याच्याविषयी कडवट बोलतात येथे ग्रथालयात मात्र नि पक्षपाती दृष्टीने त्याला शोकेस दिली होती. मला याचे बरे वाटले कारण त्याचे साहित्य उत्तुग नसले तरी प्रथम दर्जाचे आहे व नोबेल पारितोषिकाचा तो मानकरीही आहे.

रॉयल युनिव्हर्सिटीत इकडे तिकडे तरुण अभ्यासकही मला दिसले. त्यात आफ्रिकी, जपानी, असेही अभ्यासक होते जो तो त्याच्या आवडीच्या विषयाचा निष्ठेने मागोवा घेत होता प्रा. ह्योग जेव्हा मला पावणेतीन वाजता न्यायला आले तेव्हा मी छायाचित्रे बघत होतो ते म्हणाले,

‘ तू ज्या खुर्चीवर बसला होतास त्याच खुर्चीवर बसून मी माझे विद्यार्थिदशेतील व नतरचे काही सशोधन केले आहे योगायोगाने तू त्याच खुर्चीवर बसलेला होतास.’

यावर मी म्हणालो, ‘ या घटनेचा मला अभिमान वाटेल, आणि मला यश मिळेल अशी आता खात्रीही वाटू लागली आहे.’

यावर प्राचार्य ह्योग खूष होऊन मनापासून हसले.

□

## ४२. शूल्ट्झ मंडळी व मॉली

डॉल्सवाएन ४६ येथे मुक्काम असताना, पलीकडच्या रस्त्यावर राहण्याऱ्या शूल्ट्झ पतिपत्नींनी आम्हाला एका सध्याकाळी जेवायला बोलविले. श्री आरिल व सौ. कारिन हे स्वभावाने छान होते. त्याचाही बगला अतिशय भव्य होता.

ही माणसे भारताविषयी भरभरून प्रश्न विचारत होती आरिलला नॉर्वेत खूप दोष दिसत होते व तो स्वीडनची तरफदारी करीत होता. उलट मी नॉर्वेचे चांगले गुण सागत होतो. त्यावर आरिल म्हणाला, ' स्वीडन ग्रेट राष्ट्र आहे. पण आमच्या मडळींनी तुमचे ब्रेनवॉश केलेले दिसते.' त्यावर मी म्हणालो, ' असे नसेल असे नाही पण तुम्ही तर नॉर्वेत आवडीने राहता आहात !'

त्यावर आरिल म्हणाला, ' याचे कारण स्कीइग. नॉर्वेत स्कीइग नसते तर येथे राहाण्याचे कारण नाही.' आरिल हा इंजिनिअर होता.

या मंडळींकडे सोनेरी केसाची गोल्डन रिट्रायव्हर कुत्री होती ती पाहून मी आनदून गेलो. आमच्या जेनी कुत्रीसारखी ही मॉली होती. आणि बेटी माझ्याशी मनापासून खेळू लागली. ती मला इतकी चिकटली की सर्वांनाच आश्चर्य वाटले. मी उठलो आणि आमच्या घरी येऊन माझ्याजवळचे एक पुस्तक घेऊन परत शूल्टझ्‌ याच्याकडे गेलो. हे पुस्तक होते अनंतरावांनी - माझ्या वडिलांनी लिहिलेले *मी जेनी* ' हे पुस्तक पुस्तक मराठीत पण ते पाहून सारी मडळी खूष झाली हा योगायोग मजेशीर वाटला. मी ते पुस्तक शूल्टझ्‌ पतिपत्नींना भेट दिले. हे पुस्तक मी भारतातून येताना आणले होते हे [illegible] झाले.

आरिल यानी उची वाईन काढली होती तर कारिन यानी घरातल्या वेलावरच्या घेवड्यांची भाजी केली होती आरिल यानी गप्पा मारताना इब्सेनची *तेऱ्ये विगेन* ही कविता आपल्याला खूप आवडते हे सांगितले एवढेच नव्हे तर जपून ठेवलेले शाळेतील ' तेऱ्ये विगेन ' हे सचित्र पुस्तकही मला दाखविले. मला वाटले की हे दुर्मिळ पुस्तक ते मला देणार की काय ? पण छे त्यानी ते पुनश्च कपाटात ठेवून दिले. ह्या कवितेच्या आठवणीनेही आपल्या डोळ्यात पाणी येते असे आरिल म्हणाले.

कारिन ही उत्कृष्ट गृहिणी होती. ती आरिलपेक्षा थोराड होती. त्याना चार मुले होती. या मुलाच्या बेडरूम्स खूप मोठ्या होत्या व त्याचे बिछाने भल्या मोठ्या कोनाड्यासारख्या जागात ठेवलेले पाहून मौज वाटली. कारिन बाईंना हातमागावर उत्तमोत्तम गालिचे विणण्याची हातोटी दिसत होती त्यानी डिनरला अनेक सुदर पदार्थ बनविले होते.

शूल्ट्झ हे नाव जर्मन व पोलिश दोन्ही आहे. पण ही मडळी खास अस्सल नॉर्वेजियन वाटली त्याच्या घरात असताना बाहेर भुरभुर हिम पडत होते वाईन जोरदार असावी. तेथील सध्याकाळी मी विलक्षण आनदात होतो. या घराचा परिसर, भोवतीची झाडी इतकी छान होती की आरिल याना मी तुम्ही नंदनवनात राहात आहात हे सागितले

□

## ४३. मूंक म्युझियम

एदवर्द मूक म्युझियम पाहायला आम्ही सकाळीच फोक म्युझियम पाहून मग गेलो. वाटेत रोटरीअॅन डॅनिएल्झअ निघून गेल्या. त्याना काही काम होते आम्ही तिघेच उरलो. रोटेरियन आदर्स डॅनिएल्झअ याना मी म्हणालो, ' मूकची चित्रे आम्ही आर्ट बुकस् मधून बघितलीत आणि हे म्युझियम पाहण्यास मी अधीर आहे.'

आदर्स हे वनस्पतिशास्त्राचे निवृत्त प्रोफेसर होते. त्याना चित्रकलेची माहिती फारशी नव्हती पण मूकच्या जीवनातील काही घटना त्यानी जाता जाता सांगितल्या. तरुण मूकच्या चित्रकलेस नॉर्वेजियन मडळ प्रतिसाद देत नव्हती पण इब्सेनने त्याच्या प्रदर्शनाला उचलून धरले. तरुण मूकला निराश न होण्याचा सल्ला दिला. तरुणपणी माझीही अशीच अवहेलना या मडळींनी केली. हीच मडळी उद्या तुला डोक्यावर घेतील तू तुझी कला वाढवत राहा हा सल्ला दिला. ही गोष्ट मला फार उद्‌बोधक वाटली. तरुण स्ट्रिण्डबर्गची नाटके वयस्क इब्सेनला आवडत हे मला माहीत होते पण तरुण मूकलाही वयस्क इब्सेनने धीर दिला हे मला माहीत नव्हते.

एदवर्द मूक ( १८६३ - १९४४ ) हा अतिशय थोर चित्रकार आहे. त्याचे सपूर्ण म्युझियम उस्लोत असण्याचे कारण उस्लो कार्पोरेशनने त्याला मदत केली व त्या बदल्यात त्याची बव्हशी चित्रे त्याने कार्पोरेशनला दिली आज त्याची फार थोडी चित्रे युरोपात अन्यत्र दिसतात परिणामी मूक पाहिलेले रसिक कमी दिसतात मूक म्युझियममध्ये आज मूकची हजारावर चित्रे व वूडकट्स् आहेत.

मूक म्युझिमय एक मजली आहे त्याची भव्य दालने पसरलेली आहेत. अगदी लहान चित्रापासून अगदी भव्य चित्रापर्यंत मूकने चित्रे काढली आहेत मला मूकमध्ये विशेष रस असण्याचे कारण हे होते की इब्सेनची अनेक चित्रे पोर्ट्रेटस त्याने केली आहेत. वृद्ध इब्सेनच्या चेहऱ्याच्या ' क्लात ' छटा त्याने टिपल्या आहेत मूकने काढलेले इब्सेनचे प्रत्येक चित्र एका शोकनाट्यकाराचे विव्हल असे चित्र वाटते काही चित्रातून विव्हलता आणि खबीरपणा एकाच वेळी प्रतीत होतात

आदर्स यानी एका इब्सेन चित्रापाशी खास खुर्ची ठेवून माझे छायाचित्र घेतले. हे छायाचित्र फार उत्तम आहे असे नाही पण माझ्या नॉर्वे भेटीचे सूत्र त्यात कायमचे गुफले गेले त्यामुळे हे छायाचित्र मला मोलाचे झाले आहे.

मूक म्युझियम पाहून झाल्यावर आम्ही तेथील कॅफेमध्ये कॉफी व केक्स घेतले. केक्स मोठे व अप्रतिम होते. या वेळी आदर्स डॅनिएल्झअ रगात आले. त्यानी आमच्याशी मनमोकळेपणाने गप्पा मारल्या ते फार पूर्वी दिल्लीला येऊन गेले होते. भारतातील पर्यावरणाचा तोल ढासळला आहे का ? प्रदूषण खूप झाले आहे का ? हे प्रश्न त्यानी आस्थेने विचारले मला इब्सेनमध्ये कसा रस निर्माण झाला हा प्रश्न त्यानीही अर्थातच विचारला

उस्लोतील प्रदूषण, झाडतोड, घराच्या विविध शैली याबद्दल ते बोलले. पण हे प्रश्न मुबई, पुणे, कलकत्ता याच्या तुलनेने नगण्य आहेत हा दिलासा मी जणू त्यांना दिला

आदर्स यांनी इब्सेनविषयी मला अनेक प्रश्न विचारले. विशेष म्हणजे तेऱ्ये विगेन कवितेतील काही कडवी मला म्हणून दाखविली ही कविता म्हणजे नॉर्वेजियन लोकाचा ठेवा आहे, तुम्ही ग्रिमस्टाला गेला की तेऱ्ये विगेनची समाधी पाहाच हे त्यानी आवर्जून सांगितले

त्यानी एक मजेशीर प्रश्न विचारला, ' इब्सेन निराशावादी होता. तुम्हाला इब्सेन आवडतो. तेव्हा तुम्हीही निराशावादी आहात का ? '

मी उत्तर दिले, ' मला वेळोवेळी निराशा ग्रासून टाकते. आमचा देश तुमच्यासारखा नाही जास्तीत जास्त प्रतिकूल गोष्टी व समस्यानी आम्ही ग्रस्त आहोत. पण रेखामुळे मी उभारी धरतो. ती मला निराश होऊ देत नाही '

आदर्स म्हणाले, ' गेले काही दिवस मी तुम्हाला पाहतो आहे. तुम्ही तर खूप उत्साही व आनदी दिसता तुम्हाला इब्सेन कसा काय आवडतो हे मला जरा कोडेच होते '

मी म्हणालो, ' इब्सेनच्या स्तोकमानप्रमाणे माझी अवस्था आहे. प्रकाशक व लेखक या नात्याने आमच्या लोकाना मी वास्तवाची जाणीव करून देण्याचा प्रयत्न करतो पण मलाच लोक वेड्यात काढू पाहतात इब्सेनच्या नाटकातून मला धीर मिळतो पण आशा मात्र नाही.' तुमच्या येथे मी आनदी, उत्साही आहे कारण अनेक उत्कृष्ट गोष्टी मला दिसत आहेत '

डॅनिएल्झअ यानी सौम्य शैलीत आपणही कसे झगडलो याचे काही किस्से सागितले नतर त्यानी त्याच्या बोटॅनिक इन्स्टिट्यूटमधील कामही दाखविले, तेव्हा ते किती तळमळीचे व थोर कार्य करणारे शास्त्रज्ञ आहेत हे आम्हाला कळले.

□

# ४४. उस्लो बोटॅनिक इन्स्टिट्यूट ( बोतानिस्क हागअ )

श्री डॅनिएल्झअ यानी त्याच्या बोटॅनिक इन्स्टियट्यूटमध्ये आम्हाला नेले. तेथील ग्रीन हाऊसमध्ये जगातील विविध झाडाचे नमुने आणून जतन केले होते नारळ, सुपारी, केळी याचेही नमुने होते. केळ्याच्या एका झाडाला मागे केळी येऊन गेली होती. तेथील निवडुगाचे विविध नमुने पाहून आम्ही थक्क झालो

इन्स्टिट्यूटचे हर्बेरिअम केवळ प्रचड आहे लक्षावधी वनस्पतींची सुकलेली झाडे मूळ सदर्भासहित, वर्णनासहित जतन केली आहेत. रेखाला या साऱ्या गोष्टींत माझ्यापेक्षा जास्त रस. ती अनेक प्रश्न डॅनिएल्झअ याना विचारत होती

नुकत्याच कालवश झालेल्या ' डॅग्री टॅनलिड ' ही या सस्थेची विलक्षण कथाच आहे. या बाई टॅनलिड या वनस्पतीशास्त्रज्ञाची पत्नी त्या वनस्पतींची चित्रे काढीत आणि त्याच्यावर कविताही करीत त्याची चित्रे थोडीफार वापरली गेली पण कविता त्यांच्याजवळ राहिल्या खूप वय झाले तेव्हा मरण्यापूर्वीची त्याची इच्छा म्हणून त्यानी त्याच्या कवितेचे व पानाफुलाच्या चित्राचे मिळून एक छोटेखानी पुस्तक काढले. ह्या पुस्तकाचा काही खर्च त्यानी प्रकाशकाला दिला होता

ह्या छोट्या कविता आणि वनस्पती फुलाची चित्रे असलेले पुस्तक अप्रतिम होते. सबध स्कॅण्डिनेव्हिया आणि नतर युरोप त्याने आनदून गेला पुस्तकाच्या आवृत्त्यावर आवृत्त्या खपल्या. यानतर टॅनलिड याच्या उरलेल्या अनेक कविता आणि पानाफुलाची चित्रे अनेक पुस्तकरूपाने बाहेर पडली. टॅनलिडल यानी मरताना ह्या पुस्तकाचे पैसे व मूळ चित्रे उस्लो इन्स्टिट्यूटला दिली आज त्याची पुस्तके जगभर गेली आहेत. आयुष्यात सतत केलेली निसर्गसाधना आज त्यानी पुस्तकरूपाने जगाला अर्पण केली आहे

श्रीमती टॅनलिड याच्या नावाने इन्स्टिट्यूटमध्ये खास म्युझियम व दालन ठेवले आहे टॅनलिडबाईंची चित्रे अप्रतिम आहेत. आम्ही हे म्युझियम पाहून आनंदून गेलो. रेखाच्या चेहऱ्यावर आनद ओसडत होता. आम्ही आमचे साश्चर्य कौतुक स्पष्ट शब्दात डॅनिएल्झअ याना बोलून दाखविले. त्यानी टॅनलिड याची ओळख करून देणारी एक पुस्तिका रेखाला भेट दिली

बोटॅनिक इन्स्टिट्यूटमध्ये विविध प्रकारची चेरीज झाडे पाहावयास मिळाली काही

झाडाच्या नमुन्यानी भरलेले होते. विशेषत नॉर्वेत असख्य बेटावर आढळणाऱ्या अनेक दुर्मिळ वनस्पती तेथे लावल्या जात होत्या थडी व हिम याच्यामुळे गार्डन सुस्थितीत नव्हते बहुतेक झाडाचे नुसते सापळे उभे होते पण स्प्रूस, बर्च, पाईन, फर, ओक, लाईम, पॉपलर, आस्पन, इ. अनेक प्रकार मला येथे पाहता आले आपण उन्हाळ्यात येथे आलो असतो तर ह्याची विविध रगाची पानेही पाहायला मिळाली असती अशी हळहळ आम्हाला वाटून गेली.

डॅनिएल्झअ यानी लिहिलेले पुस्तकही त्यानी अभिमानाने आम्हास दाखविले. खूप सशोधनाचे ते फळ होते. पुस्तक पाहून मी त्याच्याशी जोरदार हस्तादोलन केले. ' आपल्यासारख्या व्यासगी आणि निष्ठावान वनस्पतीशास्त्रज्ञाशी आमचा परिचय झाला हे आमचे सद्भाग्य होय.' असे उद्गार उस्फूर्तपणे माझ्या तोंडून बाहेर पडले नतर बोलताना माझ्या आईचे वडील फॉरेस्ट ऑफिसर आहेत व त्यांचे वृक्षप्रेम माझ्यात सक्रमित झाले असावे हेही मी त्याना सागितले. त्यावर ते समाधानाने हसले.

डॅनिएल्झअ फार वर्षांपूर्वी भारतात एका वनस्पतिशास्त्राच्या सेमिनारला येऊन गेले होते त्याना वनस्पतींच्या प्रकाराच्या दृष्टीने भारताची समृद्धी जाणवली होती. त्याना मी म्हणालो, ' सारे खरे आहे पण आमची ८० कोटी माणसे आज अज्ञान, अनास्था आणि अहकार याच्यापोटी आमचे वनस्पती वैभव झपाट्याने नष्ट करीत आहेत.' त्यावर ' तुमच्यासारख्या अनेक तरुणांनी पुढे झाले पाहिजे ' असे डॅनिएल्झअ मला म्हणाले. किबहुना बाहेर पडताना हा संदेश त्या इन्स्टिट्यूटनेच आम्हाला दिला होता

□

## श्वेरिगअ् ४५.

नॉर्वेचा दौरा आटोपून मग स्वीडनमध्ये जायचे व तेथून परतीच्या प्रवासात मॉस्को करायचे ही मूळ कल्पना होती. पण रोटेरियन वीगार्ड यानी त्याच्या पद्धतीने व सोयीने दौरा आखला ब्रिटिश कौन्सिलने त्याचा व्हिजिटरशिपचा कार्यक्रम आखला. त्यामुळे मधेच दोन दिवस वेळ काढून आम्ही स्वीडनमध्ये जाऊन आलो. आणि परतीच्या प्रवासात इग्लडमध्ये अडीच आठवडे राहिलो स्वीडनची भेट ' शॉर्ट बट स्वीट ' अशी झाली.

स्वीडन हा नॉर्वेचा शेजारी आहे. स्वीडनचे क्षेत्रफळ १७३, ६६५ चौ. मी. ४४९, ७९३ चौ. कि. मी आहे. म्हणजे महाराष्ट्रापेक्षा थोडा मोठा आहे. १ हजार मैल

लाब ( १६१०कि. मी ) आणि २५० मैल ( ४०० कि मी. ) रुद असा भूभाग आहे स्वीडनच्या पश्चिमेस नॉर्वे आहे पण पूर्वेस बोथनियाचा उपसागर आहे. आणि खाली बाल्टिक समुद्र आहे बोथनियाच्या समुद्रापलीकडे फिनलड आहे. अगदी उत्तरेस नॉर्वे, स्वीडन, फिनलड आणि रशिया याच्या सरहद्दी एकमेकास भिडतात.

नोर्गअ् - श्वेरिगअ् ही नावे जुळी आहेत. कारण हे देश जुळ्या भावडासारखे आहेत डेन्मार्क समुद्रामुळे त्याच्यापासून दूर झाला आहे अर्थात नैऋत्येस स्वीडन आणि डेन्मार्क एकमेकाला खेटून आहेत. स्वीडन आणि नॉर्वे हे वस्तुत एकच देश होऊ शकले असते मध्ये पर्वताची राग असल्याने ते विभागले गेले आहेत.

नॉर्वेजियन्सप्रमाणे स्वीडिश देखील एकसध (homogeneous) लोक आहेत. उच शरीरे, लबाकृती चेहरे, सरळ blond सोनेरी केस, निळे डोळे, गोरा रग, हेही लोक नॉर्डिक आहेत. ( दालानी विभागात बुटके स्वीडिश आहेत म्हणजे ५॥ फुटी ) काही फिन्स आहेत ( ०.७ % ) काही लॅप आणि थोडे फिन्स सोडले तर सर्व स्वीड्स स्वीडिश भाषा बोलतात. ही नोर्स्कला खूप जवळची आहे स्वीडीश चर्च लूथरन आहे. ९५ % लोक याच प्रॉटेस्टट पथाचे आहेत. स्वीडन अतिशय प्रगत औद्योगिक देश आहे त्याची लोकसख्या नॉर्वेच्या दुप्पट ८० लाख आहे स्वीडन श्रीमत व उच्च राहणीमानात फारच वर आहे नॉर्वे प्रमाणेच स्वीडन कल्याणकारी राज्य आहे आणि तेथे राजवश व लोकशाही याचे मिश्रण आहे स्वीडनची जंगलसपत्ती केवळ प्रचंड आहे

☐

## ४६. स्वेन्स्का अकादमीस भेट

२६ जानेवारी ९०. सकाळी सातच्या सुमारास आमची ट्रेन स्तोकहोल्म रेल्वे स्टेशनजवळ आली होती. मी आणि रेखा ६। वाजल्यापासूनच आवरून तयार होतो. बाहेर अधार होता आणि भरपूर हिमवृष्टी झालेली दिसत होती. अनेक घरे पार बर्फाखाली गाडली गेलेली दिसत होती आणि असख्य सूचिपर्ण वृक्षाची तीच अवस्था दिसत होती जमीन सपाट होती तुरळक डोंगर दिसत होते आणि तेही पार बर्फाखाली गाडले गेले होते का कोणजाणे डॉक्टर झिवागो फिल्ममध्ये व्हेरोनिका भागात लारा एकटी राहात असते तो भाग मला आठवत होता समोर दिसणारी निसर्गदृश्ये तशी वाटत होती कारण ती तशाच अधारात बुडलेली होती

या सुमारास उज्ज्वला आणि एव्हर्ट आम्हाला न्यायला स्टेशनवर आले नाहीत तर ? स्तोकहोल्ममधील लोकल रेल्वेचे स्टेशन जवळ आहे की दूर ? व्हॅलेंत्युना हा भाग स्तोकहोल्म रेल्वे स्टेशनपासून नक्की किती कि मी दूर असावा अनेक प्रश्न मनात गर्दी करीत होते बाहेर पडणाऱ्या हिमाचे तुकडे काचेच्या तावदानावर आदळत होते आम्ही उस्लो सोडले तेव्हा हिमवृष्टीस सुरुवात झाली आणि आता स्तोकहोल्मजवळ पोहोचतो आहोत तेव्हाही हिमवृष्टी आहेच जवळजवळ साडेचारशे कि. मी आम्ही रात्रीत मागे टाकले होते नॉर्वेच्या पूर्व सरहद्दीवरून स्वीडनच्या पूर्व सरहद्दीवर आम्ही येत होतो स्वीडन सुप्रसिद्ध टेनिसपटू ब्योन बोर्गचा देश अभिनेत्री इन्ग्रिड बर्गमनचा आणि प्रसिद्ध नाटककार स्ट्रिण्डबर्गचा देश पण माझ्यासमोर महत्त्वाची गोष्ट होती ती नोबेल पारितोषिके देणारी स्वीडिश अकादमी विश्व साहित्याची सकल्पना साकार करणारा, शातता आणि मैत्रीसाठी झटणारा एक आधुनिक बालेकिल्ला माझे मन एकाच वेळी अस्वस्थता आणि आनद याचा विलक्षण अनुभव घेत होते.

काल रात्रीचे ते प्रवाशाच्या बॅगा हुगणारे कुत्रे आणि तो पोलीस अधिकारी कोठे दिसतात का ते पाहात होतो त्या कुत्र्याने आम्हाला आमची बॅग उघडून दाखविणे भाग पाडले होते आणि त्या बेट्याचे बरोबरच होते आमच्याजवळ भारतीय लोणच्याची मोठी बाटली होती आणि चहाही होता आणि तो वास त्याला नवखा वाटलाच असणार. पण ती दोन्ही मडळी दिसली नाही बहुधा मध्यरात्रीच कोणत्यातरी स्टेशनावर उतरून ती गेली असावीत कुत्री, लहान मुले आणि माजरे मला चिकटतात त्याच्याशी मी नेमक्या भाषेत आणि खाली गुडघ्यावर बसून बोलतो. पण कालच्या कुत्र्याने ती सधी मला दिली नाही म्हणून आज भेटते का ते मी पाहात होतो

स्तोकहोल्म जसे जवळ येऊ लागले तशी मोठ्या आणि जरा उच इमारतींची सख्या वाढू लागली पण त्या दाटीवाटीने उभ्या नव्हत्या अधारात त्याची वास्तुरचना स्पष्ट दिसत नव्हती पण ती अनाकर्षक खचितच नव्हती रस्त्यावरचे धुक्यातील पिवळे दिवे चमचमत होते सर्वत्र शुकशुकाट होता आणि प्रवासी आपापल्या कूपेत असल्याने पॅसेजमध्येही शातता होती. शेजारच्या कूपेतील इटालियन नवराबायको मात्र आमच्याप्रमाणेच तयार झालेले होते

दहापधरा मिनिटे गेली आणि आमची ट्रेन स्तोकहोल्म स्टेशनात येऊन उभी राहिली. आमचा डबा शेवटून दुसरा होता आणि आम्ही सामान घेऊन खाली उतरतो न उतरतो तोच हिरव्या स्वेटरमधील एव्हर्ट समोरून येताना आम्हाला दिसला क्षणार्धात ओळख पटली कारण पुण्यात आमची ओळख झाल्याला काहीच महिने लोटले होते. एव्हर्टच्या चेहऱ्यावर आनद ओसडत होता आणि आम्हीही खुषीत होतो. हस्तादोलन करताच

या सुमारास उज्ज्वला आणि एव्हर्ट आम्हाला न्यायला स्टेशनवर आले नाहीत तर ? स्तोकहोल्ममधील लोकल रेल्वेचे स्टेशन जवळ आहे की दूर ? व्हॅलेंत्युना हा भाग स्तोकहोल्म रेल्वे स्टेशनपासून नक्की किती कि मी दूर असावा अनेक प्रश्न मनात गर्दी करीत होते बाहेर पडणाऱ्या हिमाचे तुकडे काचेच्या तावदानावर आदळत होते. आम्ही उस्लो सोडले तेव्हा हिमवृष्टीस सुरुवात झाली आणि आता स्तोकहोल्मजवळ पोहोचतो आहोत तेव्हाही हिमवृष्टी आहेच जवळजवळ साडेचारशे कि मी. आम्ही रात्रीत मागे टाकले होते नॉर्वेच्या पूर्व सरहद्दीवरून स्वीडनच्या पूर्व सरहद्दीवर आम्ही येत होतो स्वीडन सुप्रसिद्ध टेनिसपटू ब्योन बोर्गचा देश अभिनेत्री इन्ग्रिड बर्गमनचा आणि प्रसिद्ध नाटककार स्ट्रिण्डबर्गचा देश पण माझ्यासमोर महत्त्वाची गोष्ट होती ती नोबेल पारितोषिके देणारी स्वीडिश अकादमी. विश्व साहित्याची सकल्पना साकार करणारा, शातता आणि मैत्रीसाठी झटणारा एक आधुनिक बालेकिल्ला माझे मन एकाच वेळी अस्वस्थता आणि आनद याचा विलक्षण अनुभव घेत होते

काल रात्रीचे ते प्रवाशाच्या बॅगा हुगणारे कुत्रे आणि तो पोलीस अधिकारी कोठे दिसतात का ते पाहात होतो. त्या कुत्र्याने आम्हाला आमची बॅग उघडून दाखविणे भाग पाडले होते आणि त्या बेट्याचे बरोबरच होते आमच्याजवळ भारतीय लोणच्याची मोठी बाटली होती आणि चहाही होता आणि तो वास त्याला नवखा वाटलाच असणार. पण ती दोन्ही मडळी दिसली नाही बहुधा मध्यरात्रीच कोणत्यातरी स्टेशनावर उतरून ती गेली असावीत कुत्री, लहान मुले आणि माजरे मला चिकटतात त्याच्याशी मी नेमक्या भाषेत आणि खाली गुडघ्यावर बसून बोलतो पण कालच्या कुत्र्याने ती सधी मला दिली नाही म्हणून आज भेटते का ते मी पाहात होतो

स्तोकहोल्म जसे जवळ येऊ लागले तशी मोठ्या आणि जरा उच इमारतींची सख्या वाढू लागली पण त्या दाटीवाटीने उभ्या नव्हत्या. अधारात त्याची वास्तुरचना स्पष्ट दिसत नव्हती पण ती अनाकर्षक खचितच नव्हती. रस्त्यावरचे धुक्यातील पिवळे दिवे चमचमत होते. सर्वत्र शुकशुकाट होता आणि प्रवासी आपापल्या कूपेत असल्याने पॅसेजमध्येही शातता होती शेजारच्या कूपेतील इटालियन नवराबायको मात्र आमच्याप्रमाणेच तयार झालेले होते.

दहापधरा मिनिटे गेली आणि आमची ट्रेन स्तोकहोल्म स्टेशनात येऊन उभी राहिली आमचा डबा शेवटून दुसरा होता आणि आम्ही सामान घेऊन खाली उतरतो न उतरतो तोच हिरव्या स्वेटरमधील एव्हर्ट समोरून येताना आम्हाला दिसला क्षणार्धात ओळख पटली कारण पुण्यात आमची ओळख झाल्याला काहीच महिने लोटले होते एव्हर्टच्या चेहऱ्यावर आनद ओसडत होता आणि आम्हीही खुषीत होतो. हस्तादोलन करताच

त्याने आमची बॅग घेण्याचा प्रयत्न केला. पण ते होणे नव्हते प्रवास कसा झाला, केव्हा ट्रेनवर चढलो इ गोष्टी बोलता बोलताच एव्हर्टच्या मागोमाग आम्ही चालू लागलो.

आम्ही गाडीत बसलो आणि व्हॅलेंत्युना या उपनगराच्या दिशेने निघालो तेव्हा उजाडू लागल्याचा भास झाला. पण तो भासच होता ज्या मोठ्या रस्त्यावरून आम्ही जात होतो त्यावर भरपूर प्रकाश असल्यामुळे तसे वाटत होते. शहराचे प्रथम दर्शन असे झालेलेच नव्हते रात्री एखादे शहर दिसावे तसेच स्तोकहोल्म दिसले होते दिसत होते. उस्लोप्रमाणेच येथेही मोठमोठ्या पाट्या आणि जाहिराती याचा पूर्ण अभाव दिसत होता. मुख्य स्तोकहोल्मच्या दिशेने निघालेल्या मोटारी मात्र डाव्या बाजूने बऱ्याच जात होत्या रस्त्याने दिसणारी झाडे आणि घरे यात एकदम तफावत आढळत नव्हती. काही ठिकाणी लाकडाचे ओंडके रचून ठेवलेलेही नॉर्वेतल्यासारखेच दिसत होते पण मुख्य फरक जाणवत होता तो सपाट आणि विस्तृत भूभाग दिसत असल्याने त्या अर्धप्रकाशातही आम्हाला मोकळ्यावर आल्यासारखे वाटत होते रेल्वे प्रवासातही शांत झोप झाल्यामुळे प्रसन्न व उत्साही वाटत होते.

ॲण्डरसन कुटुंबाच्या घरासमोर आमची गाडी उभी राहिली सामान उतरून घेऊन बर्फ तुडवीत आम्ही घरात आलो घराचे प्रवेशद्वार पुढून समोरून नव्हते तर बाजूने होते. घर एकमजली होते नॉर्वेतील घराएवढे मोठे नव्हते पण प्रशस्त होते. उज्ज्वला ॲण्डरसन आणि तिची मुले निकलस आणि विवेका यानी आमचे स्वागत केले. आम्ही क्लोकरूममध्ये ओव्हरकोट व शूज काढून ठेवले आणि आत गेलो. दिवाणखान्यात गेल्यावर आम्हाला खूप बरे वाटले. भारताची साक्ष देणाऱ्या अनेक वस्तू तेथे होत्या एक केळीचे झाड तजेलदार पाने घेऊन डौलाने उभे होते कृष्ण, गणपती याची चित्रे असणारी बाटिक्स होती. कपाटात मराठी पुस्तके होती, वस्तू होत्या. उज्ज्वलाशी आम्ही सवयीने इंग्लिशमधूनच बोलत होतो. पण मग अधूनमधून मराठी वापरू लागलो. एव्हर्ट उपस्थित असला की पुनश्च इंग्लिश कारण आम्ही काय बोलतो ते त्याला कळावे मुलाना मराठी आणि इंग्लिश दोन्ही येत नव्हते ती स्वीडिश बोलत होती. आम्ही काय बोलू त्यातील काही भाग उज्ज्वला आणि एव्हर्ट त्याना स्वीडिशमधून अनुवादित करून सागत त्याच्या चेहऱ्यावरून त्याच्या प्रतिक्रिया आम्हाला कळत

सकाळचा चहा खूप रंगला बघता बघता बाहेर उजाडले दुपारी तीन वाजता आमची स्वीडिश अकादमीला भेट ठरली होती मधे वेळ होता पण बाहेर हिमवृष्टी चालू होती आणि प्रतिकूल हवा होती आम्हाला गप्पा मारीत मारीत आमचे आवरणे भाग होते. निकलस आणि विवेका अतिशय गोड मुले होती. उज्ज्वला चाफळकर देशस्थ ब्राह्मण टपोरे बोलके डोळे, काळासावळा वर्ण, जाड लाबसडक केस, हसरा चेहरा.

पण मुले पूर्ण स्वीडिश होती  विवेकाचे डोळे थोडे गडद होते. पण ती तेथलीच होती. नॉर्वेतील अनेक मुले स्मृतीत होती. त्याच्या तुलनेत या मुलाची चण थोडी बारीक, नाजूक वाटत होती  पण पुण्यात ओळख झाली होती त्यावेळेपेक्षा मुले जास्त बोल्ड व खुषीत वाटत होती. जास्त रंगीत कपडे घातलेली वाटत होती. ॲण्डरसन हे आतरराष्ट्रीय जोडपे होते. पुण्यातील लाटकर कुटुबाच्या नात्यातील वर्तुळात उज्ज्वला आहे. त्यामुळे आम्ही ॲण्डरसन कुटुब पुणे - नागपूरला आले असताना त्याच्याशी ओळख करून घेतली होती  देशस्थांना ओळख जमविणे आणि मित्र जोडणे उपजत येते. परिणामी उज्ज्वला ॲण्डरसन यानी स्वीडनमध्ये परत गेल्यावर स्वीडिश अकादमी आणि बोनिएर प्रकाशक यांना माझा व कॉण्टिनेण्टलचा परिचय करून दिला  त्यातून गाठीभेटी आणि आमच्या स्वीडन भेटीचे निश्चित झाले. आम्ही ॲण्डरसन मडळींचे पाहुणे म्हणून आता स्तोकहोल्ममध्ये आलो होतो  स्वीडिश अकादमीचे एक सदस्य स्टयुरे ॲलन आणि बोनिएर प्रकाशनाचे आल्बर्ट बोनिएर हे आम्हाला भेटायला राजी आणि उत्सुक होते.

[illegible] कार्यालय स्तोकहोल्मच्या जुन्या भागात आहे. राजवाडा, जुने चर्च, पार्लमेंट ह्या महत्त्वाच्या इमारती सस्था जवळ जवळ आहेत. तेथे स्टॉक एक्सचेंजची इमारतही आहे. आणि या इमारतीच्या वरच्या मजल्यावर स्वीडिश अकादमीचे हॉल्स आणि नोबेल लायब्ररी आहे  स्वीडिश अकादमी दोनशे वर्षांची आहे तर नोबेल पारितोषिके विसाव्या शतकात दिली गेलेली आहेत. आम्ही ३ च्या आधी तेथे पोहोचलो. ॲण्डरसन पतिपत्नी व आम्ही दोघे होतो  पण आमच्या मागे हट्टाने लागलेल्या विवेकालाही बरोबर घेतले होते. पाऊस भरपूर पडत होता. पण आम्हाला [illegible] मिळाली.

अकादमीत गेलो  प्रथमदर्शन अगदी प्रसन्न नव्हते  झुबरे खूप होती  आणि सतराव्या शतकातील फ्रेंच हॉल्ससारखे हॉल्स होते  प्रकाश पुरेसा वाटत नव्हता. थोडा वेळ गेला आम्ही आल्याची वर्दी दिली गेल्यावर २ - ३ मिनिटानी श्री. आन्दर्स रायबर्ग आले आणि त्यांनी हसतमुखाने आमचे स्वागत केले. रायबर्ग याना माझी माहिती अगोदरच होती आणि नतरच्या चर्चेवरून असे वाटले की त्यानी गृहपाठ केलेला असावा.

आमचा एकदर प्रवास, नॉर्वेतील मुक्काम, स्तोकहोल्मपर्यंतचा प्रवास याविषयी त्यानी प्रश्न विचारले. नंतर ते म्हणाले  ‘ आमची अपेक्षा अशी होती की तुम्ही गुरुवारी याल  ’

‘ कारण ? ’ मी कुतूहलाने विचारले.

‘ कारण दर गुरुवारी साहित्यविषयक समितीचे सदस्य भेटतात. त्याची तुमची भेट झाली असती. आज शुक्रवार आहे. ’ आन्दर्स.

आमचे सर्वांचेच चेहरे एकदम बदलले. एका दिवसात महत्त्वाची सधी हुकली होती उज्ज्वला ॲण्डरसन याना अतिशय अचूकपणे ही माहिती मिळालेली नसावी किंवा काहीतरी गफलत झाली होती. अर्थात स्ट्युरे ॲलन बाहेरगावी होते आणि सगळे सदस्य दर बैठकीला येतातच असे नाही. शिवाय हे विन्टर सेशन होते तरी गुरुवारी येणे जास्त महत्त्वाचे होते हा धक्का पचविणे मला जड गेले श्री. रायबर्ग हे नोबेल लायब्ररीचे प्रमुख आणि साहित्याच्या १७ सदस्याच्या कमिटीचे निमत्रक होते. आहेत. त्यामुळे वाईट वाटले नाही. त्यानी आस्थापूर्वक आणि मनापासून माहिती दिली पाचपर्यंत आम्ही पाहात आणि बोलत होतो

महाराष्ट्रविषयक आणि मराठी साहित्यिकाची मराठी पुस्तके मी आधीच स्वीडिश अकादमीस पाठविली होती ती स्ट्युरे याच्याकडे गेली होती आणि नोबेल लायब्ररीकडे मराठी पुस्तके नव्हती मी बरोबर नेलेली पधरासोळा पुस्तके रायबर्ग याना दिली प्रत्येक पुस्तक कशाविषयी आहे हे सांगितले स्वीडिश अकादमी पुस्तके स्वीकारते, सस्थानी दिलेले प्रस्ताव प्रपोजलस स्वीकारते पण प्रत्यक्ष प्रस्तावाची चर्चा गुप्तपणे होते आणि गुप्त राहते कारण ती फुटली तर वृत्तपत्रे त्याचा गैरवापर करतात व राजकारण उभे करतात.

नोबेल लायब्ररीत अनेक भाषातून आलेली पुस्तके आहेत ही लायब्ररी हे स्वीडिश अकादमीच ( instrument ) साधन आहे दोन मोठे विभाग इंग्लिश व फ्रेंच भाषातील पुस्तकाचे आहेत इतर भाषाची पुस्तके कमी दिसली मराठीतील अरविंद गोखले याचा एक इग्रजी कथासग्रह, अनतराव शेवडे याच्या दोन कादबऱ्या कार्ड इडेक्सवरून दिसल्या अमृता प्रीतम याची बरीच पुस्तके दिसली आणि भट नावाच्या उत्तरेकडील साहित्यिकाची पुस्तके दिसली रवींद्रनाथ याची खूपच आणि बगाली साहित्यिकाची अनेक पुस्तके दिसली

मी म्हटले, 'स्वीडिश अकादमीची consideration माझ्याजवळ आहेत. फाऊण्डेशनने काढलेल्या इग्रजी खडात ती आहेत पण ती पाहाता आणि येथील आपल्याकडील पुस्तके पाहाता दक्षिण भारत तुमच्या वाङ्मयीन नकाशावर आढळत नाही '

रायबर्ग हसले, ते म्हणाले, ' ही तुमच्यासारख्या हितचितकाची जबाबदारीही आहे. भाषा आमची मर्यादा आहे इग्रजीतून पुस्तके जरूर पाठवा. पण आमच्याकडे नावेच नाहीत असे होणार नाही. कम्प्युटरवर माहिती भरलेली आहे.'

चला आपण ती पाहू.' मी म्हटले. आम्ही त्या विभागात गेलो. मी कुसुमाग्रज आणि शिवराम कारथ ही नावे पाहा म्हटले. ही दोन्ही नावे नव्हती वि स खाडेकराचे

नाव विचारले तेही नव्हते. मी म्हणालो, 'कुसुमाग्रज आणि कारथ ही नावे दक्षिण भारतातील फार महत्त्वाची नावे आहेत या दोन्ही साहित्यिकाना ज्ञानपीठ पुरस्कार मिळालेले आहेत माझे वैयक्तिक मत मी नोंदवीत नसून वस्तुस्थिती सागत आहे '

रायबर्ग याना माझ्या विधानातील गाभीर्य जाणवले. त्यानी माझ्याकडून आणि उज्ज्वला ॲण्डरसन याच्याकडे पाहात जास्तीत जास्त माहिती नोंदविली कम्प्युटर विभागाच्या दोन स्त्री - तज्ज्ञानाही समाधान वाटलेले दिसले मी केवळ लेखक, वाङ्मयाचा अभ्यासक वा प्रेमी नसून एका मातब्बर प्रकाशनसस्थेचा एक सचालक आहे आणि मराठी विश्वकोशाशी सबध असलेला युरोपीय वाङ्मयाचा एक सपादक आहे ही गोष्ट त्याना जास्त महत्त्वाची वाटत होती असे दिसले. मी रोटरी इटरनॅशनलचा सदस्य म्हणून स्कॅण्डिनेव्हियात आलो आहे ही घटनाही त्याना महत्त्वाची वाटलेली दिसली.

स्वीडिश अकादमीचा आवाज मला महत्त्वाचा व आदरणीय वाटतो विसाव्या शतकातील युरोपच्या आणि जगाच्या रक्तलाछित राजकारणात आपण साहित्याची वैश्विक पताका फडकावीत ठेवली आहे यामुळे अन मराठी सुशिक्षिताना आपल्या पारितोषिकाविषयी खूप विश्वास वाटतो हे सांगितल्यावर रायबर्ग गालातल्या गालात हसले आणि मला त्यानी स्वीडिश अकादमीचे सदस्य कोठे चर्चा करतात त्या हॉलकडे नेले त्या हॉलमधील टेबलाशेजारी माझे रायबर्ग याच्यासमवेत श्री एव्हर्ट ॲण्डरसन यानी छायाचित्रदेखील घेतले ज्या घड्याळ्याचे बाराचे ठोके पडताच पारितोषिकाचे नाव जाहीर होते ते जुन्या काळातील घड्याळ पाहताना आम्हाला खूप मौज वाटली विवेकाच्या लक्षात नतर ते घड्याळ फक्त राहिले होते

स्वेन्स्का अकादमीची स्थापना तिसऱ्या गुस्ताव राजाने इ. स. १७८६ मध्ये केली. हा राजा स्वत साहित्यिक पिंडाचा व आवडीनिवडीचा होता. नाटक आणि ओपेरा त्याचे आवडते होते. स्वीडिश भाषेचा विकास व्हावा, वाङ्मयास उर्जितावस्था यावी यासाठी ही अकादमी स्थापन झाली आणि युद्धाचे कालखंड सोडले तर आजतागायत स्वीडिश भाषेचा मोठा कोश तयार करण्याचा प्रकल्प चालू आहे तो कोश पाहताना मराठी भाषेचा असा भावी कोश माझ्या मनासमोर तरळत होता गुस्ताव राजाचा पुतळा असलेला भव्य हॉल प्रमुख आहे या पुतळ्यासमोर आमचे फोटो काढणे उचित आहे हे रायबर्ग याच्या बोलण्यावरून वाटल्याने आम्ही तसा फोटो घेतला या हॉलमध्ये पारितोषिके जाहीर करण्याचा समारभ होतो 'टू दोज हू ड्यूरिंग दि प्रिसीडिंग इयर शॅल हॅव कनफर्ड दि ग्रेटेस्ट बेनिफिट ऑफ दि मनकाईण्ड' हे शब्द सार्थ ठरू शकतील अशाच्या सेवेला नोबेल पारितोषिके दिली जातात प्रत्यक्ष पारितोषिक वितरणाचा समारभ व नतरची पार्टी शहरातील नगरपालिकेच्या भव्य सभागृहात होते. पदार्थविज्ञान,

रसायनशास्त्र, वैद्यकशास्त्र, वाङ्मय आणि अर्थशास्त्र याची पाच पारितोषिके प्रतिवर्षी दिली जातात सध्याची पारितोषिकाची रक्कम सुमारे ३९ लाख रु प्रत्येकी आहे. शांततेचे सहावे पारितोषिक उस्लोत दिले जाते जेथे प्रत्यक्ष सोहळा होतो तो हॉलही आम्ही पाहिला पण बाहेरून कारण हिवाळा असल्याने तो बद होता जाताना पाल्मे या बोफोर्स - फेम पतप्रधानाना जेथे गोळ्या घालून ठार मारण्यात आले ती जागाही पहिली विशेष म्हणजे त्या जागेवर फुले ठेवलेली होती मेल्यावर शत्रुत्व किंवा कडू भावना विसरावी असा संकेत तेथे पाळला गेलेला दिसला.

पार लॅगर्कविस्ट याची ' *बराबस* ' कादबरी मराठीत आलेली आहे आणि ती अप्रतिम आहे हे मी श्री रायबर्ग याना सागितले तेव्हा त्याचा चेहरा अभिमानाने उजळला ' तुम्ही इब्सेनचे चाहते आहात स्ट्रिण्डबर्ग हा आमचा मोठा नाटककार आहे तर ' ब्लू टॉवर ' येथील त्याच्या म्युझियमला तुम्ही आवर्जून भेट द्या ' असा सल्ला मला रायबर्ग यानी दिला. ते मी निश्चित करीन असे आश्वासन मी त्याना दिले.

दोन - सव्वादोन तासाच्या चर्चेत आम्ही खूप बोललो. केवळ रवीन्द्रनाथाना हे पारितोषिक मिळाले म्हणून मी आलो नसून अकादमीविषयी मला आस्था आहे हे रायबर्ग याना जाणवले. स्वीडिश अकादमी आणि नोबेल पारितोषिक याच्याविषयींच्या अत्यंत उत्कृष्ट पुस्तकाचे दोन सेट्स त्यानी आम्हाला भेट दिले स्वीडिश भाषेतील पुस्तकाचा सेट ॲण्डरसन पतिपत्नींना दिला तर इंग्लिश भाषेतील पुस्तकांचा सेट आम्हा पतिपत्नींना दिला त्या वेळी माझ्या भावना आणि स्मृती उचबळून आल्या.

अकादमीच्या वेगवेगळ्या हॉल्समधून हिंडत असताना आपण राजवाड्याच्या दालनातून हिंडतो आहोत असे वाटत होते सोनेरी नक्षीकाम, जुन्या ठेवणीचे फर्निचर आणि मोठमोठाले गालिचे यामुळे तसे वाटत होते. आपण राजवाड्यातून हिंडतो आहोत ही भावना सस्थेच्या कार्याशी परिचय असल्यामुळे तितकीशी सुखावह वाटत नव्हती. ही भावना मी व्यक्त केल्यावर रायबर्ग म्हणाले,

' अकादमीचे १७ सदस्य आजीव सदस्य आहेत नवा सदस्य सर्वानुमते घेतला जातो अर्थात त्या वेळी एक जुना सदस्य वारलेला असतो किंवा त्याने राजीनामा दिलेला असतो. पण अकादमीने वेळोवेळी नव्या वाऱ्याची पर्वा केलेली दिसते. येथील वातावरण जुने आहे याच्यावर जाऊ नका '

मी त्याना साहित्य अकादमी आणि ज्ञानपीठ याची माहिती देण्याचा प्रयत्न केला तेव्हा त्याना या दोन्ही सस्थाची कल्पना आहे असे दिसून आले. या दोन्ही संस्थाकडून

आम्ही प्रस्ताव स्वीकारू शकतो असेही ते म्हणाले. हसत हसत ते पुढे म्हणाले की फक्त व्यक्तींनी स्वत ची नावे सुचवू नयेत एवढेच

‘ अशा व्यक्ती भेटतात ? ’ मी थक्क होऊन विचारले.

‘ अर्थात ! जगात अनेक प्रकारची माणसे असतात ’ रायबर्ग म्हणाले.

त्यावर मी आमच्या मडळींकडे पाहून म्हणालो, ‘ आमची मराठी मडळी झडझडून दुसऱ्या कोणाचेच नाव सुचविणार नाहीत पण स्वत चेच नाव सुचविण्याचे धाडस नक्की करणार नाहीत. ’

या वेळी ॲण्डरसन म्हणाले, ‘ स्ट्रिण्डबर्ग या स्वीडिश लेखकाचे नाव अकादमीपुढे वारवार ठेवूनही त्याला नोबेल प्राईज कधी मिळाले नाही त्यामुळे त्याच्या चाहत्यानी त्याला ॲण्टिनोबेल पारितोषिक दिले ’

ॲण्डरसन याच्या या विधानावर रायबर्ग म्हणाले, ‘ नोबेल पारितोषिक दिले जाताना तो लेखक ध्येयवादी - आयडियालिस्ट आहे की नाही हे पाहिले जाते. आयडियालिस्ट हा शब्द खूप सदिग्ध आहे स्ट्रिण्डबर्ग त्या वेळच्या आयडियालिस्ट या शब्दात बसत नव्हता. एवढेच नाही तर इब्सेनही बसत नव्हता. ’

अर्थात या खुलाशाने ॲण्डरसन याचे समाधान झालेले नव्हते उलट त्याच्या चेहऱ्यावर स्मितात मिश्किलता आलेली होती.

घड्याळ्याचा काटा बघता बघता पाचवरून पुढे सरकरला बाहेर अधार दाटला होता पाऊस उघडल्यासारखे वाटत होते. आमची व्हिजीट लाबलेली होती. आम्ही आनदाने श्री रायबर्ग याचा निरोप घेतला. निघताना आम्ही तुमच्याशी सपर्क ठेवू असे मी म्हणालो. त्यावर ‘ अर्थातच् ’ असे ते म्हणाले.

आमची गाडी परतीचा मार्ग चालू लागली. काही वेळ गेल्यावर ॲण्डरसन म्हणाले ‘ मला नक्की नावे आठवत नाहीत पण अकादमीच्या दोन सदस्यानी स्वत लाच पारितोषिक मिळविण्याची खटपट केली होती तेव्हा फार गहजब उडाला होता. ’ ते ऐकून मला फार मौज वाटली पण त्या विधानाच्या खऱ्या खोट्यात जाता आले नाही

‘ तुमच्यामुळे आमची ही भेट घडली. एरवी आम्ही दरवर्षीचा सोहोळा टी. व्ही वर बघतो. पण येथे असूनही आम्ही येथे आलो नसतो. ’ उज्ज्वला समाधानाने म्हणत होती. मलाही मनापासून आनद झाला होता हेमिग्वे, पास्तरनाक, सार्त्र, काम्यू, सोयिंका अशा अनेक थोर साहित्यिकाच्या साहित्यकृती माझ्या मनात गर्दी करीत होत्या. अनेक वादळे येऊन गेली, तरी किनाऱ्यावर उभा असलेला दीपस्तभ जसा शातपण प्रकाशत

असतो तशी प्रकाशत असलेली अकादमी आम्ही पाहून परतत होतो. डाव्या बाजूला स्तोकहोल्म फ्योर्दमध्ये अनेक बोटी उभ्या होत्या. त्यात फिनलडला जाणारी एक प्रचड फेरी बोट पाहून आमचे कुतूहल जागे झाले आणि आम्ही त्याविषयी बोलू लागलो उज्ज्वलाला त्या फेरीने फिनलडला जाण्याचा योग लवकरच येणार होता

भारतातून निघताना मी मनाशी असे ठरविले होते की या दौऱ्यात साहित्याच्या वाढीसाठी व सच्च्या प्रगतीसाठी हातभार लावणाऱ्या अत्युत्कृष्ट सस्था पाहायच्या. मुद्रक, प्रकाशक, ग्रथविक्रते, वाङ्मय परिषदा, प्रकाशक - लेखक सघटना, त्याचप्रमाणे ट्रस्ट्स आणि पारितोषिके देणाऱ्या सस्था. त्यात स्वेन्स्का अकादमी समाविष्ट होती. ही भेट झाली याचा आम्हाला खूप आनद झाला होता

□

## ४७. रोपे, बिया, अवजारे यांचे प्रचंड स्टोअर

स्वीडनमध्ये आम्ही एका खते, बीबियाणे, यंत्रे, अवजारे, कुड्या, रोपे झाडे याच्या दुकानात गेलो हे दुकान अतिशय मोठे होते आम्ही मोठ्या प्रदर्शनातून हिंडतो आहोत असे आम्हाला वाटले.

येथे आम्हाला जाणवले ते प्रत्येक वस्तूतील वैविध्य कुड्या कुड्या अनत प्रकारच्या कुड्या होत्या मातीच्या, काचेच्या, प्लॅस्टिकच्या, लाकडाच्या, धातूच्या रोपे रोपे अनत प्रकारची रोपे, झाडे होती तीच तऱ्हा कात्र्या, सुऱ्या, कोयते, याची होती रेखा झाडाची व अशा गोष्टींची प्रेमी. ती हरवून गेली, बाहेरच पडायला तयार होईना. असख्य वनस्पतींची बीबियाणे आकर्षक रगीत पाकिटातून होती आम्ही ब्रोकोली, कीना कोल आणि रेड कॅबेज याच्या बिया घेतल्या. प्लॅस्टिकच्या छोट्या कुड्या घेतल्या

आम्हाला या स्टोअरने विलक्षण आनद दिला. स्वीडनमधील लोक झाडे, वृक्ष याच्यावर किती प्रेम करतात हे दिसून आले. गुलाबाचे प्रकार तर वेडे करणारे होते. ह्या गोष्टी तुम्हाला उस्लोत किंवा स्तोकहोल्ममध्ये मिळतील असे नॉर्वेजियन्स का म्हणत होते ते येथे आल्यावर उलगडले. नाही असे काही येथे नव्हतेच. काही भारतीय झाडेही होती पण त्याच्या किंमती फार होत्या. स्वीडनमधून एक 'खिसमस फर' घ्यावा अशी अनिवार इच्छा झाली पण तो मोह शेवटी आवरला.

आपला देश कृषिप्रधान, पण असे प्रचड दुकान पाहिल्याचे मला आठवत नाही. स्तोकहोल्म म्हटले की हे दुकान डोळ्यासमोर तरळू लागते

☐

## प्रकाशक बोनिएर यांची भेट ४८.

उज्ज्वला ॲण्डरसन याची मैत्रीण नलिनी यमदग्नी ही उत्तर हिंदुस्थानी होती तिने आल्बर्ट बोनिएर याच्याशी लग्न केले आहे ती २ वर्षे वयाची असल्यापासून स्वीडनमध्येच वाढली आहे बोनिएर फॅक्टा ही स्वीडनमधील फार मोठी प्रकाशक मडळी आल्बर्ट बोनिएर त्या भागीदार - सचालाकापैकी एक आहे. उज्ज्वला ॲण्डरसनने या मडळींनाच घरी जेवायला बोलविले व आमची त्याच्याशी गाठ घालून दिली. शनिवार - रविवार असल्याने आम्ही बोनिएर कपनीला मात्र भेट देऊ शकलो नाही. ललित वाड्मय आणि अन्य वाड्मय दोन्ही पुस्तके प्रकाशित करणारी ही सस्था आहे. आल्बर्ट बोनिएर नॉन - फिक्शन भागाकडे बघतात. त्याच्या विभागात साठ माणसे आहेत.

आल्बर्ट बोनिएर जेमतेम तिशी ओलाडलेले तरुण होते दिसायला रुबाबदार होते. त्याची पत्नी नलिनी ही झरझरीत व सडपातळ होती. तिचे डोळे व केस छान वाटले ती जर्नालिस्ट होती तिचे वडील गेले कित्येक वर्षे शास्त्रज्ञ म्हणून स्वीडनमध्ये आहेत

आल्बर्ट बोनिएर तरुण होते तरी त्यानी जगातील खूप देश पाहिलेत चीन व भारतही पाहिलेत त्याचे भारताविषयी मत चागले होते पण भारतीय त्याना आवडलेले दिसत नव्हते पण ही घटना ते खुमासदार विनोदातून माडीत होते ते म्हणाले, ‘ आम्ही भारतात हनीमून साजरा करायला गेलो पण लोकानी आम्हाला सोडलेच नाही. शेवटी प्रवास झाला पण हनीमून राहूनच गेला ’ त्यावर मी म्हणालो, ‘ आता त्या साठी परत या महाराष्ट्रातील माणसे कमी लागट आहेत याचा फायदा मिळेल ’

बोनिएर कपनी भारतावर पुस्तके काढते चद्रगुप्तावर एक कादंबरी, ताजमहालाचा इतिहास, गगेचे वर्णन, नेहरू घराणे, भारतीय पाककला, अशा विषयावर त्यानी केलेली पुस्तके पाहावयास मिळाली पुस्तकाच्या निर्मितीचा दर्जा फार वरचा होता ताजमहाल व गगेवरील पुस्तके तर आर्ट पेपरवर छापलेली होती त्याना मी कॉन्टिनेन्टलची काही पुस्तके भेट दिली.

बोनिएर कपनी चार भाषातून पुस्तके प्रकाशित करते. स्वीडिश, इंग्लिश, डॅनिश आणि फ्रेंच भारतातील भाषाविषयक प्रश्नाची गुतागुत समजून घेणे आल्बर्ट याना जड गेले नाही

आमच्या चर्चेत दोन विषय आलेच एक म्हणजे सलमान रश्दी आणि दुसरा म्हणजे पीटर ब्रूक्सचे महाभारत पीटर ब्रूक्सच्या महाभारताला मी 'फूलिश' म्हटल्यामुळे चर्चेचे रूपातर वादविवादात झाले ती सारी मडळी ब्रूक्सच्या महाभारताची तरफदारी करीत होती. त्यांचा असा समज झाला की मी आपल्या टी. व्ही वरील हिंदी महाभारताचे समर्थन करीत आहे. पण मी युनिव्हर्सॅलिझम आणि इटरनॅशनॅलिझम दोन वेगळे आहेत आणि हे ब्रूक्स यानी लक्षात घेतलेले नाही हे मांडीत होतो. शेवटी मी म्हणालो, 'महाभारत हा माझ्या आवडीचा किंवा अभ्यासाचा विषय नव्हे: पण केवळ पीटर ब्रूक्सने केला आहे म्हणून त्या चित्रपटाला मी टाळ्या वाजविणार नाही.' यानतर वाद मिटला. एव्हर्ट ॲण्डरसन यानी उची स्कॉच कपाटातून काढली.

सलमान रश्दी आणि बोफोर्स हे दोन्ही विषय झाले. या विषयावरील माझी मते मात्र बोनिएर जोडप्याला आवडलेली दिसली स्वीडिश जनतेलाही बोफोर्स आवडलेले नाही हे बोनिएर यानी मला बजावून सागितले.

आल्बर्ट बोनिएर याना महाराष्ट्रात - भारताल इब्सेन परिचित आहे हे ऐकून आश्चर्य वाटले त्याचा मुद्दा एकच होता - 'नॉर्वे आणि भारत हे अगदी सर्वस्वी भिन्न आहेत. त्याच्यात साम्य काहीच नाही तरी इब्सेन महाराष्ट्रात आवडला कसा ?'

त्यांना मी म्हणालो, 'तुम्ही प्रकाशक आहात. ह्या प्रश्नाचे तुम्हीच उत्तर देऊ शकाल. या देशातील वाङ्मय त्या देशात आवडणे भौगोलिक वा सांस्कृतिक परिस्थिती ओलाडून जाऊ शकते.' पण बोनिएर यांचे सर्वस्वी भिन्न ( टोटली डिफरन्ट ) हे शब्द माझ्या मनावर परिणाम करून गेले. त्यात अर्थ होता.

बोनिएर पतिपत्नींशी चर्चा करताना असे लक्षात आले की स्वीडन हा नॉर्वेशी तुलना करता जास्त औद्योगिक, व्यापारी आणि पुरोगामी आहे स्वीडन आणि वेस्ट जर्मनीचे सबध छान आहेत स्वीडिश माणसे धाडसी आहेत. स्वीडिश माणसांना अमेरिकन लेखकांची बेछूट पुस्तके आवडतात अमेरिकन लेखिका स्वीडनमध्ये आवर्जून वाचल्या जातात. एवढेच नव्हे तर अमेरिकन पुस्तके स्वीडिशमध्ये अनुवादित होतात व खपतात देखील स्वीडिश माणसे नॉर्वेजियन लोकांपेक्षा मनाने जास्त खुली आहेत आणि जास्त देखणीदेखील आहेत. 'अनमॅरिड कपल्स' स्वीडनमध्ये भरपूर प्रमाणावर आहेत आणि

स्वीडनमध्ये धार्मिकतेला विशेष महत्त्व उरलेले नाही. कोणीही प्रकाशक वा वृत्तपत्रे धार्मिकतेला प्राधान्य देत नाही.

स्वीडनमध्ये लेखकाकडून काही रक्कम घेऊन प्रकाशक पुस्तके काढतात का ? या प्रश्नावर बोनिएर नाही म्हणाले त्याना हा प्रकार भारतात काही वेळा होतो हे ऐकून फार मौज वाटली.

बोनिएर याना बोलविल्यामुळे शनिवारी रात्रीच्या पार्टीला खूपच मजा आली. बोनिएर पतिपत्नींचा व्यवसाय असा की त्याना खूप गोष्टीत रस होता. मी फ्रेंच प्रकाशक गालिमार, आशेत आणि लारूझ याच्या पूर्वी भेटी घेतल्याचे ऐकून त्याना समाधान वाटले

अनुवादाच्या दृष्टीने '*माणदेशी माणसे*' पुस्तक मी त्याना दाखविले. पण हे पुस्तक 'प्रातिनिधीक' आहे हे त्याना उलगडेना. त्याचे मत हे होते की भारतासारख्या देशात अमुक एक तऱ्हेची माणसे 'प्रातिनिधीक' आहेत असे म्हणता कसे येईल ?

बोनिएर यानी त्याचे चीनमधील अनुभव व गमती एगवून सागितल्या भारत आणि चीन दोन्ही ठिकाणी लोकाची सख्या पाहून अक्षरश भीती वाटते व मन अस्वस्थ होते असे ते म्हणाले.

□

## ब्लू टॉवर ४१.

स्तोकहोल्म मुक्कामात आम्ही 'ब्लू टॉवर' पाहिले. मी इब्सेनवर काम करीत आहे म्हणूनच स्ट्रिण्डबर्गच्या या स्मारकास भेट द्यावी ही इच्छा एव्हर्ट ॲण्डरसन यानी प्रकट केली आणि ती आम्हाला आवडली.

'ब्लू टॉवर' हे एका चार मजली इमारतीचे नाव आहे. अगदी भर शहरात ही इमारत आहे. आयुष्याची अखेर स्ट्रिण्डबर्गने येथे घालविली आऊगुस्त स्ट्रिण्डबर्ग हा स्वीडिश नाटककार इब्सेनच्या नतरच्या पिढीतील. स्वीडनच्या दृष्टीने त्याचे माहात्म्य फार मोठे आहे. त्याची '*मिस् ज्यूली*' आणि '*दि फादर*' ही नाटके फार गाजलेली होती एक काळ इब्सेन - स्ट्रिण्डबर्ग ही नावे जोडीने घेण्यात येत. आज स्टिण्डबर्ग नाव मागे पडले असले तरी तो स्वीडनचा मोठा साहित्यिक होता यात शका नाही

'ब्लू टॉवर' मध्ये स्ट्रिण्डबर्ग तिसऱ्या मजल्यावर राही. चवथ्या मजल्यावर त्याचा

ग्रथसभार होता. आज जवळजवळ सपूर्ण तिसरा व चवथा हे मजले म्युझियम बनविलेले आहेत. स्ट्रिण्डबर्गच्या वस्तू, पुस्तके, कपडे, बिछाना, फर्निचर सारे सारे काही जतन करण्यात आले आहे स्ट्रिण्डबर्गच्या काही नाटकाची रूपातरे व प्रयोग अन्य देशातून झाले त्याची पोस्टर्स, छायाचित्रे, तिकिटे, परीक्षणे, इ. जतन करण्यात आले आहेत या सर्वात माझे लक्ष वेधून घेतले ते एका प्रचड गरुडाच्या स्टफ्ड ममीने. या गरुडाचे पख पसरलेले आहेत. आणि हा विलक्षण रुबाबदार पक्षी आहे. आपण आपले दोन्ही हात दूर केले की जेवढी लाबी भरेल तेवढी लाबी या पखाची सहज आहे.

स्ट्रिण्डबर्ग हा विकृत मनोवृत्तींचे चित्रण करणारा नाटककार होता. नाटकात नैतिकता आणणे त्याला नापसत होते. काही उत्साही समर्थक इब्सेन टॉलस्टॉयप्रमाणे होता तर स्ट्रिण्डबर्ग दस्तूयेवस्कीप्रमाणे होता असे माडतात. अर्थात ही तुलना योग्य नाही स्ट्रिण्डबर्ग बऱ्याच कमी कुवतीचा होता. इब्सेनमुळे स्ट्रिण्डबर्गचे नाव मागे राहते ही गोष्ट स्वीडिश मडळींना बोचते.

एव्हर्ट ॲण्डरसनने स्ट्रिण्डबर्गला नोबेल पारितोषिक न दिल्याने त्याच्या चाहत्यांनी ॲण्टिनोबेल प्राईज कसे दिले, त्याच्या मृत्यूनतर त्याची भव्य अत्ययात्रा कशी निघाली या गोष्टी आम्हास सागितल्या. आणि इब्सेननतर मी स्ट्रिण्डबर्गचा अभ्यास करावा अशी प्रेमळ सूचनाही केली. स्ट्रिण्डबर्ग म्युझियम मी अतिशय काळजीपूर्वक आणि आत्मीयतेने पाहिले याचे त्याना समाधान वाटले स्ट्रिण्डबर्ग हा तरुण नाटककार इब्सेनला खूप आवडत असे. मात्र त्या दोघाची भेट झाली नव्हती विसाव्या शतकाच्या मध्यावर निर्माण झालेल्या इंटिमेट थिएटरची मुळे काही तज्ज्ञ स्ट्रिण्डबर्गच्या नाटकात शोधतात

' ब्लू टॉवर ' हे ऐतिहासिक महत्त्वाचे असले तरी म्युझियम म्हणून वाटत नाही ती इमारत व तो भाग छाप पडावे असे नाहीत. सर्वसाधारण प्रवासी अशा वेळी दुर्लक्ष करून पुढे गेले तर त्याना दोष देता येणार नाही. ब्लू टॉवरला पाहण्यासाठी तिकीट आहे.

□

## ५०. शिएनच्या तीरावर

३० जानेवारी १९९० ज्या दिवसाची गेले कित्येक वर्षे मी आतुरतेने वाट पाहत होतो तो उजाडला. किंबहुना आला होता पण उजाडला नव्हता. अगदी अधारातच सकाळी सातच्या सुमारास आम्ही उस्लोहून शिएनला जाणाऱ्या ट्रेनवर चढलो. माझे मन इतके

अधीर आणि अस्वस्थ होते की पहाटे साडेतीन वाजल्यापासूनच मी जागा होतो. आणि साडेचारच्या सुमारास मी स्नान उरकून घेतले होते कधी नसतील एवढ्या माझ्या चित्तवृत्ती उल्हासित झाल्या होत्या. रेखासुद्धा अतिशय प्रसन्न मूडमध्ये होती. आमचा नॉर्वेतील मुक्कामाचा जणू सर्वात शेवटचा आणि अत्युच्च टप्पा गाठला जात होता

शिएन हे हेन्रिक इब्सेनचे जन्मगाव. दहाव्या शतकातील हे बंदर, इब्सेन जन्माला आला तेव्हा म्हणजे २० मार्च १८२५ च्या सुमारास विशेष महत्त्वाचे नव्हते येथे सागर व्यापारी नौका येत आणि जात. पण त्याची ख्याती अशी नव्हती. उलट आज, त्याकाळचे हे छोटेखानी गाव शेक्सपिअरच्या इंग्लंडमधील स्ट्रॅटफर्ड - अपॉन - एव्हन या गावाप्रमाणेच एक आंतरराष्ट्रीय महत्त्वाचे ‘ तीर्थक्षेत्र ’ बनू पाहात आहे वसंतऋतूत आणि उन्हाळ्यात नॉर्वेचे रूप अतिशय रम्य आणि सुखद असते एप्रिल ते ऑगस्ट या महिन्यात, जगभरचे नाट्यरसिक आणि साहित्यप्रेमी या ठिकाणी येऊन ‘ कृतार्थ ’ होऊन जात असतात शिएन नदीचे पात्र त्या वेळी गोठलेले नसते आणि तिच्यातून वाहणाऱ्या पाण्याचे रूप त्या वेळी गंगोत्रीसारखे वाटावे असे असते. मात्र उरलेले ७ - ८ महिने इकडे क्वचितच कोणी फिरकते कारण नॉर्वेतील सणसणीत हिवाळा सारे काही शुभ्र स्वच्छ हिमाखाली गाडलेले असते प्रवाशाच्या दृष्टीने पूर्ण प्रतिकूल हवा आम्ही मात्र नेमके याच प्रतिकूल हवेत शिएनला येत होतो

वाटेत प्रवासात मी बाहेरची दृश्ये अधाशासारखी टिपत होतो घनदाट सूचिपर्णी वृक्ष आणि तोडलेल्या ओंडक्याच्या साठ्याचे डेपो वारंवार लागत होते समुद्रकिनाऱ्यावरून ट्रेन जाताना पाहावी लागेल ही आशा मात्र फोल ठरली याउलट हिमाने आच्छादलेले डोंगर आणि हिमाखाली गाडली गेलेली छोटी छोटी गावे पाहावी लागली. मुख्य शहरी क्षेत्रापासून आम्ही जंगल भागात दूरदूर जात होतो अशी माझी भावना होती. आम्ही शिएनला जाण्यायेण्याचे सारे रिझर्वेशन केले होते पण प्रत्यक्ष रेल्वे ट्रेनवर फारच कमी माणसे होती. किंबहुना चारही डबे रिकामे होते. आपले पैसे रिझर्वेशनमध्ये फुकट वाया गेले याची हळहळ रेखाला वाटली बाहेर देशातून हिंडताना प्रत्येक क्रोनरचा आपण विचार करत असतो ना ! रेल्वेप्रवास मात्र अतिशय सुखद होता. रेल्वेचे डबे सीट्स, तावदाने, प्रकाशयोजना उंची आणि अद्ययावत होते. तावदानांना लावलेले पडदे उत्कृष्ट होते. बर्फाचे कारंजे उडवीत आमची ट्रेन वेगाने पुढे सरकत होती भारतातील रेल्वे प्रवास आणि हा प्रवास यात अक्षरश जमीन अस्मानाचे अंतर होते.

१० ।। च्या सुमारास आमची गाडी शिएनला आली. इब्सेनच्या चरित्रग्रंथातून शिएनचा उल्लेख छोटे नगर - स्मॉल टाऊन म्हणून असतो त्यावरून आपली कल्पना

भलतीच होते. वाटते की सातारा, सागलीसारखे हे गाव असेल. प्रत्यक्षात गाव फारच ऐसपैस पसरलेले आहे. नितान्त रमणीय आहे. रस्ते, घरे, चौक सुरेख आहेत गाव लहान आहे ते लोकसख्येच्या दृष्टीने लोकवस्ती चाळीस हजारापर्यंत आहे. एवढीशी लोकसख्या असली तरी तीन रोटरी क्लब्ज आहेत. आणि अनेक प्रकारच्या आधुनिक सस्था आहेत. कागद बनविण्याची एक मिल देखील आहे

डॉ ब्योर्न बात हे आम्हाला घ्यायला येणार होते आम्ही आमचे सामान घेऊन उतरलो ते त्यांना शोधण्याच्या दृष्टीने. पण मौज म्हणजे रेल्वे प्लॅटफॉर्मवरच एक ताबडी मित्सुबिशी गाडी उभी होती हॅट घातलेले आणि हिरव्या कोटातील एक गृहस्थ तेथे उभे होते नॉर्वेजियन मोजमापाने ते बुटके होते म्हणजे साडेपाच ते पावणे सहा फूट उंचीचे. आम्हाला पाहाताच ते एकदम पुढे आले त्यानी हॅट काढून हात पुढे केला माझ्या हस्तादोलनातील उत्कटता त्याना खचित जाणवली असणार. रेखानेही तिचा जड ओव्हरकोट सावरीत उत्फुल्लपणे त्याच्याशी हस्तादोलन केले किती वाजता निघालो, प्रवास कसा झाला याची चौकशी त्यानी केली. आम्हाला भूक लागली आहे का हा प्रश्न त्यानी केला. गाडीत बसून राहणाऱ्या माणसाला भूक काय लागणार ? सकाळी निघतानाच आम्ही खाऊन निघालो होतो

त्यानी मी खूप शिस्तशीर माणूस आहे असे वाटून कार्यक्रमाची रूपरेषा मला सागितली. ते म्हणाले, ‘ प्रथम गावातील दोन - तीन पाहायला हवीत अशी स्थळे आपण पाहू नतर दुपारी दीड - दोनच्या सुमारास आपण जेवण घेऊ आणि मग वेनस्त्योपला आपण जाऊ तेथे इब्सेनचे घर आहे ते नीट पाहू आणि मग माझ्या घरी जाऊ. शिएन गावापासून वेनस्त्योप चार कि मी अतरावर आहे आणि या अज्ञात माणसाचे घर जगद्विख्यात इब्सेनच्या घराला लागूनच आहे माझ्या घरीच आज तुमचा मुक्काम आहे.’

माझ्या आश्चर्याला पारावार उरला नव्हता. मी म्हणालो, ‘ इब्सेनच्या घराशेजारीच मी रात्र घालविणार आहे,” या शब्दामुळे मला किती आनद झाला असेल याची डॉक्टरसाहेब तुम्हाला कल्पनाच करता येणार नाही मात्र हे सगळे अधार होण्याच्या आत होईल एवढेच पहा.’ आमची गाडी म्युझियमच्या दिशेने चालली होती आणि गप्पा सुरूही झाल्या होत्या

बर्फाने गच्च भरलेले रस्ते आणि झिमझिम पाऊस स्टेशन गावापासून जवळ नव्हते दहा एक किलोमीटर अतर पार करून आम्ही शिएन म्युझियमपाशी आलो. सर्वत्र

शुकशुकाट होता चिटपाखरूही कोठे नव्हते. डॉक्टरसाहेबानी दोन व्यक्ती शोधून आणल्या त्याच्याजवळ किल्ल्या होत्या. एक तरुण गृहस्थ होता तो तोर यार्दसन होता आणि शिएन म्युझियमचा क्यूरेटर होता. दुसरे वयस्क गृहस्थ पाहाताच मी चमकलो नाशिकचे प्राध्यापक बा वा दातारच माझ्यासमोर जणू उभे होते पण हे गृहस्थ होते कार्ल ग्रोनली ' इब्सेन ह्यूसेट ' या सांस्कृतिक केंद्राचे सचालक याच्याशी पूर्वी माझा पत्रव्यवहार झाला होता त्यामुळे ते विशेष खुषीत होते मी म्हणालो, ' डॉ बात हे रोटरीचे सदस्य आहेत आणि तुमच्याशी पत्ररूपाने मी परिचित आहे. चौदा हजार मैलावरून येऊन माझ्या मित्राना इब्सेनच्या स्वर्गीय साक्षीने मी भेटतो आहे. अशी माझी भावना आहे.'

' कुलकारनी, सर्व काही छान आहे आम्हाला आनदच आनद झाला आहे फक्त ह्या भयानक गारठ्याच्या हवेला मात्र काही इलाज नाही ' ग्रोनली उद्‌गारले रेखाशी त्यानी परिचय करून घेतला

शिएन - म्युझिमय हिवाळ्यात सहा महिने बदच असते. पण ते मोठमोठाले दरवाजे केवळ आमच्यासाठी उघडले गेले. आणि तेथील दालने झगमगली म्युझियम बरेच मोठे होते पण तेथे आमच्या दृष्टीने महत्त्वाच्या खोल्या तीनच होत्या. त्याना ' इब्सेन रूम्स ' असेच नाव होते जन्मापासून वयाच्या पधरा वर्षापर्यंत, शिएन या गावात इब्सेन राहात होता म्हणजे १८२८ ते १८४३ या काळात. या अवधीतील अनेक वस्तू ज्याचा सबध इब्सेन कुटुबाशी होता त्या व इतर या खोल्यातून नीट माडून ठेवल्या होत्या विद्यार्थिदशेत इब्सेनने काढलेली काही चित्रे येथे आहेत मुख्य म्हणजे स्वत च्या घराचे, वेनस्त्योप येथील घराचे - इब्सेनने काढलेले तैलचित्र येथे आहे. इब्सेनचे कुटंबीय शिक्षक, त्याला त्या वेळी भेटलेल्या महत्त्वाच्या व्यक्ती याची चित्रे येथे आहेत. तत्कालीन वृत्तपत्राची कात्रणे, इब्सेन कुटुबियाचे ग्रथ येथे आहेत शिएन गावात १८८० साली मोठी आग लागली, त्या आगीत इब्सेन ज्या घरात जन्माला आला ते मूळ गावभागातील घर नष्ट झाले. त्या घराची छायाचित्रे येथे आहेत इब्सेनच्या विद्यार्थिदशेतील हस्ताक्षरातील काही कागद येथे आहेत या हस्ताक्षरातील त्याची अक्षरे उजवीकडे कललेली दिसतात ( पुढील काळात ह्याची अक्षरे डावीकडे कललेली दिसतात. ) इब्सेनचे ' मॅट्रिक ' झाल्याचे सर्टिफिकेट आणि जन्मदाखला ह्या गोष्टीही येथे आहेत. या साऱ्या गोष्टी काळजीपूर्वक पाहाता आल्या. इब्सेनचेच उतारवयातील कपडे घालून पाठमोरा इब्सेन ( डमीरूपाने ) दरवाज्यातून बाहेर पडतो आहे, असे दृश्य येथे उभे केले आहे. ते मजेशीर वाटले तोर याने प्रत्येक गोष्टीची माहिती काळजीपूर्वक आम्हाला दिली अनेक

गोष्टींचे तपशील मीही सागू शकत होतो, याचे त्याना आश्चर्य वाटे. मी म्हणालो, ' अहो तुम्ही भारतात मला पाठविलेली पुस्तके मी वाचली आहेत एवढेच शिएन विषयक पुस्तकाच्या माहितीचा पडताळा मला येतो आहे '

म्युझियम पाहिल्यावर आमच्या दोन गाड्या ' क्नूट इब्सेन हाऊस ' कडे वळल्या इब्सेनचे वडील क्नूट इब्सेन याचे हेन्रिक चार वर्षांचा असताना दिवाळे निघाले व्यापारात खोट बसल्याने बीअर तयार करण्याचा कारखाना त्याना विकावा लागला तसेच जेथे हेन्रिकचा जन्म झाला होता ते गावातील मध्यवर्ती भागात असलेले घरही विकावे लागले गाव सोडून चार कि. मी. दूरवर असलेल्या वाडीवरील घरात इब्सेन कुटुबीय जाण्याअगोदर ३ - ३ ।। महिने ज्या एका घरात राहात होते ते घर आज ' क्नूट इब्सेन हाऊस ' म्हणून जतन केले आहे. हा लहानसा दुमजली वाडा अर्थातच् लाकडी आहे व त्याला ताबडा मूळचाच रग देण्यात आलेला आहे येथे त्या काळी २ - ३ बिऱ्हाडे रहात होती तळमजल्यावर एका बाजूला गुराचा गोठा आहे त्या काळातील वस्तू विशेषत स्वयपाकघरातील वस्तू नीट ठेवलेल्या आहेत. अर्थात मन हेलावून जावे असे या घरात काही नाही हे घर मी काळजीपूर्वक अशाकरिता पाहिले की त्याकाळी गरीब माणसे कशी राहत होती याची कल्पना त्यावरून येत होती. आपल्याकडील छोटेखानी वाड्याला जसा चौक असतो तसा चौक या घराला आहे

नतर आम्ही ' इब्सेन ह्यूसेट ' या सास्कृतिक केंद्रावर गेलो सुमारे साडेसातशे माणसे बसतील एवढे मोठे पण अतिशय सौंदर्यपूर्ण असे नाट्यगृह, भव्य कलादालन आणि वरच्या मजल्यावर व खालच्या मजल्यावर अत्युत्कृष्ट रेस्टॉरट, पुस्तके असलेले ग्रथालयवजा एक दालन, असे हे केंद्र आहे पुढे पार्किंगसाठी मोकळी जागा आहे व भव्य वृक्ष आहेत. उन्हाळ्यात येथे इब्सेनच्या नाटकाचे प्रयोग होतात. जगभरची उत्साही मडळे येऊन येथे इब्सेनची नाटके करून दाखविण्याची आकाक्षा सफल करू शकतात. अर्थात नाट्यगृहात इतर नाटकाचेही प्रयोग होतात. कलादालनात तरुण चित्रकाराची चित्रे लावली व विकली जातात आम्ही गेलो तेव्हा एक प्रदर्शन लागलेलेच होते. चित्रे ' मॉडर्न आर्ट ' चा अतिरेक नसल्यामुळे मी आवर्जून पाहिली आपल्या कलादालनातून दिसतात त्यापेक्षा ही चित्रे मोठ्या आकाराची व अतिशय टवटवीत वाटत होती. कलादालनाच्या प्रारभीच इब्सेनचे, तो जिवत असताना सिटिंग घेऊन केलेले भव्य तैलचित्र होते. चित्रातील इब्सेन वृद्ध होता पण सोनेरी फ्रेमच्या चष्म्याआडून भेदकपणे पाहणारे त्याचे डोळे चिरतरुण वाटत होते या तैलचित्राचे आणि त्याच्या पार्श्वभूमीवर आमचे फोटो काढून घेण्याचा मोह साहजिकच आवरला नाही. या तैलचित्रासमोर मी

बराच वेळ घालविला. चित्राशेजारीच इब्सेनचा एक बस्टही होता पण ते शिल्प एवढे प्रभावी वाटले नाही

इब्सेन ह्यूसेटमधील ' रंगभूमी ' अर्थातच इब्सेनकालीन नव्हती. पण त्या रंगभूमीस मी आदराने आणि मानवंदना देण्याच्या भावनेने न्याहाळत होतो. इब्सेनच्या नाटकातील अनेक प्रसंग त्या रंगमंचावर तरळून जात होते. घर सोडून जाणारी नूरा, रागावलेल्या वडिलांच्या पायाला बिलगणारी हेदविग, स्वत च्या पापाची जाहीर कबुली देणारा ' *पिलर्स ऑफ सोसायटी* ' मधील बेर्निक, एक ना दोन - अनेक प्रवेश क्षणार्धात त्या रंगमंचावरून तरळत गेले. प्रेक्षागृहात रिकाम्या खुर्च्या होत्या पण मला कल्पना देण्यासाठी सारे थिएटर दिव्यांच्या प्रकाशाने उजळण्यात आले होते रंगभूमीकडे पहात असताना मी गलबलून गेलो आहे हे कोणाच्याच नजरेतून सुटले नाही. माझ्या मनावरील ताण मला असह्य झाला आणि येऊ घातलेले आनंदाश्रू फक्त मी म्हणूनच आवरू शकत होतो. एक क्षणभर मला असेही वाटले की मला घेरी येते की काय. पण तो प्रसंग टळला आणि मी दीर्घ नि श्वास टाकला मानसशास्त्रीय भाषेत ज्याला ' ट्रॉमॅटिक अनुभव ' म्हणतात, तसा काहीसा अनुभव त्या नाट्यगृहात मी घेतला माझ्याजवळचे सारे शब्द जणू पार हरवून गेले होते प्रेक्षागृह रिकामेच होते पण प्रत्येक खुर्चीवर जणू मीच बसलो आणि शेकडो नेत्रांनी त्या रंगभूमीकडे विस्मयाने पहात होतो. भानावर आल्यावर पुन्हा संभाषणास सुरुवात झाली. सर्वांनाच भूक लागली होती. तोंडावर पाणी मारण्यासाठी आणि फ्रेश होण्यासाठी मी स्वच्छतागृहाकडे गेलो त्याला ' अनीत्रा टॉयलेट ' असे नाव देण्यात आले आहे ' अनीत्रा ही एक अरब मुलगी, नर्तकी ' *पेअर ग्यून्ट* ' नाटकामधील एक स्त्रीरेखा आहे. ती भोळ्या पेअरला प्रेषित प्रषित म्हणते आणि त्याला लुबाडून पोबारा करते म्हणून नावाची मला गंमत वाटली. मी माझे पाकीट सांभाळत आत गेलो आणि पाकीट सांभाळत बाहेर आलो. न जाणो कोणी अनीत्रा भेटायची !

जेवणासाठी डॉक्टर ब्रात यांनी बीअर व वाईन मागविली तर ग्रोनली साहेबांनी उत्तमोत्तम पदार्थ मागविले. आम्ही सर्वांनीच मनसोक्त जेवण केले जेवताना मराठी रंगभूमी, मराठी नाटकाला असलेली परंपरा याची माहिती मी त्यांना दिली. प्रत्येकाला भारतात येण्याची संधी मिळाल्यास पुण्यात आमचे पाहुणे म्हणून यावं असे निमंत्रणही दिले

जेवण झाल्यावर बसलो असताना ग्रोनली एकदम गंभीर झाले ते म्हणाले, ' शिएन गावाचे मेयर आज बाहेरगावी गेले आहेत एरवी ते स्वत येणार होते पण त्यांनी शिएन नगरीचा ध्वज आणि तुमच्यासाठी प्रेझेंट्स दिली आहेत, ती मी आता तुम्हास देत आहे.' मोठ्या डौलाने आणि आम्हासही उभे करून त्यांनी हा कार्यक्रम केला. तोरनी या प्रसंगाचे छायाचित्र घेतले. त्यानंतर ग्रोनली म्हणाले, ' इंडिया ' मध्ये आमच्या

महान् नाटककाराची पताका तुम्ही फडकवित' आहात याचा आम्हाला खूप अभिमान वाटतो तुम्ही दुर्दैवाने हिवाळ्यात आलात. उन्हाळ्यात आला असतात तर समारभपूर्वक हा प्रसग आम्ही साजरा केला असता.'

या आनद सोहोळ्यानतर इब्सेनने बालपण ज्या घरात घालविले, जेथे त्याची प्रतिभा पल्लवित झाली ते घर पाहण्यासाठी निघालो. शिएनपासून चार कि.मी अतरावर वेनस्त्योप आहे जाताना रस्त्यावर दुतर्फा मोठमोठे वृक्ष लावलेले आहेत. प्रत्येक वळणावर ' टू इब्सेन्स वेनस्त्योप ' अशा आकर्षक पाट्या रगवून लावल्या आहेत, बाण दाखविले आहे. त्यामुळे आमची उत्कठा शिगेस पोहोचली अधार पडायच्या आत तेथे आम्हाला पोहोचणे भाग होते.

शिएन नदीच्या तीरावर इब्सेनने बालपण घालविले ते घर उभे आहे घराची रचना साधी आहे पण आकार खूपच मोठा आहे. अनेक खोल्या आहेत आणि आतील फर्निचरचा दर्जा उत्तम आहे. घराच्या प्रागणात दोन एकशे वर्षापूर्वीचा ओक वृक्ष उभा आहे उत्तम प्रतीची हिरवळ सर्वत्र आहे. नदीचे पात्र पूर्ण गोठलेले होते आणि हिमाखाली गाडले गेले होते पण उन्हाळ्यात ते पहेलगावच्या लीडर नदीसारखेच नयनरम्य दिसत असणार.

रवीन्द्रनाथाच्या रवीन्द्र - बारीपेक्षा किंवा शेक्सपिअरच्या घरापेक्षा ही वास्तू साधी वाटली तरी ती जास्त रमणीय वातावरणात उभी आहे. सभोवताली अनेक फुलझाडे लावलेली आहेत व डोंगर उताराची मौजही आहे या ठिकाणी वास्तव्य करणारा छोटा हेन्रिक कविता करीत असे आणि चित्रे काढीत असे हे अगदी स्वाभाविक वाटते या घरात नाट्यवेडी आई आणि भावडे याच्या सान्निध्यात इब्सेन पधरा वर्षापर्यंत राहिला. वडील व्यवसायाच्या निमित्ताने जास्त करून शिएन गावात असत. हेन्रिकलाही शाळेसाठी गावात जा - ये करावी लागे त्यासाठी घोडे वा घोडागाडी वापरली जाई.

या ठिकाणचे म्युझियम लावणे अजून चालू आहे. या विशिष्ट काळातील रगीत तैलचित्रे मात्र लावण्यात आली आहेत इब्सेनने काढलेली काही व्यगचित्रेही आहेत इब्सेन कुटुबाला ज्या प्रतिष्ठित व्यक्ती भेटी देत त्याची चित्रेही आहेत स्वयपाक घरातील भाडीकुडी जशीच्या तशी जपून ठेवलेली आहेत सर्व तावदानाना उची पडदे आहेत. इब्सेन त्याच्या आईला - मार्केनला अनौरसपणे झाला, आणि त्याच्या वडिलाना व्यापारात खोट बसली अशा घटना सागितल्या जातात इब्सेन उतार आयुष्यात कधी इकडे परत फिरकला नाही याची अशीच काही गडद कारणे असावीत. पण प्रत्यक्षात घर आणि परिसर रम्य आहे नाटककारापेक्षा कवीला ते जास्त अनुकूल आहेत

इब्सेनच्या वडिलाचा दिवाणखाना खूपच मोठा आहे आणि उची आहे त्याच्या वडिलाना भरपूर पैसा मिळाला असता तर ते एखाद्या सरदाराच्या थाटात राहिले असते अशी लक्षणे दिसतात या सर्व खोल्यात सर्वांत महत्त्वाची खोली माळ्यावर गेल्यावर डाव्या बाजूची. येथे दोन कॉट्स व एक टेबल - खुर्ची आहे सामान ठेवण्याची कपाटेही आहेत. या खोलीत विद्यार्थी हेन्रिक व त्याची बहीण रहात इतर मुले खेळायला गेली तरी छोटा हेन्रिक याच खोलीत किंवा माळ्यावरच्या मोकळ्या जागेत जाड जाजम पसरून वाचत बसे चित्र काढत बसे.

हिवाळा असल्याने हे घर बद होते. सेंट्रल हीटिंग चालू नव्हते केवळ आमच्यासाठी घर उघडले आम्ही प्रत्येक गोष्ट काळजीपूर्वक पाहात होतो तोर आणि ग्रोनली तपशीलवार माहिती देत होते. पण घरात गारठा जाणवत होता. बाहेर अधार पडण्यास सुरुवात झाली होती माझा पाय घरातून निघत नव्हता माळ्यावर गेलो तेव्हा फारच खूष होतो माळा म्हटले तरी आम्ही बहुतेक ठिकाणी सहज उभे राहू शकत होतो. माळ्यावर जी दुसरी खोली होती तिथे ऑफिस होते तेथे कोणी बसलेले मात्र नव्हते. सामानसुमानावरून कोणीतरी आर्किटेक्ट तेथे काम करीत असावा असे वाटले. माळ्यावरील दोन्ही खोल्यातून नदीचे पात्र व समोरची वनराजी दृष्टीस पडत होती.

साडेचारच्या सुमारास अधार झाला आणि ग्रोनली व तोर याना आमचा निरोप घ्यावा लागला. आम्ही शेजारीच राहणार होतो मी जड अत करणाने ग्रोनली याना म्हणालो, ‘ तुम्ही आम्हाला किती आनदी केले आहे हे मी शब्दानी सागू शकणार नाही पण हे क्षण आणि तुम्हा दोघाना आम्ही कधीही विसरणार नाही. आम्ही तुमचे कायमचे ऋणी आहोत एका इब्सेनमुळे विश्वास बसू नये इतकी नॉर्वेजियन मडळी आमच्यावर मैत्रीचा व प्रेमाचा वर्षाव करीत आहेत भारताच्या भूमीवर तुमचे स्वागत करण्याचा सुयोग यावा हीच आमची इच्छा आहे.’

ग्रोनली म्हणाले, ‘ थँक्स, आम्ही आमच्या परीने केले. तुम्हाला इब्सेनविषयी काही मदत पुढे लागली तरी जरूर कळवा. आम्ही आनदाने ती देऊ.’

गाडीत बसून दोघे गेले तरी आम्ही त्याच्याकडे बराच वेळ पहात होतो

शिएन येथील रात्र आम्ही डॉ. बात याच्या घरी घालविली इब्सेनचे वेनस्त्योप - हाऊस पाहून आम्ही शेजारच्याच डॉ बात याच्या घरी आलो. डॉक्टरानी आम्हाला घरी सोडले व ते गावात पत्नीला आणायला गेले तेथील रोटरी क्लबला न जाण्याचा निर्णय आम्ही घेतला कारण आमचा मूड सर्वस्वी वेगळा होता

डॉ बात याच्या घरी तास - दीडतास लाभलेला एकान्त रोमॅन्टिक होता. वास्तव

आणि स्वप्न याच्या सीमारेषाच जणू पुसून गेल्या होत्या. डॉ. बात याच्या अपरिचित घरात आम्ही बसलो होतो. घरी मुले काय करीत असतील असे रेखा विचारीत होती आणि मी बाहेर पडणाऱ्या भुरू भुरू पावसाकडे पाहात होतो. त्या परिसरात पोरसवदा इब्सेन कसा वावरला असेल ह्याची चित्रे रंगवीत होतो कायम राहण्याच्या दृष्टीने हा भाग कठीणच आहे. काय करणार हो माणूस येथे अशा आडरानासारख्या भागात असे रेखा म्हणून गेली

डॉ. बात हे वैद्यकी पेशातील डॉक्टर होते. त्याचे घर सुरेख होते त्याची बायको मार्गारिट अस्खलित इंग्लिश बोलत होती. त्याविषयी मी आश्चर्य व्यक्त करताच ती एकदम सैनिकाप्रमाणे ताठ उभी राहिली आणि म्हणाली,

' आय् ॲम ॲन इंग्लिश वुमन '

तिला इंग्लंडविषयी ओतप्रोत अभिमान होता ती औषधे व वैद्यकीय फर्निचर वस्तू विकण्याच्या दुकानात काम करीत होती आणि दुसऱ्या दिवशी पहाटे ती फिनलण्डला जाणार होती. बात पतिपत्नींनी त्यामुळे आम्हाला हॉटेलात जेवायला नेले. त्याची मोठी मुलगी हेन्रिएट तेथे कामाला होती तिने बनविलेला खास पदार्थ आम्ही खाल्ला. या मुलीला केटरिंग कोर्स करण्यासाठी भारतात येण्याची इच्छा दिसली. बात याची दुसरी मुलगी शार्लोट आफ्रिकेत बोट्स्वानातील आठवणी कुरवाळीत होती. ती शाळेत होती. तिने घोड्यांच्या पुतळ्याचे इतके नमुने जमविले होते की ते पाहून आम्ही चाट पडलो

डॉ बात टेनिस प्रेमी होते आणि नॉर्वेतील टेनिस वर आणण्याच्या योजनेतील सक्रीय सदस्य होते त्याना मी ऋतूच्या टेनिसविषयी माहिती दिली तेव्हा त्याना आनंद वाटला व मी जवळचा वाटलो त्याना आफ्रिकी देशात खास रस होता आणि तिकडे ते बरेचदा जाऊन आले होते. व राहूनही आले होते. ते रोटरीच्या कामात रस घेत होते. परंतु शिएन सारख्या बाजूच्या गावातील रोटेरियन्सना म्हणावा तसा वाव मिळत नाही ही रुखरुख त्यानी बोलून दाखविली.

□

## ५१. ग्रिमस्टा

बुधवार ३१ जानेवारी १९९० रोजी आम्ही नॉर्वेतील ग्रिम्स्टा (Grimstad) या गावाला भेट दिली. याची लोकसंख्या सुमारे तेरा हजार आहे इब्सेनच्या काळी आठशे

होती पण गाव ऐसपैस आहे आणि निसर्गरम्यतेमुळे टुरिस्ट मडळींचे आकर्षण आहे. इब्सेनचे पहिले नाटक *'कॅटिलीना'* येथे लिहिले गेले हे त्याचे ऐतिहासिक महत्त्व *'कॅटिलीना'* हे फसगत झालेल्या एका रोमन बडखोराची शोकान्तिका रगविणारे नाटक आहे.

शिएन - ग्रिमस्टा प्रवास आम्ही बसने केला आणि आम्हा दोघाचे २३८ क्रोनर्स ( रु ५९५ ) भाड्यापायी गेले. प्रवास तीन तास चालला. प्रवास किती महाग आहे याची कल्पना येईल भारतातील प्रवासी क्वचितच नॉर्डिक देशात प्रवासाला जातात याचे कारण तेथील, महागडा प्रवास आणि त्याहून महागडी राहणी प्रवास फार छान झाला. बसमध्येही फारशी माणसे नव्हती. बाहेर पाऊस चालू होता पण नॉर्वेच्या अतरगाचे दर्शन येथे आम्हाला झाले तळी, गर्द वनराई, हिमाच्छादित पर्वत फ्योर्दस, छोटी छोटी शेताची हिमाच्छादित आवारे आणि लहान लहान लोकसख्येची देखणी गावे आम्ही आठला निघालो ते अकराला ग्रिमस्टाला पोहोचलो. प्रवासात यावेळी घरच्या आठवणी निघाल्या.

नॉर्वेचा निसर्ग महाबळेश्वरसारखा आहे असे म्हटले तरी काही कल्पना येणार नाही सूचिपर्णी वृक्षाची ( फर, स्प्रूस, पाईन ) गर्दी अतोनात आहे. त्यानी डोंगरच्या डोंगर व्यापलेले आहेत. फ्योर्दस, तळी, पाऊस याच्यामुळे जलतत्त्व सर्वत्र ओतप्रोत आहे. भले मोठे माळ आणि वैराण मैदाने क्वचितही दिसत नाहीत. आपल्याकडे हिरवा रग दिसला की बरे वाटते येथे हिरवा रग झाडाचा असो की गवताचा असो ठायी ठायी दिसतो डोगरमाथे जगलानी व्यापलेले दिसतात पण वाटेत श्वापदे दिसत नाहीत येथील निसर्ग बेर्गेनकडील म्हणजे पश्चिम भागापेक्षा जास्तच रम्य आहे. जास्त गडदही आहे.

ग्रिमस्टा गावातील इब्सेन म्युझियमचे सचालक यार्ले ब्योर्कलुण्ड आम्हाला न्यायला येणार होते ते सारे दाखविणार होते पण आमचा मुक्काम होणार नव्हता. सध्याकाळच्या - म्हणजे - रात्रीच्याच पाचच्या गाडीने आम्ही उस्लोला परतणार होतो ग्रिमस्टात इब्सेनच्या सदर्भात पाहण्यासारख्या गोष्टी म्हणजे, ज्या औषधे तयार करण्याच्या छोट्या कारखान्यात इब्सेन होता तो वास्तू, इब्सेन नतर जेथे राहायला होता तो वास्तू ते आता इब्सेन म्युझियम आहे. ग्रिमस्टा बदर जे त्या काळी क्रांतिकारी विचाराचे केंद्र होते, आणि तेन्ये विगेनची कबर इब्सेन या गावात चार वर्षे होता आणि त्याचे सुरुवातीचे *'कॅटिलीना'* हे नाटक येथे लिहिले गेले

ग्रिमस्टाला मुद्दाम वाकडी वाट करून कोणी येत नाही पण नॉर्डिक देशातील टुरिस्ट बरेच येतात त्यामुळे इब्सेनच्या जागा व्यवस्थित जतन केल्या आहेत ग्रिमस्टापासून

जवळच क्नूट हॅमसून या प्रसिद्ध नॉर्वेजियन कादबरीकाराचे घरही आहे. तेही जतन केले आहे. पण तेथे जाण्याचा उत्साह दाखविता येत नव्हता. कारण हॅमसून हा दुसऱ्या महायुद्धाच्या काळी नात्सी जर्मनांची तळी उचलून धरणारा होता आणि नात्सी विचारही मांडी त्याची कला पाहावी आणि नात्सी विचार सोडून द्यावेत अशी भूमिका येथील लोक घेताना दिसत नव्हते. त्यामुळे आम्हीही हा विषय दूर ठेवला शिवाय हॅमसूनला नोबेल पारितोषिक मिळाले असले तरी तो विश्ववाङ्मयात मोडेल एवढा मोठा कादबरीकार नव्हे.

जेवणाच्या वेळी ब्योर्कलुण्डजवळ मी हॅमसूनचा विषय काढला तेव्हा तो म्हणाला, ' हॅमसून आणि इब्सेन ही एका दमात घेण्याची नावे नव्हेत. तुम्ही तशी चर्चा करू नका. नात्सी जर्मनाविषयी आजही आमच्या भावना तीव्र आहेत. अतिशय प्रतिकूल आहेत आमची माणसे दीर्घायुषी आहेत. युद्धाच्या व आमच्या छळाच्या आठवणी मनात असणारे लोक आजही आमच्यात आहेत ' त म्हणता मी ताकभात ओळखला.

ब्योर्कलुण्ड हा अनुभवी विद्वान होता दाढी, सडपातळ, उच देहयष्टी, भेदक नजर, चष्मा, अस्ताव्यस्त कपडे. त्याच्याबरोबर गाडीतही त्याचा ' सका ' या नावाचा कुत्रा सतत असे. रेखा कुत्र्याला अतिशय घाबरते. त्यामुळे फिरताना ती पुढच्या सीटवर आणि मागच्या सीटवर मी आणि सका. अर्थात कुत्रा निरुपद्रवी होता. आणि मी काही मिनिटातच आपलासा केले ब्योर्कलुण्ड याना मी येण्याची पूर्वकल्पना असल्याने त्यानी इब्सेनवरील नॉर्वेजियन साहित्य वाचून ग्रिमस्टा कालखडावर भरपूर तयारी केली होती. बारीक सारीक तपशील लक्षात ठेवला होता मौज म्हणजे विद्यार्थ्यानी पाठ केलेले भाग धडाधड म्हणून दाखवावेत त्याप्रमाणे तो माहिती देत होता. त्याचे स्वत चे संशोधन व पुस्तके नॉर्वेतील बोटी व नाविक परपरा या विषयात होते तीही माहिती त्याने जाता जाता दिली

ब्योर्कलुण्ड याना माझी माहिती व मुलाखत तेथील ' आगदेर पोस्टेन ' या वृत्तपत्रात छापून आणण्यात रस होता आणि त्या दृष्टीने त्यानी मला प्रश्न विचारणे चालू ठेवले होते हे माझ्या लक्षात आले त्याना जास्तीत जास्त अचूक आणि सुस्पष्ट माहिती देणे आणि अनावश्यक माहिती टाळणे माझी जबाबदारी होती. सलमान रश्दी आणि त्याच्या सेटॅनिक व्हर्सेसवर उठलेल्या वादळात त्याना रस होता आणि भारतातील संदर्भात ते पाहू इच्छित होते

इब्सेन ज्या रायमान नावाच्या औषध तयार करणाऱ्याकडे कामाला होता ते दुकान आजही उभे आहे. त्याकाळच्या वस्तू जेथल्या तेथे ठेवल्या आहेत खालच्या

तळमजल्यावर फार्मसी आहे आणि वर राहण्याच्या खोल्या आहेत. या ठिकाणी कामाला असताना येथील सोफी नावाच्या मोलकरणीच्या खोलीतून इब्सेनला त्याच्या खोलीत जावे लागे. याची परिणती वयाने दहा वर्षे वडील असणाऱ्या मोलकरणीला इब्सेनपासून मुलगा होण्यात झाली सोफीशी लग्न करणे अशक्य होते पण मुलगा १६ वर्षांचा होईपर्यंत इब्सेनला तिला पोटगी द्यावी लागली. हा भाग ब्योर्कलुण्डने ढगदार शैलीत सांगितला. त्याच्यावर फ्रेंच वाङ्मयाचाही परिणाम असावा असे मला वाटले

या ' अपोथेक ' दुकानात विशेष असे काही नाही. पण इब्सेनच्या जीवनावर खोल जखम करणारा इतिहास तेथे घडलेला आहे. ग्रिमस्टा गाव इब्सेनला लवकर सोडावे लागले त्याला हा इतिहास कारणीभूत ठरला. ह्यावरील आमचे संभाषण ऐकताना रेखाला गमत वाटत होती

' फॉर्मसी ' बघितल्यावर ब्योर्कलुण्डने गाडीचा रोख ग्रिमस्टा बदराकडे वळविला. या बदरात बसून इब्सेन चित्रे काढी. येथील कामगार व खलाश्याच्या परिचयातून तो क्रातिकारी रिपब्लिकन विचाराचा झाला होता ग्रिमस्टा त्या काळी समाजवादी विचाराचा अड्डा होता इ. तपशील ब्योर्कलुण्डने आवेशाने सांगितला

मी म्हणालो, ' त्या काळी ग्रिमस्टाची लोकसंख्या ८०० होती. ४०० लोक मुले व स्त्रिया असतील आणि उरलेल्या ४०० पैकी फारतर २०० मडळी क्रातिकारी विचाराची याना घेऊन इब्सेन व त्याचे मित्र खरोखरच क्राती करू शकले असते का ? '

ब्योर्कलुण्ड गडबडला आणि त्याने इब्सेन हा रोमॅन्टिक तरुण होता हे मान्य केले. ग्रिमस्टा गावात इब्सेनला एका प्रेमप्रकरणात कसे अपयश आले हे त्याने नतर समुद्रावरील लाटाकडे बघत सागितले. ग्रिमस्टा हे बदर असल्याने व तेथे युरोपातील विविध देशांतून जहाजे येत व त्याच्याबरोबर नवनवे विचारही येत असेही ब्योर्कलुण्डने सागितले. ' पिलर्स ऑफ सोसायटी ' नाटकात ग्रिमस्टा बदराची पार्श्वभूमी वापरण्यात आली आहे त्यातील सभावित पिलर्सची घरे कशा प्रकारची असतील ते काही जुनी घरे दाखवून ब्योर्कलुण्डने मला समजवून देण्याचा यत्न केला. ही घरे आलिशान असून, स्वच्छ पाढऱ्या रगात रगविलेली होती किंबहुना ग्रिमस्टामधील बहुतेक लाकडी घरे पाढऱ्या रंगात रगविली होती

नतर आम्ही एका चायनीज रेस्टॉरटमध्ये जेवायला गेलो. ग्रिमस्टासारख्या ठिकाणी असे रेस्टॉरट पाहून आम्हाला आश्चर्य वाटले. आम्ही तेथील व्हेजिटेरिअन पुलाव मागितला जेवताना झालेल्या गप्पा फारच रंगल्या.

' सलमान रश्दीचे पुस्तक तुम्ही वाचले आहे का ? ' ब्योर्कलुण्ड.

' इंग्लिश पुस्तक मी पाहिले आहे पण ते वाचलेले नाही. तुम्ही वाचले आहे ?' मी

' स्वीडिश आवृत्तीतून मी ते वाचलेले आहे.' ब्योर्कलुण्ड.

' खरोखरच ते आक्षेपार्ह आहे का ?' मी

' रश्दींची शैली मला आवडली ती तिरकस आणि रूपकात्मक आहे. त्यात निषेधार्ह काहीही वाटले नाही.' ब्योर्कलुण्ड.

' मध्य पूर्वेतील नैतिकता व तिचे संकेत भिन्न आहेत. पण आमच्याकडील मुसलमानाची मने दुखावतील असे वाटून आमच्या सरकारने हे पुस्तक बॅन केले.' मी.

' पीटर ब्रूक्सच्या महाभारताबद्दल भारतीयाची काय प्रतिक्रिया आहे ?' ब्योर्कलुण्ड

' भारतीयांना ते ऑफेंडिंग वाटेल.' मी

' त्याचे कारण ?'

' महाभारत हे एका वंशातील लोकाचे आहे आपली पात्रे आफ्रिकी किंवा इंग्लिश पाहून भारतीय मने दुखावतील असे मला वाटते.' मी.

' तुमच्याकडे ते बॅन केले आहे का ?' ब्योर्कलुण्ड

' नाही. पण आमच्या टी व्ही. वर ते दाखवीत नाहीत आम्हीच काढलेले एक लबेचवडे महाभारत चालू आहे.' मी

' आमची मडळी तुमच्याशी कशी वागतात ?' ब्योर्कलुण्ड.

' मला व्ही. आय. पी. वागणूक मिळते आहे पण मी तुमचा पाहुणा आहे. येथे स्थायिक होणारा स्थलातरेच्छू नाही म्हणून.' मी.

' तुमच्या देशात स्थलातरेच्छूना आणि निर्वासिताना कशी वागणूक मिळेल ?' ब्योर्कलुण्ड.

' आमचा देश त्याला सरावलेला आहे. खुद्द आमच्या महाराष्ट्र राज्यात आम्ही निम्मे महाराष्ट्रीय आहोत तर बाहेरची निर्वासित किंवा स्थलातरित माणसे निम्मी आहेत.' मी

' तुमच्या महाराष्ट्रात लेखकाना स्वातत्र्य मिळते का ? सलमान रश्दीसारखा लेखक तुमच्यात होईल का ?' ब्योर्कलुण्ड.

' आमच्या महाराष्ट्रात लोकसख्या सहा कोटी असली तरी साक्षर मडळी सव्वीस टक्केच आहेत. पण आमचे वाचक रश्दींसारखे पुस्तक हिंदुधर्मावर किंवा इस्लामवर किंवा

बौद्धधर्मावर आले तर ते खपवून घेणार नाहीत. मात्र ते लेखकाला फाशीची शिक्षा ठोठावणार नाहीत ' मी.

' तुमच्याकडे एवढी माणसे आहेत म्हणजे प्रकाशक मडळी खूपच श्रीमत असतील ' ब्योर्कलुण्ड

' आमच्याकडे वाचक असले तरी ग्राहक कमी आहेत पुस्तके विकत घेतली पाहिजेत, चित्रकाराची पेंटिंग्ज विकत घेतली पाहिजेत असे आमच्याकडील सधन माणसानाही वाटत नाही आमची राहणी किती साधी आहे याची तुम्हाला कल्पनाही येणार नाही ' मी.

' तुमच्याकडे बोटी असतात का ?' ब्योर्कलुण्ड.

' नाही. आमच्याकडे फक्त कोळी माणसेच मच्छीमारीला जातात. बोटीने समुद्रात विहार करणे हा आमच्या सस्कृतीचा भाग नाही ते केरळात आहे.' मी

ब्योर्कलुण्डला मी जेवतानाच माझी इब्सेनवरील लेखाची डमी दाखविली आमच्याविषयी छापलेली फोल्डर्स त्याला दिली चायनीज रेस्टॉरटच्या मालकानेही आमची फोल्डर्स मागून घेतली. त्याचा ब्योर्कलुण्डवर अनुकूल परिणाम झालेला दिसला. मात्र महाराष्ट्रात सहा कोटी लोक आहेत हे पाहून तो कमालीचा अस्वस्थ झाला

-' तुम्ही गुन्नार म्यूरदाल याचे ' एशियन ड्रामा ' ऐकले असेलच.' ब्योर्कलुण्ड.

' सक्षिप्त *' एशियन ड्रामा '* मी वाचलेले आहे. आमच्या देशाच्या दारुण अवस्थेचे विदारक विश्लेषण आमच्या विद्वानानीही केले आहे. पण आमची अवस्था कळते पण वळत नाही अशी आहे.' मी

' इब्सेन तुम्हाला प्रस्तुत वाटतो की त्याच्या कलेने तुम्ही भारावला आहात ?' ब्योर्कलुण्ड

' इब्सेनची कला उत्तरोत्तर उचावताना दिसते पण त्याची व्यक्तिप्रतिष्ठेची कल्पना, त्याचा सत्य व प्रेम याचा पुरस्कार मला प्रस्तुत वाटतो. आमच्याकडे व्यक्ती अनेक ओझ्याखाली व बधनाखाली दडपली जाते. तिला इब्सेनसारखा माणूस ताठ मानेने वागण्याचा आत्मविश्वास देऊ शकतो.' मी

' छान फारच छान रेखाला इब्सेनविषयी काय वाटते ?' ब्योर्कलुण्ड.

' मी येथे आल्यावर इब्सेनची नाटके टी. व्ही वर पाहिली व बेर्गेन विद्यापीठावर काही इग्रजीतून वाचली. मला ती आवडतात. पण त्याच्या नाटकात स्वगत सभाषणे फार आहेत असे वाटते ' रेखा.

' अगदी खरे आहे.' ब्योर्कलुण्ड,

' तुम्हाला काय वाटते ? तुमच्या येथे इब्सेन कालबाह्य वाटतो की  ? मी.

' छे ! छे ! इब्सेन आमचा फार मोठा नाटककार आहे. आम्ही त्याला कधीच विसरू शकणार नाही  एरवी मी तुम्हाला वेळ दिला असता का ?' ब्योर्कलुण्ड

अशा तऱ्हेने गप्पासप्पा करीत आमचे जेवण झाले  नतर ब्योर्कलुण्डने आम्हाला ' तेऱ्ये विगेन ' या दर्यावर्दी महाभागाला जेथे पुरले आहे ते चर्च, ती कबर आणि तो समुद्रभाग दाखविण्यासाठी नेले  ते चर्च विटाचे होते  पण अगदी साधे होते. कबरही साधी होती. पण परिसर अतिशय रमणीय होता  तेऱ्ये विगेनची समाधी पाहताना मला काहीसे गहिवरून आले. ब्योर्कलुण्डने त्याच्याकडे दुर्लक्ष करीत मूळ कबरीची जागा काहीशी हलली असावी असा अंदाज व्यक्त केला

मी म्हणालो, ' मला कविता व तेऱ्ये विगेनची व्यक्तिरेखा आठवल्याने उचबळून आल्यासारखे वाटले  कबर हे निमित्त आहे '

आम्ही इतरही कबरी पाहिल्या  अनेक कबरींवर ठेवलेली फुले वा पुष्पचक्रे टवटवीत दिसत होती  खुद्द चर्चमध्ये आत जाऊन मात्र पाहता आले नाही. कारण आत अत्यभागाविषयी कोणा मडळींचा विधी चालू होता. चर्चचे आणि कबरीचे छायाचित्र मी घेतले  ज्या इंग्लिश सरदाराने तेऱ्ये विगेनला कित्येक वर्षासाठी तुरूगात टाकलेले असते, त्याच सरदाराला, त्याच्या बायकोला व लहान मुलाला पुढे तेऱ्ये विगेन वादळातून वाचवितो आणि अपकाराची फेड उपकाराने करतो. अशी ही दीर्घ कविता आहे. बहुतेक नॉर्वेजियन व्यक्तींना हिच्यातील काही कडवी तरी पाठ असतातच. इब्सेनची ही दीर्घ कविता या मंडळींची कमालीची लाडकी कविता आहे  ती जितकी साधी आहे तितकीच हृदय हेलावून टाकणारी आहे  आम्ही पतिपत्नी तेऱ्ये विगेनच्या कबरीवर आमची श्रद्धाजली अर्पण करू शकलो याचे आम्हास समाधान वाटले. तेऱ्ये विगेन या कवितेचा अनुवादही मराठीत व्हावयास हवा असे त्या वेळी आम्हास वाटले.

नतर आम्ही ग्रिमस्टामधील मुख्य इब्सेन म्युझियम पाहण्यासाठी गेलो. ' आगदेर पोस्टेन ' वृत्तपत्रासाठी माझी मुलाखत व आमचे फोटो घेण्याचा कार्यक्रम तेथेच लुडविग लोरेंत्सेन यानी पार पाडला. या वृत्तपत्राची मुलाखत आलेली कात्रणे आमच्या सग्रही आहेत. लोरेंत्सेन यानी मुलाखत घेतली खरी  परतु त्यानी आमची वीस - पचवीस छायाचित्रे घेतली  ती इतकी का असे मी विचारले. त्यावर ते म्हणाले,

' आमच्या तावडीतून तुमची सुटका नाही '

ग्रिमस्टा येथील इब्सेन म्युझियम नॉर्वेतील सर्व इब्सेन म्युझियम्सपेक्षा समृद्ध आणि महत्त्वाचे आहे याचे कारण इब्सेनच्या मृत्यूनतर त्याचा प्रसिद्ध मित्र ब्रॅण्डस व त्याचे अन्य मित्र यानी चग बाधून इब्सेनच्या अनेक गोष्टी येथे जमविल्या आणि मला वाटते की उद्या इब्सेनचे सकलित एकच मोठे म्युझियम उस्लो वा शिएन येथे करायचे ठरले तरी ही मडळी हे म्युझियम तेथे जाऊ देतील असे वाटत नाही इब्सेनने ग्रिमस्टामध्ये काढलेली चित्रे, त्याने वापरलेल्या वस्तू, कपडे, त्याने जमवलेली पुस्तके, त्याला मिळालेली पारितोषिके, पदके, इब्सेनने औषध कारखान्यात वापरलेल्या वस्तू, *कॅटिलीना* लिहिताना वापरलेली खोली इ इ अनेक गोष्टी पाहून मी तृप्त झालो. माझ्या पावलावर पाऊल ठेवून जर पुढे कोणी मराठी वा अन्य भारतीय इब्सेनप्रेमी नॉर्वेत आला तर त्याला ग्रिमस्टाला येणे आवश्यक आहे. कारण मनाची जडणघडण होत असताना इब्सेन येथे चार वर्ष राहिला होता, ही गोष्ट महत्त्वाची आहे.

म्युझियम काळजीपूर्वक पाहून झाल्यावर आम्ही ब्योर्कलुण्डच्या ऑफिसमध्ये विश्राती घेतली त्याची सहकारी तरुण मुलगी लिझेन बर्गसुहावेन अतिशय सुदर होती. ती अप्रतिम असल्याची ग्वाही रेखाने दिली लिझेनने आमच्यासाठी गरमगरम कॉफी तयार केली होती. कॉफी घेत असताना ब्योर्कलुण्डच्या मनात आम्हाला त्याचे घरी न्यावे असे आले व त्याने तसे सूतोवाचही केले पण प्रत्यक्षात काय झाले कोण जाणे नतर आम्ही रमतगमत जगलवजा भागातून फेरफटका मारीत विविध तऱ्हेची घरे खाली उतरून पाहात आराडेल रेल्वे स्टेशनवर येऊन पोहोचलो. ब्योर्कलुण्डने मोटरकार थेट प्लॅटफॉर्मवर आणली.

परत गप्पासप्पा झाल्या. भुरभुर हिम पडत होते. आराडेलहून उस्लोला जाणारी ट्रेन फक्त तीन डब्याची होती. प्रवास पाच तासाचा होता निरोप घेताना ब्योर्कलुण्डला कुडी अडकविण्याचे हँगिंग आम्ही भेट दिले. ती छोटीशी भेट घेताना ब्योर्कलुण्डचे डोळे चमकले व तो आनदून गेला गाडी उस्लोच्या दिशेनी निघाली तेव्हा ब्योर्कलुण्ड अगदी शेवटपर्यंत हात हालवून आमच्याकडे पाहात होता.

□

## यूलेंदाल फोर्लागला भेट ५२.

नॉर्वेतील सर्वांत मोठी प्रकाशन सस्था आणि इब्सेनची नाटके प्रकाशित करीत आलेली प्रकाशन सस्था म्हणून त्याना भेटण्यास मी उत्सुक होतो उलट इब्सेन एक्सपर्ट

आणि अग्रेसर मराठी - इडियन प्रकाशन सस्थेचा एक सचालक म्हणून माझे त्यानी स्वागत केले. श्रीमती इवा ली नील्सन यानी सस्थेच्या कार्याची मला माहिती दिली

इब्सेन, ब्योर्नसन, जोनास ली, यासारख्या मोठ्या नोर्स्क साहित्यिकाची पुस्तके १९ व्या शतकात कोपेनहागन मधील डॅनिश प्रकाशक हेगेल हे काढीत स्वतत्र नॉर्वे चळवळीचा अध्वर्यू ओले ब्युल याने या साहित्यिकाच्या पुस्तकाचे हक्क विकत घेऊन यूलेंदालकडे प्रकाशनाचे काम सोपविले, त्यातून ही संस्था उदयास आली. ललित वाङ्मयाच्या प्रकाशनाचे काम करण्यात यूलेंदाल आजही आघाडीवर आहे.

यूलेंदालने शभरी ओलाडली आहे. तेथे ११२ माणसे कामाला आहेत व छपाई खेरीज सर्व गोष्टी ते करतात यूलेंदालची कचेरी तीन मजली भव्य आहे. विशेष म्हणजे ती दगडी आहे.

श्रीमती नील्सन यानी आम्हाला सस्थेत फेरफटका मारून आणले. केबिन सिस्टिम दिसली. काही अन्य मडळींचा परिचय झाला पण हीही मडळी कामात होती नील्सनबाईंनी त्याच्या केबिनमध्ये कॉफीपान करताना आमचा परिचय करून घेतला. ‘ माझीही आत्मकथा ’ हे कॉण्टिनेण्टलचा इतिहास सागणार पुस्तक मी त्याना दिले व अन्य तीन - चार पुस्तके दिली

श्रीमती नील्सनबाई स्वत इब्सेनप्रेमी होत्या त्याना माझे इब्सेनप्रेम जाणवले. आणि इब्सेनची सहा खडी आवृत्ती त्यानी मला भेट देऊ केली. त्यावर मी म्हणालो,

‘ तुम्ही दाखविलेल्या अगत्याबद्दल धन्यवाद पण विमानप्रवासात वीस किलोची अट असते. माझ्याजवळ इब्सेनच्या तीन खडी आवृत्तीतील एक खड आहे. उरलेले दोन मी नेऊ शकतो ’ या खडाचे पैसेही मी देऊ केले.

नील्सनबाईंना मौज वाटली त्यानी दोन खड मला भेट दिले. योगायोग म्हणजे दस्त्येवस्कीचे नोर्स्क चरित्रकार गायेर क्येतृसा हे नील्सन बाईंच्या ओळखीचे होते व ते चरित्र यूलेंदालनेच प्रकाशित केले होते. त्याच्याशी सपर्क साधून मला दस्त्येवस्की इटरनॅशनल सोसायटीचे सदस्यत्व देण्याची कल्पना त्यानी बोलून दाखविली यामुळे माझा आनद द्विगुणित झाला

नील्सनबाई झरझरीत होत्या. त्या माझ्यापेक्षा दोन - तीन वर्षांनी लहान होत्या. पण सोनेरी केसांमुळे त्याचे वय थोडे जास्त दाखवीत होते. त्याना माझ्या काळ्याभोर केसाचे व कोटाच्या कापडाचे आश्चर्य वाटलेले दिसले. त्यानी ते बोलूनही दाखविले. सिगरेटचे झुरके घेत त्या मला व रेखाला झपाझप माहिती देत होत्या व प्रश्नही विचारीत होत्या.

विशेष म्हणजे माझी स्वीडिश अकादमीची व बोनिएर प्रकाशकाशी भेटही त्याना प्रश्न विचारण्यासारखी वाटलेली दिसली त्याना मी म्हणालो,

‘ पूर्वी मी गालिमार, आशेत, लारूझ या फ्रेंच प्रकाशनसस्थानाही भेटी दिल्यात पण तुमची सस्था मला ‘ घरची ’ वाटते कारण तुम्ही इब्सेनचे प्रकाशक आहात.’ यामुळे नील्सनबाई खूष झाल्या

यूलेंदालमध्ये असलेली इब्सेनची विविध चित्रे व कार्टून्स नील्सनबाईंनी आम्हाला आवर्जून दाखविली. इब्सेनच्या हयातीत इब्सेनवर कार्टून्सही काढली जात ती येथे पाहावयास मिळाली. यूलेंदालने इब्सेनची नाटके आणि इब्सेनवरील पुस्तके विविध आवृत्त्यात गेली शभर वर्षे काढली आहेत ती येथे प्रदर्शनासारखी माडली आहेत.

□

## उस्लो सिटी म्युझियम ५३.

उस्लो फोक म्युझियम शहराबाहेर आहे तर हे सिटी म्युझियम गावात आहे श्रीमती सिरेन ग्राव्हर यानी हे म्युझियम आम्हाला दाखविले या म्युझियमची इमारत केवळ अप्रतिम आहे. लॅण्डस्केप आर्किटेक्टचरही उत्कृष्ट आहे.

१९ व्या शतकात उस्लो कसे होते, घरातील खोल्या कशा असत, फर्निचर कसे असे, हे मला नीट समजावून देण्याचे उद्दिष्ट त्यानी समोर ठेवले होते शिवणकाम, कपडे धुणे, घर गरम ठेवणे, कामे कशी जिकिरीची असत हे त्यानी दाखविले. आजच्या श्रीमत व सुखसोयींनी युक्त घरावरून व रस्त्यावरून त्या वेळच्या नॉर्वेची कल्पना करू नका तर या म्युझियमवरून कल्पना करा असे त्या सागत होत्या. त्याही इब्सेनच्या चाहत्या होत्या आणि त्याच्या म्हणण्यात अर्थ होता १९ व्या शतकातील नॉर्वेजियन्सची राहाणी १९व्या शतकातील इग्लड फ्रान्समधील राहाणीपेक्षा मागास आणि गरिबीतील होती. त्याना वसाहतवादाचे मिळालेले फायदे नॉर्वेला मिळालेले नव्हते.

ग्राव्हरबाईंनी अभ्यासपूर्वक तयारी केली होती. रॉन्दीबाईंनी त्याना फुले दिली तेव्हा त्याना खूप आनद झाला एका निवृत्त एम्बसी - सेक्रेटरीची पत्नी हे काम मन पूर्वक करते हे पाहून आम्हाला विशेष वाटले आर्थिक गरज हा भाग वेगळा पण हे काम त्या खास आवडीने करत होत्या त्या देखण्या होत्या व त्याचा निळा वेषही रुबाबदार होता. एककाळ त्या दिल्लीत येऊन भारतात राहून गेल्या होत्या

इब्सेन विद्यार्थिदशेत जेव्हा उस्लोत राहात होता तेव्हा भिकार वस्तीत, गरिबीत राहात होता त्याचे त्याच्या मनावर प्रतिकूल सस्कार झाले उलट म्हातारा इब्सेन आयुष्याच्या शेवटी जेव्हा उस्लोत राहात होता तेव्हा आलिशान वस्तीत राहात होता त्या वेळी तो कीर्तीच्या शिखरावर होता आणि उस्लोचा विकासही झालेला होता ही परिस्थिती ग्राव्हरबाईंनी उलगडून सागितली

उस्लो सिटी म्युझियममधून हिंडत असताना ग्राव्हरबाईंजवळ इब्सेनच्या स्केचेस व कार्टूनची पुस्तिका दिसली. ती मला आवडल्यामुळे अशी पुस्तिका कोठे मिळते असे मी विचारले तर ती तेथेच विकत मिळते असे आढळले. मी त्वरित ती विकत घेतली.

उस्लो सिटी म्युझियममध्ये उस्लो गाव कसे कसे विकास पावत गेले आणि त्याचे ऐतिहासिक टप्पे कसे आहेत याचे शास्त्रीय दर्शन घडते उस्लो नगरीचा चद्राकृती आकार माझ्या मनावर ठसला नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क ही स्कॅण्डिनेव्हियन राष्ट्रे, युरोपीय राष्ट्रे असूनदेखील समुद्रामुळे युरोपपासून अलग, वेगळी आहेत. तेथील वातावरण वेगळे त्याप्रमाणे तेथील गावे, शहरेही वेगळी अत्यत कमी व विरळ लोकवस्तीमुळे नगरे रम्य व मनोवेधक आहेत. ख्रिश्चॅनिटीचा पगडाच काय पण ठसाही पुसट आहे उस्लोबाबतही हे जाणवते. निसर्गाच्या रम्य कुशीत ही जगद्विख्यात् सुदर नगरी वसली आहे.

सुरुवातीचे उस्लो आकर नदीच्या पूर्वेस होते. तिसऱ्या हारल्ड राजाने ही इ स १०५० मध्ये वसविली १४ व्या शतकात ही भरभराटीला आली आणि राजधानी झाली १६२४ च्या आगीत उस्लो खूपच जळली नतर जी वस्ती झाली ती आकर्सहूस किल्ल्याच्या भागात हिचे नाव चौथ्या ख्रिस्तियनने वसविल्यामुळे क्रिस्तियानिया असे ठेवण्यात आले एकोणिसाव्या शतकात ह्या नगरीला बरे दिवस आले व तिची वाढ झाली १९ व्या शतकाच्या सुरुवातीस हिची लोकसख्या फक्त ९,५०० होती तर एकोणिसाव्या शतकाअखेरीस २,३०,००० झाली आज सुमारे ४॥ लाख इतकी आहे आणि आज तिचे रूपातर अद्ययावत आधुनिक नगरीत झाले आहे

दुसऱ्या महायुद्धात उस्लोपासून जवळच जर्मनाची विनाशिका 'ब्लूशेर' बुडविण्यात आली ती अद्भुत कथा चित्रपट रसिकाच्या स्मरणात असते. दुसऱ्या महायुद्धात उस्लो नगरी बचावली कारण त्यासाठी नॉर्वेजियनानी लवकर शरणागती पत्करली. परतु महायुद्धाच्या पाच वर्षांच्या काळात जर्मनाच्या ताब्यात नॉर्वे होते. त्या वेळी उस्लोतील नागरिकाचा छळ झाला. तीमधील देशभक्ताना गोळ्या घालून मारण्यात आले महायुद्धानतर नॉर्वे मुक्त झाला अमेरिकनाबद्दल वाटणारी कृतज्ञता या लोकानी आकर्सहूस किल्याबाहेर रूझवेल्टचा पुतळा उभारून व्यक्त केलेली आहे.

उस्लो सिटी म्युझियम आम्ही गेल्या गेल्या पाहावयास हवे होते असे आम्हास वाटले म्युझियम आणि उस्लोचे अतरग उलगडून दाखवू पाहाण्याऱ्या श्रीमती सिरेन ग्राव्हर आमच्या दीर्घकाळ स्मरणात राहतील

□

## नॅशनल आर्ट गॅलरी ५४.

ही आर्ट गॅलरी पुरेशी भव्य आहे येथे फक्त नॉर्वेजियन चित्रकाराची चित्रे - शिल्पे आहेत असे नाही तर अनेक विख्यात युरोपीय चित्रकाराची चित्रे आहेत. ही गॅलरी जास्त निवातपणे पाहावयास हवी होती असे मला नतर वाटले व हळहळही वाटली.

मला विशेष आनद झाला कारण सेझानची व इंप्रेशनिस्ट मडळींची बरीच पेंटिंग्ज येथे आहेत रेखाला तिचा रेन्वाही येथे भेटला. वेरेनश्योल्डने उतारवयातील इब्सेनचे काढलेले जगद्‌विख्यात चित्र येथे आहे. इब्सेन त्याच्या परिपक्व आणि रुबाबदार ताठ्यात या चित्रात दिसून येतो. चित्राचे रग अतिशय हळवे आणि कोमल आहेत. फिके आहेत

डाल, टीडेमान, गूडअ् हे थोर नॉर्वेजियन चित्रकार होत त्याना मूकएवढी आतरराष्ट्रीय कीर्ती मिळाली नसली तरी त्याची चित्रे अत्युत्कृष्ट दर्जाची व स्वतत्र प्रतिभेची, शैलीची निदर्शक आहेत. योहाना क्रिस्तियन डाल ( १७८८ - १८५७ ) हा निर्सगाची चित्रे रेखाटणारा सिद्धहस्त चित्रकार आहे. फ्योर्दस्, सागर किनारीचे कडे, सूर्यास्त, कापणीला आलेली शेते, धबधबे, वादळात उभा असलेला बर्चवृक्ष, इ. अनेक चित्रे त्याचे सामर्थ्य दर्शवितात त्याने नॉर्वेच्या निसर्गाचे अतिशय खोलवर व झपाटून जाऊन चित्रण केलेले दिसले फिअर्नले हा सुद्धा निर्सग चित्रकार आहे. तो डालचा शिष्य वाटावा असाच आहे पेडर बास्केचे लाईटहाऊस हे विख्यात चित्र पाहून फार आनद झाला

आदोल्फ टीडेमानने ( १८१४ - १८७९ ) नॉर्वेतील शेतकरी व त्याचे जीवन रेखाटले आहे चर्चेस व चर्चजीवनाची चित्रेही आहेत हा नॉर्वेजियन मडळींचा आवडता आहे.

हान्स गूडअ ( १८२५ - १९०३ ) माणसाची व त्याच्या समूहाची चित्रे काढतो. हार्दांगरमधील वधूची मिरवणूक हे त्याचे चित्र फार गाजलेले आहे.

हॅरिएट बेकर (,१८४५ - १९३२ ) ही नॉर्वेची थोर स्त्री - चित्रकार होय. तिचा आवर्जून उल्लेख केला पाहिजे निसर्गचित्रे आणि घरातील चित्रे दोन्ही ती उत्कृष्ट तऱ्हेने

काढताना दिसते. प्रकाश व प्रकाशकिरणे आणि झाडे याचे संमिश्र चित्रण तिला छान साधते.

क्रोग, आऊगूस्त काप्पेलने, हान्स हेयरदाल, गेरहार्द मूथअ्, ह्यांची चित्रेही आम्हाला छान वाटली.

नॉर्वेजियन घराघरातून भरपूर चित्रे पाहायला मिळतात त्याची सुरुवात उस्लोच्या राष्ट्रीय चित्र सग्रहालयातील थोर चित्रकाराच्या स्फूर्तीदायक चित्रात आहे.

□

## ५५. ग्रांद काफे

'ग्राद काफे' हे उस्लोतील अतिशय विख्यात हॉटेल आहे एकोणिसाव्या शतकातही ते असेच विख्यात होते. उस्लोतील बडी बडी मडळी येथे जेवणासाठी येत असत. आजही येतात उतारवयात, उस्लोत स्थायिक' झालेला इब्सेन येथे येई कोपऱ्यातील एखाद्या टेबलावर मद्य घेत वर्तमानपत्रे वाचीत बसे वर्तमानपत्रे काळजीपूर्वक वाचणे इब्सनेला मनापासून आवडे तेही इतराकडे पाठ फिरवून बसून वाचणे

या हॉटेलमध्ये जायचे व दुपारची छोटी लच येथे घ्यायची हा कार्यक्रम ह्योग मडळींनी आखला होता. इब्सेन ज्या टेबलावर जास्त करून बसे तेच टेबल आम्ही निवडले होते हॉटेल फार मोठे. उची आणि जुने फर्निचर. गालिचे, झुबरे, आरसे आणि रुबाबदार खुर्च्या माझ्या दृष्टीने या हॉटेलात येणे महत्त्वाचे नव्हते पण ह्योग पतिपत्नींना ते आवश्यक वाटत होते

दुपार झाली असल्याने मी मोठे ऑम्लेट व सॅलड मागविले नतर काळी कॉफी आली. हॉटेलच्या एका भितीवर प्रचंड मोठे भित्तीचित्र आहे एकोणिसाव्या शतकातील बडी मडळी हॉटेलात बसून खातपीत आहेत आणि कोपऱ्यातील दरवाज्यात इब्सेन उभा आहे असे हे ऐतिहासिक चित्र आहे हे चित्र आवडावे असे आहे. हॉटेलातील काही प्रेट्सवरही इब्सेनची व्यगचित्रे होती. इब्सेन आणि ग्राद काफे ही नावे एकत्र गुफली गेली आहेत.

'ग्राद काफे' चे महत्त्व अशाकरिता की नॉर्वेतील स्वातत्र्यचळवळीची खलबते येथे चालत. स्वीडन आणि डेन्मार्क दोघाच्याही वर्चस्वापासून नॉर्वेने मुक्त व्हावे आणि

स्वत ची अस्मिता जागवावी असा विचार करणारी अनेक लहानमोठी माणसे येथे ऊठबस करीत त्यामुळे नॉर्वेजियन मडळींना आजही ह्या हॉटेलविषयी आपुलकी वाटते. ह्योग हे इतिहासाचे प्राध्यापक त्याना ही आपुलकी वाटल्यास नवल नव्हते

इब्सेन आणि विख्यात नोर्स्क चित्रकार मूक याची गाठभेट येथे झाली मूकने इब्सेनची जी काही व्यक्तिचित्रे काढली आहेत त्यात ' ग्राद काफे ' मध्ये बसलेल्या इब्सेनचे चित्र सुप्रसिद्ध आहे

ह्योग पतिपत्नीही ह्या हॉटेलमध्ये प्रथमच आले असावेत किंवा खूप वर्षांनी आले असावेत असे वाटले त्यांना खूप आनद झालेला दिसला. मला, चर्चगेटला मरीनड्राईव्ह शेजारचे ' पुरोहित ' हॉटेल पूर्वी होते त्याची आठवण झाली कारण साधे होते ते म्हणजे तेथे असलेले चांदीचे काटे चमचे व सुऱ्या शुगरक्यूबस ठेवायला असलेली चादीची भाडी. हॉटेल भर चौकात आहे आणि भोवती जरा उच अशा इमारती त्यामुळे मुबईची आठवण झाली

❑

## आकर्सहूस

५६.

आकर्सहूस किल्ला आम्ही २९ जानेवारीला सोमवारी बघितला दिल्लीत लाल किल्ला जसा महत्त्वाचा आहे तसा नॉर्वेचा हा ऐतिहासिक किल्ला आहे. अनेक रोमाचकारी प्रसगाचा हा किल्ला साक्षी आहे. विशेष म्हणजे दुसऱ्या महायुद्धात नात्झी जर्मनानी येथेच अनेक नॉर्वेजियन शूर सैनिकाना कैदेत ठेवले आणि फाशीही दिले नॉर्वेसारख्या छोट्या लोकसख्येच्या राष्ट्राने जर्मनीविरुद्ध तीन महिने लढा दिला होता त्यानंतर ४५ साली नात्झी जर्मन्स जेव्हा पराभूत झाले तेव्हा येथेच त्यानी शरणागती पत्करली

*लेडी इगेर ऑफ योस्त्रॉत* नावाचे इब्सेनचे ऐतिहासिक नाटक आहे. झाशीच्या राणीसारखी ही एक राणी होती. या नाटकाच्या आधारे जी फिल्म नोर्स्क मडळींनी केली त्यात राणीची भूमिका ज्या नटीने केली होती त्या मादाम वॉडेलान्द बाई हा किल्ला आम्हाला दाखविणार होत्या या बाई इब्सेनच्या विलक्षण चाहत्या होत्या आणि दुसरे म्हणजे ' लेडी इगेर ' या चित्रपटात पार्श्वभूमीला म्हणून हा किल्ला वापरला गेला होता.

ह्योग पतिपत्नींनी निघताना अत्युत्कृष्ट गुलाबाची फुले घेतली मादाम वॉडेलान्द याचे त्याना खूप कौतुक होते असे दिसले. आम्हाला काही वाटण्याचा प्रश्न नव्हता कारण

मादाम वॉडेलान्द याच्या नटी म्हणूनच्या कारकीर्दीविषयी आम्हाला काहीच माहिती नव्हती शिवाय नटनट्या या विषयी मला खास आकर्षण कधीच वाटलेले नाही मादाम वॉडेलान्द इब्सेनच्या नाटकाच्या चाहत्या व अभ्यासक होत्या हे माझ्या दृष्टीने विशेष होते

आकर्सहूस किल्ला उस्लोतून जाता येता आम्ही बाहेरून काही वेळा पाहिला होता आत्ता आतून पाहण्याचा योग येत होता. किल्ला म्हटले की भव्य हॉल्स, राजराणींचे खास चॅपेल, राहण्याच्या जागा, तळघरे, भुयारे, घोड्याच्या पागा, तुरुंग, खदक, बुरूज इ इ सारे आले. हिवाळ्यात आकर्सहूस जवळजवळ बद असतो पण मादाम वॉडेलान्द याच्या मध्यस्थीने आम्हाला साऱ्या गोष्टी पाहता आल्या. साधारण युरोपात जसे कासल असतात तसाच हा कासल आहे ह्योग व मादाम सागत होते तो इतिहास आम्ही ऐकत होतो त्याचा इतिहास आमच्या डोळ्यासमोर उभा राहणे अवघडच होते पण माहिती तर होत होती हिंडताना दालनातून भुयारातून जाम थडी वाजे तर बाहेर हिंडताना बर्फावरून घसरून पडणार नाही म्हणून बिचकत बाचकत चालावे लागत होते.

किल्ल्यातला सर्वांत उच्च भाग, बालेकिल्ल्यासारखा जो होता तेथे शिपाई गस्त घालीत होते व नॉर्वेचा ध्वज फडकत होता. ताबड्या रगावर निळा क्रॉस असा नॉर्वेचा ध्वज आहे मौज म्हणजे नॉर्वेचा ध्वज, फ्रान्सचा ध्वज आणि इग्लडचा युनियन जॅक याच्यातील रग सारखे आहेत अर्थात राष्ट्रे अगदी भिन्न प्रवृत्तीची आहेत. नॉर्वेजियन रॉयल गार्ड्स उत्कृष्ट पोषाखात सगीनी घेऊन उभे होते हिमवर्षाव आणि झोंबरे गार वारे याची त्याना जणू पर्वा नव्हती. नॉर्वेत लोकसख्या फक्त चाळीस लाखाच्या आसपास असल्याने लष्करी शिक्षण सर्वांनाच करावे लागते. त्यातील उत्कृष्ट ठरणाऱ्यांना आकर्सहूसवर काही काळ नेमण्यात येते किल्ल्यात छोटी लष्कर छावणी आजही आहे.

जेथे दुसऱ्या महायुद्धातील नॉर्वेजियन देशभक्त सैनिकाना गोळ्या घालून मारण्यात आले ती जागा आम्हास दाखविण्यात आली भोवती उच्च वृक्ष होते आणि एका भितीवर बदुकीच्या गोळ्याच्या खुणा होत्या तेथेच स्मारकाचा स्तभ उभारण्यात आला आहे ही जागा पाहण्याचा प्रसग अर्थातच गभीर होता आम्ही भारतीय पद्धतीने वदन केलेले पाहून ह्योग याना फार समाधान वाटले दुसऱ्या महायुद्धात भारतीय फौजा ब्रिटिशाच्या बाजूने आणि नात्झी फौजाविरुद्ध लढल्या ही गोष्ट मी आवर्जून स्पष्ट केली. अर्थात ह्योग पतिपत्नीच्या स्मरणात दुसऱ्या महायुद्धाचा इतिहास, नॉर्वेवर जर्मनीने केलेले आक्रमण या साऱ्या गोष्टी ताज्या आहेत.

फिरता फिरता आम्ही एका विशिष्ट जागी आलो. मादाम ह्यानी आम्हाला तेथे

थाबवून त्या जागी त्यानी पूर्वी कसे काम केले होते ते रगवून सांगितले ते ऐकल्यावर मी त्याना म्हणालो,

'अरे आम्ही तर इंगेर राणीसमोर उभे आहोत.' आणि त्याच्याशी मी हस्तादोलन केले त्याना खूप खूप आनद झाला त्याचा मूळचा अतिशय सुरेख चेहरा लाल झाला व उजळून निघाला

मादाम वॉडेलान्द ह्यानी त्याच्या तरुण वयात फिरत्या नटमडळीत सामील होऊन स्कॅण्डिनेव्हियाभर कामे केली होती. त्याचे नाट्यकलेवर जेवढे प्रेम होते तेवढेच इब्सेनच्या नाटकावरही होते. त्यानी एक गोष्ट सागितली ती ही की, नॉर्वेतील सध्याची तरुण मडळी इब्सेनच्या नाटकातील वास्तववादाला दूर करून नाटके करण्याचा प्रयत्न करीत आहेत ते योग्य नव्हे लेडी इगेर ही सरदारीण आहे पण प्रत्यक्ष अभिषिक्त राणी नाही ( Queen ) हेही त्यानी सागितले

किल्ला म्हटला की आपल्या डोळ्यासमोर उच डोंगर उभा राहतो. माथ्यावर पडकी तटबदी दिसते न दिसते. आकर्सहूस बुटक्या टेकडीवर आहे. त्याचे बाधकाम नजरेत भरते. विशेष म्हणजे उस्लो बदरावर हा किल्ला आहे त्याच्या तटावरून अर्धचद्राकृती उस्लो आणि समोर सागर असे विहगम दृश्य दिसते किल्ला खूप सुस्थितीत आहे

आकर्सहूस किल्ल्यात नॉर्वेचा राष्ट्रकवी वेर्गेलान्द याची खोली जशीच्या तशी जतन करण्यात आली आहे. वेर्गेलान्द हा स्वतत्र नॉर्वेवादी होता आणि ह्या किल्ल्याचा क्यूरेटर म्हणून काही वर्षे काम करीत होता वेर्गेलान्दला सापाची भारी आवड होती त्याचे सूचक म्हणून खोलीतील गालिच्यावर रबरी साप ठेवलेले आहेत ते पाहून आम्हास मौज वाटली वेर्गेलान्दचा आणि इब्सेनचा सबध आला नव्हता वेर्गेलान्द त्याच्या जरा आधीच्या पिढीतील पण वेर्गेलान्दची बहीण कोलेत इब्सेनचे एक आदरस्थान होते आणि तिलाही इब्सेनचे कौतुक होते

तारुण्यात, १८६३ अगोदर इब्सेनने काही काळ उस्लोत घालविला होता त्याच्या *कोंग्जएमनेर्ने* या नाटकात हा किल्ला आणि उस्लोच्या बिशपची मोनॅस्ट्री याची पार्श्वभूमी आहे.

इ स पूर्व ९००० ते ८००० इतक्या मागे नॉर्वेतील इतिहासाचा मागोवा घेतला जातो मूळ नोर्स मंडळी कोण होती. याविषयी अनेक अन्वय लावले जातात काहींना वाटते की प्राचीन काळी जर्मन टोळ्यांपैकी काही येथे येऊन स्थायिक झाल्या असाव्यात प्राचीन नोर्स मडळींना बोटी तयार करता येत होत्या आणि ती स्कीईंग देखील करीत होती याचे पुरावे उपलब्ध होतात.

इ. स. ८०० ते १०३० हे वायकिंग युग मानले जाते. त्या काळी नॉर्वेजियन वायकिंग्ज (त्यात स्वीड्स, डेन्सही असत) युरोपात काही ठिकाणी गेले. काही ठिकाणी लूटमार करून परत आले तर काही ठिकाणी स्थिरावले फ्रान्समधील नोर्मांदि किंवा आयर्लंड, स्कॉटलड मधील काही भाग वायकिंग सस्कार जतन करून आहेत वायकिंग काळात दोन फार महत्त्वाच्या घटना घडल्या. एक म्हणजे नॉर्वे एक राज्य म्हणून उदयास आले आणि नॉर्वेत ख्रिश्चन धर्म आला. मूळचे पेगन देवदेवता व विश्वास मागे पडले. फेअरहेअर हाराल्द हा नॉर्वे राष्ट्राचा सस्थापक मानला जातो. स्तवांगर येथे झालेल्या परकीयाशी युद्धात या हाराल्द राजाने विजय तर सपादित केलाच पण एकछत्री राज्यही स्थापन केले. हा राजा वायकिंग राजा होता.

वायकिंग कालखडाकडे नॉर्वेजियन्स कौतुकाने बघतात. वायकिंग यांचे धाडसी होते त्यानी नॉर्वेच्या जगप्रसिद्ध आरमाराचा पाया घातला शूर, लढवय्ये म्हणून स्वत.चा ठसा सर्वत्र उमटविला. वायकिंग काळातील जहाजे उस्लोत खास म्युझियम उभारून जतन करण्यात आली आहेत अमेरिका 'शोधल्याचे' श्रेय कोलबसला देण्यात येते पण अलीकडील सशोधनाने हे सिद्ध केले आहे की 'लान्स ओ मेडोज' भागात नॉर्वेजियन वायकिंग्ज इ. स. १००० च्या आसपासच जाऊन पोहोचले होते.

वायकिंग कालखडानतर आणि मध्ययुगाच्या पूर्वार्धात नॉर्वेचा इतिहास झगमगता राहिला नाही स्वीडन आणि डेन्मार्क याच्या तुलनेत नॉर्वे नेहमीच मागे राहिले ब्यूबॉनिक प्लेगचा सर्वात जबरी तडाखा नॉर्वेला बसला. त्या काळच्या लोकसख्येपैकी १/३ लोकसख्या या प्लेगच्या साथीत मृत्युमुखी पडली. ही घटना १४ व्या शतकाच्या मध्यावर घडली. १५३० नतर तर नॉर्वे डेन्मार्कचा भाग बनले. नॉर्वेवर डॅनिश राजघराण्याचे राज्य चालू झाले. नॉर्वे - डेन्मार्क 'जुळी राज्ये' म्हणून त्या काळी ओळखली जात

सुरुवातीच्या काळात नॉर्वेतील ख्रिश्चन धर्मपथ रोमला मानीत असे. पण १५३७ नतर डेन्मार्कच्या राजाने लूथर पथीय प्रॉटेस्टट पंथ स्वीकारला आणि नॉर्वेतही हा बदल घडून आला नॉर्वे आजतागायत प्रॉटेस्टट आहे. आणि नॉर्वेचे चर्च हे 'स्टेट चर्च' आहे डॅनिश वर्चस्वाखाली असले तरी नॉर्वेतील स्वत.चे सास्कृतिक जीवन आणि नोर्श्क भाषा याची वाढ चालूच होती. त्याचीच परिणती पुढे नॉर्वेजियन राष्ट्रीय पुनरुत्थानात झाली.

इ. स. १८१४ हे नॉर्वेच्या इतिहासातील महत्त्वाचे वर्ष आहे. हा काळ नेपोलिअनची युद्धे सपण्याचा काळ होता या काळात डेन्मार्कच्या राजामुळे डेन्मार्क व नॉर्वेच्या फौजा नेपोलिअनच्या बाजूने युद्धात उतरल्या होत्या तर स्वीडन नेपोलिअनच्या विरुद्ध होते.

स्वीडनने या काळात डेन्मार्कवर हल्ला केला आणि त्याला नामोहरम केले. परिणामत नॉर्वे - डेन्मार्क युती सपुष्टात येऊन नॉर्वे - स्वीडन युती निर्माण झाली. पण याच वेळेपासून नॉर्वेचा स्वातंत्र्यलढादेखील सुरू झाला. अर्थात हा लढा शातता मार्गानेच पुढे सरकत होता.

उस्लोच्या उत्तरेस आईड्सवोल येथे कॉन्स्टिट्यूअन्ट ॲसेंब्ली ( घटना - परिषद ) निवडणुकाच्या मार्गाने अस्तित्वात आली १७ मे १८१४ रोजी ॲसेंब्लीने स्वतंत्र, स्वायत्त आणि लोकशाही नॉर्वेसाठी घटना निर्माण केली. हा ऐतिहासिक प्रसंग ज्या वास्तूत घडला तो वास्तू राष्ट्रीय स्मारक म्हणून आज उभा आहे.

१८१४ साली तयार केली असलेली राज्यघटना दुरुस्त्या व भर टाकून आजही वापरात आहे. प्रजासत्ताक पद्धती, मानवी हक्काची स्वीकृती आणि सत्ताविभाजन ह्यांना या घटनेत आधारस्तभ मानण्यात आले आहे घटनेनुसार लोक स्टॉर्टिंगवर सदस्य निवडून देतात न्यायव्यवस्था न्यायालयाच्या हातात आहे आणि सर्वोच्च न्यायालयही उस्लोत आहे. १८८४ पासून ससदीय लोकशाही सरकारच घटनात्मक मानण्यात येत आहे सरकार स्टॉर्टिंगच्या ( म्हणजे पार्लमेण्टच्या ) विश्वासावर चालते नॉर्वेतील राजा सत्तेपासून दूर असतो पण त्याला अतिशय मानाचे स्थान आहे.

१९०५ साली नॉर्वे - स्वीडन युती सपूर्णपणे सपुष्टात आली नॉर्वेने स्वत.चा राष्ट्रध्वजही फडकावला आज जगात नॉर्वे एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून अभिमानाने उभे आहे स्वतंत्र होतानादेखील नॉर्वेने खास ठराव करून राजेपद टिकविण्याचे ठरविले. डॅनिश प्रिन्स कार्ल याला नॉर्वेचा राजा म्हणून स्वीकारण्यात आहे. त्याने ' सातवा होकॉन ' असे नाव घेतले. १९०५ साली त्याला राज्याभिषेकही करण्यात आला.

१९४० साली एप्रिलमध्ये नात्झी जर्मन फौजानी हिटलरच्या आदेशानुसार नॉर्वेवर लष्करी आक्रमण केले. पुढे पाच वर्षे नॉर्वे जर्मनाच्या लष्करी अमलाखाली होता. नॉर्वेच्या इतिहासातील हा दु खद व अपमानाचा काळ होता. या काळात सातवे होकॉन इग्लडमध्ये राहून नॉर्वेची अस्मिता साभाळत होते. इग्लड - नॉर्वेची दाट मैत्री तेव्हापासून आजतागायत टिकून आहे नॉर्वेत इग्लिश भाषा शिकविली जाते

सातवे होकॉन १९५७ मध्ये कालवश झाले आणि त्याचे पुत्र पाचवे ओलाव्ह नॉर्वेच्या राजपदी आले आज ऐंशी वर्षे उलटून गेलेले हे राजेसाहेब त्याची बुद्धिमत्ता, व्यक्तिमत्त्व आणि नॉर्वेच्या अभिमानामुळे नोर्स्क मडळींचे आदरस्थान आहेत.

१७ मे हा नॉर्वेचा राष्ट्रदिन म्हणून पाळण्यात येतो सर्वत्र झेंडे नुसते फडकत असतात घराघरातूनच नव्हे तर प्रत्येक खिडकीतून झेंडे डोकावत असतात. स्वालबार बेट नॉर्वेचे

आहे. तेथेही हा दिवस उत्साहाने साजरा होतो या दिवशी लष्करी संचलन वगैरे मात्र होत नाही. निघतात त्या लहान व तरुण मुलामुलींच्या शिस्तबद्ध मिरवणुका कोणीही मुलेमुली मागे राहात नाही. त्यामुळे या मिरवणुकातील उत्साहाला व आनंदाला पारावार राहात नाही. स्मारके, कबरी यांच्यावर पुष्पचक्र अर्पण करणे, चर्चमध्ये प्रार्थना करणे, गावागावातून सार्वजनिक कार्यक्रम घेणे हे मनापासून केले जाते उस्लोत कार्ल योहान या राजरस्त्यावर सर्वात मोठी मिरवणूक निघते त्या वेळी राजकुटुंब राजवाड्याच्या गच्चीत उभे राहून सर्वांची वंदना स्वीकारतात व सर्वांना शुभेच्छा देतात.

□

## ५७. राज्यकारभार

नॉर्वेत राजा हे पद आणि राजा आजही आहेत पण आपल्याकडील राष्ट्रपतीसारखे हे पद आहे. खरी सत्ता पार्लमेण्ट आणि पतप्रधान ह्यांच्याच हातात आहे मात्र नॉर्वेच्या राजेसाहेबावर लोकांचे फार प्रेम दिसले

राष्ट्रीय सभा - स्टॉर्टिंग म्हणजे आपल्या भाषेत पार्लमेंट ही राजकारभाराच्या केंद्रस्थानी आहे निवडणूक दर चार वर्षांनी होते आणि विविध विभागातून १५७ सदस्य निवडून येतात. १८ वर्षाच्या वरील व्यक्तींना मतदानाचा हक्क आहे लेबर पक्ष आणि कझर्वेटिव्ह पक्ष हे सर्वांत महत्त्वाचे पक्ष आहेत. ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टी, सेंटर पार्टी, समाजवादी पक्ष, आणि पार्टी ऑफ प्रोग्रेस हे इतर पक्ष आहेत आम्ही गेलो होतो तेव्हा लेबर पार्टी कोॲलिशनमध्ये सत्तेत होती व श्री. सिस्यअ् हे पतप्रधान होते

स्टॉर्टिंग हे दोन गृहात विभागले गेले आहे, ओदेलस्तिंग आणि लागटिंग कुठलेही बिल मान्यतेसाठी दोन्ही गृहासमोर ठेवावे लागते. स्टॉर्टिंगचे बहुतेक काम स्थायी समित्यामार्फत होते महत्त्वाचे प्रश्न मात्र सर्वजण चर्चा करून सोडवितात. १८१४ साली नॉर्वेची घटना बनविण्यात आली तेव्हापासून नॉर्वे लोकशाही मार्गाने पुढे जात आहे घटना बनविण्याच्या ऐतिहासिक प्रसंगाचे भव्य तैलचित्र अध्यक्षीय सभागृहात आहे सभापतीच्या खुर्चीमागे ते आहे

नॉर्वेचे परराष्ट्रीय धोरण काय असावे याबाबत यावर दुसऱ्या महायुद्धानंतर सर्वपक्षात एकमत आहे. आंतरराष्ट्रीय सहकार्याच्या योजनात भाग घेणे युनो, नाटो आणि OECD चे कार्यशील सदस्य राहणे हा त्याचा परिणाम होय. जगापासून दूर असणाऱ्या नॉर्वेजियन

मडळींना आपण इतरात मिसळलो तरच सकटकाळी लोक आपल्या मदतीला धावून येतात एरवी नाही हे दुसऱ्या महायुद्धात चागलेच उमगले. ' तिसऱ्या जगाशी ' सबध ठेवण्यावरसुद्धा नोर्स्क मडळी सध्या भर देत आहेत.

नॉर्डिक कौन्सिल, युरोपियन कौन्सिल आणि EFTA या सर्व सघटनाचे नॉर्वे सदस्य आहे राजकारण आणि व्यापार उद्योग दोन्ही बाबतीत आपण अलिप्त असून चालणार नाही आवर्जून प्रयत्न करून आपण सहकार्य व सामंजस्य वाढविले पाहिजे असे नॉर्वेतील सरकाराना वाटत आले आहे. EC मध्ये नॉर्वेला पूर्ण सदस्यत्व देण्यात आलेले नाही परतु औद्योगिक सहकार्याच्या योजनात नॉर्वे सहभागी झालेले आहे.

लष्करी दृष्टीने नॉर्वेचे स्थान महत्त्वाचे आणि अडचणीचे आहे पूर्व आणि पश्चिम याच्यातील सबध शाततापूर्ण असले तर नॉर्वेही शात राहू शकते. सुरक्षित राहू शकते. नाटोचा सदस्य होण्याचे नॉर्वेचे कारण हेच आहे. नाटोत असल्यामुळे पूर्वेकडील युरोपीय राष्ट्राशी नॉर्वे सलोख्याचे सबध ठेवू शकते व स्वत. सुरक्षित राहू शकते. सध्या रशियात फार मोठ्या घडामोडी व बदल चालू आहेत. गोर्बाचोव्ह एक दुसरी क्रांतीच घडवून आणत आहेत कम्युनिस्ट लष्करशाहीतून रशियाला व पूर्व युरोपला मुक्त करीत आहेत. नोर्स्क मडळी यावर फार खूष दिसली

लोकसंख्या अत्यत कमी असल्याने नॉर्वे मोठे खडे सैन्य ठेवू शकत नाही परतु सर्वांना लष्करी शिक्षणाची पार्श्वभूमी असल्याने युद्धप्रसगी बरेच सैन्य उभे करता येण्याची शक्यता आहे. नॉर्वेने स्वत च्या देशात अलाईड सैन्याला तळ दिलेले नाहीत किंवा अमेरिकेला विमानतळ, आण्विक तळ दिलेले नाहीत एवढेच नाही तर २४ अक्षाशाच्या पलीकडे असलेल्या फिनमार्कमध्ये मित्र राष्ट्राची विमाने किंवा जहाजे याना प्रवेश नाही. त्यासाठी खास परवानगी लागते. दुसऱ्या महायुद्धाचा दारुण अनुभव पाठीशी असल्यामुळे युद्धजन्य परिस्थितीत या सर्व अटी शिथिल कराव्या लागतील याची या मडळींना जाणीव आहेच

यु एन् सघटनेसाठी नॉर्वेने सैन्याच्या काही डिव्हिजन्स ठेवल्या आहेत आणि शातीसैन्याची गरज युनोला जेव्हा लागते तेव्हा ह्या तुकड्याचा वापरही करण्यात येतो सध्या लेबेनानमध्ये नॉर्वेची शातीसेना आहे

नॉर्वेच्या सैन्यात पुरुषाची भरती केली जाते आणि ती मोजकी असते हे उघडच आहे. परतु १९७९ नतर स्त्रियाही सैन्यात नोकरी करू शकतात किंवा लष्करी शिक्षण घेऊन वेळ आली तर सैन्यात भरती होण्याची तयारी करू शकतात. नॉर्वेचे सैन्य सुमारे पन्नास हजार आहे आणि त्यातील १२,००० मडळी सिव्हिलियन आहेत. युद्धजन्य परिस्थितीत नॉर्वे

सुमारे सव्वातीन लाख सैन्य उभे करू शकते. एवढेच नव्हे तर इतर मडळीही निमलष्करी कामे पार पाडू शकतात. सर्वसामान्य नॉर्वेजियन माणूसही सावध आणि शिस्तप्रिय का आहे याचा उलगडा या पार्श्वभूमीवर होतो

□

## ५८. वीगेलांड पार्क

वीगेलाड म्युझियम आम्हाला नीट पाहता आले पण बाहेर पाऊस पडत असल्यामुळे वीगेलाड पार्क धावतपळत उरकावे लागले

वीगेलाड हा प्रतिभाशाली शिल्पकार होता त्याने निर्माण केलेली शिल्पे म्युझियममध्ये आहेत. उत्तरोत्तर त्याच्या शिल्पाचा आकार मोठा होत जाताना दिसतो. मानवी जीवनाचे विशाल चक्र त्याच्या आयुष्यभराच्या कलेचे सूत्र आहे. हीच शिल्पे पोलादात ओतून बाहेर पार्कमध्ये माडली आहेत. जगभरचे प्रवासी ही शिल्पे पाहतात आणि आश्चर्याने दिङ्मूढ होतात.

नॉर्वेचे इब्सेन, एडवर्ड ग्रीग, एडवर्ड मूक, ओले ब्युल जसे जगप्रसिद्ध आहेत त्याप्रमाणेच वीगेलाड जगप्रसिद्ध आहे रास्त अभिमान बाळगावा अशी त्याची शिल्पकला आहे मानवी आकृत्यासमूह हा त्याचा विशेष आहे. मात्र आम्हाला आवडली ती त्याची लहान मुलाची शिल्पे. लहान मुलाचे हावभाव त्याने कमालीच्या कौशल्याने शिल्पांकित केले आहेत रेखाचे एक छायाचित्र तिला आवडलेल्या शिल्पासमवेत रॉन्दीबाईंनी टिपले

आम्ही इटलीतील अत्युच्च शिल्पकला पाहिलेली आहे असे असले तरी वीगेलाड याची कामगिरी आम्हाला कमी वाटली नाही. अर्वाचीन काळात हेन्री मूर सोडला तर शिल्पकलेत एवढे भरीव कार्य कोणी केलेले नाही खलील जिब्रान या लेबेनानी कलावताच्या चित्रकलेवर वीगेलाडचा प्रभाव दिसून येतो.

रिसरेक्शन - पुनरुत्थान हे युरोपीय कलेतील महत्त्वाचे सूत्र आहे. पुरलेल्या व्यक्ती अतिम दिवशी पुनश्च जिवंत होतात असे या सूत्रानुसार मानले जाते. हे सूत्र ख्रिश्चन व मुसलमान दोघानाही भावते आपल्याला म्हणजे हिंदू वा निधर्मी या दोघानाही ते भिडत नाही. वीगेलाडने त्याची फार मोठी ताकद या पुनरुत्थानाच्या सूत्रावर खर्च केली आहे व त्याचा आविष्कार दाखविला आहे

वीगेलाड म्युझियममधील शिल्पाकृती पांढऱ्या आहेत. संगमरवरातील किंवा प्लॅस्टर ऑफ पॅरिसमधील वीगेलाड पार्कमधील शिल्पे ब्रॉन्झमधील असल्याने काळी आहेत. हा फरक एकदम मनावर ठसतो

□

## इब्सेनच्या कबरीपाशी ५१.

ज्या दिवशी आम्ही उस्लो सोडले, त्याच्या आदल्या दिवशी संध्याकाळी दोन फेब्रुवारी ९० रोजी इब्सेनच्या कबरीचे दर्शन घेतले आणि आमच्या कार्यक्रमाची जणू सांगता केली. ह्योग कुटुंबाने हेतूपुरस्सर हा कार्यक्रम अगदी शेवटी ठेवला होता हे उघड होते.

उस्लोच्या राष्ट्रीय चर्चच्या कबरस्तानात इब्सेनचा देह चिरविश्राती घेत पहुडला आहे. त्याच्या शेजारी त्याची पत्नी सुझाना व मुलगा सिगूर्द याच्या कबरी आहेत. या कबरस्तानात कबरींची खूप गर्दी आहे आणि मोठमोठी झाडेही बरीच आहेत

इब्सेनची कबर हुडकून काढावी लागली पाऊस पडत होता व हवेत गारठाही भरपूर होता अंधार पडायच्या आत कबरीचे दर्शन झाले हे विशेष. कबरीवर वाहण्यासाठी आम्ही फुले घेतली नव्हती. पण तेथे फुले व लॉरेल्स वाहिलेली होती कबरीवर कोणताही मजकूर नाही फक्त हेन्रिक इब्सेन हे नाव आहे आणि मागे स्तंभ आहे, तो काळाशार आहे.

कबर पाहताना मला क्षणभर हलल्यासारखे झाले पण क्षणभरच. भावना उचंबळून आल्या किंवा विचाराची गर्दी झाली, असे झाले नाही. रॅन्दी ह्योगने आग्रहाने कबरीच्या शेजारी मला उभे करून फोटो घेतला तो एक परिपूर्तीचा क्षण होता आपल्या येथे येण्याचा व कार्यक्रम पार पाडण्याचा हा अखेरचा टप्पा आहे, हे उत्कटतेने जाणवले आणि मन काहीसे खिन्नही झाले. परतीचा प्रवास सुरू झाल्यासारखे वाटले

इब्सेन वस्तुत नास्तिक होता पण त्याचा अंत्यविधी ख्रिश्चन पद्धतीने व अधिकृत इतमामाने झाला विशेष म्हणजे त्याला आवडणारी बायबलमधील सामगीते म्हटली गेली आणि त्याच्या अंत्ययात्रेचे असेही एक गीत आहे. हे गीत व साम मी आवर्जून मागून घेतले. जेव्हा कबरस्तानातून आम्ही बाहेर पडत होतो, तेव्हा आपण फुले आणावयास हवी होती, असे वाटले. कबरीपाशी मात्र मी हिंदू पद्धतीने हात जोडून

मनोभावे नमस्कार केला. सज्जनगडावरील रामदासाच्या समाधीस नमस्कार करताना जी श्रद्धा व आदर माझ्या मनात दाटले होते, त्याच्याएवढीच उत्कट श्रद्धा व आदर या वेळी माझ्या मनात होते. नॉर्वेहून परतताना मी इंग्लडमध्ये जाऊन शेक्सपिअरच्या कबरीलाही अभिवादन केले इब्सेनप्रमाणेच त्या शतकातील इंग्लिश कवी वर्डस्वर्थ आणि रशियन कादबरीकार दस्तृयेवस्की याच्या कबरींचे दर्शन घेण्याची आशा मी बाळगून आहे

इब्सेनची कबर खास पद्धतीची आणि वेगळ्या ठिकाणी असेल, असे मला वाटले होते. प्रत्यक्षात ती अनेक कबरींच्या गजबजाटात आहे. ‘तुमच्या देशात एवढा शुकशुकाट आहे व भरपूर जागा आहे पण एकाकी जीवन जगणाऱ्या इब्सेनला मात्र गर्दीत पुरले गेले आहे, हे जरा अनपेक्षित वाटले,’ मी ह्योग मडळींना म्हणालो त्यावर रॉन्दीबाई म्हणाल्या, ‘या कबरस्तानात नॉर्वेतील मोठमोठी मडळी पुरलेली आहेत.’

कबरीच्या मागे काळ्या सगमरवरासारख्या दगडाचा स्तभ आहे. त्या स्तभावर मात्र एक हातोड्याचे सूचक चित्र आहे बेर्गमानेन म्हणजे ‘खाण कामगार’ नावाची इब्सेनची एक कविता आहे

*‘No, still delve I must not cease*
*Here lives my eternal peace*

*Break my way you hammer batter*
*To the secret heart of matter*

*Hammering and hammering*
*To the last day of life shall bring*

*Never beam of brightness dawning*
*Never sun of hope's full morning’*

या कवितेच्या अखेरच्या ओळी इब्सेनच्या कार्यावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. या स्तभाचा रंगही म्हणून काळाच ठेवण्यात आला आहे. हे चित्र कोरण्याची कल्पना मला आवडली.

आम्ही चौघानी कबरस्तानातून लवकर काढता पाय घेतला. कारण पावसाचा जोर वाढू लागला होता आणि छत्र्या त्या वारा व पावसाला तोंड देऊ शकल्या नसत्या.

नॉर्वेला मी इब्सेनच्या नाटकाचा व मूळ सदर्भाचा अभ्यास करण्यासाठी गेलो आमचे मुख्य ईप्सित साध्य झाले. त्यावरही मी लिहीत आहे. पण या प्रवासाचे ‘बाय प्रॉडक्ट’ तितकेच महत्त्वाचे ठरले

निसर्ग - समृद्धी असेल आणि लोकसंख्या कमी असेल तर आधुनिक प्रगतीचा फायदा घेऊन माणसे किती सुखी व आदर्श जीवन जगू शकतात, याचे जणू साक्षात्कारी दर्शनच आम्हाला घडले चागल्या अर्थी ' पर्यावरण ' महात्म्य प्रत्यक्ष अनुभवूनच आम्ही परतलो इब्सेन, शोकातिका लिहिणारा साहित्यिक, पण त्याचा देश मात्र आनदी आणि अत्युत्कृष्ट जीवन जगतो आहे कडाक्याची थडी व हिम असूनही त्याचे स्वरूप एका नदनवनासारखे आहे.

□

## परतीचा प्रवास

आम्ही जड अत.करणाने उस्लो सोडले आम्ही जेव्हा रेल्वे प्लॅटफॉर्मवर आलो तेव्हा रेखा आणि रॉन्दीबाईंना अश्रू आवरेनात. तुम्ही भारतात या आणि आमचा पाहुणचार घ्या आपण मिळून हिमालयात जाऊ हे आम्ही त्याना पुन्हा सागितले.

साडेदहाला निघून रात्री ८ च्या सुमारास आम्ही बेर्गेनला आलो फिन्सअ व म्यूरदाल भागात पुन्हा जोरदार बर्फ पाहावयास मिळाले. पण या प्रवासात आनद नव्हता. परतीची भावना होती आपण आयुष्यात पुन्हा या सुदर भागात येणार नाही असे वाटत होते आणि तरीही बाहेरची दृश्ये मी काळजीपूर्वक पाहात होतो. एकदा क्षणभरच का होईना आल्हाददायक ऊन डोंगर उतरणीवर पाहावयास मिळाले.

बेर्गेनमध्ये पोहोचलो तेव्हा बऱ्यापैकी पाऊस पडत होता प्रो. ऑर्सेथ आम्हाला घ्यायला आले होते आमच्याच गाडीवर त्याची भाचीही होती हे आम्हाला नतर कळले.

□

## प्रो. ऑर्सेथ यांच्या घरी ६०.

प्रो ऑर्सेथ याचा माझा पत्र परिचय ८७ सालपासूनचा होता त्याच्या सल्ल्याने माझ्या नॉर्वे मुक्कामातील ' नाट्यविषयक ' भाग आखला गेला बेर्गेनमधील शेवटचा आठवडा मी त्याच्या घरी घालविला. आणि त्यानतर मी लडनला गेलो लडनमध्ये मी मायकेल मेयर आणि जॉन नॉर्दम या इब्सेन - अभ्यासकाना भेटावे हा त्यांचा आग्रह होता.

प्रो आसब्योर्न ऑर्सेथ हे बेर्गेन विद्यापीठाच्या ' नोर्दिस्क इन्स्तित्यूत ' मध्ये प्रोफेसर आहेत. नॉर्वेजियन वाङ्मयाचे ते अभ्यासक असून त्याच्या नावावर आठ ग्रंथ आहेत यापैकी दोन इब्सेनवर आहेत *' पेअर ग्यून्ट '* ह्यावर नोर्श्कमध्ये त्याचा मोठा ग्रथ आहे. त्याचा भाऊ केंब्रिजमध्ये प्राध्यापक आहे ऑर्सेथ याची पत्नी बेर्गेन विद्यापीठात इंग्लिशची लेक्चरर आहे. ऑर्सेथ हे वाङ्मयाची नोबेल पारितोषिके देणाऱ्या स्वीडिश अकादमीचे सल्लागारही आहेत.

ऑर्सेथ पतिपत्नी सकाळी ७॥ ला विद्यापीठावर जात व दुपारी तीनला परतत. त्यांच्याबरोबर आम्हीही जात असू त्यांची मुलगी रॉनवे हीदेखील सकाळीच बाहेर पडत असे. ऑर्सेथ याचे घर बेर्गेन विमानतळाच्या बाजूला जे फ्योर्द आहे तिथे होते घरातून विशाल समुद्र आणि बदर दिसत होते घराशेजारी त्यांचे जुने घर होते, त्यात कोणी राहात नव्हते. मी गमतीने त्याना म्हणालो ' ९३ साली आम्ही नॉर्वेला आलो तर तुमच्या जुन्या घरात राहू ' त्यावर ते हसत म्हणाले

' तेथील तक्तपोशी दुरुस्त करून घेतली तरच ते जमेल.'

ऑर्सेथ याचा मुलगा DTP प्रिंटर होता आणि विद्यापीठाच्या त्या विभागात कामाला होता. प्रकाशन व्यवसायात काही करून दाखविण्याची त्याला इच्छा होती रॉनवे ही ज्युनिअर कॉलेजमध्ये होती.

प्रो. ऑर्सेथ म्हणजे विद्वत्ता आणि रसिकता याचा मिलाफ होता अमेरिकेविषयी त्याना विशेष ओढा होता. तीनदा ते अमेरिकेत जाऊन आले होते येल विद्यापीठाविषयी त्याना जिव्हाळा दिसला मात्र ते अमेरिकेमुळे भारावलेले वाटत नव्हते. सधी मिळाली तर भारतात आपण जरूर येऊ असे ते म्हणत. पण ही सधी कशा प्रकारची ह्याबद्दल त्यानी सांगितले नाही त्याच्या घरच्या पुस्तक सग्रहात *Night in Bombay* ही एक कादबरीही होती. अर्थात बरीच जुनी. सोनेरी काड्याचा नाजूक चष्मा सोडला तर ऑर्सेथ दणदणीत होते. सैनिकी अधिकारी म्हणून ते शोभून दिसले असते. उलट त्याची पत्नी इगेर ही उच असली तरी कृश आणि आजारलेली वाटत होती. असे आजारलेले असणे ख्रिश्चन असण्याला पूरक व शोभून दिसते तिचा चेहरा थकल्यासारखा वाटत होता. पण याबाबत आम्ही खोदून काय पण वरवरही प्रश्न विचारले नाहीत.

ऑर्सेथ यांचीही एक बोट होती. उन्हाळ्यात बोटीवरून समुद्रात फिरायला जायचे हा त्याच्या कुटुबियाचा आवडता छद होता. वल्ही मारायची, शिडे उभारायची आणि फिरायचे. हात थकले की बोट चालविण्यासाठी इंजिन वापरायचे. उत्तम बोटीची किंमत उत्तम मोटारीएवढी असते म्हणजे साठ ते सत्तर हजार क्रोनर्स एवढी असते म्हणजे दीड

ते पावणे दोन लाख रुपये. महाराष्ट्रातील नद्याना पाणीच नसते आणि खूप मोठी किनारपट्टी असली तरी बोटिंगला एकदर मराठी जीवनात काहीच स्थान नाही हे ऐकून त्याना खूप आश्चर्य वाटले प्रथम मी गमत करतो आहे असे त्याना वाटले. नतर आपल्याकडचे हवामान, नद्याची पात्रे, धरणाचे दुष्परिणाम, समुद्रावर असलेले कडक उन इ इ गोष्टी मला त्याना समजावून सागाव्या लागल्या.

ऑर्सेथ याचे राहणीमान चागले होते. त्याचा दिवाणखाना प्रशस्त होता. त्याच्या दुमजली घरात एकूण दहा खोल्या होत्या. त्यांपैकी तीन खोल्या ज्या खालच्या मजल्यावर होत्या - त्या तात्पुरत्या दूरच्या नात्यातील जोडप्याला राहायला दिल्या होत्या सर्व आधुनिक उपकरणे त्याच्या घरात होती त्याची गाडी टोयाटा होती पत्नी इंगेर ही कम्प्यूटरवर स्वत च्या कसल्यातरी नोट्स तयार करीत होती.

आम्ही ज्या दिवशी त्याच्याकडे राहायला आलो त्या दिवशी उस्लोतील त्याची भाचीही त्याच्याकडे आली होती उस्लोतील वातावरण व विद्यापीठातील वातावरण इपर्सनल होत चालल्यामुळे ती बेर्गेनला आली होती ही भाची धिप्पाड होती पण तिचा चेहरा मात्र नाजूक व हसरा होता ती अमेरिकन पद्धतीची जीन्स घालत होती. दुसऱ्या गावात शिकायला गेले की भत्ता मिळतो असा भत्ता तिला मिळणार होता आणि तिचे शिक्षण ऑर्सेथ पतिपत्नींच्या पालकत्वाखाली पार पडणार होते

आपल्याकडे प्राध्यापकाचे राहणीमान बरे असले तरी त्याची स्वत ची खासगी पुस्तके फारशी नसतात. ऑर्सेथकडे स्वत ची पुस्तके भरपूर होती. त्याची पत्नी इंग्लिशची लेक्चरर ( प्राध्यापक नव्हे ) असल्याने इंग्लिश कादबऱ्या, नाटके, कवितासग्रह भरपूर होते नॉर्वेजियन साहित्य तर खूपच होते ऑर्सेथ याचे इंग्लिश चागले होते पण इग्लिश वाङ्मयाबद्दल त्याना विशेष आस्था दिसली नाही. मात्र ऑक्सफर्ड आणि केंब्रिज या दोन्ही विद्यापीठात काही गोष्टी चागल्या आहेत असे ते म्हणत कोणत्या गोष्टी चागल्या आहेत याविषयी मी विचारणा केली नाही

ऑर्सेथ आणि त्याचा मुलगा हे धार्मिक नव्हते मुलगा गावात स्वतत्र राहात होता. मादाम इंगेर या धार्मिक होत्या त्याचा ५० वा वाढदिवस नुकताच झाला होता त्यांना मी विचारले, '५० वा वाढदिवस झाला आयुष्याचा एक टप्पा तुम्ही पूर्ण केला. यानिमित्त काही नवे सकल्प नवे मनोरथ ?'

'परमेश्वराच्या इच्छाशक्तीत समरस होणे हा माझा सकल्प ' इगेर

'ही एक धूसर कल्पना झाली काही नक्की प्रॉजेक्ट, नक्की योजना.' मी

'नक्की म्हणजे ?' इगेर

' उदाहरणार्थ बायबलवर प्रवचने देणे, लिहिणे.' मी

' तसा काही नाही ' इगेर

ऑर्सेथ पितापुत्र इंगेरची आणि तिच्या ख्रिश्चन श्रद्धाची खिल्ली उडविण्यासही कमी करत नसत एकदा मुलगा म्हणाला, ' तुझा ख्रिश्चन तत्त्वावर विश्वास आहे मग सोड नोकरी बायबलमध्ये स्त्रियानी नोकरी करू नये असे सागितले आहे ' याबाबत तिने सदर्भवाद सागून मारून नेण्याचा प्रयत्न केला. पण ते जमेना

ऑर्सेथ कुटुब मजेत होते. तिघे मिळवते होते. सारेच जण सहा फूट उचीच्यावर होते. त्या कुटुबात मी व रेखा बुटके वाटत होतो. ऑर्सेथच्या मुलाचे व आमचे छान जमले. ऑर्सेथ तर आम्हाला निमत्रण देणाऱ्यापैकीच होते. त्याना पद्धतशीर अभ्यासाची फार आवड होती. माझे कौतुक होते. त्यानी न केलेली एक गोष्ट फक्त खटकली ती म्हणजे त्यांच्या सहकाऱ्याशी त्यानी आमची फक्त तोंडओळख करून दिली परिचय जास्त वाढावा असे केले नाही.

प्रो. ऑर्सेथ याच्याशी वाङ्मयविषयक इतक्या गप्पा झाल्या की सागता येणार नाही. मतभेद होत पण अनेक ठिकाणी सूर जुळत. इब्सेनप्रमाणेच दस्तुयेवस्की हाही त्याचा आवडता साहित्यिक होता माणूस आणि निसर्ग यादृष्टीने वर्डस्वर्थ माणूस आणि माणसाच्या अतरंगातील माणूस या दृष्टीने दस्तुयेवस्की आणि माणूस व समाज या दृष्टीने इब्सेन ह्याचा मी सखोल अभ्यास करतो आहे. माझ्या समीक्षेमागे एक वैचारिक चौकट आहे हे पाहिल्यावर त्याना समाधान वाटलेले दिसले मात्र ' समजून घ्या, मूल्यमापनाची घाई करू नका ' ह्या माझ्या दृष्टिकोणाची त्यानी काही वेळा थट्टाही केली. त्यावर मी त्याना म्हणालो,

माझ्या मागे पौर्वात्य विचारही उभे आहेत. कनफ्यूशिअस आणि रामदास याच्या विचाराचा माझ्यावर प्रभाव आहे. त्यामुळे मी जास्त गुतागुतीच्या विचारमिश्रणाद्वारे काम करीत आहे. तुम्ही भारतास भेट दिलीत व तेथील वाङ्मय अभ्यासलेत तर कदाचित तुम्हीही माझ्यासारखे मत बनवाल.'

□

## ६१. होकॉन्स हॉल

उस्लोहून आम्ही परत बेर्गेनला आलो. त्यानतर एक महत्त्वाची भेट उरकली ती होकॉन्स हॉलची. हा किल्ला बेर्गेनच्या फ्योर्दवर आहे हा किल्ला, विशेषत त्यातील

प्रमुख दरबार - हॉल ज्या राजाने बाधला तो होकॉन ४ था, इब्सेनच्या *कोंग्जएमूनेर्नें* नाटकाचा नायक आहे. अर्थात इब्सेनच्या नाटकाची कथा प्रत्यक्ष हा हॉल बाधण्याच्या अगोदरच्या काळातील आहे

हा किल्ला आता पद्धतशीर म्युझियम म्हणून सजविला आहे लडन टॉवरची छोटी प्रतिकृती म्हणाना ! हिवाळ्यात म्युझियम बद होते आणि किल्लाही उघडा नव्हता. पण रोटरी क्लब उसचे उपाध्यक्ष कर्नल ओब्रेक हेच या वास्तूचे इन्चार्ज असल्यामुळे त्यानी हौसेने आमची भेट ठरविली आणि त्यासाठी भरपूर वाचनही केले.

गेल्या गेल्या आम्ही कर्नल ओब्रेक याच्या ऑफिसमध्ये गेलो. ते युनिफॉर्ममध्ये होते आणि आतुरतेने आमची वाट पाहात होते आमच्याबरोबर हेन्रिकसन होतेच. कॉफीपान करीत करीत व केक्स खात आम्ही कर्नलसाहेबानी किल्ल्याविषयी दाखविलेला स्लाईड शो पाहिला विशेष म्हणजे किल्ला व त्याच्यामागच्या इतिहासाची खडान्खडा आणि जास्त अचूक माहिती हेन्रिकसनना होती.

नॉर्वेला ' राष्ट्र ' म्हणून उदयास आणण्याचे श्रेय होकॉन होकॉन्सन याच्याकडे जाते तेराव्या शतकातील या राजाने नॉर्वेत एकी निर्माण केली, राज्यकारभार सुधारला, आणि नॉर्वेच्या बलाढ्य आरमाराचा पाया घातला त्याच्या काळात बेर्गेन ही नॉर्वेची राजधानी होती आणि ती भरभराटीसही आली. राज्याभिषेकाच्या वेळी उत्कृष्ट दरबार हॉल नाही ही खत वाटून होकॉनने हा पॅलेस - किल्ला बाधला वास्तू भव्य आणि भक्कम आहे. दुसऱ्या महायुद्धातील पडझड सोसूनही ही वास्तू दिमाखाने उभी आहे

हा किल्ला दाखविताना ओब्रेक आणि हेन्रिकसन इतके रगात आले होते की त्यानी साऱ्या होकॉन राजाचा इतिहासच आम्हाला ऐकविला त्याचा परिणाम म्हणून नतर मी पुढे सुप्रसिद्ध होकॉन चॉकलेट्सचा पुडा तर फस्त केलाच पण त्याचे कव्हरही जपून ठेवले कारण त्या चॉकलेटच्या पुड्यावर होकॉन राजाची नावे होती व त्या राजघराण्यातील मुकुटाचे सोनेरी चित्रही आपणा मराठी माणसाना जसे भोसले राजघराण्याचे कौतुक आहे तसेच नॉर्वेतील माणसाना होकॉन घराण्याचे दिसले.

खदक, जबरदस्त जड दरवाजे, जाड भिती, तळघरे, तुरुग, मोठ्या प्रमाणावर जमविलेली शस्त्रास्त्रे, वस्तू, तट, बुरूज, साधे पण महत्त्वाचे चॅपेल, या साऱ्या गोष्टी येथे होत्याच तळघरातील अगदी खालच्या मजल्यावर अधार कोठडी होती ती पाहून अगावर शहारे आले. ती पाहून मी म्हणालो,

' कर्नलसाहेब, या गारव्यात मी तुम्हाला दिलेल्या त्रासाबद्दल तुम्ही आता मला येथेच तर बदिवान् करणार नाही ना ? '

त्यावर ओब्रेक हसून म्हणाले, ‘ उलट तुम्ही दाखविलेल्या उत्साहाबद्दल मी तुम्हाला आता रोझेनक्रान्ट्झ टॉवरवरील सर्वांत उच्च जागी नेणार आहे ’

मग आम्ही तेथे गेलो तेथून बेर्गेनचे सुरेख दर्शन होत होते. मात्र वारा इतक्या जोरात वाहात होता की तेथे उभे राहाणे केवळ अशक्य होते

□

## ६२. बेर्गेनची चित्र संग्रहालये

बेर्गेनमध्ये ‘ रोसमुस मेयर कलेक्शन ’ आणि ‘ रोल्फ स्टेरनेसन कलेक्शन ’ अशी दोन म्युझियम्स एकमेकाला लागून आहेत. रविवार असल्याने ती बंद असावीत असे वाटले होते पण ती उघडी होती.

रोल्फ स्टेरेन्सन छत्री घेऊन काही माणसाच्या अंगावर जातो आहे असे छायाचित्र प्रसिद्ध झाले होते. हा माणूस कलावादी आहे. त्याच्या नावाने म्युझियम आहे ह्या दोन्ही म्युझिमयमध्ये उत्तमोत्तम चित्रे आहेत तरी अजून युरोपीय दर्जा त्याना प्राप्त झालेला नाही इमारती तुलनेने नव्या असल्याने त्या मात्र कलात्मक व स्वच्छ प्रकाश आत असणाऱ्या आहेत. या म्युझियममध्ये पिकासोची दहा तर पॉल सेझॉनची सहा चित्रे आहेत.

गूदअ्, डाल इ थोर नोर्स्क चित्रकाराचीही भरपूर चित्रे येथे आहेत. मला विशेष वाटले ते हे की नॉर्वेतील लहान मोठे चित्रकार काही क्वचित अपवाद सोडले तर कॉन्टिनेन्टल चित्रकाराचे अनुकरण करताना दिसत नाहीत त्याची वृत्ती स्वतःची वैशिष्ट्ये जपण्याकडे दिसते. चित्रे भरघोस वाटतात. ‘ नॉर्वेतील निसर्ग ’ आणि नॉर्वेच्या इतिहासातील प्रसग ’ साहजिकच केंद्रस्थानी आहेत. उस्लोतील नॅशनल गॅलरी साहजिकच भव्य व जास्त समृद्ध आहे पण बेर्गेनच्या या गॅलऱ्यादेखील समाधानाकारक वाटतात एक कलाकृती उभ्या पातळ गजाची होती एका गजाला धक्का लावला की सारा गजसमूह हाले व संगीत निर्माण होई त्याची फार मौज वाटली.

चित्रकला म्युझियम्समध्ये आमची मजल इंप्रेशनिस्ट व एक्सप्रेशनिस्ट चित्रांपर्यंत जाते. चित्रेकलेतील ‘ मॉडर्न आर्ट ’ आमचे मन आकर्षून घेत नाही प्रो. ऑर्सेथ याना चित्रकलेची आवड होती पण तो त्यांचा प्रांत नव्हता आणि मला युरोपीय चित्रकलेचीही इतकी जाण व माहिती असेल असे त्याना वाटले नव्हते.

चित्रकलेचे आणि इब्सेनचे अतूट नाते आहे. आणि बेर्गेनमधील म्युझियम्स पाहताना माझे मन नकळत ह्या नात्याचा तपशील शोधत होते. फ्रेंच किंवा इटालियन समाजच पिंडाने चित्रकलाप्रेमी चित्रकार आहेत नॉर्वेत चित्रकलेचे पुरेसे कौतुक आहे तरी देखील मला नॉर्वेजियन समाज आणि चित्रकला एकजीव झालेले वाटले नाहीत

□

## नॉर्वेचा निरोप

६३.

८ फेब्रुवारी ९० या दिवशी आम्ही बेर्गेन सोडून परतीच्या प्रवासास निघणार होतो. त्या दिवशी आम्ही सपूर्ण मोकळा वेळ ठेवला होता ऑर्सेथ कुटुब मात्र सकाळीच आपापल्या उद्योगाला निघून गेले.

आमची अत.करणे जड झाली होती पण सारे सामान काळजीपूर्वक आवरले. भेट म्हणून मिळालेली पुस्तके, जमा केलेले फोल्डर्स, पुस्तके, झेरॉक्स कागद याच्यातील निवडक तेवढेच ठेवले व त्याचे पार्सल तयार केले. ते समुद्रमार्गे भारताला पाठवून द्यायचे होते काय घ्यावे अन् काय घेऊ नये हे ठरविणे जड जात होते पार्सल पोस्ट करण्यासाठी दोनशे क्रोनर्स खर्च आला

ऑर्सेथ याची दोन माजरे आम्ही दोघे परके घरात आहोत हे पाहून बिचकत होती त्याचे घर बगल्याच्या दारातच होते मी बशीभरून दूध त्याना दिले. ते देताना मला आमच्या घरच्या ' गुडी, श्वेता, मोजे ' याची आठवण होत होती. ही माजरे ही आमच्या माजराच्या दुप्पट मोठी होती आणि त्याच्या अगावर खूप जाड केस होते.

नॉर्वेतून निघण्याच्या दिवशी आम्हाला भारताची आठवण होत नव्हती. कारण वाटेत दोन आठवडे तरी आम्ही लडनला थाबणार होतो ब्रिटिश कौन्सिलने तेथे आमच्यासाठी एक व्हिजिटरशिपचा कार्यक्रम आखलेला होता आणि लडन म्हणजे जरा चागली मुबई त्यामुळे मनात थोडी उत्सुकता आणि खूप नाराजी अशा भावना एकमेकात मिसळल्या होत्या आम्हाला तथाकथित मोठी शहरे बिलकूल आवडत नाहीत

ऑर्सेथ याचे सुदर घर आणि सभोवतालचा रम्य निसर्ग मी मनात साठवून घेत होतो समोरच्या फ्योर्दचे बारकावे न्याहाळत होतो. युरोप सोडून परतण्याचा अनुभव नवा नव्हता पण या वेळी मी आणि रेखा एकत्र होतो ही घटना नवी होती.

ऑर्सेथ मंडळी २ ।। ला परतली. रॉनवेनी आमचे फोटो घेतले. रॉनवेला मी भारताचा तिरंगी ध्वज दिला आणि म्हणालो, ' नॉर्वे - भारत मैत्रीचा ध्वज रॉनवे तुला फडकत ठेवायचा आहे मी आणि तुझ्या वडिलांनी सुरुवातीचे पाऊल टाकले खरी जोपासना तुझ्यासारख्या तरुण - तरुणींच्या हाती आहे '

रॉनवेला आनंद वाटला. ती म्हणाली, ' १७ मे ला आमचा स्वातंत्र्यदिन असतो त्या दिवशी मी मिरवणुकीत हाही ध्वज फडकवेन.'

ऑर्सेथ यांचे घर टेकडीच्या उतारावर होते. आम्ही तो उतरून खालच्या भागात फेरफटका मारून आलो. पार्सल पोस्ट केले एक अगदी नव्या पद्धतीने बांधलेले चर्च आढळले आम्ही काचातून आत डोकावू शकलो पण आत प्रवेश करता आला नाही कारण ते बंद होते. निघतानाही देवळात गेलो असतो, योगायोगाने झाले असते का होईना पण वाटेत देऊळ लागले.

बहुतेक दुकाने बंद होती. रेखाने खास नॉर्वेजियन चॉकलेट्स मिळतात का ते पाहिले पण ऐन वेळी चॉकलेट्स विमानतळावरच घ्यायची असे ठरले. ऑर्सेथनी ब्रेड विकत घेतले. आम्ही रमत गमत गप्पा मारीत परतलो. नॉर्वेतील अखेरचे डिनर जोरात झाले मेणबत्त्यांनी वातावरण उजळले होते कोणार्क मंदिराच्या चाकाची प्रतिकृती मी ऑर्सेथना भेट दिली

एअरपोर्टवर डॉ कृष्णा आम्हाला भेटायला येणार होते. आम्ही बराच वेळ त्यांची वाट पाहिली ऑर्सेथ व आमच्या गप्पा या वाट पाहण्यामुळे नीट होऊ शकत नव्हत्या. ऑर्सेथ यांना मी म्हणालो,

' मी येथे परत येऊ शकेन असे तुम्हाला वाटते काय ? का ही आपली शेवटची भेट आहे ?'

ते म्हणाले, ' आमचा देश लोकशाही देश आहे. तुम्ही येऊ शकता. आणि मला वाटते की नॉर्वे तुम्हाला आवडला असणार हा तुमच्या इब्सेनचा देश आहे.'

या उत्तराने माझे समाधान झाले नाही ऑर्सेथ यांच्या शब्दामागच्या भावना मला नीट उमगल्या नाहीत.

डॉ कृष्णा येत नाहीत असे पाहून आम्ही कस्टममधून जाण्याचे ठरविले आमचे सामान तपासणी यंत्राखालून जाताना अडचण आली नाही दरवाज्यातून पलीकडे जाताना मात्र अडचण आली. शिट्टी वाजू लागली. रेखाच्या अंगावर काही धातूचा

तुकडा असावा. तिची जरा झडती घेतल्यासारखे केले गेले. ऑर्सेथही बुचकळ्यात पडले होते. नंतर कळले की तिची हेअरपिन ओव्हर कोटच्या खिशात लपली होती.

आम्ही पलीकडे आलो. ऑर्सेथना तेथून निघवत नव्हते. ते उलटे थोडे थोडे मागे सरकत होते आम्ही एकमेकाकडे पाहून हात हलवीत होतो. अखेर ऑर्सेथ निघून गेले. आणि आम्ही आमची SAS ची फ्लाईट ज्या दरवाज्यावर लागणार होती तिकडे वळलो.

नॉर्वेने आम्हाला निरोप दिला नव्हता तर आम्ही नॉर्वेचा निरोप घेत होतो. नॉर्वेला १९९३ साली परत येण्याचे निमंत्रण माझ्याजवळ होते

□ □

RFFBK-0026558